स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

*वीजनिर्मिती पिढ्यान्‌पिढ्यांसाठी*

# वार्षिक अहवाल २०२०-२०२१



महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल
## २०२०-२०२१

# वार्षिक अहवाल २०२०-२०२१

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- |
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ००१ |
| संचालक मंडळाचा अहवाल | ००३ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ०४१ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (स्वायत्त) | ०५० |
| ताळेबंद (स्वायत्त) | ०६५ |
| नफा-तोटा विवरण (स्वायत्त) | ०६६ |
| समभाग भांडवलाचे विवरणपत्र (स्वायत्त) | ०६७ |
| रोकड प्रवाह विवरण (स्वायत्त) | ०६८ |
| वित्तिय विवरण पत्रात येणाऱ्या अनुसूची (स्वायत्त) | ०७० |
| लेखा परिक्षकांचा अहवाल (एकत्रित) | १२१ |
| ताळेबंद (एकत्रित) | १३९ |
| नफा-तोटा विवरण (एकत्रित) | १४० |
| समभाग भांडवलाचे विवरणपत्र (एकत्रित) | १४२ |
| रोकड प्रवाह विवरण (एकत्रित) | १४३ |
| वित्तिय विवरण पत्रात येणाऱ्या अनुसूची (एकत्रित) | १४५ |
| दिर्घ मुदतीची कर्जे | १९८ |
| अल्प मुदतीची कर्जे | २१९ |
| महानिर्मिती प्रकल्प | २२१ |

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## संचालक मंडळ
## ( ०१-०४-२०२० पासून वार्षिक सर्वसाधारण सभेची दिनांक २०.०९.२०२१ पर्यंत )

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** | : | श्री. संजय खंदारे (१०.०८.२०२० पासून)<br>श्रीमती शैला ए (१७.०१.२०२० पासून १०.०८.२०२० पर्यंत) |
| **संचालक ( संचलन )** | : | श्री. सी.एस. थोटवे (१६.०३.२०२१ पासून)<br>श्री. राजू बुरडे (अतिरिक्त भार ३१.०८.२०२० पासून १६.०३.२०२१ पर्यंत) |
| **संचालक ( वित्त )** | : | श्री. बाळासाहेब थिटे (१५.०९.२०२० पासून)<br>श्री. एस. के. लाबडे (अतिरिक्त भार १०.०८.२०२० पासून १५.०९.२०२० पर्यंत)<br>श्री. एस. जे. आंबेरकर (११.०८.२०१७ पासून १०.०८.२०२० पर्यंत) |
| **संचालक ( खनिकर्म )** | : | श्री. पी. व्ही. जाधव (०१.०६.२०१९ पासून) |
| **संचालक ( प्रकल्प )** | : | श्री. व्ही. थंगपंडियन (१०.०४.२०१९ पासून) |
| **संचालक** | : | श्री. डी.टी. वाघमारे (२९.०१.२०२१ पासून)<br>श्री. असीम गुप्ता (१७.०१.२०२० पासून २९.०१.२०२१ पर्यंत) |
| **संचालक** | : | श्रीमती जुईली वाघ (१५.०६.२०१८ पासून ०६.०७.२०२० पर्यंत) |
| **संचालक** | : | श्रीमती स्वाती व्यवहारे (२२.०१.२०२१ पासून) |

## संचालकांचा अहवाल

प्रिय सदस्य,

आपल्या कंपनीचा १६वा वार्षिक अहवाल आणि त्यासोबत दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरिक्षित वार्षिक लेखे सादर करण्यास आपल्या संचालक मंडळाला आनंद होत आहे.

### वित्तीय निष्कर्ष ( स्वायत्त )

(₹ कोटीत)

| तपशील | २०२०-२१ | २०१९-२० पुनर्लिखित* |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| वीज विक्री पासून महसूल (निव्वळ) | २३५७५ | २४६५६ |
| इतर उत्पन्न | ५० | ८० |
| **एकत्रित उत्पन्न** | २३६२५ | २४७३६ |
| **खर्च** | | |
| वापरलेल्या मालाचा खर्च | १३४९२ | १४३९८ |
| कर्मचारी खर्च | १४२९ | १८२८ |
| वित्त खर्च | ३६३७ | ३५७९ |
| घसारा/कर्जफेडीची तरतूद | २७३८ | २७७९ |
| इतर खर्च | १९०४ | १९२८ |
| **करपूर्व नफा** | ४२५ | २२४ |
| कर निव्वळ (स्थगित कर खर्चासहीत चालू कर) | १४९ | ६४ |
| **निव्वळ करोत्तर नफा** | २७५ | १६० |
| नफा आणि तोटा या मध्ये पूनर्वर्गीकरण न होणाऱ्या बाबी (इतर सर्वकष उत्पन्न) | ०.५६ | (१२३) |
| व्याख्यांकित लाभ योजनांचे पूनर्मापन | | |
| इतर सर्वकष (बाबी) उत्पन्नातील बाबींवर कर खर्च | | |
| **कालावधीतील एकूण सर्वकष उत्पन्न, करोत्तर मिळकत** | **२७६** | **३७** |

* भारतीय लेखा मानकानुसार, मागील वर्षातील एखादी नोंद चालू वर्षात केली असल्यास, मागील वर्षातील आकडेवारी नफा व तोटा आणि ताळेबंद पत्रकात सादर करण्यासाठी 'पूनर्लिखित' करण्यात येतात.

### वित्तीय कामगिरी

आढाव्याच्या वर्षात वीज विक्री आणि इतर प्रवर्तनातील महसूल यापासुनच्या उत्पन्नात ४.३८ टक्यांची घट झाली आहे. हे ₹ २४६५६ कोटी वरुन ₹२३५७५ कोटी असे कमी झाले. उत्पन्नातील ही कपात प्रामुख्याने कोव्हीड-१९ या आजारामुळे वित्तीय वर्ष २०२०-२१ च्या पहिल्या भागात औद्योगिक कामांवर झालेल्या बाधक परिणामांमुळे झाली आहे. या काळात विजेच्या गरजांवर प्रभाव पडला. तसेच व्याजदरात घट केल्यामुळे अधिभार देयकातील ₹३० कोटी घट झाली. या कालावधीत इतर उत्पन्न ₹ ५० कोटीने कमी मिळाले. अशाप्रकारे, मागील वर्षाच्या तुलनेत, या वर्षी एकूण उत्पन्न ४.४९ टक्याने कमी झाले आहे. यावर्षी वीज निर्मिती कमी करावी लागल्याने कोळसा कमी वापरला आणि त्यामुळे ६.२८ टक्के साहित्य कमी वापरले. ते ₹१४३९८ कोटीवरुन ₹ १३४९२ कोटी कमी झाले. कर्मचारी खर्च मागील वर्षी ₹ १८२८ कोटी होता तो यावर्षी ₹ १४२९ कोटी असा कमी झाला. मागील वर्षी वेतन श्रेणीतील सुधारणांमुळे व रजा रोखीकरण यासाठी तरतूद केल्याने कर्मचारी खर्च जास्त झाला होता. चालू वर्षाचा वीज खर्च

₹३६३७ कोटी होता. मागील वर्षी तो ₹३५७९ कोटी इतका होता. ही वाढ खेळत्या भांडवलीच्या कर्जाच्या व्याजदर वाढीमुळे झाली आहे. कंपनीच्या जुना मत्तांचा घसारा आता त्यांच्या कमाल घसारा मूल्यापर्यंत खाली आल्याने घसारा/कर्जफेड तरतूद यांच्यात १.४८ टक्क्याने घट झाली आहे. यामुळे कंपनीचा कर पूर्व नफा ₹४२५ कोटी झाला आहे. मागील वर्षी तो ₹२२४ कोटी (पुनर्लिखित) होता. आयकर तरतूद आणि इतर सर्वकष उत्पन्नासाठी (निव्वळ) समायोजन केल्यानंतर गतवर्षीच्या ₹३७ कोटी (पुनर्लिखित) नफ्यावरुन यावर्षी ₹२७६ कोटी (निव्वळ) नफा झाला आहे.

१. **वित्त खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न :** महानिर्मिती कंपनीने तिचे प्रकल्प आणि भांडवली खर्च खेळती भांडवली कर्जे यासाठी असलेल्या व्याज दर कमी करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नामध्ये विद्यमान धनको (कर्जदाते) यांच्याशी विचार विमर्श करणे, अति महाग कर्जाची मुदती पूर्ण होण्यापूर्वीच त्यांची परतफेड करणे. महागड्या कर्जांचे रूपांतर कमी खर्चाच्या/कमी व्याजदराच्या कर्जात करणे, नवीन कर्जे स्वरूप स्रोताकडून मिळविणे, कर्जाच्या पुन: वित्त पुरवठ्यासाठी स्वारस्याच्या अभिव्यक्ती प्रसिध्द करणे आदिंच्या समावेश आहे या मुळे वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये व्याज खर्चात ₹३३७ कोटींची बचत झाली.

२. **आयकर अधिनियमाचे कलम ११५बी एए नुसार नवीन कर पध्दती स्वीकारणे :** आयकरातील तरतुदीप्रमाणे महानिर्मिती कंपनीला आयकर अधिनियमातील कलम ११५ जेबी नुसार पुस्तकी (नोंदलेल्या) नफ्यावर किमान पर्यायी कर भरावा लागणार होता. सप्टेंबर २०१९ मध्ये कर कायदा (दुरुस्ती) विधेयक २०१९ मांडण्यात आले. आयकर अधिनियमात नव्याने अंतर्भूत/समाविष्ट केलेल्या कलम ११५बी एए द्वारा देशांतर्गत कंपन्यांच्या कॉर्पोरेट कराच्या दरात दुरुस्त्या/सुधारणा यांची तरतूद केली आहे. जी कंपनी कलम ११५बीएए नुसार कराचा पर्याय स्वीकारेल तिला आयकर अधिनियमानुसार मिळणारे विद्यमान लाभ सोडावे लागतील आणि त्या कंपनीला ३० टक्के ऐवजी २२ टक्के या सवलतीच्या दराने कर भरावा लागणार आहे. याशिवाय कलम ११५बीएए यात कंपनीला किमान पर्यायीकर अनुसार आयकर भरण्याची माफी/सूट मिळते. महानिर्मितीने कलम ११५बी एए यातील तरतुदी स्वीकारल्या आहेत. त्यामुळे वित्तीय वर्ष २०२०-२१ साठी किमान पर्यायी कर अंतर्गत भरावयाच्या रु. ९२.४१ कोटीची बचत झाली आहे.

३. **प्रवर्तनातील कामगिरी :** महानिर्मिती कंपनीची एकूण स्थापित क्षमता दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी १३१८२ मे.वॅ. होती याची स्त्रोतानुसार विभागणी अशी - कोळसा आधारीत औष्णिक वीज निर्मिती - ९७५० मे.वॅ., वायु आधारीत वीज निर्मितीची स्थापित क्षमता - ६७२ मे.वॅ. जलविद्युत निर्मिती क्षमता : २५८० मे. वॅ. आणि सौर वीज प्रकल्पांची क्षमता - १८० मे.वॅ.




४. आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये (महानिर्मिच्या केंद्राचा) संयंत्र भार अंक (पीएलफ) ५१.३८ टक्के होता. मागील वर्षी तो ५३.२९ टक्के होता. वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रासाठी वायूची सरासरी उपलब्धता वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये ४९.४९ टक्के होती आणि त्यांचा संयंत्र भार अंक ३४.११ टक्के होता. कारण उरण येथील केंद्रास वीज निर्मितीसाठी कमी वायू मिळाला. वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये कोळशाची प्राप्ती ७०.०४ टक्के होती. ती मागील वर्षी ६१.६१ टक्के होती. वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये विशिष्ट कोळसा वापर ०.८००

केजी/केडब्ल्यूएच होती. ती मागील वर्षी ०.७८५ केजी/केडब्ल्यूएच होती. विशिष्ट कोळसा वापर यात जास्त करावा लागला कारण गेल्या वर्षाच्या तुलनेत या वर्षी मिळालेला दर्जा खराब होता. वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये जाळलेल्या कोळशाचे सरासरी ठोक कैलोरीफिक मूल्य ३०८१ के कॅलरी/केजी असे होते. ते मागील वर्षी ३१११ के कॅलरी/केजी होते. बॉयलर ट्यूब गळतीची टक्केवारी यामध्ये वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये २.६५ टक्के अशी वाढ झाली. मागील वर्षी ती २.०२ टक्के होती. तसेच वित्तीय वर्ष २०२०-२१ एमएल/केडब्ल्यूएच मध्ये विशिष्ट तेलाचा वापर १.०९ असा झाला. मागील वर्षी तो २.१३ एमएल/केडब्ल्यूएच होता.

सहयोगी वीज वापर वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये ८.२७ टक्के होता. तो मागील वर्षी ८.५२ टक्के होता. कारण यावर्षी जास्त संख्येने वीज निर्मितीचे युनीट्स सुरु करण्यात आले, काही युनीट्स आरक्षणानुसार बंद ठेवावी लागली (आरएसडी) (रिझर्व्ह शट डाऊन) याशिवाय (एलडी-लॉकडाऊन) ताळेबंदी तसेच कोळशाची टंचाई आणि कमी दर्जाचा कोळसा मिळाले. यामुळे सुध्दा काही युनीट्स कमी प्रमाणात कार्यरत होती.

**वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि वित्तीय वर्ष २०१९-२० मधील महानिर्मितीची वीज निर्मितीची स्थापित क्षमता आणि वीज निर्मिती.**

**( दशलक्ष युनीट्स मध्ये )**

| वीजनिर्मिती ( स्त्रोत ) | स्थापित क्षमता मेगावॅट ( MW ) मध्ये | २०२०-२१ वीज निर्मिती द.ल.यू. मध्ये | २०१९-२० वीज निर्मिती द.ल.यू. मध्ये |
|---|---|---|---|
| औष्णिक | ९७५० | ४३८८० | ४५६४० |
| वायु | ६७२ | २००८ | २५९८ |
| जल विद्युत | २५८० | ४०३३ | ४५६९ |
| सौर | १८० | २६८ | २६६ |
| **एकूण** | १३१८२ | ५०१८९ | ५३०७४ |

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे मापदंड**

| अनु क्र. | मापदंड | २०२०-२०२१ | | २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रमाणक | प्रत्यक्ष | प्रमाणक | प्रत्यक्ष |
| १ | उपलब्धता अंक (एवीएफ)% | ८३.०२ | ७८.०३ | ८३.०२ | ७०.७८ |
| २ | उष्णता दर (केकॅल/केडब्ल्यूएच) | २४६८ | २४७५ | २४६८ | २४६३ |
| ३ | सहयोगी वीज वापर % | ७.७२ | ८.२७ | ७.७२ | ८.५२ |
| ४ | विशिष्ट तेल वापर (एमएल/केडब्ल्यूएच) | १.१० | १.०९ | १.१० | २.१३ |
| ५ | कोळशाची प्रवासातील हानी % | ०.८० | ०.७४ | ०.८० | ०.७१ |

**एकूण वीज निर्मिती - दशलक्ष युनिटमध्ये ( MUS )**




| | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|
| महानिर्मिती वीज निर्मिती | ५३१०४.५९ | ५२७४९.८९ | ५३०७४ | ५०१८९ |
| औष्णिक वीज निर्मिती | ४६०६४.३८ | ४६१३५.२६ | ४५६४० | ४३८८० |

**एकूण वीज निर्मिती - दशलक्ष युनिटमध्ये ( MUS )**




**लाभांश :**

आपल्या कंपनीच्या मोठ्या प्रमाणात भांडवली खर्चाच्या योजना आहेत त्यामुळे त्यासाठी मोठ्या समभाग निधीची गरज आहे. या कारणांमुळे जर काही रोख रकमेचे आधिक्य निर्माण झाले तर ते विस्तारासाठी लागणाऱ्या निधीत आणि भविष्यातील भांडवली खर्चाच्या योजनामध्ये पून्हा गुंतविण्याचे संचालकांनी ठरविले आहे. म्हणून या आढावा वर्षासाठी आपल्या कंपनीच्या संचालकांनी कोणताही लाभांशची शिफारस केलेली नाही.

## क्षमता वाढीचे कार्यक्रम

### १. औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प

महानिर्मिती कंपनीने ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात विविधता आणण्याचे मिशन यापूर्वीच ठरविलेले असून महाराष्ट्र राज्याची विजेच्या गरजा पूर्ण करणारी जबाबदार वीज निर्मिती संस्था होण्याचे धेय्य अंगिकारले आहे. त्याला अनुसरुन महानिर्मीतीने कोळसावर आधारित वीज निर्मिती करणारे नवे प्रकल्प हाती घेतले आहेत- तसे प्रस्तावित केले आहेत. या प्रकल्पांसाठी अत्यंत कार्यक्षम व अद्यावत तंत्रज्ञानाचे अधिष्ठान असेल. महानिर्मितीच्या जुन्या स्थापित क्षमतेची जागा नवीन प्रकल्प घेतील तसेच नव्या प्रकल्पासाठी पर्यावरण स्नेही असतील त्यांना लागणारा कोळसा वीज निर्मिती केंद्राचा नजीकच्या कोळसा खाणीतून कोळसा पर्यावरण स्नेही पाईप कन्व्हेयरने वाहून आणणाऱ्या या प्रकल्पाची आहे. तशी कार्यवाही चालू आहे.

**अ ) विद्यमान औष्णिक वीज निर्मिती केंद्रे ( ६६० मे.वॅ. )**

**१. भुसावळ औष्णिक वीज केंद्रतील युनीट-६ ( १×६६० मे.वॅ. )**

**या प्रकल्पाची आणि त्याच्या प्रगतीचे ठळक वैशिष्टे :**

- हा प्रकल्प भुसावळ युनीट-२ आणि ३ आणि नाशिक युनीट-३ (३×२१० मे.वॅ.) यांच्या बदली वीज निर्मिती करणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा आरंभ किंवा तांत्रिकभाषेत ‘‘शून्य दिनांक ३१.१२.२०१८ अशी आहे आणि त्याच्या कार्यान्वयाची नियोजित तारीख ३०.०५.२०२२ अशी आहे. प्रकल्प उभारणीचे कंत्राट मे. बी एच ए एल (भेल) यांना देण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे.

**२. इतर विद्यमान प्रकल्पातील पर्यावरण रक्षणाच्या आणि नव्या तंत्रज्ञानाच्या योजना :**

औष्णिक वीज केंद्रातील कोळशाची भूपृष्ठावरुन थेट वाहतूक केल्यामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी महानिर्मितीने पाईप कन्व्हेयर टेक्नोलॉजीची अंमलबजावणी सुरु केली आहे.

**१. कोळसा वाहतूकीसाठी पाईप कन्व्हेयरची स्थापना :**

महानिर्मितीने चंद्रपूर आणि कोराडी-खापरखेडा या औष्णिक विद्युत केंद्राना जवळपासच्या कोळसा खाणीतून कोळसा वाहतूक करण्यासाठी पाईप कन्व्हेयर स्थापन करण्याचे काम हाती घेतले आहे.

या प्रकल्पाची व त्याच्या प्रगतीची ठळक वैशिष्टे.

- कोळशाचे कण आणि त्यांची वाहतूक करणारे प्रचंड ट्रक यांच्यामुळे होणारे प्रदूषण कमी होईल. तसेच वाहतूकीमध्ये होणारी कोळशाची हानी कमी होईल. कोळशाचा दर्जा व प्रमाणाची हमी मिळेल.
- चंद्रपुर महाऔष्णिक वीज केंद्रासाठी भाताडी येथील कोळसा खाणीपासून पद्मपुर येथील सध्याच्या वॅगम लोडिंग स्टेशन पर्यंत कोळसा वाहतूक करण्यासाठी, महानिर्मिती कंपनीने पाईप कन्व्हेयर योजना सुरु केली आहे. तिचे कार्यान्वयन पूर्ण झाले असून ती चालविण्यासाठी संचलन व व्यवस्थापन शाखेकडे सूपूर्त करण्यात आली आहे.
- खापरखेडा आणि कोराडी येथील औष्णिक विद्युत केंद्रासाठी भानेगाव, गोंदेगाव आणि सिंगोरी येथील कोळसा खाणीपासून पाईप कन्व्हेयर व्यवस्था सुरु करण्यात येईल. त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. या यंत्रणेतील ७६ टक्के स्थापत्य काम पूर्ण झाले आहे. तसेच विजेचे व यांत्रिक कामे सुध्दा ६२ टक्के पूर्ण झाली आहेत. ही यंत्रणा जुलै २०२२ मध्ये कार्यान्वित होईल अशी अपेक्षा आहे.

**२. कोराडी आणि परळी औष्णिक विद्युत केंद्रात ओझोनायझेशन योजना**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) पाणी व सांडपाणी यांच्या क्लोरीनेशन वापर न करता ओझोनायझेशनने प्रक्रिया करावी असे निर्देश दिले आहेत. महानिर्मितीने त्यानुसार कोराडी औ.वि. केंद्रात (३x६०० मे वॅ) आणि परळी औ.वि. केंद्रातील (१x२५० मे वॅ) येथे ओझेनायझेशन प्रणाली स्थापित करण्याचे काम सुरु केले आहे. कोराडी औ.वि. केंद्रातील ओझोनायझेशन प्रणाली कार्यान्वित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. परळी औ.वि. केंद्रात ओझोनायझेशन प्रणालीची ८० टक्के साहित्य सामग्री मिळाली आहे. पुढची कामे चालू आहेत.

**३. कोराडी व खापरखेडा औ.वि. केंद्रात प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर:**

कोराडी आणि खापरखेडा प्रकल्पामध्ये प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर सुरु केला आहे. ही प्रक्रिया कारखाना १९० एम एल डी क्षमतेचा दुय्यम पाणी (टर्शरी) प्रक्रिया प्रकल्प खाजगी-सार्वजनिक सहभाग (पीपीपी) पध्दती द्वारे विकसित केला आहे. यामुळे पेंच येथील स्वच्छ पाण्याचा वापर कमी झाला.

४. **चंद्रपूर महा औ.वि. केंद्रासाठी प्रक्रिया केलेले पाणी :**

चंद्रपूर सांडपाणी प्रक्रिया केंद्र खाजगी-सार्वजनिक सहभागातून साकार करण्याच्या करारावर सहया झाल्या आहेत. या प्रणालीद्वारे ५० एम एल डी दुय्यम दर्जाचे पाणी पुरवठा होईल. अशा प्रकारे बचत केलेल्या पाण्याचा वापर वाढविल्याने ईराई या प्रकल्पातून मिळणाऱ्या स्वच्छ पाण्याचा वापर कमी होईल आणि हे स्वच्छ पाणी चंद्रपूरच्या पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी उपलब्ध होईल.

**ब) प्रस्तावित प्रकल्प :**

**६६० मे वॅ/५०० मे वॅ/२५० मे वॅ/२१० मे वॅ औ.वि. केंद्राच्या युनीटमध्ये निगंधकीकरण यंत्रणा स्थापन करणे :**

पर्यावरण रक्षणासाठीची नवी प्रमाणकांचे अनुसरण करण्यासठी महानिर्मती कंपनीने फल्यू गॅस डिस्फरायझेशन प्रणाली (FGD) अर्थात बाहेर सोडला जाणाऱ्या वायूतील गंधकाचे प्रमाण कमी करणारी यंत्रणा कोळसा अधिष्ठित औष्णिक वीज निर्मिती केंद्रात स्थापित करण्याचे ठरविले आहे.

१. **६६० मे. वॅ. केंद्रातील एफजीडी प्रणालीची स्थापना :** कोराडी येथील यूनिट क्र. ८, ९ आणि १० यामध्ये अभियांत्रिकी प्रापण आणि उभारणी यासाठी (ई पी सी) निविदा दिनांक ०४.११.२०२० रोजी प्रसिध्द झाली. या कामाचा अंदाजे खर्च ₹ ८०५ कोटी आहे. तांत्रिक-वाणिज्य आणि किमतीच्या बोली उघडण्याची कामे पूर्ण झाली. पुढील कार्य चालू आहे.

२. **५०० मे वॅ क्षमतेच्या युनीमध्ये एफ जी डी स्थापन करणे :** चंद्रपूर (युनीट - ५, ६, ७, ८ आणि ९), भुसावळ (युनीट ४ व ५), खापरखेडा (युनीट ५) या ५०० मे. वॅ. क्षमतेच्या आठ युनीटमध्ये एफ जी डी प्रणाली स्थापन करण्याच्या निविदा दिनांक २०.११.२०२० रोजी प्रसिध्द झाल्या. यापूर्वीची निविदा क्र.आरएफ ३००००१३८४५ रद्द करण्यास संचालक मंडळाने परवानगी दिली आणि सुधारित अंदाजानुसार नवीन निविदा प्रसारित करण्याची संमती दिली.

३. **२५० मे.वॅ. क्षमतेच्या युनीट मध्ये एफ जी डी प्रणाली :** पारस युनीट ३ व ४ च्या निविदेमधील तांत्रिक-वाणिज्य आणि किमतीच्या बोली उघडण्यात आल्या उलट लिलाव करण्यात येत आहे. परळी युनीट ६, ७ आणि ८ साठी तांत्रिक-वाणिज्य बोली एकाच पात्र निविदाकारात उघडली त्यामुळे परळी ३ x २५० मे वॅ केंद्रासाठी ही निविदा रद्द करुन नविन निविदा भरण्याचा निर्णय घेण्यात आला.

४. **२१० मे. वॅ. युनीटसाठी एफ जी डी :** खापरखेडा (युनीट १,२,३ व ४), कोराडी युनीट ६, चंद्रपूर (युनीट ३ व ४) यात सात २१० मे.वॅ. क्षमतेच्या युनीटसाठी एफ जी डी प्रणाली स्थापित करण्यात येणार आहे. त्यांच्या निविदा तांत्रिक-वाणिज्य बोली उघडण्यात आल्या. कामे प्रगतीपथावर आहे.

५. **नाशिक २१० मे.वॅ. युनीटसाठी एफ जी डी :** नाशिकच्या २१० मे.वॅ. युनीट क्र. ३ व ४ यांच्यासाठी एफ जी डी प्रणाली स्थापित करण्यात येणार आहे. त्याच्या निविदा दिनांक ०२.०९.२०२१ रोजी प्रसिध्द झाली. पुढील कामे चालू आहे.

६. **ई एस पी रिट्रोफिटींग :** उत्सर्जनाचा स्त्रोत प्रमाणकांनुसार ठेवण्यासाठी, महानिर्मितीने खापरखेडा युनीट १ व २ (२१० मे.वॅ.) आणि चंद्रपूर युनीट ५ व ६ (५०० मे.वॅ.) येथे ई.एस.पी. पूनर्स्थापित करण्याचा प्रस्ताव महानिर्मितीने केला आहे. तांत्रिक-वाणिज्य बोली उघडण्यात आल्या त्यांचे मूल्यमापन करणे चालू आहे.

**क) औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाच्या योजना ( १९८० मे.वॅ. )**

**१. कोराडी औ.वि. निर्मिती प्रकल्प ( २ x ६६० मे.वॅ. )**

- महानिर्मितीने कोळसा आधारित आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे दोन वीज निर्मिती प्रकल्प (२ x ६६० मे.वॅ.) कोराडी येथे स्थापित करण्याचा प्रस्ताव केला आहे. हे प्रकल्प येथील निवृत्त होणाऱ्या कोराडी युनीट ५, नाशिक युनीट ४ व ५, परळी युनीट ४ व ५ आणि चंद्रपूर युनीट ३ यांच्या ऐवजी वीज निर्मिती करतील. प्रस्तावित प्रकल्पाचे प्रदूषण नियंत्रणाच्या एफ जी डी आणि एस सी आर या प्रणाली असतील. त्यासाठी गरे-पालमा येथील महानिर्मितीच्या मालकीच्या खाणीतून कोळसा पुरवठा केला जाईल. नागपुर शहरातील सांडपाणी प्रक्रियाकरुन या प्रकल्पासाठी वापरले जाईल. या प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांनी ही त्यांचे आदेश पत्र दिनांक ०४.०९.२०१९ नुसार तत्वत: मान्यता दिली आहे.
- महाराष्ट्र शासनाने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर दि. ०४.०५.२०२० रोजीच्या आदेशाने काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत.
- या शिवाय राज्य शासनाच्या ऊर्जा विभागाने दिनांक १७.०६.२०२० रोजीच्या पत्राने महानिर्मिती कंपनीतील कोराडी २ x ६६० मे. वॅ. प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी कळविले आहे. यात नवीकरण ऊर्जा संबंधीची बंधने (आर पी ओ), कृषि ग्राहकांना प्राधान्याने

दिवसा वीज पुरवठा करणे, नवीकरण ऊर्जेला प्राधान्य देणे आदिचा विचार करण्याचे सांगितले आहे. तसेच पुढील पाच वर्षात कोणताही औष्णिक वीज प्रकल्प हाती न घेण्या विषयीचे धोरण सादर करण्याचे सूचविले आहे.

दरम्यान केंद्रीय पर्यावरणने व वन हवामान बदल मंत्रालय यांचे पत्रक दिनांक २६.०६.२०२० नुसार या प्रकल्पाचे संदर्भ (टी ओ आर) बाबत पत्र मिळाले आहे. या अटीच्या संदर्भानुसार महानिर्मती कंपनीस पर्यावरणाच्या प्रभावाचे निर्धारणाचा अभ्यास करावयाचा असून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे जमिनीवर होऊ शकणाऱ्या प्रदूषणाचा ही अंदाज द्यावयाचा आहे व तो पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय सादर करावयाचा आहेत.

यामुळे प्रस्तावाच्या सांविधिक परवानगीसाठीची कामे आणि प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या मंत्रीमंडळास सादर करणे बाबतची प्रक्रिया करणे चालू आहे. पर्यावरण प्रभाव निर्धारणाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर आणि केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने परवानगी दिल्यानंतर, प्रकल्प उभारणीची कामे पून्हा सुरु केली जातील.

**२. चंद्रपूर औ. वि. वि. केंद्र प्रकल्प ( १ x ६०० मे. वॅ. ) :**

- संचालक मंडळाने चंद्रपूर १ x ६०० मे. वॅ. प्रकल्पाची व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यास मान्यता दिली आहे.
- महानिर्मिती कंपनीने व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी मेसर्स स्टेग या कंपनीला सल्लागार नेमले होते. त्यांनी अभ्यास करुन प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अहवाल दिला.
- महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाने दिनांक १७.०६.२०२० रोजीच पत्राने कळविले की "पुढील पाच वर्षात कोणताही नवा औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करु नये." राज्यशासनाच्या या आदेशामुळे सध्या हा प्रकल्प प्रस्ताव केला नाही.
- मात्र भविष्यातील विजेच्या सर्वोच्च मागणीच्यी (वित्तीय वर्ष २०२६ पुढे) विश्लेषणानुसार, या प्रकल्पाच्या व्यवहार्यता आजमावणेचा अहवाल तयार करण्याबाबत विचार चालू आहे.

**ड) उरण वायु औ.वि. केंद्रात यंत्रणा पुनर्स्थापित करणे/बदलणे प्रकल्प :**

- उरण येथील वायु औ. वि. केंद्राची स्थापित क्षमता ६७२ मे. वॅ. आहे. गॅस टर्बाईन ४ x १०८ मे. वॅ. क्षमतेचे आहे. येथील युनीट्स १९८५-८६ या वर्षी कार्यान्वित झाले आणि वेस्ट हिट रिकव्हरी युनीट (२ x १२० मे. वॅ. क्षमतेचे) १९९४ मध्ये कार्यान्वित झाले.
- महानिर्मितीने वायु औ. वि. केंद्र उरणचे पुन: शक्तीशाली करण्याची योजना केली आहे. त्यासाठी सध्याची ६७२ मे.वॅ. क्षमता १६०० मे.वॅ. इतकी वाढविण्याच्या प्रस्ताव आहे. या नवशक्ति करणाऱ्या योजनेच्या कार्यक्रमाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**टप्पा - १ चा कार्यक्रम :**

- सध्याच्या अस्तित्वात युनीटच्या ऐवजी 'अद्यावत तंत्रज्ञानयुक्त' दोन नवीन युनीट स्थापित करणे; वायुच्या उपलब्धतेनुसार त्यांची वीज निर्मिती क्षमता ८०० मे.वॅ. पर्यंत वाढविणे.
- स्वीकार पत्र मिळण्याच्या तारखेपासून ३२ महिन्यात प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**टप्पा - २ चा कार्यक्रम**

- ८०० मे. वॅ. क्षमतेची आणि अद्यावत तंत्रज्ञान वापरणारी दोन नवीन युनीट स्थापित करणे. (वीज निर्मिती जादा वायू उपब्धतेच्या अधीन), उरण येथील केंद्रात जमीन उपलब्ध आहे.
- वरील कार्यक्रमासाठी वायू उपलब्ध व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाने भारत सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाकडे, हा प्रस्ताव मांडला आहे.
- महानिर्मितीने या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासणे, त्यासाठी योग्य पर्याय निवडले, प्रकल्प अहवाल व तांत्रिक विनिर्देश तयार करणे यासाठी मेसर्स स्टेग याना सल्लागार नेमले आहे.
- टप्पा-१ यासाठी व्यवहार्यतेचा अहवाल मसूदा सादर केला. त्यात विद्यमान युनीट बदलून अद्यावत तंत्रज्ञानाची ८०० मे. वॅ. क्षमतेची दोन नवीन युनीट स्थापण्याचा प्रस्ताव आहे.

## सौर वीज निर्मिती

### १. सौर ऊर्जा प्रकल्प :

१. महानिर्मितीने 'राष्ट्रीय सौर वीज मिशन सोबत ऊर्जा विषयक विविधता' कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु केली आहे.

२. महावितरण यांचेवर ४थ्या नियंत्रणाच्या कालावधीत म्हणजे वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ या मध्ये ५.१८ टक्केवरुन १३.५ टक्के सौर ऊर्जा खरेदी करणे असे नवीकरण वीज खरेदी अंतर्गत बंधनकारक आहे. त्यामुळे भविष्यात नवीनकरणीय विजेची मागणी वाढेल.

३ 'हरित महाराष्ट्र' यासाठी महानिर्मिती योगदान देत आहे. आत्तापर्यंत २०७ मे.वॅ. क्षमतेचे सौर वीज निर्मितीचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत आणि समाधानकारकरित्या कार्यरत आहे. भारत व महाराष्ट्र शासन यांचे निर्देश व लक्ष्ये यानुसार भविष्यात क्षमतावाढ केली जाईल. सध्या एकूण २७९५ मे.वॅ. क्षमतेचे विविध सौर वीज निर्मिती प्रकल्प उभारणीच्या विविध टप्प्यावर आहेत.

| अ क्र. | सौर वीज योजना | क्षमता ( मे.वॅ ) | सौर वीज प्रकल्प कार्यान्वयनाचे वेळा पत्रक- मे.वॅ. मध्ये | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वि. वर्ष २०-२१ | वि. वर्ष २१-२२ | वि. वर्ष २२-२३ | वि. वर्ष २३-२४ | वि. वर्ष २४-२५ |
| १ | मुख्यमंत्री सौर कृषि योजना | ५८८ | १६ | ७८ | ४२९ | ६५ | - |
| २ | ई.पी.सी. पध्दती | ५७० | - | ३० | १५७ | ३८३ | - |
| ३ | सौर-उद्यान दोंडायचा-धुळे | २५० | - | - | २५० | - | - |
| ४ | एन टी पी सी सोबत संयुक्त साहस - यू एम आर ई पी पी | १२५० | - | - | - | ६२५ | ६२५ |
| ५ | ईराई धरण येथे तरंगता सौर प्रकल्प | १०५ | - | - | - | १०५ | |
| | एकूण ( मे.वॅ ) | २७९५ | १६ | १०८ | ८३६ | ११७८ | ६२५ |

**अ ) सध्या कार्यरत प्रकल्प**

**१. ई पी सी प्रकल्प**

**१.१ ५०० मे. वॅ. कोडगाव सौर प्रकल्प**

- प्रकल्प खर्च : ₹ २४५.७९ कोटी (जमिनी, सल्लागार व निर्वासन यासह).
- प्रकल्प दिल्याची पत्रे दिली (सीई/एसपीजीडी-पी/५० मे वॅ कुडगाव/एलओए/बीएचईएल/४१९४ दिनांक २२/०४/२०२० रोजी हे पत्र मे. भेलला दिले. खर्च ₹२१२.५ कोटी.)
- महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित सोबत दिनांक २१.११.२०१९ रोजी वीज करारावर स्वाक्षरी झाल्या. वीज दर ₹ २.९२/ के उब्ल्यू एच.
- वीज निर्वासन (बाहेर नेणे) यासाठी ३३ कोटी क्षमतेच्या वीजदारांचे काम महावितरण - भंडार तत्त्वावर (डिपॉझिटरी) दिले. कामाची प्रगती मुळ मुद्दया बाबतच्या न्यायातील प्रकरणावर अवलंबून आहे.

**१.२ साक्री २५ मे. वॅ. - १**

- प्रकल्प खर्च : ₹ ९३.१२ कोटी (जमिनी, सल्लागार शुल्क, निष्कासन यासह).
- प्रकल्प प्रदान केल्याचे पत्र सीई/एसपीजीडी-पी/२५ मे.वॅ. साठी दि. १७.१२.२०२ रोजी मे. गोदरेज अॅण्ड बॉइस मन्युफॅक्चरींग कंपनी लिमिटेडला दिले (खर्च ₹ ८७.४४ कोटी).
- महावितरण सोबत ३५० मे. वॅ. साठी वीज खरेदी करार ₹ २.९०/के डब्ल्यू एच. दराने उपलब्ध आहे. वीज खरेदी करारा वरील स्वाक्षरी प्रक्रिया चालू.

**१.३ ६० मे. वॅ. लातूर**

- प्रकल्प खर्च ₹२३३.६९ कोटी (जमीन, सल्लागार शुल्क, निष्कासन यासह)
- प्रकल्प दिल्याचे पत्र क्र. सीई(एस पी जी डी - पी)/ईपीसी लातूर-६०० मे.वॅ. जीआर-चार/५९८० दिनांक १८.१२.२०२० मे. गोदरेज ॲण्ड बॉईस मॅन्युफॅक्चरींग कंपनी लिमिटेड यांनी ₹ २०९.९९ कोटीला दिले.
- महावितरण सोबत ३५० मे.वॅ. क्षमतेच्या वीज खरेदी करार उपलब्ध आहे. वीज दर रु. २.९०/केडब्ल्यूएच खरेदी करार स्वाक्षरी करण्याचे काम चालू.

**१.४ ५२ मे.वॅ. औ. वि. केंद्राच्या जमीनीवर.**

- प्रकल्प खर्च ₹ १८३.६० कोटी (जमीन, सल्लागार शुल्क, वीज निष्कासन यासह)
- प्रकल्प दिल्याचे पत्र क्र. सीई/एम पी जी डी - पी/५२ मे.वॅ./टीपीएस लँड/एलओए/न. ०५९६६ दिनांक १८.१२.२०२० रोजी मेसर्स रिफेक्स एनर्जी लिमिटेड, मुंबई यांना ₹१८१.४८ कोटी साठी दिले.
- महावितरण सोबत ३५० मे.वॅ. क्षमतेचा वीज खरेदी करार उपलब्ध आहे. वीज दर रु. २.९०/केडब्ल्यूएच. महावितरण सोबत करार स्वाक्षरी करण्याचे काम चालू आहे.

**२. ( मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना ) अंतर्गत प्रकल्प**

**२.१ मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना प्रकल्प - १८४ मे.वॅ.**

- प्रकल्प देण्याचे पत्र दिनांक १८/०१/२०२० रोजी मे. वारी एनर्जीज लिमिटेड यांना दिले.
- महानिर्मिती ही या मुख्यमंत्री कृषी योजनेत अंमलबजावणी करणारी संस्था आहे. यात महानिर्मितीला आर्थिक लाभ नाहीत. या प्रकल्पाची विभागणी अशी -विदर्भ (३४ मे वॅ), मराठवाडा (५० मे वॅ), पश्चिम महाराष्ट्र (५० मे वॅ), उत्तर महाराष्ट्र (५० मे वॅ)
- प्रकल्प खर्च - हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभागावर आधारीत आहे. महानिर्मिती महाराष्ट्र शासनाकडून ₹ १/- भाडे देऊन जमीन घेईले आणि ती एस पी डी ला देईल.
- महानिर्मितीला स्थापत्य पायाभूत कामात वाव असेल.
- मे. वारी एनर्जीज लिमिटेड सोबत नोव्हेंबर २० ते जून २१ साठी वीज खरेदी करार केले.
- महावितरण सोबत दिनांक १८/०८/२०२१ रोजी पी एस ए केला.

**२.२ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना - १७९ मे वॅ चा प्रकल्प**

- प्रकल्प देण्याचे पत्र दिनांक ०२.०९.२०२० रोजी मेसर्स एनर्जी एफिशियन्सी सर्विसेस लि. यांना दिले.
- या प्रकल्पासाठी महावितरणने खुल्या निविदेमार्फत लेटर ऑफ अवॉर्ड दिले. व्यापारी मार्जिन ₹०.१९/केडब्ल्यूएच - एवढे महानिर्मितीची उपलब्ध असून त्याला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची मंजूरी मिळाली आहे.
- प्रकल्प खर्च - हा प्रकल्प खाजगी - सार्वजनिक सहभागावर आहे. महानिर्मिती महाराष्ट्र शासनाकडून ₹ १-एवढ्या भाडयाने जमीन संपादन करील आणि ती एस पी डी ला देईल.
- पायाभूत स्थापत्य विकास कामे व निष्कासन व्यवस्था विकसित करील.
- मे. इ इ एस एल सोबत दि.१८.०९.२००० रोजी वीज खरेदी करार केला - वीज दर ₹ ३.११ के डब्ल्यू एच.
- महावितरण सोबत पी एस ए दि.३०.०९.२०२० रोजी केल दर ₹ ३.३० के डब्ल्यू ए च.

**२.३ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना प्रकल्प - १०० मे वॅ**

- प्रकल्प देण्याचे पत्र दिनांक १०.०८.२०२० रोजी मेसर्स एनर्जी एफिशियन्सी सर्विसेस लि. यांना दिले.
- महानिर्मिती मुख्यमंत्री कृषी फिडर योजना यामध्ये अंमलबजावणी करणारी संस्था आहे. त्यात महानिर्मितीस वित्तीय लाभ नाहीत. यात पश्चिम महाराष्ट्र (ए) आणि उत्तर महाराष्ट्र यातील बरेच जिल्हे समाविष्ट आहे.
- प्रकल्प खर्च - हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभाग या तत्वावर आधारीत आहे. महानिर्मिती महाराष्ट्र शासनाकडून ₹१-भाडयाने जमीन घेऊन आणि ती एस पी डी ला देईल.

- पायाभूत स्थापत्य विकास कामे आणि निष्कासन व्यवस्था विकासक करील.
- महावितरण सोबत पी एस ए दि १०.०८.२०२० रोजी करण्यात आले आणि दि. ०३.०९.२०२१ रोजी वीज खरेदी करार झाला.

**२.४ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना प्रकल्प - १०९ मे वॅ**

- महानिर्मितीला वित्तीय लाभ नाही (ट्रेडींग मार्जीन).
- हा १०९ मे वॅ क्षमतेचा प्रकल्प इ ओ आय मार्फत खालील विकासकांना दिला.

  (१) १०० मे वॅ मे. कर्नाटक रेस्को रूफ टॉप कंपनी मर्यादित.

  (२) ७ मे वॅ मे. ग्रो सोलर एनर्जी खाजगी मर्यादित.

  (३) २ मे वॅ श्री श्री शेतकरी ऊर्जा निर्मिती सहकारी सोसायटी मर्यादित.
- भूसंपादन खर्च, पायाभूत स्थापत्य विकास, निष्कासन व्यवस्था आणि इतर सर्व संबधित कामे संबधित विकासक करतील.
- अनुक्रमांक १ व २ या विकासकांसोबत वीज खरेदी करारवर अनुक्रमे ३१.१०.२०१९ आणि १३.०१.२०२० रोजी सहया झाल्या.
- पी एस ए : ९ मे वॅ – २०.११.२०१९ आणि १०० मे वॅ १४.०१.२०२० रोजी वीज दर २ मे वॅ – ₹ २.९३/के डब्ल्यू एच, ७ मे वॅ – ₹ ३.१०/के डब्ल्यू एच आणि १०० मे वॅ ₹ ३.१०/के डब्ल्यू एच.
- ७ मे वॅ – मे. ग्रो सोलर प्रकल्प देगाव, जिल्हा धुळे २५.०६.२०२१ रोजी कार्यान्वित झाला.

**ब) भविष्यातील प्रकल्प**

**१ ई पी एस प्रकल्प : ३९० मे वॅ इ पी सी आधारित सौर प्रकल्प**

- महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय सौर प्र–२०२०/प्र.क्र.१३०/ऊर्जा – ७ दि. २९.०९.२०२१ नुसार हा प्रकल्प मंजूर केला.
- ३९० मे वॅ प्रकल्प के एफ डब्ल्यू यांच्या नवीन कर्जानुसार विकसित केला जाईल. गुंतवणुकीवर परतावा दर ०.०५ टक्के या नाविण्यपूर्ण पध्दतीने आहे.
- डी इ ए पोर्टल वर पी पी आर अपलोड करण्यात आला. राज्य समन्वय (नोडल) अधिकाऱ्यांनी त्यावर २७.१०.२०२१ रोजी शेरा दिला आणि तो संबधित मंत्रालयात मंजूरीसाठी सादर केला. सादर केलेल्या पीपीआर वर निल आयोगातील अभिप्रायास महानिर्मिती दि. १०.१२.२०२१ रोजी उत्तर सादर केले.
- या क्षमतेपैकी २५ मे वॅ साठी क्रमांक दोनची महसूल वाटपा तत्वावरची निविदा प्रसारित करण्यात आली व ती चालू आहे. याशिवाय १८८ मे वॅ प्रकल्पासाठी निविदा मंजूरीच्या टप्पावर आहेत.

**२ सौर उद्यान : दोंडायचा सौर उद्यान - २५० मे वॅ.**

- २५० मे वॅ दोंडायचा सौर उद्यान हे ५०४.७१ हेक्टर जमीनीवर प्रस्तावित केले आहे. ही जमीन महानिर्मितीने संपादन केली आहे.
- महानिर्मितीने अटी असलेले हेतू पत्र मे. टी. पी. सौर्या लि. यांना दि. १७.०९.२०२१ रोजी दिले तर मे. टी. पी. सौर्या यांना दि. १७.१२.२०२१ रोजी एलओए दिले.
- महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने ₹२.५१/के डब्ल्यू एच यादरास मान्यता दिली. महानिर्मितीचा ट्रेडींग मार्जिन ₹०.०७/के डब्ल्यू एच ठेवला आहे.

**३ महसूल विभाजन तत्वावर वीज खरेदी करार**

**२५ मे वॅ साठी क्र. २**

- प्रकल्प खर्च – तात्पूरता अंदाज ₹८५ कोटी (जमीन, सल्लागार शुल्क आणि निष्कासन यासह)
- महावितरण सोबत ३५० मे वॅ क्षमतेसाठी वीज खरेदी करार उपलब्ध असून त्यात वीज दर ₹ २.९०/के डब्ल्यू एच आहे
- निविदा प्रसारित केली आहे.

**४ तरंगता सौर प्रकल्प : १०५ मे वॅ चा इराई धरण यावर**

- हा प्रकल्प सौर उद्यान पध्दतीनुसार – यु एम आर इ पी पी योजनेअंतर्गत अमलात येत आहे.

- ड्राफ्ट डी पी आर मिळाला असून त्याचा आढावा घेणे चालू आहे. लवकरच अंतिम डी पी आर तयार होईल
- या प्रकल्पाचा समावेश एम एन आर इ योजनेत करावा यासाठीचा प्रस्ताव अग्रेसित करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचा ऊर्जा विभाग त्याचा अभ्यास करीत आहे.
- महावितरण कडून वीज दरात संमती मिळावी यासाठी प्रक्रीया चालू आहे.

**५ राष्ट्रीय औद्योगिक विद्युत महामंडळ सोबत संयुक्त साहस उपक्रम**

**अल्ट्रा - मेगा रिन्यूएबल एनर्जी पॉवर पार्क**

- अतिप्रचंड - नवीकरण ऊर्जा वीज प्रकल्पाची अंमलबजावणी पध्दती - ८ या प्रकारे व्हावी यासाठी एम एन आर इ ने कार्यालयीन टिपणी १५ जून २०२० मध्ये अधिसूचित केली आहे. हा प्रकल्प विद्यमान सौर उद्यान योजनेअंतर्गत होण्याची सूचना आहे
- याविषयी महानिर्मिती आणि एन टी पी सी यांच्यात दिनांक. २०.०२.२०२० रोजी मुंबई येथे सामंजस्याचा करार झाला महाराष्ट्रात २५०० मे वॅ क्षमतेची नवीकरण ऊर्जा प्रकल्प स्थापना करण्याचा प्रस्ताव आहे.
- महाराष्ट्र शासनाची या संयुक्त साहस प्रकल्पात मान्यतेची प्रतिक्षा आहे.

**इंधन व्यवस्थापन.**

**अ ) इंधन पुरवठ्यासाठी करार**

महानिर्मितीने कोळसा कंपन्यांसोबत केलेल्या इंधन पुरवठयाच्या कराराची कोळसा कंपनी निहाय माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

(संख्या एम एम टी पी ए मध्ये)

| औष्णिक विकास केंद्र | डब्ल्यूसीएल | एमसीएल | एसईसीएल | एससीसीएल | एफएसए संख्या |
|---|---|---|---|---|---|
| चंद्रपूर (यू-३ ते ७) | ९.७५६ | ० | ०.७४७ | ० | १०.५०३ |
| कोराडी (यू-६ ते ७) | ०.३३९ | ०.७४५ | १.२५४ | ० | २.३३८ |
| खापरखेडा (यू-१ ते ५) | १.४३२ | ३.८७९ | २.००१ | ० | ७.३१२ |
| नाशिक (यू-३ ते ५) | २.३५४ | ० | ०.७२४ | ० | ३.०७८ |
| भुसावळ (यू-३ ते ५) | ३.२१३ | ० | २.३१२ | ० | ५.५२५ |
| परळी (यू-४ ते ७) | २.८४८ | ० | ० | ० | २.८४८ |
| पारस (यू-३ ते ४) | २.५०३ | ० | ० | ० | २.५०३ |
| एकूण | २२.४४५ | ४.६२४ | ७.०३८ | ०.००० | ३४.१०७ |

**ब ) बीज लिंकेज चा सामंजस्य करार**

वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मध्ये डब्ल्यू सी एल आणि एस सी सी एल या कंपन्यासोबत सेतु जोडणी खालील प्रमाणे होईल

| वीज निमिती केंद्र | डब्ल्यूसीएल ( जी८-जी१० ) एमएमटी मध्ये | एससीसीएल ( जी-९ ) एमएमटी | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| कोराडी ३ x ६०० मे वॅ (८० टक्के डब्ल्यूसीएल कडून व २० टक्के एससीसीएल | ५.२०२ | १.३ | ६.५०२ |
| चंद्रपूर २ x ५०० मे वॅ | ३.४७ | ० | ३.४७ |
| परळी १ x २५० मे वॅ | ० | ०.८६५ | ०.८६५ |
| एकूण | ८.६७२ | २.१६५ | १०.८३७ |

**क ) महानिर्मिती वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मधील कोळसा पुरवठा:**

कोळसा कंपनी निहाय - जोडणी आणि प्रत्यक्ष टक्केवारी खालील तक्त्यात दिली आहे.

संख्या : टीएचएमटी मध्ये

| कोळसा कंपनी | वित्तीय वर्ष २०२०-२०२१ | | |
|---|---|---|---|
| | जोडणी | प्राप्ती | % टक्केवारी |
| डब्ल्यूसीएल | ३७५१० | २३९१३ | ६३.७५ |
| एमसीएल | २१०२ | ४५१७ | २१४.९६ |
| एसईसीएल | ४३८८ | १५३८ | ३५.०५ |
| एससीसीएल | ३१४१ | ३०५० | ९७.०७ |
| एकूण | ४७१४० | ३३०१७ | ७०.०४ |

**ड ) आयात कोळसा:**

देशातील कोळशाची टंचाई असल्याने महानिर्मितीने कोळसा आयात करण्यासाठी आणि त्याद्वारे २.०० दशलक्ष एम टी 'नॉन-कुकींग स्टीम' या प्रकारचा परदेशी कोळसा मिळविण्यासाठी निविदा प्रसिध्द केली. हा परदेशी कोळसा महानिर्मिच्या कोराडी, खापरखेडा, चंदपूर, भुसावळ आणि नाशिक येथील औ.वि. केंद्रात वापरण्याचे ठरविले. निविदेच्या तांत्रिक-वाणिज्यिक बोली २५.०२.२०२० रोजी उघडण्यात आल्या. त्यांचा अभ्यास कार्यकारी समितिने आणि शिखर समितिने पूर्ण केला. या दरम्यान भारत सरकारने आयात कमी करण्याचे धोरण अमलात आणले आणि सी आय एल या संस्थेने व कोळसा मंत्रालयाने आयात कोळसा ऐवजी देशातंर्गत कोळसा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. यामुळे महानिर्मितीने तिची आयात कोळसाची निविदा रद्द केली.

मात्र वित्तीय वर्ष २०२१-२२ मध्ये कोळशाची तीव्र टंचाईची शक्यता लक्षात घेऊन आणि केंद्रीय वीज प्राधिकारण आणि भारत सरकारने कोळसा मंत्रालय यांच्या मार्गदर्शक भू-भाग विचारात घेऊन महानिर्मिती कंपनीने परदेशी नॉन कुकींग स्टिम या प्रकारचा २.०० दक्षलक्ष मे. टन कोळसा आयात करण्याची योजना तयार केली आहे. हा कोळसा खापरखेडा, चंद्रपूर, भुसावळ आणि नाशिक या औ.वि. वि. केंद्रात वारण्यात येईल यासाठी निविदा प्रसारित केली आहे.

**ई ) उरण केंद्रासाठी वायूचा पुरवठा :**

महानिर्मितीची या प्रकल्पात एकूण स्थापित क्षमता ६७२ मे वॅ आहे. त्यासाठी एकूण ईंधन गरज ३.५ एम एम एस सी एम डी आहे. ए पी एम गॅसचा उत्पादन स्तर कमी असल्याने सध्या मे. गेल कडून खूप कमी वायू मिळतो ३.५ एम एम एस सी एम डी च्या तूलनेत महानर्मितीला ए पी एम वायू कमी मिळत असल्याने महानिर्मितीने मागणी-पुरवठा यातील अंतर भरुन काढण्यासाठी नॉन-ए पी एम वायू मिळवणे सुरु केले. तसेच देशातंर्गत वायू उपलब्धता कमी असल्याने महानिर्मितीने पर्यायी स्त्रोत शोधले. त्यासाठी मे. गेल सोबत उरणसाठी दिनांक १८.०१.२०१७ रोजी स्पॉट गैस (खरेदी करार केला) (एसजीएसए) यात नैसर्गिक वायू/पुर्न वायू केलेला लिकवीफाईड नॅचरल गॅस - आर एल एन जी याचा समावेश आहे. या एस जी एस ए मूळे महानिर्मिती कंपनीला देशांर्तगत वायू टंचाई च्या काळात आर एल एन जी हा वायू मिळविणे येथे शक्य होईल आणि तांत्रिक व वित्तीय व्यवहार्यतेनुसार योग्य वीजनिर्मिती करता येईल.

**फ ) स्वस्त वीज निर्मितीसाठी कोळसासाठा सुधारण्याचे उपाय :**

- भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयातील सचिव (कोळसा) यांनी दिनांक २१.०९.२०१७ रोजी कोळसासाठा करण्यासाठी रस्त्याने किंवा आणि रेल्वे मार्ग अशा भिन्न पध्दतीने कोळसा वाहतूक करण्याचे आदेश दिले (आर सी आर मोड). केंद्रीय वीज प्राधिकरण यांनी सुध्दा कोळसा खाणी पासुनच्या ६० किमी त्रिज्येच्या क्षेत्रातील औ.वि. केंद्राना अधिक्य असलेला कोळसा वाटप निर्देशित केले आहे. त्यानुसार महानिर्मितीने जास्त कोळसा मिळविण्यासाठी रस्त्याने कोळसा वाहतूकीचे काम सुरु केले. त्यासाठी ६० किमी परिसरातील कोळसा खाणीतून कोळसा मिळविण्याचे आदेश दिले. कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर औ.वि. केंद्रासाठी विविध खाणीतून सरासरी दररोज ११७१२ कोळसा २०२०-२१ या वर्षात रस्त्याने कोळसा मिळविला.
- कोराडी ३ x ६६० मे.वॅ ची युनीट्सची रचना ३६२० जी सी व्ही साठी करण्यात आली आहे. मात्र कोराडीला मिळणारा कोळसा खूप कमी दर्जाचा आहे. कोराडी केंद्रासाठी चांगल्या दर्जाचा जादा कोळसा मिळविण्यासाठी कुसमूंडा येथील एस ई सी एल कंपनीच्या

खाणीतून कच्चा कोळसा मिळविण्याचा आदेश दिला आहे. त्याची वाहतूक रेल्वे आणि रोड (आर सी आर) पध्दतीने केली या व्यवस्थेमुळे कोराडी केंद्रात प्रतिदिन दोन रेक्स या गतीने चांगल्या दर्जाचा कोळसा मिळाला त्यामुळे सरासरी मासिक निर्मितीत वाढ झाली आणि कमी कोळसा या कारणाने होणाऱ्या विजदराच्या वजावटील घट झाली.

३. महानिर्मितीने एस सी सी एल सोबत ५ एम एम टी कोळसा पुरवठ्यासाठी सामंजस्य करार केला. त्यामुळे फेब्रुवारी २०२१ नंतर अधिसूचित किमती वर एक वर्षासाठी ₹१२५ कोटी इतकी सवलत मिळेल. हा कोळसा चंद्रपूर, कोराडी व परळी केंद्रासाठी दिला जाईल.

**कोळसा धुलाईः**

महानिर्मितीने एम एस एम सी सोबत १०/१२/२०२० रोजी करार केला त्याद्वारे डब्ल्यू सी एल, एस इ सी एल आणि एम सी एल येथील आर ओ एम/रॉ कोल चा लाभ मिळेल. व चांगला दर्जाचा कोळसा उपलब्ध होईल वीज केंद्राची उपलब्धता वाढेल आणि उपलब्धता नसल्याने होणाऱ्या वजावटीचे प्रमाण कमी होईल या करारामुळे महानिर्मितीच्या केंद्राना लाभकारी कोळशाचा पुरवठा होईल हा लाभकारी/धुतलेला कोळसा मार्च २०२१ पासून कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर यांना मिळणे सुरू झाले.

५. **विनिदेर्शित खाणीतून कोळसा पुरवठा :**

महानिर्मितीने दि. ०१.०१.२०२१ पासून डब्ल्यू सी एल विनिदेर्शित केलेल्या खाणीचाच कोळसा ₹४५०/- प्रतीटन अशा जादा दराने मिळविला आहे. महानिर्मितीने असा कोळसा ०२.११.२०१९ पासून ३१.१२.२०२० पर्यंत मिळविण्यासाठी मागील थकबाकी चुकती केली. त्यासाठी महानिर्मितीने आपले दाव्याचे समायोजन केले. हे दावे कमी पुरवठा, कमी दर्जा, ओला कोळसा, कोळशातील दगड व पैसे भरणे इत्यादी बाबत होते त्याबाबत परस्पर सामंजस्याने तीन महिन्यात मेळ केला.

**पर्यावरण आणि सुरक्षाः**

**''भारतातील कोळसावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातून सोडलेल्या वायूमधील गंधकाचे प्रमाण कमी करणे आणि निवडक मध्यस्त कणांची कपात करणे'' यावर एक दिवसाच्या परिषदेच्या आयोजनात महानिर्मिताचा सहभाग**

सी एस आय आर, नीरी आणि महानिर्मिती यांनी दि. २४ जाने २०२० रोजी हॉटेल ऑर्चीड येथे एक दिवसाची परिषद आयोजित केली होती. तिचा विषय ''भारतातील कोळसावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातून सोडलेल्या वायूमधील गंधकाचे प्रमाण कमी करणे आणि निवडक मध्यस्त कणांची कपात करणे'' असा होता. यामध्ये पद्मभूषण डॉ. किरिट पारेख माजी सदस्य नियोजन आयोग आणि अध्यक्ष (आय आर ए डी इ) नवी दिल्ली यांनी सन्माननीय पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. या परिषदेचा मुख्य विषय ''एफ जी डी, एस सी आर, एस एन सी आर या विषयी आणि इतर तंत्रज्ञाना विषयी बौद्धीक चर्चा करणे आणि त्यातून वीज केंद्रातील उत्सर्जनातील प्रदूषण नियंत्रण धोरणा अमलात आणणे तसेच त्यासोबत खर्च आणि लाभ यांचा भविष्यासाठी विचार करणे'' हा होता.

यावेळी सी पी सी बी, वन पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, वीज प्राधिकरन महानिर्मिती, बी एच इ एल, अडाणी पॉवर, मित्सुबिशी, हिंडालको, ए डी बी, सी आर इ ए यातील वक्त्यांनी विचार मांडले. शैक्षणिक व खाजगी संस्थांचे तंत्रज्ञ व उपकरणाचे उत्पादक, वित्तीय संस्था प्रतिनिधी यांनी ही सहभाग घेतला आणि एकाच मंचावर तात्काळ कृती करण्याची गरज मांडण्यात आली आणि उत्सर्जनाचे नवीन प्रमाणके अमलात आणण्याचे ठरले.

**भुसावळ ( जळगाव ) येथील १ x ६६० मे वॅ क्षमतेचा आणि महत्वपूर्ण औ.वि.प्रकल्पः**

या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयीच्या वैधतेचा विस्तार देण्यास परवानगीचे पत्र दि. २७.११.२०१२ रोजी मिळाले होते (त्याची वैधता २६.११.२०१९ पर्यंत होती) त्यानंतर दि. २७.११.२०१९ पासून पुढील तीन वर्षासाठी म्हणजे २६.११.२०२२ पर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. ती दि. १४.०१.२०२० रोजीच्या पत्रात दिलेल्या जादा अटींच्या अधीन आहे.

दि. २७.११.२०१२ रोजी मिळलेल्या इ सी मधील सुधारणा आला दि. ११.०९.२०२० च्या पत्राद्वारे खालील गोष्टीसाठी मान्य झाल्या :

(१) कोळसा स्त्रोतात बदल करणे मच्छाकाटा खाणी ऐवजी डब्ल्यू सी एल/एस इ सी एल/एम सी एल यांच्या खाणीचा कोळसा घेणे. कोळसा गरज ३.१८ एम टी पी पर्यंत कमी केली.

(२) बाहेर सोडल्या जाणाऱ्या वायूची गती बदलली ती जादा अटीच्या अधिन आहे.

दि. १०.०६.२०२० रोजी मिळविलेल्या संमतीची वैधता युनीट कार्यान्वित होण्यापर्यंत किंवा ५ वर्षासाठी – यापैकी ती अधीक असेल त्याप्रमाणे असेल.

**गरे-पालमा सेक्टर दोन ( २ ) कोळसा खाण प्रकल्प, रायगढ – छत्तीसगढः**

गरे पालमा सेक्टर–२ येथील कोळसा खाणीच्या पर्यावरण परवानगी मिळविण्याच्या प्रस्तावावर इ.ए.सी. च्या (कोळसा खाण प्रकल्प) दि. २८, २९ सप्टेंबर २०२० रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीत विचार झाला, इ ए सी ने विचार विमर्श केल्यावर असा निष्कर्श काढला की प्रकल्प संबधित घटकांचा प्रतिसाद समाधानकारक आहे. त्यामुळे पर्यावरणाची परवानगी साठीचा प्रस्ताव काही अटी व शर्तींचा यांचा/विशिष्ट अटी (एम ओ एम दि. १४.१०.२०२० रोजी नमूद केलेला) यांच्या पूर्ततेच्या अधिन असून त्यासाठी शिफारस केली आहे मंत्रालयाच्या पत्राची प्रतीक्षा आहे.

**२ x ६०० अद्यावत तंत्रज्ञानाचा औ.वि. प्रकल्प** – कोराडी – नागपूर यातील संदर्भाच्या प्रस्तावावर (टी ओ आर) इ ए सी कमिटीने (औ.वि. प्रकल्प) दि. २८.०५.२०१९, २३.०८.२०१९, ०४.१२.२०१९ आणि अंतिम बैठक दि. १०.०४.२०२० रोजीच्या बैठकी मध्ये विचार केला.

मंत्रालयाने प्रमाणक संदर्भात भर घालणारे विशिष्ट संदर्भ कोळसा, कोराडी २ x ६६० मेगावॅट प्रकल्पासाठी दिले आहेत आणि त्यांचे पत्र क्र. जे – १३०१२/११/२०१९/ – आय ए (टी) दिनांक २६.०६.२०२० नुसार इ आय ए/इ एम पी तयार करण्यास सांगितले आहे.

**वार्षिक परताव्याचा उतारा**

या अहवालाचे परिशिष्ट क्र १ यामध्ये वार्षिक परताव्याचा उतारा फॉर्म एमजीटी–९ जोडला आहे. तो कलम ९२ चे उपकलम (३) प्रमाणे आहे.

**मंडळाच्या बैठकीची संख्या**

वर्ष २०२०–२०२१ कंपनीच्या मंडळाच्या ०५ बैठका संपन्न झाल्या.

**संचालक नियुक्तिचे धोरण**

कंपनीचे संचालक आणि स्वतंत्र संचालक यांच्या नियुक्त्या मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड करते. कार्य करण्यासाठी नियुक्त करावयाचे संचालक यांच्या पात्रतेचे व इतर निकष कंपनीच्या संघटनात्मक संस्थापक नियमावलीमध्ये नमूद केले आहेत.

**कलम १८६ नुसार कर्ज, हमी व गुंतवणूकीचे तपशील**

ही कंपनी पायाभूत सुविधा पुरविणे या व्यवसायात असल्याचे वित्त कर्जे हमी किंवा प्रतिभूती देण्यासंबंधी तरतूदी कंपनी अधिनियम २०१३ कलम १८६ नुसार लागू नाहीत. कंपनीने उपकंपन्यांना प्रवर्तन कामासाठी कर्जे पुरविली आहेत. गुंतवणूकीचा तपशील स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाची टिपा – ३ यात दिली आहे.

**संबधितांशी केलेल्या कराराचा/कंत्राटाचा तपशील**

महानिर्मिती कंपनी ने निर्माण केलेली बहूतांश वीज 'मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित ची' दूसरी उपकंपनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला (सहोदर) विकते. या वीज विक्रीचे दर विद्युत अधिनियम २००३ च्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचे कडून निश्चित केले जातात. तसेच महानिर्मिती कंपनी रिॲक्टिव एनर्जी चार्जेस याचे देयक मे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित ला आकारते या वीज विक्रीचे दर सुध्दा विद्युत अधिनियम २००३ च्या तरतूदीप्रमाणे विद्युत नियामक आयोग यांचे कडून निश्चित केले जातात.

**वित्तीय वर्ष अखेर आणि अहवालाची तारीख दरम्यान वित्तीय स्थितीदर परिणाम करणारे महत्वाचे बदल आणि बांधिलकी असल्यास वित्तीय वर्ष संपल्यानंतर अहवाल तारखे पर्यंतच्या कालावधीत कंपनीच्या वित्तीय स्थिती बाधक करु शकतील असे कोणतेही मोठे बदल किंवा बांधिलकी झालेली नाहीत.**

**औद्योगिक संबधः**

या वर्षभरात कंपनीच्या कर्मचाऱ्यांसोबतचे संबंध सलोख्याचे आणि सुसंवादाचे चालू राहिले आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या बाबत तसेच कल्याणाच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या सर्व थरात प्रतिनिधी सोबत कार्यशाळा घेऊन त्यांना कंपनी समोरील व्यावसायिक बदल, संधी, जोखिमा आणि आव्हाने याबाबत अवगत करण्यात आले. कंपनीत सर्व थरातील औद्योगिक संबंध हे शांततेचे आहेत त्यांचा परस्पर विश्वास आणि सुसंवाद आहे.

**संचालक मंडळातील बदल**

यावर्षी श्री. संजय खंदारे, भा.प्र.से. यांची श्रीमती शैला ए यांच्या जागी कंपनीचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक यापदावर दि. १०.०८.२०२०

पासून नियुक्ती झाली. श्रीमती स्वाती व्यवहारे यांची दि. २२.०१.२०२१ रोजी 'संचालक' पदावर नियुक्ती झाली. श्री. डी. टी. वाघमारे, प्रधान सचिव (ऊर्जा) महाराष्ट्र शासन, यांची श्री. असीम गुप्ता यांच्या जागी दि. २९.०१.२०२१ रोजी नियुक्ती झाली. श्री. सी.एस. थोटवे यांची संचालक (प्रवर्तन) या पदावर श्री. राजू बुरडे यांच्या जागी १६.०३.२०२१ रोजी नियुक्ती झाली. श्री. बाळासाहेब थिटे यांनी दि. १५.०९.२०२० रोजी संचालक (वित्त) या पदाची सूत्रे हाती घेतली. श्रीमती जुईली वाघ आणि श्री. एस.जे. आंबेकर अनुक्रमे दि. ०६.०७.२०२० आणि १०.०८.२०२० पासून संचालक पदावर नाहीत.

**लेखा परिक्षण समिती**

भारत सरकार चे कंपनी व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली अधिसूचना क्रमांक जी एस आर ८८० (इ) दि. १३.०७.२०१७ नुसार लेखा परिक्षण समिती , नामनिर्देशन आणि पारिश्रमिक समितीची अनिवार्य स्थापना बंधनकारक नाही.

**कंपनीची सामाजिक जबाबदारी**

कंपनीने सी एस आर कामांसाठी (दि. ३१.०३.२०२१) पासून ही पुढील सदस्यांची समिती कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या कामांसाठी नियुक्त केली आहे. श्री. संजय खंदारे (अध्यक्ष), श्री. सी एस थोटवे (सदस्य), श्री. व्ही थंगपंडीयन (सदस्य), श्री. बाळासाहेब थीटे (सदस्य) आणि श्री. पुरुषोत्तम जाधव (सदस्य) कंपनीने सी एस आर चे धोरण तयार केले असून त्याला सी एस आर समितीने आणि मंडळाने मान्यता दिली आहे. या धोरणांस खालील उद्दिष्टे व ध्येय आहेत.

१. प्रकल्प बाधीत व्यक्ती (पी ए पी) याच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत सुधारणा घडविणे.

२. कायम स्वरूपी सुधारणा साठीच्या संधी पुढील क्षेत्रात पुरविणे-उत्पन्नाची निर्मिती, आरोग्य, शिक्षण, पाणी व वीज, स्वच्छता, संवाद व इतर क्षेत्रे.

३. प्रकल्प ग्रस्तांच्या सामुदायिक विकासासाठी व्यापक दृष्टिकोन बाळगणे आणि अशा क्षेत्रात प्रकल्पग्रस्तांना किमान त्यांची पूर्वीची जीवन शैली पुन्हा प्राप्त होईल याची हमी घेणे.

४. सामुदायिक विकासाची कामे पारदर्शक व सहभाग पद्धतीने अंमलात आणणे.

५. स्थानीक लोकप्रतीनिधींच्या सहभागाने व सल्ल्याने समितीच्या कामाचे आयोजन करण्याची हमी घेणे आणि प्रकल्पग्रस्त क्षेत्रे व वीज केंद्राचा परिसर यात कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या कार्यासाठी संस्थात्मक स्वरूपाची यंत्रणा तयार करणे.

कंपनी अधिनियमनाच्या तरतुदी प्रमाणे वित्तीय वर्षे २०२०-२१ मध्ये सी एस आर कामाचे दायित्त्व **निरंक** होते. कारण कंपनीला मागील तीन वित्तीय वर्षात तोटा झाला आहे.

सामाजिक जबाबदारी बाबत तपशील अहवाल **परिशिष्ट -२** येथे जोडण्यात आला आहे.

**संचालकांच्या जबाबदारीचे निवेदन**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४(३)(सी) नुसार, कंपनीच्या संचालकांच्या जबाबदारीचे विवरण पत्राच्या संदर्भात खालील बाबींची हमी देण्यात येते.

१. कंपनीला लागू होणाऱ्या लेखामानकांचे अनुसरण करण्यात आले आहे. जर काही प्रत्यक्ष विचलन झाले असेल तर, त्याबाबत योग्य स्पष्टीकरणे देण्यात आली आहेत.

२. निवडलेली लेखा धोरण सातत्याने लागू केली होती आणि दि. ३१.०३.२०२१ रोजी कंपनीच्या स्थितीचे रास्त आणि योग्य दर्शन घडावे यासाठी न्याय्यबुद्धीने तसेच सुज्ञतेने निर्णय घेण्यात आले व अंदाज करण्यात आले.

३. कंपनीच्या मत्तांचे संरक्षण करणे तसेच लबाडी व अनियमितता रोखणे यासाठी कंपनी अधिनियम २०१३ मध्ये ज्या तरतुदी केल्या आहेत. त्यानुसार लेख्यांचे अभिलेखांचे जतन करण्यासाठी महानिर्मिती कंपनीच्या संचालकांनी योग्य प्रकारे आणि पुरेशी काळजी घेतली आहे.

४. "महानिर्मिती" ही सतत कार्यरत असलेली संस्था आहे या तत्त्वांच्या आधारे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले आहेत.

५. कंपनीला लागू होणारे सर्व कायद्यातील तरतूदीचे अनुपालन करण्याची हमी मिळावी या दृष्टीने योग्य कार्य पद्धतीची रचना, संचालकांनी केलेली होती आणि ही कार्यपद्धती पुरेशी असुन प्रभावी कार्यरत होती.

**ऊर्जा संवधर्नन, तंत्रज्ञानाचा वापर आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च**

कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १३४(एम) ज्याचे सहवाचन कंपनी (लेखे) नियमावली २०१४ यातील नियम क्र.८(३) या सोबत होते. त्यानुसार ''ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञान स्वीकार आणि परदेशी चलनातील मिळकत व खर्च'' या संबंधीची आवश्यक असलेली माहिती या अहवालाचा भाग असलेले, '**परिशिष्ट-३**' यामध्ये दिलेली आहे.

**सांविधिक लेखा परिक्षक यांची निरीक्षणे / अभिप्राय यांची उत्तरे**

सांविधिक लेखा परिक्षक यांनी त्यांच्या लेखापरिक्षण अहवालात लिहिलेली निरीक्षणे व अभिप्राय यांना कंपनीने दिलेली उत्तरे या अहवालाचे '**परिशिष्ट-४**' यामध्ये जोडली आहेत.

**मुदतींच्या ठेवी**

अहवालाच्या वर्षात कंपनीने जनतेकडून कोणत्याही मुदतीच्या ठेवी मागविल्या नाहीत/स्वीकारल्या नाहीत.

**व्यय लेखापरिक्षक**

सांघिक प्रकरण विभाग मंत्रालय भारत सरकार यांच्या मंजुरीने महानिर्मिती कंपनीने दि.३१.०३.२०२१ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी कंपनीचे ''व्यय लेखा परिक्षक'' म्हणून मेसर्स एम आर पंडित अॅण्ड कंपनी यांची नेमणूक केली आहे.

**सांविधिक लेखापरिक्षक**

भारतीय लेखा नियंत्रक आणि महालेखा परिक्षक यांनी मेसर्स के.एस.अय्यर अॅन्ड कंपनी, मुंबई, आणि मेसर्स आर एस व्ही ए अॅन्ड कंपनी, मुंबई, यांची वित्तीय वर्ष २०२०-२१ या वर्षासाठी संयुक्त सांविधिक लेखापरिक्षक म्हणून नेमणूक केलेली आहे.

**बाह्य कंपनी सेक्रेटरी कृत परिक्षण**

महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाने वित्तीय वर्ष २०२०-२१ साठी स्वतंत्र कंपनी सेक्रेटरी यांचेकडून परिक्षण करण्यासाठी मेसर्स **ए.वाय. साठे अँड कंपनी** या कंपनी सेक्रेटरी (सी/२०२, कोहीनूर अपार्टमेंटस्, दुसरा गाळा, एन.सी.केळकर मार्ग, कबुतर खान्याजवळ, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८ यांची) नियुक्ती केली आहे. त्यांचा अहवाल **परिशिष्ट-५** यामध्ये आहे.

**ऋणनिर्देश**

महानिर्मिती कंपनीला आपल्या कार्यामध्ये विविध केंद्र व राज्य सरकार विभाग / संस्था यांचे तसेच वित्तीय संस्था आणि बँका, सांविधिक लेखा परिक्षक, व्यय लेखा परिक्षक, भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक, नवी दिल्ली तसेच महालेखापाल (वाणिज्य) मुंबई, केंद्रीय/राज्य विद्युत नियामक, प्रधिकारी, सेक्रेटरीयल, ऑडीटर्स, अपीलासाठीची न्यायाधिकरणे आणि कंपनीचे भागधारक यांनी जी मदत व सहकार्य केले त्याबद्दल संचालक त्यांची कृतज्ञतापूर्वक प्रशंसा व धन्यवाद नोंदवित आहेत. तसेच कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तळमळीने व समर्पित वृत्तीने त्याचे कार्य केले त्याबद्दल मंडळ त्यांची प्रशंसा करीत असून ती तेथे नोंदवित आहे.

**संचालक मंडळाच्या वतीने**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**स्थळ: मुंबई**

**दिनांक : ०४.०३.२०२२**

# संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र-१

## फॉर्म नं. एम.जी.टी.९

## वार्षिक विवरणाचा सारांश

### ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची स्थिती

### ( कंपनी अधिनियम २०१३ चे कलम ९२( ३ ) आणि कंपनी ( व्यवस्थापन व प्रशासन ) नियमावली २०१४ यातील नियम १२( १ ) याला अनुसरुन )

**१. नोंदणी व अन्य तपशील:**

| | | |
|---|---|---|
| १ | सी आय एन | यू ४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८ |
| २ | नोंदणीची तारीख | ३१.०५.२००५ |
| ३ | कंपनीचे नांव | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित |
| ४ | कंपनीची श्रेणी / उपश्रेणी | शासकीय कंपनी |
| ५ | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व संपर्क तपशील | प्रकाशगड, प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांन्द्रे (पूर्व), मुंबई ४०००५१. |
| ६ | कंपनी यादीवरील (लिमिटेड ) आहे का ? होय/नाही | नाही |
| ७ | रजिस्टर व ट्रान्स्फर एजंटचे नाव पत्ता, जर असल्यास | लागू नाही. |

**२. कंपनीचे प्रमुख उद्योग कार्य:**

**कंपनीच्या उलाढालीमध्ये १०% किंवा त्याहून जास्त योगदान देणाऱ्या सर्व औद्योगिक व्यवहाराची माहिती देणे.**

| अनु. क्र. | मुख्य उत्पादित / सेवांची नांवे | वस्तु / सेवा यांचा एन आय सी कोड | कंपनीच्या एकूण उलाढालीत टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीज निर्मिती | लागू नाही | १०० टक्के |

**३. सूत्रधारी, उपकंपन्या व सहयोगी कंपन्याचा तपशील:**

| अनु. क्र. | कंपनीचे नाव व पत्ता | सी आय एन / जी एल एन | सुत्रधारी / उपकंपनी / सहयोगी | शेअर्सची टक्केवारी | लागु होणारा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित | यू४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४९ | सुत्रधारी | १०० | २(८७) |
| २ | महागुज कोलरीज कंपनी मर्यादित | यू१०१०२एमएच२००६एसजीसी१६५३२७ | उपकंपनी | ६० | २(८७) |
| ३ | धोपावे कोस्टल पॉवर कंपनी मर्यादित | यू४०१०८एमएच२००७एसजीसी१६८८३६ | उपकंपनी | १०० | २(८७) |
| ४ | महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस मर्यादित | यू४०१०५एमएच२००७एसजीसी१७३४३३ | उपकंपनी | १०० | २(८७) |

**४. शेअर धोरणेचे स्वरुप ( समभाग भांडवलाची विभागणी: एकूण समभागाची टक्केवारी ):**

**१ ) श्रेणी निहाय भाग धारणा**

| भाग धारकांची श्रेणी | वर्षाच्या आरंभी धारण केलेल्या भागांची संख्या | | | | वर्षाच्या अखेरीस धारण केलेल्या भागांची संख्या | | | | वर्षभरातील बदलाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | डीमॅट | प्रत्यक्ष | एकूण | एकूण भागांची टक्केवारी | डीमॅट | प्रत्यक्ष | एकूण | एकूण भागांची टक्केवारी | |
| **अ ) प्रवर्तक** | | | | | | | | | |
| **१ ) भारतीय** | | | | | | | | | |
| अ) व्यक्ती/एच.यु.एफ. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ब) केंद्र सरकार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| क) राज्य शासन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ड) संस्था कंपनी | ० | २५३४३९४६२२६ | २५३४३९४६२२६ | १०० | ० | २५४०७९४६२२६ | २५४०७९४६२२६ | १०० | |
| इ) बँका / वित्तसंस्था | ० | | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| फ) इतर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| उप बेरीज ( अ )( १ ) | ० | २५३४३९४६२२६ | २५३४३९४६२२६ | १०० | ० | २५४०७९४६२२६ | २५४०७९४६२२६ | १०० | ०.२५ |
| **२ ) परदेशी** | | | | | | | | | |
| अ) अनिवासी भारतीय व्यक्तीगत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ब) इतर व्यक्ती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| क) संस्था, कंपन्या | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ड) बँका/वित्तसंस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| इ) इतर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| **उप बेरीज ( अ ) ( २ )** | | | | | | | | | |
| एकूण प्रवर्तकांची भागधारणा ( अ ) = ( अ )( १ )+( अ( २ ) | ० | २५३४३९४६२२६ | २५३४३९४६२२६ | १०० | ० | २५४०७९४६२२६ | २५४०७९४६२२६ | १०० | ०.२५ |
| **ब ) सार्वजनिक भागधारणा** | | | | | | | | | |
| **१ ) संस्था** | | | | | | | | | |
| अ) म्युचअल फंड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | लागू नाही |
| ब) बँक / वित्त संस्था | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| क) केंद्र सरकार | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ड) राज्य शासन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| इ) साहसी भांडवल निधी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| फ) विमा कंपन्या | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ग) वित्तीय संस्थाकडून | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ह) परदेशी साहसी भांडवल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ज) इतर (स्पष्ट करा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| उप बेरीज ( बी ) ( १ ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| **२ ) संस्था व्यतिरिक्त** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अ) महामंडळ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| १) भारतीय | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २) परदेशी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ब) व्यक्तिगत | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) व्यक्तिगत भागधारक नाम मात्र ₹ १ लाख पर्यंत भाग भांडवल धारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| २) व्यक्तिगत भागधारके ₹ १ लाख पेक्षा जास्त नाममात्र भाग धारण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| क) इतर (स्पष्ट करा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| उप बेरीज ( बी ) ( २ ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| **बेरीज सार्वजनिक भागधारणा ( ब ) = ( ब ) ( १ )+( ब )( २ )** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | |
| **क ) जी डी आर आणि ए डी आर यांचे रक्षक यांनी धारण केलेले भाग** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **लागू नाही** |
| एकूण बेरीज ( अ + ब + क ) | ० | २५३४३९४६२२६ | २५३४३९४६२२६ | १०० | ० | २५४०७९४६२२६ | २५४०७९४६२२६ | १०० | ०.२५ |

## २ ) प्रवर्तकांची भाग धारणा

| अनु. क्र. | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभाची भाग धारणा | | | वर्षाअखेरीची भाग धारणा | | | वर्षभरातील बदलाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | गहाण असलेल्या भागाची एकूण भागांमध्ये टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीच्या एकूण भागांची टक्केवारी | गहाण असलेल्या भागाची एकूण भागांमध्ये टक्केवारी | |
| १ | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित (राज्य शासनाची कंपनी) | २५३४३९४६२२६ | १०० | ० | २५४०७९४६२२६ | १०० | ० | ०.२५ |
| | एकूण | २५३४३९४६२२६ | १०० | ० | २५४०७९४६२२६ | १०० | ० | ०.२५ |

## ३ ) प्रवर्तकांच्या भागधारणातील बदल ( जर बदल नसेल तर कृपया तसे स्पष्ट करावे )

| तपशील | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभीची भागधारणा | | वर्षभरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीचे एकूण भागांचे टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीचे एकूण भागांचे टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित आणि राज्य शासन | २५३४३९४६२२६ | १०० | | |
| वर्षभरात दिलेले भाग | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित | ६४०००००० | ०.२५ | २५४०७९४६२२६ | ०.२५ |
| वर्षाच्या अखेरीस | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित आणि राज्य शासन | २५४०७९४६२२६ | १०० | २५४०७९४६२२६ | १०० |

**४) पहिल्या दहा भागधारकांच्या भागधारणेचे स्वरुप ( संचालक, प्रवर्तक व जीडीआर आणि एडीआर धारक व्यतिरिक्त )**

| पहिल्या १० भागधारकांसाठी प्रत्येकाची | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभीची भागधारणा | | वर्षभरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीचे एकूण भागांचे टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीचे एकूण भागांचे टक्केवारी |
| वर्षाची आरंभी | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित | २५३४३९४६२२६ | १०० | – | – |
| शेअर्सचे वाटप (०७.०८.२०२०) | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित | ६४०००००० | ०.२३ | २५४०७९४६२२६ | ०.२५ |
| वर्षाच्या अखेरीस किंवा जर वर्षभरात अलग झाले असतील तर अलग होणाच्या तारखेला | मराविम सुत्रधारी कंपनी मर्यादित | २५४०७९४६२२६ | १०० | २५४०७९४६२२६ | १०० |

**५) संचालक आणि व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्तींची भागधारणा**

| प्रत्येक संचालक आणि व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्ती | भाग धारकांचे नाव | वर्षाप्रारंभीची भागधारणा | | वर्षभरातील संचित भाग धारणा | |
|---|---|---|---|---|---|
| | | भागांची संख्या | कंपनीचे एकूण भागांचे टक्केवारी | भागांची संख्या | कंपनीचे एकूण भागांचे टक्केवारी |
| वर्षाच्या आरंभी | श्रीमती शैला ए<br>श्री.एस.जे.आंबेरकर<br>श्री.सी.एस.थोटवे<br>श्री व्ही थंगपंडियन<br>श्री असीम गुप्ता<br>(मराविम सूत्रधारी चे नामनिर्देशित | १०<br>१०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९ | १०<br>१०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९ |
| वर्षभरात प्रवर्तकांच्या धारणेत झालेली वाढ/घट तारिख निहाय वाढी/घट होण्याची कारणे स्पष्ट करावीत (उदा. वाटप/ हस्तांतरण बोनस/ स्वेट इक्विटी इ.) | | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| वर्षाच्या अखेरीस | श्री संजय खंदारे<br>श्री बाळासाहेब थिटे<br>श्री सी एस थोटवे<br>श्री व्ही थंगपंडीयन<br>श्री डी टी वाघमारे<br>(मराविम सूत्रधारी नाम निर्देशित) | १०<br>१०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९ | १०<br>१०<br>१०<br>१०<br>१० | ०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९<br>०.००००००००३९ |

## ५. ऋणे

कंपनीची ऋणे यामध्ये थकीत / उपार्जित परंतु देय नसलेले व्याज समाविष्ट आहे.

(रक्कम ₹ कोटीत)

| तपशील | प्रतिभूत कर्जे ( ठेवी वगळता ) | अप्रतिभूत कर्जे | ठेवी | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्षाच्या आरंभीचे कर्ज (०१.०४.२०१९) | | | | |
| १) मुद्दल | ३१०३१.४५७१३ | २९४९.९७७३७५ | ०.०० | ३३९८१.४३४५ |
| २) देय पण न भरलेले व्याज | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३) उपार्जित पण देय नसलेले व्याज | २१७.०७९९३ | ७.३१३१४३ | ०.०० | २२४.३९३०८ |
| **बेरीज ( १+२+३ )** | **३१२४८.५३७०६** | **२९५७.२९०५१८** | **०.००** | **३४२०५.८२७५८** |
| आर्थिक वर्षात कर्जातील बदल | | | | |
| १) मुद्देतील भर | ६४२६.६३०१३२ | १०८.०३५७३ | ०.०० | ६५३४.६६५८६२ |
| २) मुद्दलात घट | ३२३१.०४७७९ | ५३४.२०१८१०९ | ०.०० | ३७६५.२४९६०१ |
| निव्वळ बदल | ३१९५.५८२३४२ | -४२६.१६६०८०९ | ०.०० | २७६९.४१६२६१ |
| **आर्थिक वर्षाच्या अखेरचे कर्ज** | | | | |
| १) मुद्दल | ३४२२७.०३९४७ | २५२३.८११२९४ | ०.०० | ३६७५०.८५०७६ |
| २) देय पण न भरलेले व्याज | ०.३५३६८१९ | ०.०० | ०.०० | ०.३५३६८१९ |
| ३) उपार्जित पण देय नसलेले व्याज | २२१.९५९४०५८ | ७.६४८२३११ | ०.०० | २२९.६०७६३६९ |
| **बेरीज ( १+२+३ )** | **३४४४९.३५२५६** | **२५३१.४५९५२५** | **०.००** | **३६९८०.८१२०८** |

## ६. संचालक व व्यवस्थापनातील महत्वाचे कर्मचारी यांचे परिश्रमिक

### अ ) व्यवस्थापकीय संचालक पूर्णवेळ संचालक आणि किंवा व्यवस्थापक यांचे परिश्रमिक

| अनु. क्र. | परिश्रमिकाचा तपशील | व्यवस्थापकीय संचालक / पूर्ण वेळ संचालक / व्यवस्थापक यांची नांवे | | | | | | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शैला ए ( अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ) | संजय खंदारे ( अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ) | एस.जे. आंबेरकर ( संचालक वित्त ) | बाळासाहेब थिटे ( वित्त ) | व्ही.थंगपंडियन ( संचालक प्रकल्प ) | सी एस थोटवे ( संचलक प्रवर्तने ) | पी व्ही जाधव ( संचालक खाणकाम ) | |
| १ | एकूण वेतन | ९१३८१८ | २०२७५८० | १९४०३४३ | १२०५८३७ | ३५४८१६५ | १४०२०६३२ | १९११९९० | २५५७६३६५ |
| | अ) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (१) यातील तरतुदी नुसार वेतन | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ४७३२४५ | १७१००८५ | २२६३३१ | २४०९६६१ |
| | ब) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (२) नुसार इतर लाभांचे मुल्य | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | क) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (३) नुसार वेतनाऐवजी नफा | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | स्टॉक पर्याय | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | स्वेट इक्विटी | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | दलाली<br>नफ्याची टक्केवारी<br>इतर (स्पष्ट करावे) | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ५ | इतर – कृपया स्पष्ट करावे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | एकूण ( अ ) | ९१३८१८ | २०२७५८० | १९४०३४३ | १२०५८३७ | ४०२१४१० | १५७३०७१७ | २१४६३२१ | २७९८६०२६ |
| | कायद्यानुसार मर्यादा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

| अ. क्र. | परिश्रमिकाचा तपशील | प्र.सं./पूर्ण वेळ संचालक/व्यवस्थापक यांची नावे | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | श्री राजू बुरडे | श्रीकांत लाबडे | |
| १ | एकत्रित वेतन<br>अ) आयकर कायद्याचे कलम १७(१) यातील तरतुदीनुसार वेतन | १८५१४७८ | २९१४७० | १८५८१०६ |
| | ब) इतर लाभांचे मूल्य (आयकर कायदा १९६१ कलम १७(२) नुसार वेतनेतर प्राप्तिचे मूल्य | २४०१६२ | ३८५०४ | २४१७१८ |
| | क) आयकर कायदा १९६१ चे कलम १७(३) नुसार वेतमान्य ऐवजी नफा | निरंक | निरंक | निरंक |
| २ | स्टॉक पर्याय | निरंक | निरंक | निरंक |
| ३ | स्वेट इक्विटी | निरंक | निरंक | निरंक |
| ४ | कमीशन – नफ्यारी टक्केवारी | निरंक | निरंक | निरंक |
| ५ | इतर (स्पष्ट करणे) | निरंक | निरंक | निरंक |
| | एकूण | २०९१६४० | ३२९९७४ | २४२६१४ |
| | कायद्यानुसार मर्यादा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**ब ) इतर संचालाकांना मानधन**

| अ.क्र. | पारिश्रमिकांचा तपशील | संचालकांची नावे | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | स्वतंत्र संचालक<br>१. मंडळ/समिति यांच्या बैठकीच्या उपस्थितीचे शुल्क<br>२. दलाली<br>३. इतर (स्पष्ट करणे) | निरंक<br>निरंक<br>निरंक<br>निरंक | लागू नाही<br>लागू नाही<br>लागू नाही<br>लागू नाही | लागू नाही<br>निरंक<br>निरंक<br>निरंक |
| | एकूण ( १ ) | निरंक | | निरंक |
| २ | इतर अकार्यकारी संचालक<br>१) मंडळ/समिति यांच्या बैठकीच्या उपस्थितीचे राहण्याचे शुल्क<br>२) दलाली | श्रीमती स्वाती व्यवहारे<br>५०००/–<br>– | लागू नाही | –<br>५००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | इतर (स्पष्ट करणे) | - | - | - |
| ४ | एकूण ( ब ) - ( १+२ ) | ५००० | निरंक | ५००० |
| ५ | एकूण व्यवस्थापकीय परिश्रमिक | ५००० | **निरंक** | ५००० |
| | कायद्यानुसार एकूण मर्यादित | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**क ) व्यवस्थापकीय संचालक / व्यवस्थापक / पूर्ण वेळ संचालक या व्यतिरिक्त महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांचे परिश्रमिक**

| अ. क्र. | परिश्रमिकाचा तपशील | महत्त्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| | | **कंपनी सेक्रटरी** | |
| १ | एकूण वेतन<br>अ) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (१) यातील तरतुदीनुसार वेतन<br>ब) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (२) याप्रमाणे वेतनेतर प्राप्तीचे मुल्य<br>क) आयकर कायदा १९६१ च्या कलम १७ (३) नुसार वेतना ऐवजी नफा | <br>३०१००८२<br>३८९३९३<br>निरंक | <br>३०१००८२<br>३८९३९३<br>निरंक |
| २ | स्टॉक पर्याय | निरंक | निरंक |
| ३ | स्वेट इक्विटी | निरंक | निरंक |
| ४ | दलाली<br>- नफ्याच्या टक्केवारी मध्ये<br>- इतर (स्पष्ट करावे) | निरंक | निरंक |
| ५ | इतर - कृपया स्पष्ट करावे | निरंक | निरंक |
| | बेरीज ( अ ) | ३३९९४७५ | ३३९९४७५ |

**७. गुन्हे प्रशमन करण्याबद्दल दंड / शिक्षा**

| प्रकार | कंपनी कायद्याचे कलम | संक्षिप्त वर्णन | गुन्हे प्रशमन करण्याद्दल दंड / शिक्षा | प्राधिकारी आरडी / एन सी एल टी न्यायालय | अपिल केले असल्यास ( तपशील देणे ) |
|---|---|---|---|---|---|
| दंड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| शिक्षा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| गुन्हे प्रशमन | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**८ ) कसुर करणारे इतर अधिकारी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दंड | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| शिक्षा | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| गुन्हे प्रशमन | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

**संचालक मंडळाच्या वतीने**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**स्थळ: मुंबई**
**दिनांक : ०४.०३.२०२२**

## परिशिष्ट - २

## कंपनीची सामाजिक जबाबदारी यांचे वार्षिक इतिवृत्त दिनांक ०१ एप्रिल २०२० पासूनच्या वर्षाचा

१. **महानिर्मिती कंपनीचे सीएसआर विषयी धोरण ( संक्षिप्त ) :** स्थानिक समुदायाचा आर्थिक व सामाजिक विकासाचे तसेच सर्व समाजाचे विकासासाठी सक्रीयपणे योगदान देण्याचे महानिर्मिती कंपनीचे धोरण आहे.

२. **सी एस आर समितीची रचना :**

| अ. क्र. | संचालकांची नावे | पद/संचालनाचे स्वरूप | वर्षभरातील सभांची संख्या | उपस्थिति |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. संजय खंदारे | अध्यक्ष व्य. मु. सं. | - | - |
| २ | श्री. बाळासाहेब थिटे | संचालक (वित्त) | - | - |
| ३ | श्री. सी. एस. थोटवे | संचालक (संचलन) | - | - |
| ४ | श्री. व्ही. थांगपंडियन | संचालक (प्रकल्प) | - | - |
| ५ | श्री. पी. व्ही. जाधव | संचालक (खनिकर्म) | - | - |

वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये सीएसआर समितीच्या बैठकी होऊ शकल्या नाही.

३. कंपनीच्या संचालक मंडळाने मंजूर केलेली सीएसआर समितीची रचना, सीएसआर धोरण आणि सीएसआर प्रकल्प यांचे प्रकटन ज्या वेबसाइटवर केलेले आहे, तिचा तपशील : https://www.mahagenco.in/uploads/CSR/MSPGCL%20New%20CSR%20 policy.pdf

४. कंपनीचे (सी एस आर धोरण) नियमावली २०१४ यातील उपनियम (३) नुसार कार्यवाही केलेल्या सी एस आर प्रकल्पाच्या प्रभावाच्या मूल्यांकनाची माहिती देणे - (लागू असल्यास अहवाल जोडावा) : लागू नाही

५. कंपन्यांचे (सी एस आर धोरण) नियमावली २०१४ यातील नियम ७ चे उपनियम (३) नुसार उपलब्ध केलेली रक्कम आय वित्तीय वर्षात द्यावयाची आवश्यक रक्कम (जर असल्यास) तिची माहिती.

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | मागील वित्तीय वर्षातील उपलब्ध असलेली रक्कम ( ₹ मध्ये ) | वित्तीय वर्षापासून उपलब्ध करण्याची आवश्यक रक्कम ( ₹ मध्ये ) |
|---|---|---|---|
| १ | २०२०-२१ | निरंक | निरंक |

६. कलम १३५(५) नुसार कंपनीच्या सरासरी निव्वळ नफा: (₹ २३४.५१/३ = ७८.१७ कोटी) तोटा

७. (अ) कलम १३५(५) नुसार कंपनीच्या सरासरी निव्वळ नफ्याची २ टक्के रक्कम : लागू नाही

(ब) मागील वित्तीय वर्षातील सीएसआर प्रकल्प किंवा कार्य यातील अधिक्याची रक्कम : लागू नाही

(क) वित्तीय वर्षासाठी राखून ठेवायची रक्कम - लागू नाही

(ड) वित्तीय वर्षासाठी एकूण सी एस आर बंधन (७अ+७ब+७सी) - निरंक

८. (अ) वित्तीय वर्षात खर्च केलेली सी एस आर रक्कम

| वित्तीय वर्षात खर्च केलेली एकूण रक्कम (₹ मध्ये) | खर्च न केलेली रक्कम (₹ मध्ये) | | | |
|---|---|---|---|---|
| | कलम १३५(६) नुसार सीएसआर कार्यातील खर्च न केलेली रक्कम स्थानांतरण करणे | | कलम १३५(५) नुसार अनुसूची ७ अंतर्गत विनिर्देशित केलेल्या निधीत स्थानांतरण केलेली रक्कम | |
| | रक्कम | स्थानांतरण | रक्कम | स्थानांतरण तारीख |
| २७८३०७९८६ | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**(ब) वित्तीय वर्षातील कार्यरत प्रकल्पावर खर्च केलेले सीएसआर**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रकल्पाचे नावे | कार्यक्षेत्र सूची ७ च्या लाभांच्या यादी नुसार बाबी | स्थानिक क्षेत्र (होय/ नाही) | प्रकल्प जागा | प्रकल्पाचे मुदत | प्रकल्पाची दिलेली रक्कम (₹ मध्ये) | चालू वित्तीय वर्षात खर्च केलेली रक्कम (₹) | खर्च न केलेली सी एस आर प्रकल्पाची रक्कम कलम १३५(६) यानुसार खर्च न केलेल्या सीएसआर खात्यात हस्तांतरित | अमल बजावणी प्रत्यक्ष थेट (होय/नाही) | अंमलबजावणी अन्य संस्थे मार्फत केली असल्यास | |
| | | | | राज्य | जिल्हा | | | | | नाव | सी एस आर नोंद क्रमांक |
| १ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | एकूण | | | | | | | | | | |

**(क) वित्तीय वर्षात चालू असलेल्या प्रकल्पा-व्यतिरिक्त खर्च केलेल्या सी एस आर तपशील**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | | (६) | (७) | (८) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | प्रकल्पाचे नाव | कायद्याच्या सूची-७ मधील यादीतील बाब क्रमांक | स्थानिक जागा (होय/ नाही) | प्रकल्पाची जागा | | प्रकल्पावर खर्च केलेली रक्कम (₹ मध्ये) | अंमल बजावणी पद्धत थेट (होय/नाही) | अंमलबजावणी संस्थे मार्फत केल्यास | |
| | | | | राज्य | जिल्हा | | | नाव | सी एस आर नोंद क्रमांक |
| १. | कोविड-१९ साहय निधीत योगदान | i | होय | छत्तीसगढ | रायगड | १००००० | होय | लागू नाही | लागू नाही |
| २. | गौटीयापार रस्ता (७५ एम) कॉंक्रिटीचा बांधकाम | x | होय | छत्तीसगढ | रायगड | २७७३४४ | होय | लागू नाही | लागू नाही |
| ३. | सरसमाळ सीसी रस्ता बांधकाम (१०० एम) | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ३७१३८६ | होय | लागू नाही | लागू नाही |
| ४ | सराई टोळा सीसी रस्ता बांधकाम (७५ एम) | x | होय | छत्तीसगढ | रायगड | २७७३४४ | होय | लागू नाही | लागू नाही |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | सारसमाळ सीसी रस्ता बांधकाम (१०० एम) | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ३७५१३७ | होय | लागू नाही | लागू नाही |
| ६ | ढोलेनारा - सीसी रस्ता बांधकाम | x | होय | छत्तीसगढ | रायगड | २९७०९७ | होय | लागू नाही | लागू नाही |
| ७ | चित्तवाही - सीसी रस्ता बांधकाम | x | होय | छत्तीसगढ | रायगड | १७६५१६ | होय | लागू नाही | लागू नाही |
| ८ | संतोष बेहरा जवळ पाण्याची टाकी बांधकाम | i | होय | छत्तीसगढ | रायगड | ६४४६६ | होय | लागू नाही | लागू नाही |
| ९ | झिका बहाल येथे ड्रेन बांधकाम | i | होय | छत्तीसगढ | रायगड | १३८८७२ | होय | लागू नाही | लागू नाही |
| १० | बोअर वेल आणि कुपण भिंतीचे रंगकाम | i | होय | छत्तीसगढ | रायगड | ५६८३९७ | होय | लागू नाही | लागू नाही |
| ११ | चित्तवाही - तलाव खोल करणे | i | होय | छत्तीसगढ | रायगड | २६४००० | होय | लागू नाही | लागू नाही |
| १२ | तिहळी रामपुर तलाव खोल करणे | i | होय | छत्तीसगढ | रायगड | ४९६७५८ | होय | लागू नाही | लागू नाही |
| १३ | तलाव खोली वाढवण्यासाठी जमीन निष्कासन | i | होय | छत्तीसगढ | रायगड | २९७३४४ | होय | लागू नाही | लागू नाही |
| १४ | रोडोपली येथे तलाव खोदणे आणि सुशोभित कामे | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ११०७४ | होय | लागू नाही | लागू नाही |
| १५ | मुडगाव येथे भानावर तलाव खोदणे कामे | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ८६०५ | होय | लागू नाही | लागू नाही |
| १६ | मुक्तीधाम येथे शेड बांधणे | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ९०००० | होय | लागू नाही | लागू नाही |
| १७ | शाळेत मंच बांधणे | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ७०००१ | होय | लागू नाही | लागू नाही |
| १८ | इमारत व प्रसाधनगृह दुरुस्ती व रंगकाम करणे | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ४६१३११ | होय | लागू नाही | लागू नाही |
| १९ | वैद्यकीय वाहन व डॉक्टर सोय करणे | i | होय | छत्तीसगढ | रायगड | २८४५२१६ | होय | लागू नाही | लागू नाही |
| २० | एलइडी एसपीजीएस एआयओ सोलर लाईट जोडली (१५ व्हॉट) | i | होय | छत्तीसगढ | रायगड | २२९५९५६ | होय | लागू नाही | लागू नाही |
| २१ | दिवे उभारणी स्थापना | x | होय | छत्तीसगढ | रायगड | ११०५८०८ | होय | लागू नाही | लागू नाही |
| २२ | कोराडी पंप हाऊस जवळील तलाव क्र ३चे विकासकाम सुशोभिकरण आणि जलीय परिसंस्था संवर्धन या राष्ट्रीय योजने अंतर्गत कोराडी तलावाचे संवर्धन | i&iv | होय | छत्तीसगढ | रायगड | २६७७१५३५४ | होय | लागू नाही | लागू नाही |
| | **एकूण** | | | | | **२७८३०७९८६** | | | |

डी) प्रशासकीय कामासाठी केलेला खर्च -लागू नाही

इ) प्रभाव मूल्यांकनासाठी केलेले खर्च (लागू असल्यास) - लागू नाही

एफ) वित्तीय वर्षात केलेले एकूण खर्च - २७८३०७९८६ (८बी+८सी+८डी+८इ)

(ग) जादा खर्च केला असल्यास

| अनु.क्र. | तपशील | रक्कम ( ₹ मध्ये ) |
|---|---|---|
| १ | कलम १३५(५) प्रमाणे सरासरी निव्वळ नफ्याच्या २ टक्के | निरंक (तोटा झाल्या मुळे) |
| २ | वित्तीय वर्षातील एकूण केलेला खर्च | २७८३०७९८६ |
| ३ | वित्तीय वर्षात जादा खर्च केला [(२)-(१)] | २७८३०७९८६ |
| ४ | मागील वित्तीय वर्षातील सी एस आर प्रकल्प/कार्ये यातील जादा रक्कम असल्यास | निरंक |
| ५ | पुढील वित्तीय वर्षासाठी उपलब्ध रक्कम (३) - (४) | २७८३०७९८६ |

**९. ( अ ) मागील तीन वित्तीय वर्षात खर्च न केलेल्या सी एस आर रकमेचा तपशील.**

| अ. क्र. | मागील वित्तीय वर्ष | खर्च न केलेल्या खात्यात स्थानांतरित केलेली रक्कम ( कलम १३५( ६ ) नुसार | अहवालाच्या वित्तीय वर्षात खर्च केलेली रक्कम ( ₹ ) | कलम १३६( ६ ) नुसार अनुसूची ( ७ ) मधील विनिदेर्शित मधील स्थानांतरित केलेली रक्कम | | | पुढील वर्षात खर्च करण्यासाठी उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निधीचे नाव | रक्कम ( ₹ मध्ये ) | स्थानांतरण दिनांक | |
| १. | २०१९-२० | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २. | २०१८-१९ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| ३. | २०१७-१८ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| | **एकूण** | | | | | | |

**( ९ ) ( ब ) या वित्तीय वर्षात मागील वित्तीय वर्षातील चालू असलेल्या कामांवर खर्च केलेली रक्कम.**

| ( १ ) | ( २ ) | ( ३ ) | ( ४ ) | ( ५ ) | ( ६ ) | ( ७ ) | ( ८ ) | ( ९ ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रकल्प आयडी | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाला ते वित्तीय वर्ष | प्रकल्पाची मुदत | प्रकल्पाची एकूण दिलेली रक्कम | अहवालाची वि. वर्षात प्रकल्पावर खर्च केलेली रक्कम ( ₹ ) | अहवालाची वित्तीय वर्षात खर्च केलेली एकत्रित रक्कम ( ₹ ) | पूर्ण/चालू असलेल्या प्रकल्पाची स्थिति |
| १. | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २. | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| ३. | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| | **एकूण** | | | | | | | |

१०. जर सी एस आर रकमेतून वित्तीय वर्षात भांडवली मत्ता निर्माण किंवा संपादित केल्या असतील त्याच्या निर्मितीच्या संपादनाचा खर्च : लागू नाही.

(अ) भांडवली मत्ता निर्मितीची तारीख

(ब) भांडवली मत्ता संपादन/निर्मितीची रक्कम

(क) ज्या संस्था/सार्वजनिक प्राधिकरण किंवा लाभ घेणाऱ्या संस्थेचे नावे या भांडवली मत्ता नोंदल्या असतील त्याचे नाव, पत्ता इ

(ड) निर्मित/संपादित भांडवली मत्तांचा तपशील (पूर्ण पत्ता, जागा यासह)

११. जर कंपनी (कलम १३५(५) नुसार) तिच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या दोन टक्के रक्कम खर्च करु शकली नसेल तर त्याची कारणे स्पष्ट करावी. **कंपनीला मागील तीन वित्तीय वर्षातील सरासरी निव्वळ नफा झाला नसल्याने ही बाब लागू नाही.**

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

**अध्यक्ष सी एस आर समिति**

दिनांक : ०४.०३.२०२२

स्थळ : मुंबई

# संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र. ३

## ( कंपनी ( लेखे ) नियमावली २०१४ अनुसार आवश्यक तपशील )

**अ ) ऊर्जा संवर्धन**

वर्ष २०२० - २०२१ दरम्यान ऊर्जा संवर्धनासाठी खालीलप्रमाणे कार्य करण्यात आली आहेत.

- पुढील क्षेत्रामध्ये अंतर्गत ऊर्जा अंकेक्षण करण्यात आले. क्राँम्प्रेस्ड एअर, फिड वॉटर, कुलींग वॉटर सिस्टम, हिटर्स इत्यादी क्षेत्रे.
- वीज निर्मिती केंद्रात कर्मचाऱ्यांची जागरुकता वाढावी म्हणून सतर्कतता/प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले.
- ऊर्जा संवर्धनाची जागृती निर्माण करण्यासाठी भित्ती पत्रके/निबंध स्पर्धा इत्यादीचे आयोजन.
- महानिर्मिती कंपनीकडे प्रशिक्षित अभियंताचा ताफा आहे. ते ऊर्जा अंकेक्षण आणि प्रमाणित ऊर्जा व्यवस्थापक आहेत. त्यांचे ज्ञान केंद्राच्या संचालन व सुव्यवस्थेच्या नित्य कामात उपयोगात आणण्यात येते.
- कर्मचाऱ्यांना वर्षातून २ वेळा एल.ई.डी. बल्बचे विनामूल्य वाटप केले जाते. कर्मचाऱ्यांना एल.ई.डी. बल्ब सवलतीच्या दराने देण्यात येतात.

**सहाय्यक वीज वापर**

- साह्यकारी वीज वापराची अचूक मोजणी करण्याकरिता ०.२ क्लास एनर्जी मिटर्स वापरले जातात.
- दिवसाच्या प्रकाशाचा पूरेपूर उपयोग करण्यात येतो.
- यंत्र व उपकरणे यांचा निरूपयोगी वापर टाळणे.
- ऊर्जा कार्यक्षम दिव्यांचा वापर करण्यासाठी प्रकाश यंत्रणेत सुधारणा केल्या जातात.
- कॉम्प्रेस्ड एअर, स्टिम पाईप, कुलींग वॉटर सिस्टम व इलेक्ट्रीक सिस्टम यातील गळतीला आळा घालण्यात येतो.
- डी.एम. वॉटर फ्लो मिटर्सची स्थापना केली.
- उरण येथील जी.टी.युनीट्स साठी नैसर्गिक शितकरणाची व्यवस्था.
- सर्व स्थितीवर लक्ष देणे व साह्यकारी सामग्रीची प्रतिबंधात्मक देखभाल करणे.
- वीज निर्मिती केंद्रात पंपासाठी व्ही एफ डी कॉम्प्रेसर व पंखे बसविणे.
- खापरखेडा २१० मे. वॅ. युनीट मधील सी.इ.पी. इंपेलर स्टेज मध्ये कपात.

**प्रकाश योजना**

- एच.पी.एम.व्ही.लॅम्प बदलून त्याजागी एल.ई.डी. लॅम्पचा वापर.
- इलेक्ट्रॉनिक ब्लास्ट व सी.एफ.एल. प्रकाश साधनांचा वापर.
- सेवेच्या इमारतीमध्ये जीने, टर्बाइन बेसमेन्ट आदि क्षेत्रात प्रकाश व्यवस्थेची व्यक्तीशा चालू/बंद करता येणारी बटणे लावण्यात आली.

**उष्णता ऊर्जा**

- ऑन लाईन कंडेसर ट्यूब क्लिनिंग सिस्टीमवर योग्य लक्ष.
- औष्णिक रोधके वेळेवर दुरुस्त करणे.
- एअर - प्रीहिटर्स व भट्टया शक्य तेव्हा स्वच्छ करणे.

- बॉयलर एक्सेस एअरचा जास्तीत जास्त वापर.

**वंगण**

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना अंमलात आणली आहे.
- गळणारे इंधन तेल पून:प्राप्त करण्यासाठी ऑईल स्किमर्स व्यवस्था विकसित केली आहे.
- भुसावळ व नाशिक केंद्रात टर्बाइन व बी.एफ.एल तेल केंद्रावर्ती पध्दतीने गाळून घेण्यात येते.

**डीएम वॉटर**

- डी.एम.वॉटर, फिड लाईन व स्टिम गळती यांच्या दुरूस्तीकडे अग्रक्रमाने लक्ष दिले जाते.
- खापरखेडा केद्रांत सोनिक बॉयलर डिटेक्टशन सिस्टीम स्थापन केली आहे.

**अन्य पाण्याचा वापर**

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातील राखेच्या पाण्याचा पूनर्वापर केला जातो.
- आग विझविण्यासाठी लावलेले पाण्याचे नळ पूर्वी जमीनीच्या आत असत. त्यातील गळती तात्काळ दुरुस्ती करता यावी म्हणून ते जमीनीच्या वर लावण्यात आले.

**ब ) तंत्रज्ञानाचा अंगिकार, आणि नवीन शोध स्वीकार**

अ) तंत्रज्ञान समाविष्ट करण्याचे प्रयत्न.

- कोराडी ६६० मे.वॅट युनीटसाठी नागपूरच्या प्रक्रीयायुक्त सांडपाण्याचा वापर.
- कोराडी युनीट – ६ मध्ये ऊर्जा कार्यक्षम असे नुतनीकरण व आधुनिकीकरण केले.
- महानिर्मिती मुख्यालय व वीज केंद्रे येथे साहित्य प्रापणासाठी इ–निविदा संकल्पना सुरू केली.
- खापरखेडा युनीट – २ मध्ये डी.व्ही.आर सिस्टिम स्थापन केला.
- कोराडी ६६० व खापरखेडा ५०० मे. वॅ. युनीटमध्ये लो नॉक्स बॅर्नरची स्थापना.

ब) कंपनीने कोणतेही आयात केलेले तंत्रज्ञान वापरलेले नाही.

**क ) परकीय चलनातील मिळकत व खर्च**

अ) निर्यातीची कामे, निर्यात वाढीसाठी प्रयत्न, उत्पादित मालासाठी व सेवांसाठी नवी निर्यात बाजारपेठे आणि निर्यात योजना: निरंक

ब) एकूण परकीय चलनाचा वापर व कमाई

| अ.क्र. | वापरलेले / कमावलेले एकूण परकीय चलन | ₹ |
|---|---|---|
| १. | परकीय चलनातील खर्च | निरंक |
| २. | मिळालेले परकीय चलन | निरंक |

# संचालकांच्या अहवालाचे परिशिष्ट - ४

## सांविधिक लेखापरिक्षकांच्या निरिक्षणांना कंपनीची उत्तरे

| अ. क्र. | मुख्य निरिक्षण | कंपनीची उत्तरे |
|---|---|---|
| १ | *अधिभार स्वरूप कंपनीने 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड' (महावितरण) च्या चालू वित्तीय वर्षाच्या देयकाचा विलंबीत भरणा व्याजाला महसूलात मान्यता देण्याची पध्दत चालू ठेवली आहे. ही रक्कम ₹२५११.५१ कोटी झाली आहे. (३१ मार्च २०२१ पर्यंतची संचित रक्कम ₹१४८६२.१० कोटी आहे.) ही रक्कम कंपनीने वीज खरेदी करारातील अटी आणि संबंधित बहुवर्षीय वीज दर नियमने यानुसार अंगिकारलेल्या हिशोबाच्या पध्दतीनुसार आहे. दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंतच्या देयकातील विलंब भरणा आकाराची रक्कम पूर्णपणे वसुली होऊ शकणार नाही आणि वसूली संशयास्पद आहे कारण महावितरणने या विषयी वाद व्यक्त केला असून तिचा स्वीकार आणि भरणा केलेला नाही. महावितरणने महानिर्मितीला कळविले आहे की महावितरणने या डीपीएससाठी एकतर्फी वेगळी हिशोब पध्दती अंगिकारली आहे. महावितरणाच्या मते ही रक्कम फक्त ₹४११२.२७ कोटी एवढीच होते. यामुळे महानिर्मितीच्या देयकातील डीपीएस रक्कम आणि महावितरणने तिच्या पध्दतीने हिशेब केलेली डीपीएसची रक्कम यात ₹१०७४९.८३ कोटीचा एवढा प्रचंड फरक आहे. या वादाचा अंतिम निर्णय, अंतिम समझोता प्रलंबित आहे. महावितरण सोबतचा वाद चालू असल्याने संशयास्पद वसूलीच्या डीपीएससाठी कोणतीही निश्चिती नसल्याने आणि महावितरण व महानिर्मिती यांना मान्य होईल असा तोडगा झाला नसल्याने यातील अपेक्षित पतहानीसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. (संदर्भ टिपा क्र. ४३बी आणि एफएस)*<br>*विशेषत: पुढील बाबींकडे लक्ष वेधण्यात येते. (अ)- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला (महावितरण) वीज खरेदी करारानुसार पुरवठा केलेल्या विजेचे रक्कम ₹२७०४०.४८ कोटी (या चालू वर्षाचा विना देयक महसूल ₹२५११.५१ कोटी समाविष्ट आहे) एवढी शिल्लक वर्षाअखेर वसूली योग्य आहे. महावितरणने महानिर्मितीस देय असलेल्या पैकी ₹१५९५७.२४ कोटी कायम केली आहे. या शिल्लकीचा मेल दोन्ही कंपन्यांनी संयुक्तपणे केला. आम्हाला देण्यात आलेल्या माहिती प्रमाणे या समस्येचे निराकरण झाल्यानंतर वादग्रस्त रकमेचा अंतिम लेखा सुधारणा आणि समायोजन केले जाईल. (ब)- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण) यांच्याकडे वसुली योग्य शिल्लक ₹१४३.५२ कोटी ही कायम व मेळ करण्याच्या अधीन आहे. तथापि आम्हाला माहिती देण्यात आली की, कंपनीने पुष्टीकरणासाठी पत्र आणि स्मरणपत्रे पाठविली परंतु त्याची उत्तरे मिळाली नाही. लेखापरिक्षणासाठी पुरेसे व योग्य पुरावा नसल्याने वरील (अ) आणि (ब) यातील शिल्लकीची त्यांचे नफ्यावर होऊ शकणाऱ्या संभाव्य परिणामबाबत मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत.* | प्रचलित पध्दतीनुसार, महानिर्मिती कंपनीने महावितरण कंपनीला अधिभाराची देयके देणे चालू ठेवले आहे ही पध्दती वित्तीय वर्ष २००९-१० पासून चालू आहे. त्यात महवितरण कडून मिळालेल्या निधीचे विनियोजन प्रथम व्याजासाठी आणि नंतर उर्वरित पैसा थकीत मुद्दलाकडे वळवला जातो.<br>महावितरण ने वरील पध्दतीला वित्तीय वर्ष २०१७-१८ पर्यंत हरकत घेतली नव्हते आणि या आकाराची नोंद वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या वित्तीय विवरण पत्रात केली होती.<br>मात्र वित्तीय वर्ष २०१८-१९ दरम्यान, महावितरणने एकतर्फी वेगळी पध्दती अंगिकारली, त्यामध्ये प्रथम मुद्दल रकमेचे विनियोजन केले उर्वरित रक्कम विलंब भरण्याच्या व्याजासाठी वळवली यामुळे वर्ष ३१.०३.२०२१ रोजी महावितरणने तिच्या अधिभाराचे दायित्त्व कमी करून रुपये ४११२.२७ कोटी असे तिच्या लेखा वहयात नोंदवले आहे.<br>महानिर्मिती कंपनीने वरील हिशेब पध्दती मधील बदल करण्यास संमती दिलेली नाही आणि तिची आरंभापासून असलेली पध्दतीच चालू ठेवली.<br>महानिर्मितीने या वर्षात महावितरण सोबत मेळ व शिल्लक पक्की करण्याचे काम केले. मेळ करतांना निदर्शनास आलेल्या वादांचे निराकरण करण्याचे काम सुरू आहे.<br>त्याचप्रमाणे कंपनीने महापारेषण भार प्रेषण केंद्राला रिॲक्टीव्ह एनर्जी चार्जेस संबंधीची शिल्लक पक्की करण्या संदर्भात पत्र दिले आहे आणि त्यांच्याकडून ते कायम करण्याच्या प्रतिक्षेत आहे. |

कोळसा कंपन्याच्या शिल्लकी संबंधित कंपन्यांकडून खात्री व मेळ करण्याच्या अधीन आहेत. आमच्यामते कंपनी मध्ये सामान्य खातेवही शिल्लकवर आधारीत मेळ करण्यात आला नाही, त्यामुळे त्याचा कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामांवर आम्हास भाष्य करता येत नाही. कंपनी निहाय थकीत अग्रिमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

*(रक्कम ₹ कोटीत)*

| *पुरवठादारांची नावे* | *महानिर्मितीच्या लेख्याप्रमाणे ३१.३.२०२१ रोजीची शिल्लक* |
|---|---|
| *सिंगरेनी कोलरीज लिमिटेड* | *१२४.८४ जमा नोंद* |
| *साऊथ इस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड* | *२५२.१७ खर्च नोंद* |
| *वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड* | *२०१३.४४ जमा नोंद* |
| *महानदी कोलफिल्ड्स लिमिटेड* | *१२०.१६ जमा नोंद* |
| *एकूण* | *२००६.२७ जमा नोंद* |

*खात्री आणि मेळ पूर्ण करणे प्रलंबित असल्याने आणि कोळसा कंपन्यांनी पाठविलेल्या प्रोत्साहक देयकांसाठी/कोळसा कमी उचलण्याबद्दल तरतुद केलेली नाही. तसेच कोळसा कंपन्यांकडे काही प्रतिदावे मांडले आहेत. जसे कोळश्याचा कमी पुरवठा, कमी गुणवत्ता इत्यादी हे दावे आणि प्रतिदावे असल्यामुळे या सर्वाचा प्रभाव अनिश्चित आहे. या कारणांमुळे कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकांवर प्रभावाविषयी अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

*रेल्वे कंपन्यांकडील शिलकी कायम होण्याच्या अधीन आहेत. बहुतेक शिलकी मागील वर्षातील जुन्या असमायोजित थकीत आहेत. त्याची ठळक माहिती खालीलप्रमाणे आहे.*

कोळसा कंपन्या सोबत देयक निहाय तत्त्वावर मेळ करण्याची पध्दत चालू आहे. सामान्यत: वित्तीय वर्षाच्या प्रत्येक तिमाहीला मेळ केले जातात. मात्र या वादामुळे चालू वर्षी हे काम थोडे मागे पडले. येत्या वर्षी महानिर्मिती लेखा वह्यातील शिल्लकीचा मेळ करील.

*(रक्कम ₹ कोटीत)*

| *पुरवठादारांची नावे* | *महानिर्मितीच्या लेख्याप्रमाणे ३१.३.२०२१ रोजीची शिल्लक* |
|---|---|
| *दक्षिण मध्य रेल्वे (खाते क्र. ३००००)* | *६.८६ खर्च नोंद* |
| *दक्षिण पूर्व मध्य रेल्वे (खाते क्र. ३०००१)* | *४३.६६ खर्च नोंद* |
| *मध्य रेल्वे (खाते क्र. ४३०००)* | *३१.१५ खर्च नोंद* |
| *एकूण* | *८१.६८ खर्च नोंद* |

*कायम / मेळ करणे प्रलंबित असल्याने, त्याचे वित्तीय नोंदवह्यात परिणामकारक समायोजने करता आलेली नाहीत. तरी कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामांबाबत आम्ही मत देऊ शकत नाही.*

कंपनीने रेल्वेच्या शिल्लक राहिलेल्या बाबींचा आढावा घेतला आणि मागील वर्षातील तुलनेने काही रकमाच्या चुकत्या केल्या. भविष्यात उर्वरित रकमांचा निपटारा केला जाईल व तश्या लेखा नोंदी केल्या जातील.

| | | |
|---|---|---|
| | *व्यापारी येणे कर्ज आणि अग्रिमे, ठेवी आणि व्यापारी देणी यांच्या शिल्लकी, संबंधित व्यक्ती - संस्था यांचेकडून खातरजमा करणे आणि/किंवा त्याप्रमाणे मेळ केला जाणे यांच्या अधीन आहेत अशी निश्चिती आणि मेळ करणे प्रलंबित असल्याने त्यांची परिणाम स्वरूप समायोजने केलेली नाहीत. मात्र आम्हांला माहिती देण्यात आली की, कंपनीने तिच्या पुरवठादारांना याविषयी पत्रे दिली असून जेथे जेथे शिलकीची खातरजमा मिळत आहे त्यांचा मेळ करण्यात येत आहे. तसेच आम्हांला सांगण्यात आले की, असे मेळ करणे ही कंपनीत सतत चालू असलेली प्रक्रिया असते. लेखा परिक्षणासाठी पुरेसे आणि योग्य पुरावे नसल्यामुळे या शिलकीचा जर काही प्रभाव होणार असेल तर त्याबाबत आणि त्यामुळे कंपनीच्या या वर्षीच्या फायद्याबाबत आम्ही अभिप्राय देण्यास असमर्थ आहोत.* | महानिर्मिती कंपनीने तिच्या विद्यमान निर्मिती केंद्रातून वीज निर्मितीचे काम करीत असतानांच, औष्णिक आणि सौर विजेचे नवे निर्मिती केंद्र स्थापन करुन ती कार्यान्वित करणेही चालू ठेवले आहे. यासाठी कंपनी विविध ग्राहक/विक्रेते यांच्याशी विविध व्यवहारसुध्दा करते. विद्यमान कार्यपध्दतीनुसार महानिर्मिती कंपनी विविध पुरवठादार/ग्राहक/कर्ज देणारे धनको यांना शिल्लकी रकमा कायम करण्यासाठी पत्र पाठवते या शिवाय कंपनीने तिच्या पुरवठादारांसोबत मेळ करण्याचे काम सुध्दा चालू ठेवले आहे. ते सतत केले जाणारे काम आहे. मात्र ज्याला केवळ महानिर्मिती कंपनी कारणीभूत नाही अशा काही कारणांमुळे, जसे काही विक्रेते त्यांची वीजके उशीराने सादर करणे. तसेच शिल्लकी कायम करण्याच्या पत्रांना प्रतिसाद न मिळणे आणि पुरवठादारांनी दिलेली तपशील चुकीचा असणे, दावे/प्रतिदावे उद्भवणे इत्यादी कारणामुळे काही पुरवठादारांच्या बाबत मेळ किंवा समायोजनास जास्त वेळ लागतो. अशा विक्रेत्यांच्या शिल्लकीचा बाबत गरज असल्यास, कंपनी, तरतूद करते. |
| २ | *आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार तसेच आम्ही अभिलेखांचे जे परिक्षण केले त्याच्या आधारे, कंपनी सर्व स्थावर/अचल मालमत्ताच्या तासांचे विलेख मिळविल्याच्या प्रक्रीयेत आहे. त्यातून या मालमत्ता कंपनीच्या नावाने धारण केल्या आहेत किंवा कसे, हे निश्चित ठरवता येईल. उपलब्ध माहितीवरुन असे दिसते की, खालील अचल संपत्तीचे विलेख कंपनीच्या नावाने धारण केलेले नाहीत.*<br><br>*(१) वर्षाच्या अखेरीपर्यंत चार लेखा (अकाऊटींग) युनीटच्या संबधीची आणि एकूण ₹४५.६२ कोटी प्रचलीत मूल्य असलेली मालकीची जमीन याशिवाय एका लेखा युनीट कडे वर्षाच्या अखेरपर्यंत ₹८४.२३ कोटी प्रचलीत मूल्याची भाडेतत्वाची जमीन. या दोन्ही मालमत्ता अद्याप पूर्वीच्या "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ" या संस्थेच्या नावावर आहेत. (फ्री होल्ड) आम्हाला असे सांगण्यात आले की, महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार आणि हस्तांतरण योजनेनुसार या मत्ता कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आल्या.*<br><br>*(२) याशिवाय दोन लेखा युनीटच्या संबंधातील मालकी असलेली ₹३१६.६९ कोटी प्रचलित मुल्याची जमीन "महानिर्मिती" आणि "महाजनको थर्मल पॉवर स्टेशन" अशा नावे आहेत. परंतु ते काही कंपनीच्या संज्ञापन लेखातील नावाने नाहीत. तसेच रजिस्ट्रार ऑफ कंपनी यांच्याकडे नोंद केलेल्या नावाने नाहीत.* | काही विलेखात पूर्वीची महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ किंवा 'महानिर्मिती (महाजनकाचे मराठी रूपांतर) आदि नावाने आहेत. सर्व स्थावर/ अचल मालमत्तावर आता कंपनीच्या नोंदणीकृत नावानेच केल्या जाव्यात यासाठी कंपनीने या पूर्वीच उपाया योजना सुरु केल्या आहेत.<br><br>चंद्रपूर, कोराडी आणि पारस या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रांतील सर्व मालकीचे विलेख कंपनीच्या नोंदणीकृत नावाने करण्याचे काम पूर्ण होत आले आहे. तर नाशिक, भुसावळ आणि परळी येथे नाव बदण्याची प्रक्रिया चालू आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | *आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आमच्या लेखा परिक्षणाच्या आधारे आम्हाला दि.३१ मार्च २०२१ रोजी पर्यंतच्या जेथे अंतर्गत नियंत्रणांचे काम प्रभावी नव्हते अशा खालील मोठ्या दुर्बल बाबी लक्षात आल्या त्या अशा:*<br><br>*(१) पुरवठादारांची अग्रिमे व दायित्वाची तरतूद यांचे वेळेवर समायोजन करणे यावर कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रण.* | कोळशाचा दर्जा कमी असणे, पुरवठा कमी होणे इत्यादी बाबत कोळसा पुरवठादारांकडे दावे केलेले आहेत. त्यांनाही अभिदत्त पोहोचवणी/ प्रोत्साहन रक्कम आणि व्याज इत्यादी बाबत प्रतिदावे केले असून त्यावर पूर्णपूणे समझोते अद्याप झालेले नाहीत. परिणामी कंपनीने कोळसा कंपन्याना देय असलेल्या वादग्रस्त प्रकरणात आकस्मिक दायित्व नोंद अशी केली आहे. तसेच कंपनीने 'आकस्मिक मत्ता' यांचे सुध्दा प्रकटीकरण केलेल्या आहेत. भविष्यात कंपनी, आधार सामग्री (डेटा) वेळेवर नोंदणे/अग्रिमे व दायित्व यांचे समायोजन करणे, असमायोजित अग्रिमांचा हिशेब पूर्ण करणे इत्यादी कामे वेळेवर लेखा वह्यात नोंदण्याच्या कामांना गती देईल. |
| | *(२) परिसमापनातील नुकसानीचे वेळेवर अंतिमीकरण आणि वसुली यावर कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रण / धोरण* | कंत्राटदारामुळे कामांच्या कार्यवाहीचा विलंब झाला आहे आणि त्या विलंबाचे प्रमाण स्थापित झाल्यानंतर, अशा कंत्राटदारांचे परिसमापनातील नुकसानाचे अंतिमीकरण केले जाते. मोठ्या प्रकल्पातील विलंबाचे विश्लेषण करण्यात बराच वेळ लागतो. कारण विलंबाच्या कारणा अभ्यास करावा लागतो. ज्यास संबंधित कंत्राटदार किंवा दुसरा कंत्राटदार, मालक जबाबदार असू शकतात. परिणामी अशा मत्ता कार्यान्वित झाल्यावर तशी नोंदी लेखा वहयात केल्या असल्यातरी परिसमापनातील नुकसानांची नोंद त्याचे अंतिमीकरण झाल्यावरच करता येते. महानिर्मितीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणे/धोरण यानुसार वेळेवर अंतिमीकरण करुन परिसमापन नुकसानाची वसूली करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. |
| | *(३) कर्मचाऱ्यांच्या संबंधीत दस्तऐवज जतन करणे तसेच सॅप निर्मित वेतनपत्रक (पेरोल) या मानव संसाधन मोड्युल सोबत वित्तीय मॉड्युलची एकात्मिकता साधलेली आहे परंतु तसे दिसणे किंवा मेळ असणे याबाबत कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रण असणे.* | कंपनीने केंद्रीय वेतन प्रक्रिया यापूर्वीच सुरू केली आहे. कर्मचारी संबंधित व्यवहारासाठी कंपनी संबंधित सॅप मोड्यूल वापरते. मात्र कंपनीने असा प्रस्ताव केला आहे की ज्यामध्ये मानव संसाधन (एचआर) मोड्यूल सोबत मेळ करता येईल अशी अहवाल नोंद पध्दती सुरु करावी पुढील वर्षी ती अमलात येईल. |

# संचालकांचे अहवालाचे परिशिष्ट क्र.५
# फॉर्म क्र. एम आर ३
# सेक्रेटरीयल लेखापरिक्षण अहवाल
# ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षांसाठी

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम २०४( १ ) आणि कंपन्यांची नियमावली २०१४ यातील नियम क्रं.९ ( व्यवस्थापकीय कर्मचारी वृदांची नियुक्ती व परिश्रमिक ) यानुसार**

**प्रति,**

**मा. सदस्य,**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड**

प्रकाशगड, भुखंड जी-९,

प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),

मुंबई-४०० ०५१.

मी अजित वाय. साठे, मालक ए.वाय.साठे अँड कंपनी आणि व्यावसायिक कंपनी सेकेटरी, मुंबई, आपणांस नमुद करतो की, मी **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड ( सीआयएन यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८ )** (यापुढील मजकुरात हिचा उल्लेख कंपनी असा केला आहे,) या कंपनीकडून तिला लागू होणाऱ्या सांविधिक तरतूदींचे पालन आणि कंपनी व्यवसायाला धरून राहण्याची निष्ठा यासाठी सेक्रेटरियल ऑडिट केले. या कंपनीच्या व्यावसायिक वर्तनाचे / सांविधिक अनुपालनाचे मुल्यांकन करण्यासाठी मला योग्य आधारतत्व मिळावे आणि त्यावर अभिप्राय द्यावा याप्रकारे मी हे परिक्षण केले.

मी कंपनीची लेखा वह्या-पुस्तके, कागदपत्रे, इतिवृत्त नोंदणीच्या वह्या, प्रपत्रे आणि कंपनीने दाखल केलेली निवेदन पत्रे व इतर अभिलेख नोंदी यांची पडताळणी केली. तसेच कंपनी आणि तिचे अधिकारी, अधिकृत प्रतिनिधी आणि एजंट यांनी मला माहिती दिली. त्या सर्वांच्या आधारे मी अहवाल देतो की, या परीक्षणाच्या कालावधीत म्हणजे दि. ३१ मार्च २०२१ (परिक्षण कालावधी) रोजी संपलेल्या वित्तीय वर्षात, महानिर्मिती कंपनीने येथे खालील यादीमधे नमूद केलेल्या सांविधिक तरतूदींची पूर्तता केलेली आहे. तसेच या कंपनीकडे योग्य प्रकारची मंडळ प्रक्रिया आणि त्या मर्यादेत आणि कार्यपद्धतीत अनुपालन करण्याची यंत्रणा अस्तित्वात आहे आणि ती खालील अहवालाच्या अधीन आहे.

जी कागदपत्रे, वह्या, प्रती, दाखल केलेले फॉर्म्स व दाखले (रिटर्न्स) माहिती / प्रकाशने इ-मेल ने पाठविले त्याची पडताळणी / परिक्षण केले. कारण कोविड-१९ मुळे प्रत्यक्ष करणे शक्य नव्हते.

या कंपनीने ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी जी लेखा पुस्तके-वह्या कागदपत्र, इतिवृत्त नोंद वह्या, प्रपत्रे विवरणे आणि अन्या अभिलेख जनत केली आहेत, त्यांचे मी पुढील कायदे व नियामे आदिच्या तरतुदींनुसार परिक्षण केले.

१. कंपनी अधिनियम २०१३ (हा कायदा), कंपनी अधिनियम १९५६ (लागू होणाऱ्या मर्यादेपर्यंत) आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमावली.

२. दि सिक्युरीटीज कॉंट्रॅक्ट (रेग्युलेशन) कायदा १९५६ (एससीआरए)आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमावली, (मात्र ही कंपनी पब्लीक अनलिस्टेड कंपनी असल्याने तिला लागू नाहीत.)

३. दि डिपॉझीटरी ॲक्ट १९९६, त्याची नियमावली आणि उपनिधी (कंपनीचे शेअर्स प्रत्यक्ष स्वरूपात असल्याने लागू नाही.)

४. परकीय चलन व्यवस्थापन अधिनियम १९९९ आणि परकियांची थेट गुंतवणूक, परकियांची थेट गुंतवणूक आणि बाह्य देशातून केलेले वाणिज्यक स्वरूपात उसनवारी यांच्या मर्यादेपर्यत बनविलेले नियम आणि कायदे (कंपनीला लागू नाहीत.)

५. सिक्युरीटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया कायदा १९९२ (सेबी कायदा), यातील खालील नियामके आणि मार्गदर्शक सूचना या महानिर्मिती कंपनी ही पब्लिक अनलिमिटेड कंपनी असल्याने तिला लागू नाहीत.

अ) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स संपादन व ताब्यात घेणे) नियामके २०११.

ब) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (प्रोहिबीशन ऑफ इनसायडर ट्रेंडींग) रेग्युलेशन्स २०१५.

क) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (भांडवल देणे व आवश्यक प्रकटने) नियम २००९;

ड) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूची बंधने आणि आवश्यकता) नियमने २०१५;

इ) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (एम्प्लॉयी स्टॉक ऑप्शन स्कीम ॲन्ड एम्प्लॉयी स्टॉक परचेस स्किम गाईड लाईन १९९९) आता त्यांचे नाव दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स बेस्ड एम्पलॉयी बेनिफिट) नियमने २०१४ आणि दि सेक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (शेअर्स एम्पलॉयी बेनिफिट) नियमने २०१५;

ई) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (कर्जे व प्रतिभूत देणे व त्याचे लिस्टिंग करणे) नियमने २००८;

उ) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (रजिस्टार टू ॲन इशू अँड शेअर ट्रान्सफर एजंट्स) नियमने १९९३, अधिनियम व अशील सोबत व्यवहार यासंबंधी;

ऊ) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (डीलिस्टींग ऑफ इक्वीटी ऑफ शेअर्स) नियमने २००९; आणि

ए) दि सिक्युरीटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (बाय बँक ऑफ सिक्युरीटीज) नियमने १९९८.

६. कंपनीस स्पष्टपणे लागू होणाऱ्या इतर कायद्याच्या संदर्भात खाली नमुद केलेले इतर कायदे निश्चितपणे लागू होतात.

**विद्युत अधिनियम २००३**

मी खालील बाबींच्या लागू होणाऱ्या खंडाच्या पूर्ततेचेही परिक्षण केले.

१. इनस्टिट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सेक्रेटरीयल मानके (१ जुलै २०१५ पासून आणि १ ऑक्टोबर २०१७ पासून लागू केलेले.)

२. कंपनीने बी एस इ लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांचे सोबत यादीवर घेण्याबाबतचे (हे करार लेखापरीक्षण कालावधी मध्ये लागू नव्हते, कारण कंपनी पब्लिक अनलिस्टेड आहे.)

आढावा वर्षात कंपनीने उपरोक्त कायदे नियमावली, नियामके, मार्गदर्शक सूचना, मानके इत्यादी, ची पूर्तता केली असून ती खालील निरिक्षणे / पूर्तता न होणे याच्या अधीन आहे.

**कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत**

मी, माझ्या ऑडीटच्या कालावधीत कंपनीने दिलेली माहिती/अभिलेख यावर विलंबून होतो आणि माझा अहवाल त्या मर्यादेत आहे आणि तो खालील अभिप्रायाचा अधीन आहे.

१. या कंपनीमध्ये दिनांक १०.०८.२०२० पासून २२.०१.२०२१ या कालावधीत महिला संचालक नव्हत्या.

२. दिनांक २३ नोव्हेंबर २०२० रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील मंजूर झालेले ठराव व्हिडीओ कॉन्फरन्सीग मार्फत घेतलेली आणि १९ मार्च २०२१ रोजीची तहकूब केलेली वार्षिक सर्वसाधारण सभा - यांचे एमजीटी-१४ - हे दाखल केले नाही.

३. कंपनीने ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षित वित्तीय अहवाल, त्यावरील संचालकाचे आणि लेखा परिक्षकांचे अहवाल आणि त्यासोबत भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचा स्वीकार अभिप्राय यांचा स्विकार दिनांक १९ मार्च २०२१ रोजीच्या तहकूब झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये केला.

**यापुढे मी खालीलप्रमाणे अहवाल देत आहे.**

कंपनीच्या संचालक मंडळाची रचनेत कार्यकारी संचालक, अकार्यकारी संचालक यांचा योग्य समतोल वरील निरिक्षणाचा आधीन राहून साधला आहे. या कालावधीत संचालक मंडळाच्या रचनेमध्ये करण्यात आलेले बदल हे कायद्यातील तरतूदीनुसार करण्यात आले आहेत.

सर्व संचालकांना बैठकीचे वेळापत्रक, कार्यक्रम पत्रिका आणि त्यावरील विषयाबाबत तपशीलवार टिपा या, बैठकीचे किमान सात दिवस आधी पाठविण्यात आल्या होत्या. तसेच कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांबद्दल अधिक माहिती व स्पष्टीकरणे मंडळाच्या बैठकीपूर्वी देण्यात याव्या आणि बैठक अर्थपूर्ण व्हावी यासाठी दक्ष असलेली कार्यपद्धती या कंपनीस प्रभावीरीत्या अस्तित्वात आहे.

निर्णय हे बहुमताने घेतले जातात आणि काही सदस्यांची असहमती दर्शक मते जर असली तर ती विचारात घेतली जातात. त्यांची नोंद इतिवृत्तांत करण्यात येते.

**मी, यापुढे अहवाल देतो की,** कंपनीस लागू होणारे कायदे, नियमावली नियामके आणि मार्गदर्शक सूचना यांच्या अनुपालनाची खातरजमा करणारी आणि कंपनीच्या आकारमानाशी आणि प्रवर्तनाशी अनुरूप असलेली प्रणाली व कार्यपद्धती पुरेशा प्रमाणात आहे.

**मी यापुढे अहवाल देतो की;** महानिर्मिती कंपनी म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे. सूत्रधारी कंपनी ही पूर्णपणे महाराष्ट्र शासनाच्या मालकीची कंपनी आहे आणि तिथे हक्काच्या तत्त्वाच्या आधारे प्रत्येकी ₹ १०/- दर्शनी किमतीचे समभाग महाराष्ट्र सरकारच्या शासन निर्णयानुसार (जी आर) वाटप केले होते. त्याच्या तपशील खालील प्रमाणे आहे.

| वाटपाची तारीख | समभागाची संख्या | रचना | शासन निर्णय क्रमांक |
|---|---|---|---|
| ०७.०८.२०२० | ६,४०,००,००० | ६४,००,००,००० | निधीवी-२०१९/प्र.क्र.८२(बीएसएल)/ऊर्जा-३ दिनांक ०९.१०.२०१९. |
| | | | निधीवी-२०१९/प्र.क्र.४(१) ऊर्जा-३ दिनांक २७.०३.२०२०. |

**मी पुढे अहवाल देतो की,** लेखापरीक्षणाच्या कालावधीत कंपनीने २२ जानेवारी २०२१ रोजीच्या तिच्या विशेष सर्वसाधारण सभेत, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४ नुसार कंपनीच्या संगठन विलेखात बदल करण्याचे विशेष ठराव मंजूर केले आहेत.

मी या पुढे अहवाल देतो की, अहवाल वर्षात खालील घटना/प्रसंग घडलेले नाहीत.

(१) सार्वजनिक/प्राधान्य शेअर्स/ऋणपत्रे/स्वेट इक्विटी यांचे वितरण करणे

(२) प्रतिभूतींचे विमोचन/पुनर्खरेदी करणे

(३) विलिनीकरण/एकत्रीकरण/पुनर्रचना इत्यादी करणे.

(४) परकीय तांत्रिक सहयोग करणे

**ए. वाय. साठे ॲण्ड कंपनी साठी**
**कंपनी सेक्रेटरी**

**सीएस अजित साठे**
**मालक - एफसीएस नं. २८९९ सीओपी नं. ७३८**

**यूडीआयएन : एफ००२८९९बी००१३८६५५६**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ०४.०३.२०२२**

हा अहवाल आमचे समान तारखेचे पत्रासोबत वाचावा. हे पत्र, जोडपत्र-१ या अहवालाचा अविभाज्य भाग आहे.

# सेक्रेटरीयल लेखापरिक्षणाच्या अहवालाचे जोडपत्र क्र.१

**प्रति,**
**मा. सदस्य,**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
**प्रकाशगड, भुखंड जी-९,**
**प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे ( पूर्व ),**
**मुंबई-४०० ०५१.**

आमचा समान तारखेचा अहवाल या पत्रासोबत वाचण्यात यावा.

१. सेक्रेटरीयल संबंधित कामाचे अभिलेख जतन करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या अभिलेखांचे परिक्षण करून त्या आधारे अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

२. सेक्रेटरीयल सबंधित अभिलेखामधील आशय अचूक असल्याची हमी मिळविणे या हेतुसाठी आम्ही परिक्षणाच्या कार्यपद्धती व प्रक्रीया यांचे अनुसरण केले. या अभिलेखात दर्शविलेल्या बाबींची वस्तूनिष्ठता अचूक असल्याची खात्री मिळावी म्हणून तत्वांवर पडताळणी केली. आम्ही अनुसरलेल्या प्रक्रीया व कार्यपद्धती या आमची मते तयार करण्यासाठी पुरेसा आधार देतात असा आमचा विश्वास आहे.

३. या कंपनीचे वित्तीय अभिलेख आणि लेख्यांची वह्या – पुस्तके यातील अचूकता व योग्यता यांची आम्ही तपासणी केलेली नाही.

४. जेथे आवश्यकता आहे तेथे कागदे, नियमावली, नियामक व घडलेल्या घटना इत्यादी, यांच्या पूर्ततेबद्दल आम्ही निवेदने मिळविली आहेत.

५. कंपनी कायदा आणि इतर लागू होणारे कायदे, नियम मानके इत्यादी यातील तरतुदींची पूर्तता करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आमचे परीक्षण या प्रक्रीयांची प्रायोगिक तत्वावर पडताळणी करणे या मर्यादेमध्ये केलेले आहे.

६. या सेक्रेटरीयल ऑडीट म्हणजे कंपनीच्या भविष्यातील जीवन क्षमता याची हमी नाही किंवा कंपनीच्या व्यवस्थापनातर्फे तिचे व्यवहार कार्यक्षमतेने अथवा प्रभावीपणे करण्यात येत आहेत याबद्दलच आश्वासन नाही.

**ए.वाय.साठे ॲन्ड कंपनीकरिता**
**कंपनी सेक्रेटरीज**

**सी एस अजित साठे**
**मालकः एफसीएस नं.२८९९ सी ओ पी नं. ७३८**

**यूडीआयएनः एफ००२८९९बी००१३८६५५६**

**स्थळः मुंबई**
**दिनांकः ०४.०३.२०२२**

## भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३( ६ ) ( ब ) यानुसार 'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड या कंपनीच्या दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रांवर दिलेले अभिप्राय:

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड** या कंपनीच्या **दिनांक ३१ मार्च २०२१** रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरण पत्रके 'कंपनी अधिनियम' यातील वित्तीय अहवाल देण्यांच्या आकृतीबंधानुसार सादर करणे, ही कंपनीच्या व्यवस्थानाची जबाबदारी असते. भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यानी कंपनी अधिनियमाचे कलम १३९(५) यानुसार नियुक्त केलेल्या सांविधिक लेखा परिक्षकांची या अधिनियमाचे कलम १४३ (१०) यात विहित केलेल्या मानकानुसार स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे या वित्तीय विवरण पत्रकांवर अभिप्राय देण्याची जबाबदारी लेखा परिक्षकांची असते. त्यांनी तसे केले आहे हे त्यांच्या लेखा परिक्षणाचा दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रण आणि महालेखापरिक्षक यांच्या वतीने **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड** या कंपनीच्य **दिनांक ३१ मार्च २०२१** रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रकांचे पूरक लेखा परिक्षण, अधिनियमाचे कलम १४३(६) (अ) नुसार केले. हे लेखापरिक्षण स्वतंत्रपणे केले आहे. त्यासाठी सांविधिक लेखापरिक्षकांकडून कागदपत्र मिळविली नाहीत. सांविधिक लेखा परिक्षक आणि कंपनीचे कर्मचारी यांचेकडे विचारणा करणे, लेखा दस्ताऐवजचा निवडक परिक्षण यांच्या मर्यादीत होते.

माझ्या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारे, मी अधिनियमाचे कलम १४३(६)(बी) नुसार माझ्या ज्ञात आलेल्या खालील महत्वाच्या बाबींवर लक्ष वेधू इच्छितो. माझ्या मते वित्तीय विवरणपत्रके आणि संबंधित लेखा परिक्षण अधिक चांगले समजावून घेण्यासाठी ते आवश्यक आहे.

अ) **नफ्याविषयी अभिप्राय:**

**नफा-तोटा पत्रक :**

**खर्च :**

**इतर खर्च ( टिपा क्र. २८ ) ₹ १९०३.६० कोटी**

१. यामध्ये सॅप-इ-आर पी सिस्टिम एप्रिल २०२० ते जानेवारी २०२१ या कालीवधीत चालू ठेवण्यासाठी सॅप - हाना एंटरप्राईज क्लाउड ( एच ई सी) सर्विसेस यांच्या नुतनीकरण्याचा खर्च ₹ ५.९८ कोटी समाविष्ट नाहीत. त्याचे समायोजन (सप्टेंबर २०२०) अग्रिम म्हणून भरलेले पैसे (₹ ७.१७ कोटी फेब्रुवारी २०२० ते जानेवारी २०२१ या कालीवधीसाठी) या सोबत करावयास हवे होते.

या संबंधित सेवा जानेवारी २०२१ मध्ये पूर्ण होउनही अग्रिमांचे समायोजन करणे शिल्लक राहिले आहे.

यामुळे ₹ ५.९८ कोटी एवढ्या रकमेचे कमी विवरण 'इतर खर्च' यात झाले आहे तर तेवढयाच रकमेचे जादा विवरण वर्षाच्या नफ्यात झाले आहे. तसेच ठेवून घेतलेल्या रकमा ₹ १.१९ कोटी (०१.०२.२०२० ते ३१.०३.२०२० या काळासाठी) जास्त दाखविल्या आहेत आणि इतर चालू मत्ताचे ₹ ७.१७ कोटीने जादा विवरण झाले आहे (पुरवठादार/कामे यासाठी अग्रिमे).

२. यामध्ये भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या वार्षिक विम्याच्या आकाराचे ₹३.३१ कोटी समाविष्ट नाहीत. त्याच्या लेखा केला नसल्याने, इतर खर्च व दायित्वे यांचे ₹३.३१ कोटीने कमी विवरण झाले आहे. तर नफ्याचे तेवढयाच रकमेने जादा विवरण झाले आहे.

**ब ) वित्तीय स्थितीवर अभिप्राय**

**ताळेबंद**

**मत्ता**

**चालू नसलेल्या मत्ता : ₹ ४२७१३.१४ कोटी**

**वापरहक्क असलेल्या मत्ता ( टिपा क्र. १अ ) ₹ ३९२८.६९ कोटी**

महत्वाची लेखा धोरणे यातील मुदा क्र. १९(१) ज्याचे सहवाचन लेख्याच्या टिपा यातील टिपा क्र. ४२बी सोबत होते, त्याच्या कडे लक्ष वेधण्यात येते. यामध्ये मत्ता वापर आणि भाडेपट्टी दायित्व व यांची विहित मर्यादा ₹ १ कोटी असे स्वीकारले आहे.

मात्र कंपनीने ₹ १ कोटी या विहित मर्यादेपेक्षा कमी असलेल्या भाडेपट्टीचे, वापराचा हक्क असलेल्या मत्ता व भाडेपट्टीचे दायित्व अश्या नोंदी केल्या जे टिपा क्र ४२ (ब) या सोबत सुसंगत नाहीत.

यामुळे मत्ता आणि दायित्वे यांचे ₹ ०.५५ कोटी जादा विवरण झालेले आहे.

**चालू मत्ता : ₹ २९२१९.४२ कोटी**

**इतर मत्ता ( टिपा १० ) : ₹ ६४८.४९ कोटी**

**संचालन व सुव्यवस्था पुरवठादार/कामे याना अग्रिमे : ₹ ३३९७.७० कोटी**

४ अ) यामध्ये विक्रेत्याकडे तीन वर्षापेक्षा अधिक काळ राहिलेल्या अग्रिमाची रक्कम ₹ ३०.४० कोटी समाविष्ट आहे. मागील लेखावर्षातील तेल आणि साहित्य विक्रेत्यांना दिलेल्या ₹०.२४ कोटी, संचालन व सुव्यवस्था कामाच्या पुरवठादारांना दिलेल्या ₹ २८.९३ कोटी आणि अन्य विक्रेत्यांचा दिलेल्या ₹१.२३ कोटी यांचा समावेश आहे. ह्या विक्रेतानेकडून बीजपत्रके प्राप्त झाल्या आहेत. मात्र या अग्रिमाचे समायोजन संबंधित वर्षातील मिळलेल्या वर्षातील देयकांसोबत केलेले नाही किंवा तो निरंक ही करण्यात आलेला नाही. यामुळे अग्रिमाचे आणि दायित्वाचे ₹ ३०.४० कोटीने जादा विवरण झाले.

**पुरवठादार/इतर यांना अग्रिमे : ₹ ४१७.२५ कोटी**

४ ब) यामध्ये मार्च २१ याच महिन्यात मिळलेल्या कोळशासाठी इस्टर्न रेल्वे ( इ सी) यांना मार्च २१ या महिन्यात दिलेली अग्रिम रक्कम ₹४३.२४ कोटी समाविष्ट आहे. या अग्रिमाचे समायोजन रेल्वे कडून त्याचवर्षी मिळलेल्या बीजका सोबत करणे आवश्यक होते.

यामुळे चालू मत्ता – इतर मत्ता (टिपा १०) याचे आणि दायित्वाचे ₹ ४३.२४ कोटीने जादा विवरण झाले.

**दायित्वे**

**चालू दायित्वे : ₹ २५३२९.१८ कोटी**

**कर्जे ( टिपा क्र. १७ ) - ₹ १०४७३.५५ कोटी**

५) यामध्ये कोविडची कर्जे ₹ ३०५.४५ कोटी समाविष्ट आहेत. ही कर्ज दोन वर्ष मुदतीची असून त्याची परतफेड कर्जफेड तरतूदीचे ०६ महिन्याची मुदत संपल्यावर १८ समान हफ्त्यात करणे आवश्यक होते.

मात्र 'भारतीय लेखा मानक १ : वित्तीय विवरण पत्रके सादर करणे यातील अटीनुसार ज्या उसनवारीचा कालखंड ०१ वर्षापेक्षा जास्त असतो. त्याचे वर्गीकरण दीर्घ-मुदतीची' असे करावयास हवे होते. तसे केले नसल्याने अल्प मुदतीची कर्जे याचे ₹ ३०५.४५ कोटीने जादा विवरण झाले असून दीर्घ मुदतीची कर्ज याचे तेवढेच कमी विवरण झालेले आहे.

**इतर वित्तीय दायित्वे ( टिपा क्र. १९ ) : ₹ ११२१८.५४ कोटी**

**ठेवून घेतलेल्या आणि देय रकम : ₹ ४७२५.८८ कोटी**

६ ) यामध्ये विविध कंत्राटदारांच्या सुरक्षा अनामती आणि इसारा रक्कम ठेवी याची ₹ ६.३४ कोटी समाविष्ट असून कंपनी कडे तीन (१) वर्षापासून (म्हणजे २००५ ते २०१८) आहेत. याचा प्रकरण निहाय आढावा घेऊन लागू होणारी कारवाई करणे आवश्यक आहे.

सुधारणा करण्यासाठी ही बाब निर्दशनास आणली आहे.

७) यामध्ये संपर्क कामासाठीचा देय असलेल्या दलालीचे ₹ ३.६४ कोटी समाविष्ट आहेत. ही कामे वर्ष २०१५-१६ मधील असून २०१९-२०२० मध्ये खर्च वजा करुन दिले आहेत मात्र त्याचे विद्यमान दायित्वासोबत समायोजना करणे आवश्यक होते. यामुळे तरतूदीचे ₹ ३.६४

कोटीने जादा विवरण झाले असून ठेवून घेतलेल्या पैशाचे तेवढेच कमी विवरण झाले आहे.

**क ) प्रकटनाविषयी अभिप्राय**

**वित्तीय विवरण पत्रावरील टिपा,**

**आकस्मिक दायित्वे ( टिपा क्र. ४२ )**

८) यामध्ये जलसिंचन विभागासोबत वाद असलेली आकस्मिक दायित्वासाठी रक्कम रुपये एक कोटी समाविष्ट नाही. हा वाद खूप वेळेपासूनचा आहे. यामुळे टिपा क्र. ४२ यात त्या प्रमाणात कमतरता आहे.

**भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक**

**यांचे साठी आणि त्याच्यावतीने**

**सही/-**

**( आर. तिरुपति वेंटक स्वामी )**

**महालेखापाल ( लेखापरिक्षण ) - दोन ( २ ) महाराष्ट्र**

दिनांक : २८.०३. २०२२

स्थळ : नागपूर

## भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ ते कलम १४३ ( ६ ) ( ब ) ज्याचे सहवाचन या अधिनियमाचे कलम १२९ ( ४ ) सोबत केले जाते, त्यानुसार 'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड' या कंपनीच्या दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर दिलेले अभिप्राय:

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड, मुंबई** या कंपनीच्या **दिनांक ३१ मार्च २०२१** रोजी संपलेल्या वर्षाची एकत्रित वित्तीय विवरण पत्रके 'कंपनी अधिनियम २०१३ यातील वित्तीय अहवाल देण्याचा आकृतीबंधानुसार सादर करणे; ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असते. भारताचे लेखनित्रंयक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियमाचे कलम १३९(५) ज्याचे वाचन पत्र अधिनियमाचे कलम १२९(४) सोबत होते; त्यानुसार नियुक्त केलेल्या संविधिक लेखापरिक्षकांनी या अधिनियमाचे कलम १४३(१०) यात विहित केलेल्या मानकानुसार केलेल्या स्वतंत्र लेखापरिक्षणाच्या आधारे या वित्तीय विवरण पत्रकावर अभिप्राय देण्याची जबाबदारी लेखापरिक्षकांची असते. त्यांनी तसे केले हे त्यांच्या लेखा परिक्षणाच्या दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

मी भारताचे लेखा नियंत्रण आणि महालेखापरिक्षक यांच्या वतीने **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड** या कंपनीच्या दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय पत्रकांचे पूरक लेखापरिक्षण, अधिनियमाचे कलम १४३(६) (अ), ज्याचे सहवाचन कलम १२९(४) सोबत केले जाते, त्यानुसार आयोजित केले होते. मात्र आम्ही, **महागूज कोलायरीज लिमिटेड, महाजेनको अ‍ॅश मॅनेजमेंट सर्विसेस लिमिटेड** आणि **धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड** (कंपनीच्या उपकंपन्या) आणि **मेसर्स युसीएल कोल कंपनी लिमिटेड** आणि **छत्तीसगढ काटधोरा डोंगरगढ रेल्वे लिमिटेड** (कंपनीच्या सहयोगी कंपन्या) यांच्या त्याच तारखेला संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रकांचे पूरक लेखा परिक्षण केलेले नाही. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले. त्यासाठी संविधिक लेखा परिक्षकांची कामकाज कागदपत्र मिळविण्यात आलेले नाहीत आणि हे पूरक लेखापरिक्षण प्रामुख्याने सांविधिक लेखा परिक्षक यांच्याकडे चौकशी करणे, कंपनी कर्मचारी वृंदाकडे विचारणा करणे, आणि लेख्यांच्या दस्ताऐवजी निवडक परिक्षण करणे या मर्यादित केले आहे.

माझ्या पूरक लेखापरिक्षणात, ज्यावर अधिनियमाचे कलम १४३(६)(ब) यानुसार अभिप्राय द्यावेत किंवा सांविधिक लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालावर पूरक अभिप्राय/शेरे द्यावेत असे कोणतेही महत्त्वाचे विषय माझ्या निरिक्षणात आलेले नाहीत.

**भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक**
**यांचे साठी आणि त्याच्यावतीने**

**सही/-**
**( आर. तिरुपति वेंटक स्वामी )**
**महालेखापाल ( लेखापरिक्षण ) - दोन ( २ )**

दिनांक : १४.०३. २०२२
स्थळ : नागपूर

## वित्तीय वर्ष २०२०-२१ साठी लेखानियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अंतिम अभिप्रायांवर महानिर्मिती कंपनीची उत्तरे

| अ. क्र. | लेखा परिक्षण विचारणा ( अभिप्राय ) | उत्तर | सांविधिक लेखा परिक्षकांचे मत |
|---|---|---|---|
| १ | **नफ्याविषयी अभिप्राय:**<br>**नफा-तोटा पत्रक :**<br>**खर्च :**<br>**इतर खर्च ( टिपा क्र. २८ ) ₹ १९०३.६० कोटी**<br>यामध्ये सॅप-इ-आर पी सिस्टिम एप्रिल २०२० ते जानेवारी २०२१ या कालीवधीत चालू ठेवण्यासाठी सॅ प - हाना एंटरप्राईज क्लाउड ( एच ई सी) सर्विसेस यांच्या नुतनीकरण्याचा खर्च ₹५.९८ कोटी समाविष्ट नाहीत. त्याचे समायोजन (सप्टेंबर २०२०) अग्रिम म्हणून भरलेले पैसे (₹ ७.१७ कोटी फेब्रुवारी २०२० ते जानेवारी २०२१ या कालीवधीसाठी) या सोबत करावयास हवे होते.<br>या संबंधित सेवा जानेवारी २०२१ मध्ये पूर्ण होउनही झाल्यावर त्याचे समायोजन करणे शिल्लक राहिले आहे.<br>यामुळे ₹ ५.९८ कोटी एवढ्या रकमेचे कमी विवरण 'इतर खर्च' यात झाले आहे तर तेवढयाच रकमेचे जादा विवरण वर्षाच्या नफ्यात झाले आहे. तसेच ठेवून घेतलेल्या रकमा ₹ १.१९ कोटी (०१.०२.२०२० ते ३१.०३.२०२१ या काळासाठी) जास्त दाखविल्या आहेत आणि इतर चालू मत्ताचे ₹ ७.१७ कोटीने जादा विवरण झाले आहे (पुरवठादार/कामे यासाठी अग्रिमे). | सॅप हाना एन्टरप्रायझेस (एच इ एल) सर्विसेस यांचे नुतनीकरण करण्याकरिता मेसर्स सॅप इंडिया लि. यांना इ एम एस द्वारे पी ओ क्र. ४५००१०८८७७ हा आदेश देण्यात आला आणि ०१.०२.२०२० ते ३१.०१.२०२१ या कालावधीसाठी नुतनीकरण केले. यासाठी मे. सॅप इंडिया लि. यांचे नावे अग्रिम रक्कम १४.०९.२०२० रोजी ₹ ७,१६,७६,८४०/- देण्यात आली. सदर पी ओ नुसार मुदत ३१.०१.२०२१ रोजी संपली सर्विस एंट्री शीट आणि खर्च नोंद ३१.०३.२०२१ रोजी योग्य किंवा त्यापूर्वी करणे योग्य झाले असते.<br>मात्र साथीच्या आजाराची परिस्थिति मुळे कामाची व्याप्ती वाढली आणि परस्पर संवादास विलंब झाला या मुळे हा व्यवहार सॅप मध्ये दिनांक ०१.०७.२०२१ रोजी झाला. (वरील खर्चाचे सुधारित नोंद या वर्षातील 'पूर्वकालीन खर्च' या लेखाशीर्षात करण्यात येईल.) | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | यामध्ये भुसावळ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या वार्षिक विम्याच्या आकाराचे ₹ ३.३१ कोटी समाविष्ट नाहीत.<br>त्याच्या लेखा केला नसल्याने, इतर खर्च व दायित्वे यांचे ₹ ३.३१ कोटीने कमी विवरण झाले आहे. तर नफ्याचे तेवढयाच रकमेने जादा विवरण झाले आहे. | भुसावळ औ.वि. केंद्र (बीटीपीएस) याचं आग व इतर धोके या विषयीची विमा पॉलीसीचे १४.०५.२०२० ते १३.०५.२०२१ साठी नुतनीकरण करण्यात आले.<br>म्हणून वरील विमा खर्चाचा लेखा वि. वर्ष २०२०-२१ मध्ये त्याप्रमाणात करावयास हवा होता (₹ २.९३ कोटी) आणि शिल्लक ₹ ०.३९ कोटी आगाऊ भरणा या प्रमाणे करणे योग्य झाले असते.<br>मात्र कोविड परिस्थितिमुळे (लॉकडाउन) मार्च २०ची अखेर पासून जून २०चा पहिला सप्ताह या काळात कार्यालये बंद ठेवावी लागली. कार्यालयीन कागदपत्रे मिळविण्यासाठी फार थोडा कालावधी उपलब्ध होता त्यामुळे वि. वर्ष २०२०-२१ मध्ये या खर्चाचा लेखा करणे अनावधाने राहिले आणि विलेखांच्या शिल्लकींचा निपटारा झाला नाही. मात्र येत्या वर्षात आवश्यक सुधारणा करण्यात येतील. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |
| ३ | **ब ) वित्तीय स्थितीवर अभिप्राय**<br>**ताळेबंद**<br>**मत्ता**<br>**चालू नसलेल्या मत्ता : रु ४२७१३.१४ कोटी**<br>**वापरहक्क असलेल्या मत्ता ( टिपा क्र. १अ ) ₹ ३९२८.६९ कोटी**<br>महत्वाची लेखा धोरणे यातील मुदा क्र. १९(१) ज्याचे सहवाचन लेख्याच्या टिपा यातील टिपा क्र. ४२बी सोबत होते, त्याच्या कडे लक्ष वेधण्यात येते. यामध्ये मत्ता वापर आणि भाडेपट्टी दायित्व यांची विहीत मर्यादा ₹१ कोटी अशी स्वीकारली आहे.<br>मात्र कंपनीने १ कोटी या विहीत मर्यादेपेक्षा कमी असलेल्या भाडेपट्टीचे, वापराचा हक्क असलेल्या मत्ता व भाडेपट्टीचे दायित्व अश्या नोंदी केल्या, जे टिपा ४२ बी सोबत सुसंगत नाही.<br>यापुढे मत्ता आणि दायित्वे यांचे ₹ ०.५५ कोटी जादा विवरण झालेले आहे. | कंपनीच्या कामाचे स्वरूप आणि व्याप्ती यांच्या विचार करुन कंपनीने काही मर्यादा निश्चित केली आहे. किरकोळ बाबींसाठी तरतूदी पूर्तता कमी करावी आणि कार्य सुलभता वाटावी या दृष्टिने असे केले आहे.<br>कंपनीने मुंबईत काही निवासी, सदनिका भाडयाने घेतल्या आहेत. जे भाडेतत्वावरील मत्ता व संलग्न दायीत्वाचे भाग आहेत परंतु, त्याची संलग्न भाडेतत्वावरील मत्ता १ कोटी पेक्षा कमी आहे. मात्र भारतीय लेखा मानक ११६ च्या अमंलबजावणीच्या पहिल्या वर्षात, कंपनीने त्यांची भाडी ₹१ कोटी पेक्षा कमी आहे असा भाडयांचा मत्तांना सुध्दा वरील मानक लागू केले होते.<br>अन्य परिस्थिती नुसार, सध्याच्या प्रकरणात भाडयाच्या सदनिकांचे भाडेपट्टीचा घसारा केल्या नंतर ३१.०३.२०२१ रोजीचे उर्वरित मूल्य ₹ ०.०९ कोटी असेल. ती काही मोठी रक्कम नाही आणि भविष्यातील लेखा वहीत राहणार नाही. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ अ | **चालू मत्ता : ₹ २९२१९.४२ कोटी**<br>**इतर मत्ता ( टिपा १० ) : ₹ ६४८.४९ कोटी**<br>**संचालन व सुव्यवस्था पुरवठादार/कामे याना अग्रिमे :**<br>**₹ ३३९७.७० कोटी**<br>यामध्ये विक्रेत्याकडे तीन वर्षापेक्षा अधिक काळ राहिलेल्या अग्रिमाची रक्कम ₹३०.४० कोटी समाविष्ट आहे. (मागील लेखा वर्षातील तेल आणि साहित्य विक्रेत्यांना दिलेल्या ₹ ०.२४ कोटी, संचालन व सुव्यवस्था कामाच्या पुरवठादारांना दिलेल्या ₹२८.९३ कोटी आणि अन्य विक्रेत्यांना दिलेल्या ₹१.२३ कोटी यांचा समावेश आहे.) या विक्रेत्यांकडून बिजपत्रके प्राप्त झाले आहेत. मात्र या अग्रिमाचे समायोजन संबंधित वर्षातील मिळालेल्या देयकांसोबत केलेले नाही किंवा तो निरंक ही करण्यात आलेला नाही. यामुळे अग्रिमाचे आणि दायित्वाचे ₹ ३०.४० कोटीने जादा विवरण झाले. | अग्रिमे व दायित्वे यांचा निपटारा करणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि कंपनी नियत कालीवधी नंतर असे निपटाऱ्याची (क्लिअरींग) कामे करते. वि. वर्ष २०२१-२२ मध्ये लेखा परिक्षणात उल्लेखित ₹ ३०.४० कोटीपैकी ₹ ३०.१६ कोटी अग्रिमाचा विविध प्रकारे निपटारा केला आणि येत्या वर्षात कंपनी उर्वरित रक्कम ₹ ०.२४ कोटीचे लेखे पूर्ण करील. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |
| ४ ब | **पुरवठादार/इतर यांना अग्रिमे : ₹ ४१७.२५ कोटी**<br>यामध्ये मार्च २०२१ याच महिन्यात मिळालेल्या कोळशासाठी इस्टर्न रेल्वे ( इ सी) यांना मार्च २१ या महिन्यात दिलेली अग्रिम रक्कम ₹ ४३.२४ कोटी समाविष्ट आहे. या अग्रिमाचे समायोजन रेल्वे कडून त्याच वर्षी मिळालेल्या बीजका सोबत करणे आवश्यक होते.<br>यामुळे चालू मत्ता - इतर मत्ता (टिपा १०) याचे आणि दायित्वाचे ₹ ४३.२४ कोटीने जादा विवरण झाले. | कंपनी माल वाहतूकीसाठी रेल्वेचा रेक आल्यावर आणि रेल्वेची रशिद मिळल्यावर अग्रिमाचा भरणा करते. रेल्वे व्हेंडर यासाठी दायित्वाची निर्मिती केली जाते. सदर अग्रिम आणि दायित्व यांचा निपटारा नंतर केला जातो असे निपटारे करणे ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.<br>विद्यमान प्रकरणातील अग्रिमांचा निपटारा वि. वर्ष २०२१-२२ मध्ये करण्यात आला. ते नेहमीच्या कामाचा भाग होता. त्या निपटाराचे कागदपत्र क्र. १०१०८४२ आहे. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | **दायित्वे**<br>**चालू दायित्वे : ₹ २५३२९.१८ कोटी**<br>**कर्जे/उसनवारी ( बॉरोईंग ) ( टिपा क्र. १७ ) - ₹ १०४७३.५५ कोटी**<br>यामध्ये कोविडची कर्जे ₹ ३०५.४५ कोटी समाविष्ट आहेत. ही कर्ज दोन वर्ष मुदतीची असून त्याची परतफेड कर्जफेड तरतूदीचे ०६ महिन्याची मुदत संपल्यावर १८ समान हफ्त्यात करणे आवश्यक होते.<br>मात्र 'भारतीय लेखा मानक १ : वित्तीय विवरण पत्रके सादर करणे यातील अटीनुसार ज्या उसनवारीचा कालखंड ०१ वर्षापेक्षा जास्त असतो. त्याचे वर्गीकरण दीर्घ-मुदतीची' असे करावयास हवे होते. तसे केले नसल्याने अल्प मुदतीची कर्जे याचे ₹ ३०५.४५ कोटीने जादा विवरण झाले असून दीर्घ मुदतीची कर्जे याचे तेवढेच कमी विवरण झालेले आहे. | कोविडसाथीच्या या काळात लॉकडाउन असल्याने, मिळू शकणाऱ्या येण्यांची वसूलीवर अनिष्ट परिणाम झाला त्यामुळे संपूर्ण देशात रोकड सुलभतेच्या समस्या उद्भवल्या या रोकडता समस्येवर, मात करण्यासाठी काही बॅकांनी 'कोविड कर्जे' ही संकल्पना अमलात आणली. ज्या भांडवली खर्चाच्या योजना किंवा प्रकल्पामुळे कंपनीला विशिष्ट मुदतीत महसूल मिळण्याची अपेक्षा असते, आणि त्यातून कर्जाची परतफेड करणे शक्य असते अशा योजना व प्रकल्पांसाठी कंपनी दीर्घ मुदतीची कर्जे उभारते. तसेच येण्याची वसूली आणि देणी देणे यातील फरक भरुन काढण्यासाठी बँका खेळत्या भांडवलाची कर्जे देतात. उद्योग चक्र एकावर्षाचे असल्याने सामान्यपणे एक वर्षासाठी अशी कर्जे घेतली जातात. मात्र कोविड परिस्थितीमुळे नेहमीचे उद्योग चक्र खंडीत झाले असल्याने बॅकानी दोन वर्षे मुदतीची कर्जे दिली.<br>म्हणून जरी अशा कर्जांची मुदत एक वर्षापेक्षा जास्त असली तरी (म्हणजेच तात्काळ प्रकरणी दोन वर्षे) बॅकांनी दीर्घ मुदतीची कर्जे दिली. त्याचे स्वरूप खेळत्या भांडवलाचे कर्ज असेच होते आणि बॅकांत त्याच्या मंजूरीच्या पत्रात तसे नमूद केलेले आहे. तरी सुध्दा काही बॅकांनी कर्जाची मुदत दोन वर्षे असली तरी त्याला 'अल्प मुदतीची कर्जे' असेच संबोधिले आहे. (पहावे बॅक ऑफ महाराष्ट्रचे कर्ज मंजूरीचे पत्र त्याची प्रत जोडली आहे).<br>यानुसार या कर्जाचे वर्गीकरण 'अल्प मुदतीची कर्जे या श्रेणीत केले आहे आणि वित्तीय विवरण पत्रात तसे दर्शविले आहे. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |
| ६ | **इतर वित्तीय दायित्वे ( टिपा क्र. १९ ) :**<br>**₹ ११२१८.५४ कोटी**<br>**ठेवून घेतलेल्या आणि देय रकम : ₹४७२५.८८ कोटी**<br>यामध्ये विविध कंत्राटारांच्या सुरक्षा अनामती आणि इसारा रक्कम ठेवी याची ₹ ६.१४ कोटी समाविष्ट असून कंपनी कडे तीन (१) वर्षापासून म्हणजे २००५ ते २०१८ (१) आहेत. याचा प्रकरण निहाय आढावा घेऊन लागू होणारी कारवाई करणे आवश्यक आहे.<br>सुधारणा करण्यासाठी ही बाब निदर्शनास आणली आहे. | ज्या इएमडी ठेवी आणि सुरक्षा अनामती तीन वर्षापेक्षा जास्त जुन्या आहेत, त्यांचे पुनर्लेखन कागदपत्र क्र. १२४९५४३ आणि क्र. १२४९५४४ दिनांक ३१.०३.२०२१ यानुसार केले आहे.<br>उर्वरित इएमडी ठेवी आणि सुरक्षा अनामती यांचा आढावा घेऊन पात्र रकमांचे पुनर्लेखन केले जाईल आणि त्यांची परतफेड झाली नाही तर पुढील वर्षात त्यांचे लेखे केले जातील. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | यामध्ये संपर्क कामासाठीचा देय असलेल्या दलालीचे ₹ ३.६४ कोटी समाविष्ट आहेत. ही कामे वर्ष २०१५-१६ मधील असून २०१९-२०२० मध्ये खर्च वजा करुन दिले आहेत मात्र त्याचे विद्यमान दायित्वासोबत समायोजन करणे आवश्यक होते. यामुळे तरतूदीचे ₹ ३.६४ कोटीने जादा विवरण झाले असून ठेवून घेतलेल्या पैशाचे तेवढेच कमी विवरण झाले आहे. | सामान्यपणे कंपनी अशा खर्चासाठी तरतुदी करते आणि त्याच्या भरणा केल्यानंतर या तरतुदीचा निपटारा केला जातो. मात्र या संबंधित प्रकणात दलालीसाठी ₹ ३.६४ कोटीची तरतुदीची निपटारा ३१.०३.२०२१ पर्यंत करण्याचे शिल्लक राहिले. पुढच्या वर्षात आदरसह सुधारीत नोंद कागदपत्र क्र. ११६७३४५ दिनांक ०१.१२.२०२१नुसार मजूर करण्यात आली आहे. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |
| ८ | **क ) प्रकटनाविषयी अभिप्राय**<br>**वित्तीय विवरण पत्रावरील टिपा,**<br>**आकस्मिक दायित्वे ( टिपा व्र ४२ )**<br>यामध्ये जलसिंचन विभागासोबत वाद असलेला व आकस्मिक दायित्वाची रक्कम रुपये एक कोटी समाविष्ट नाही. हा वाद बऱ्याच वेळेपूासनचा आहे. यामुळे टिपा क्र. ४२ यात त्या प्रमाणात कमतरता आहे. | उपलब्ध माहितीच्या आधारे, वि. वर्ष २०२०-२१ च्या लेख्यांचे अंतिमीकरण करण्यात आले. त्यात ₹ २.०३ कोटीचे रक्कम वादग्रस्त असल्याचे शिल्लक राहिले आहे. परिणामी ती यापूर्वीच आकस्मिक दायित्वे या मध्ये समाविष्ट केली आहे. | आम्ही व्यवस्थानाच्या मताशी सहमत आहोत. |

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक**
**यांचे साठी आणि त्याच्यावतीने**

**सही/-**

**( आर. तिरुपति वेंटक स्वामी )**
**महालेखापाल ( लेखापरिक्षण ) - दोन ( २ )**

दिनांक : २८.०३.२०२२
स्थळ : नागपूर

## स्वतंत्र लेखा परिक्षकांचा अहवाल

प्रति, मा. सदस्य, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**या कंपनीचा दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या स्वायत वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखापरिक्षणांचा अहवाल सादर करण्यात येत आहे.**

**पात्र मत**

**आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित** (या पुढे "महानिर्मिती/कंपनी") यांचा येथे जोडलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण केले. या वित्तीय विवरण पत्रकामध्ये दिनांक ३१ मार्च २०२१ रोजीचे ताळेबंद पत्रक, तसेच त्या तारखेस संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक, समभागातील बदलांचे पत्रक, रोकडता प्रवाह पत्रक, स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकावरील टिपा तसेच महत्वाच्या लेखा धोरणांची संक्षिप्त माहिती आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे. (यापुढे या सर्वांचा उल्लेख स्वायत वित्तीय विवरण पत्रके असा केलेला आहे)

आमच्या मते, आणि आमची सर्वोत्तपरी माहिती आणि आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार, *मात्र आमच्या वित्तीय विवरण अहवालात 'पात्रतेच्या मतांचा आधार' या विभागात वर्णन केलेल्या विषयांचा अपवाद करुन आम्ही अभिप्राय देतो की,* उपरिनिर्दिष्ट स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके ही कंपनी अधिनियम २०१३ ("कायदा") यात विहित केलेल्या कार्य पध्दतीद्वारे आणि कायदयातील आवश्यकते प्रमाणे तसेच भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या लेखा तत्वांशी सुसंगत अशा प्रकारे महानिर्मिती कंपनीच्या दिनांक ३१ मार्च २०२१ रोजीच्या स्थितीचे आणि तिचा या वर्षाच्या नफा (इतर सर्वकष उत्पन्नासह) आणि या तारखेस संपलेल्या वर्षाची समभागांचे (इक्विटी) यातील बदलांचे आणि तिचा रोकडता प्रवाहाचे यथार्थ आणि रास्त दर्शन घडवितात.

**पात्रतेच्या मतांचा आधार**

१. *कंपनीने 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड' (महावितरण) च्या चालू वित्तीय वर्षाच्या देयकाचा विलंबीत भरणा अधिभार स्वरूप व्याजाला महसूलात मान्यता देण्याची पध्दत चालू ठेवली आहे. ही रक्कम ₹२५११.५१ कोटी झाली आहे. (३१ मार्च २०२१ पर्यंतची संचित रक्कम ₹१४८६२.१० कोटी आहे.) ही रक्कम कंपनीने वीज खरेदी करारातील अटी आणि संबंधित बहुवर्षीय वीज दर नियमने यानुसार अंगिकारलेल्या हिशोबाच्या पध्दतीनुसार आहे. दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंतच्या देयकातील विलंब भरणा आकाराची रक्कम पूर्णपणे वसुली होऊ शकणार नाही आणि वसूली संशयास्पद आहे कारण महावितरणने या विषयी वाद व्यक्त केला असून तिचा स्वीकार आणि भरणा केलेला नाही. महावितरणने महानिर्मितीला कळविले आहे की महावितरणने या डीपीएससाठी एकतर्फी वेगळी हिशोब पध्दती अंगिकारली आहे. महावितरणाच्या मते ही रक्कम फक्त ₹४११२.२७ कोटी एवढीच होते. यामुळे महानिर्मितीच्या देयकातील डीपीएस रक्कम आणि महावितरणने तिच्या पध्दतीने हिशेब केलेली डीपीएसची रक्कम यात ₹१०७४९.८३ कोटीचा एवढा प्रचंड फरक आहे. या वादाचा अंतिम निर्णय, अंतिम समझोता प्रलंबित आहे. महावितरण सोबतचा वाद चालू अस संशयास्पद वसूलीच्या डीपीएससाठी कोणतीही निश्चिती नसल्याने आणि महावितरण व महानिर्मिती यांना मान्य होईल असा तोडगा झाला नसल्याने यातील अपेक्षित पतहानीसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. (संदर्भ टिपा क्र. ४३बी आणि एफएस)*

२. *विशेषतः पुढील बाबींकडे लक्ष वेधण्यात येते. (अ)- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला (महावितरण) वीज खरेदी करारानुसार पुरवठा केलेल्या विजेचे रक्कम₹ २७०४०.४८ कोटी (या चालू वर्षाचा विना देयक महसूल₹ २५११.५१ कोटी समाविष्ट आहे) एवढी शिल्लक वर्षाअखेर वसूली योग्य आहे. महावितरणने महानिर्मितीस देय असलेल्या पैकी ₹ १५९५७.२४ कोटी कायम केली आहे. या शिल्लक दोन्ही कंपन्यांनी संयुक्तपणे केला. आम्हाला देण्यात आलेल्या माहिती प्रमाणे या समस्येचे निराकरण झाल्यानंतर वादग्रस्त रकमेचा अंतिम लेखा सुधारणा आणि समायोजन केले जाईल. (ब)- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण) यांच्याकडे वसुली योग्य शिल्लक ₹१४३.५२ कोटी ही कायम व सेल करण्याच्या अधीन आहे. तथापि आम्हाला माहिती देण्यात आली की, कंपनीने पुष्टीकरणासाठी पत्र आणि स्मरणपत्रे पाठविली परंतु त्याची उत्तरे मिळाली नाही. लेखापरिक्षणासाठी पुरेसे व योग्य पुरावा नसल्याने वरील (अ) आणि (ब) यातील त्यांचे नफ्यावर होऊ शकणाऱ्या संभाव्य परिणामबाबत मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

३. *कोळसा कंपन्याच्या शिल्लकी संबंधित कंपन्यांकडून खात्री व सेल करण्याच्या अधीन आहेत. आमच्यामते कंपनी मध्ये सामान्य खातेवही शिल्लकवर आधारीत मेळ करण्यात आला नाही, त्यामुळे त्याचा कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामांवर आम्हास भाष्य करता येत नाही. कंपनी निहाय थकीत अग्रिमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.*

(₹कोटीत)

| पुरवठादारांची नावे | महानिर्मितीच्या लेख्याप्रमाणे ३१.०३.२०२१ रोजीची शिल्लक |
|---|---|
| सिंगरेनी कोलरीज लिमिटेड | १२४.८४ जमा नोंद |
| साऊथ इस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड | २५२.१७ नावे नोंद |
| वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड | २०१३.४४ जमा नोंद |
| महानदी कोलफिल्ड्स लिमिटेड | १२०.१९ जमा नोंद |
| **एकूण** | **२००६.२७ जमा नोंद** |

खात्री आणि मेळ पूर्ण करणे प्रलंबित असल्याने आणि कोळसा कंपन्यांनी पाठवलेल्या प्रोत्साहक देयकांसाठी, कोळसा कमी उचलण्याबद्दल तरतुद केलेली नाही. कंपनीने कोळसा कंपन्यावर कमी पुरवठा दर्जा घट इत्यादी. तसेच प्रतिदावेही दाखल केले आहेत. हे विवादित दावे आणि प्रतिदावे असल्याने या सर्वांचा प्रभाव अनिश्चित आहे. या कारणांमुळे यांचा कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकांवर पडू शकणाऱ्या प्रभावाविषयी अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

४. रेल्वे कंपन्यांकडील शिल्लकी कायम होण्याच्या अधीन आहेत. बहुतेक शिल्लकी मागील वर्षातील जुन्या असमायोजित थकीत रकमेबाबत आहेत. त्याची ठळक माहिती खालीलप्रमाणे आहे.

(₹कोटीत)

| पुरवठादारांची नावे | महानिर्मितीच्या लेख्याप्रमाणे ३१.०३.२०२१ रोजीची शिल्लक |
|---|---|
| दक्षिण मध्य रेल्वे (खाते क्र. ३००००) | ६.८६ खर्च नोंद |
| दक्षिण पुर्व मध्य रेल्वे (खाते क्र. ३०००१) | ४३.६६ खर्च नोंद |
| दक्षिण मध्य रेल्वे (खाते क्र. ४३०००) | ३१.१५ खर्च नोंद |
| **एकूण** | **८१.६८ खर्च नोंद** |

कायम / मेळ पुर्ण करणे प्रलंबित असल्याने, त्याचे वित्तीय नोंदवह्यात परिणामकारक समायोजने करता आलेली नाही. त्यामुळे या बाबींचे कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामांबाबत आम्ही मत देऊ शकत नाही.

५. व्यापारी येणे कर्ज आणि अग्रिमे, ठेवी आणि व्यापारी देणी यांच्या शिल्लकी, संबंधित व्यक्ती - संस्था यांचेकडून खातरजमा करणे आणि/किंवा त्याप्रमाणे मेळ केला जाणे यांच्या अधीन आहेत अशी निश्चिती आणि मेळ करणे प्रलंबित असल्याने त्यांची परिणाम स्वरूप समायोजने केलेली नाहीत. मात्र आम्हांला माहिती देण्यात आली की, कंपनीने तिच्या पुरवठादारांना याविषयी पत्रे दिली असून जेथे जेथे शिलकीची खातरजमा मिळत आहे त्यांचा मेळ करण्यात येत आहे. तसेच आम्हांला सांगण्यात आले की, असे मेळ करणे ही कंपनीत सतत चालू असलेली प्रक्रिया असते. लेखा परिक्षणासाठी पुरेसे आणि योग्य पुरावे नसल्यामुळे या शिलकीचा जर काही प्रभाव होणार असेल तर त्याबाबत आणि त्यामुळे कंपनीच्या या वर्षीच्या फायद्याबाबत आम्ही अभिप्राय देण्यास असमर्थ आहोत.

आम्ही आमचे लेखापरिक्षण कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३(१०) यात निर्देशित केलेल्या लेखा परिक्षणाची मानके याप्रमाणे केले आहे. या मानकांप्रमाणे आमच्या जबाबदाऱ्यांचे अधिक तपशीलवार वर्णन आमच्या अहवालातील स्वायत्त वित्तीय विवरण पत्राचे लेखापरिक्षणा संबंधी लेखापरिक्षणाच्या जबाबदाऱ्या या विभागात दिल्या आहेत. कंपनी कायदा २०१३ यातील तरतुदी आणि नियमानुसार स्वायत्ता वित्तीय विवरण पत्रकाच्या आमच्या लेखा परिक्षणा संबंधीत नैतिक आवश्यकता आणि भारतीय सनदी लेखापाल संस्थाने जारी केलेली आचारसंहिता यांच्या अनुषंगाने आम्ही या कंपनीपासून स्वतंत्र आहोत आणि आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्या या आवश्यकतेनुसार व आचारसंहितेनुसार पूर्ण केल्या आहेत आणि आमचा विश्वास आहे की, आमच्या मतांना योग्य तो आधार देणारे पुरेसे आणि योग्य पुरावे आम्ही मिळविले आहेत.

**भर देण्याची प्रकरणे**

१. महाराष्ट्र शासनासोबतच्या भाडेपट्टी करारा संदर्भात जलविद्युत निर्मितीच्या विविध सुविधाची कार्यवाही बाकी असण्या बाबतची टिपा ४५(ए-ए) याकडे लक्ष वेधण्यात येते.

२. टिपा क्र. ४३(इ) याकडे लक्ष वेधण्यात येते. भविष्य निर्वाह निधीसाठी योगदान देण्यास पात्र असलेल्या कमाईमध्ये कर्मचाऱ्याना दिल्या जागाऱ्या विशिष्ट भत्तांचा समावेश करावा यावर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. याबाबत कंपनीच्या व्यवस्थपनाचे मत अद्याप ठरलेले नाही म्हणून त्याच्या परिणामांना निश्चित करता आलेले नाहीत.

वरील विषयावर आम्ही पात्र मत दिलेले नाही.

**लेखा परिक्षणातील महत्वाच्या बाबी**

लेखा परिक्षण विषयक महत्वांची प्रकरणे म्हणजे विद्यमान काळातील स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाचे आम्ही केलेल्या लेखा परिक्षणात, आमच्या व्यवसायिक न्याय निर्णय बुद्धीच्या मते आम्हांला महत्वाची वाटली. आम्ही स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाचे संपूर्णपणे लेखा परिक्षण केले. त्या संदर्भात या महत्वाच्या प्रकरणाकडे लक्ष देण्यात आले आहे. त्यानुसार आमचे मत तयार केले आहे. त्याविषयी आम्ही वेगळे मत दिले नाही. या वर्षात खालील विषयांना आम्ही लेखापरिक्षणांना महत्वाचे मानले आहे.

**आकस्मित दायित्वे / आकस्मित मत्ता**

कंपनीच्या विरोधात विविध मंचा समोर बरीच कायदेविषयक वादग्रस्त प्रकरणे प्रलंबित आहेत. व्यवस्थापनाने यातील रकमेबाबत अंदाज करून तेवढे आकस्मित दायित्व प्रकट करणे आवश्यक आहे. कोळसा कंपन्यानी महानिर्मितीकडे विविध दावे केले आहेत. तसेच महानिर्मितीच्या व्यवस्थापनाने कोळसा कंपन्यावर प्रतिदावे केले आहेत. ते आकलनावर आधारित आहेत.

आम्ही याबाबीची महत्वाचा लेखा परिक्षण विषय म्हणून ओळख निश्चिती केली आहे. कारण व्यवस्थापनाच्या न्यायनिर्णय बुद्धीनुसार जे अंदाज केले जातात व या प्रकरणांचा अर्थ लावला जातो त्या आधारे रकमा मांडल्या आहेत आणि ही बाब व्यवस्थापनाच्या पूर्वग्रहाच्या आधीन असू शकते. दावे व प्रतिदावे करण्यासाठी व्यवस्थापनाने अंदाज करणे आणि मुदयांचा अन्वयार्थ लावणे यांची आवश्यकता असते. या विविध विषयाचे स्वरूप व्यक्तिगत असू शकते.

(स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाची टिपा क्र. ४२ पहावी आणि ती लेखा धोरणे परिच्छेद २१ सोबत वाचावी)

आम्ही आकस्मिक दायित्वे आणि आकस्मिक मत्ता यांचे अंदाज व प्रगटीकरण याविषयांसाठी कंपनीच्या अंतर्गत सूचना व कार्यपद्धती या समजून घेतल्या आणि लेखापरिक्षणासाठी खालील पद्धतीचा अवलंब केला.

- प्रलंबित कायदे विषयक खटले बाबत सर्वोतोपरी माहिती शोधण्यास व्यवस्थापनाची जी रचना व नियंत्रणे स्थापित केली ती समजून घेऊन तिचे परिक्षण केले.
- या कायदे विषयक प्रकरणातील प्रत्यक्ष आणि अद्यावत घडामोडीची स्थिती याविषयी व्यवस्थापनाशी चर्चा केली.
- या कायदे विषयक प्रकरणासंबंधीत विविध पत्रव्यवहार, कागदपत्रे आणि जर काही व्यवस्थापनाने बाह्य कायद्याची मते मिळवली असतील तर त्यांचे अवलोकन केले आणि आकस्मित दायित्वे व मत्ता यांच्या प्रकटनाला पुष्टि देण्यासाठी महत्वाच्या बाबींचा हिशेब केला.
- यासाठी तरतूदींची आवश्यकता याविषयी व्यवस्थापनाचे न्यायनिर्णय आणि निर्धारण प्रमाण यांचे परिक्षण केले.
- प्रकरणांचे प्रमाण आणि पूर्तता यांचा आढावा घेतला.

वरील प्रमाणे केलेल्या कार्य पद्धतीच्या अंमजबजावणीच्या आधारे आकस्मिक दायित्वे आणि आकस्मित मत्ता यांविषयी केलेली अंदाज आणि प्रकटने ही पुरेशी आणि योग्य आहेत.

**इतर बाबी**

१. या वित्तीय वर्षात, सरकारने कोवीड-१९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी पूर्णपणे लॉकडाऊन लागू केल्यामुळे आम्ही आमची लेखा परिक्षणाची प्रक्रीया करण्यासाठी कंपनीच्या विविध कारखान्यांना किंवा जागांना प्रत्यक्ष भेटी देऊ शकलो नाही. म्हणून सांविधिक लेखा परिक्षण "घरी थांबून काम" याप्रकारे करण्यात आले म्हणजेच कंपनीचे अन्य जागी असलेले कारखाने आणि कार्यालये यांचे लेखा परीक्षणाच्या व्यवस्थापनाने डिजीटल माध्यमातून उपलब्ध केलेली आकडेवारी / माहीती / अभिलेखे / दस्तऐवज / आधारभूत माहिती याआधारे केले आहेत. त्यासाठी सॅप प्रणाली आणि व्ही पी एन लिंक मार्फत डॅशबोर्ड यांचा उपयोग करण्यात आला.

२. कंपनीचे अंतर्गत लेखा परीक्षण सनदी लेखापालांच्या बाहेरच्या संस्थांनी केले आहे. चालू वर्षातील पहिल्या आणि दुसऱ्या तिमाही अंतर्गत

लेखा परिक्षण अहवाल फक्त आंम्हाला मिळाले. कोवीड-१९ च्या लॉकडाऊनमुळे तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीचे अहवाल उपलब्ध होऊ शकलेले नाहीत.

वरील दोन विषया संदर्भात आमचे लेखापरीक्षण मत पात्र न.

**''स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके आणि त्यावरील लेखापरिक्षणांचा अहवाल या व्यतिरिक्त इतर माहिती''**

कंपनीचे संचालक मंडळ हे इतर माहितीसाठी जबाबदार असतात. कंपनीची इतर माहिती संचालक मंडळाचा अहवाल आणि इतर जोडपत्रे परिशिष्टे यात समाविष्ट असते. परंतु स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके आणि त्यावरी लेखा परिक्षकांचा अहवाल यात समाविष्ट नसतो.

स्वायत्त वित्तीय विवरण पत्रांमध्ये इतर माहिती समाविष्ट नसल्याने आम्ही त्यासंबंधीची आश्वासने आणि निष्कर्ष इत्यादी रुपाने आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही.

आम्ही स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाच्या लेखापरिक्षणाच्या निमित्ताने आमच्या जबाबदारीमध्ये इतर माहिती वाचनाचाही समावेश होतो तसे करताना आम्हाला इतर माहिती स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांस प्रत्यक्ष विसंगत आहे किंवा कसे किंवा लेखापरिक्षणाची आम्ही मिळविलेले ज्ञान यात काही मोठ्याप्रमाणात गैर विवरण झाले किंवा नाही याचा विचार करावा लागतो.

आम्हाला सांगण्यात आले की, ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा संचालकांचा अहवाल आणि संबंधित जोडपत्रे यांचे अंतिमीकरण झाल्यावर त्याचा नंतर संचालक मंडळातर्फे स्वीकार केला जातो. त्यामुळे आम्हाला आजच त्याविषयी मत देता येणे शक्य झालेले नाही.

**स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांच्या संदर्भात कंपनीचे व्यवस्थापन आणि प्रशासकाच्या जबाबदार**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४(५) यामधील दिलेल्या विषयांसाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. त्यामध्ये भारतातील सर्वसाधारणपणे स्वीकृत केलेली लेखाविषयी तत्त्वे आणि कलम १३३ यात विहित केलेली लेखा मानके यांच्याशी सुसंगत असे कंपनीच्या वित्तीय स्थिती, वित्तीय कामगिरी, समभागातील बदल आणि रोकडता प्रवाह याचे यथार्थ आणि योग्य दर्शन घडविणारी स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकेत तयार करण्याची जबाबदारी समाविष्ट आहे. यामध्ये कंपनीच्या मत्ताचे संरक्षण करणे, लबाड्या व इतर अनियमितता यांना शोधणे किंवा आळा घालणे. योग्य लेखा धोरणे निवडून ती लागू करणे, प्रमाणबद्ध व सुज्ञ असे निर्णय व अंदाजकरणे, अंतर्गत लेखा नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी करुन ती व्यवस्थित कार्यरत ठेवणे आणि कंपनीचे सत्य आणि योग्य दर्शन घडविणारी आणि अन्य कोणतीही मोठी लबाडी किंवा चूक भूल यापासुन मुक्त असलेली स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके तयार करणे या कामांचा समावेश असतो.

स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके तयार करताना, जर कंपनीची परिसमापन करावे किंवा काम थांबवावे किंवा तसे करण्यापासुन अन्य पर्याय नाही असे जर संचालक मंडळाचे मत नसेल तर, संचालक मंडळाला 'सतत कार्यरत असलेली संस्था' असे काम करण्यासाठी कंपनी समर्थ असल्याबद्दल निर्धारीत करावे लागते. सतत कार्यरत संस्था संबंधी तसे प्रकटन करणे त्या आधारे लेखे करणे ही संचालक मंडळाची जबाबदारी असते.

संचालक मंडळाकडे कंपनीच्या वित्तीय अहवाल देण्याच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवण्याचीही जबाबदारी असते.

**स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण करण्यासाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी**

आमचे लेखा परिक्षणाचे उद्दिष्ट असे आहे की, ही स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके संपूर्णत: कोणत्याही मोठ्या गैर विवरणापासुन मुक्त आहेत किंवा कसे याचे योग्य कारणांसह हमी मिळविणे ही गैर विवरणे लबाडी किंवा चुकीमुळे होऊ शकतात आणि लेखा परिक्षणाच्या अहवाल देऊन आमची मते व्यक्त करणे. आमची प्रमाणशीर हमी किंवा खात्री ही उच्च स्तरावरील खात्री असते. मात्र लेखा मानकांनुसार करण्यात आलेले, लेखापरिक्षणातून अस्तित्त्वात असलेली मोठी चूक किंवा गैरविवरण नेहमीच शोधता येईल अशी हमी देता येत नाही. लबाडी किंवा चुकीमुळे गैरविवरण होऊ शकते आणि जेव्हा वापरकर्त्या संस्था, आर्थिक निर्णयावर त्यांचा एकत्रितपणे मोठा प्रभाव पडत असेल तर ते मोठ्या प्रमाणातील गैर विवरण आहे असे समजण्यात येते.

लेखा मानकांनुसार केलेल्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही व्यावसायिक निर्णयबुद्धीचा वापर केला आहे आणि आमच्या संपूर्ण लेखापरिक्षणात व्यावसायिक संशयबुद्धी वापरली आहे. आम्ही खालील बाबी अनुसरल्या आहेत.

- स्वायत्ता वित्तीय विवरण पत्रकातील महत्त्वाची गैरविवरणाचे धोके शोधणे आणि त्यांचे मुल्यमापन करणे, ही गैरविवरणे लबाडीमुळे किंवा चुकीमुळे झालेली आहेत किंवा कसे ते शोधणे. या जोखीमांना प्रतिबंधात्मक लेखा परिक्षण पद्धतीची संरचना करणे व त्यादृष्टीने काम

करणे आणि आमच्या मतांना आधार देणारे पुरेसे व योग्य पुरावे लेखापरिक्षणातुन मिळविणे. लबाडी मधुन होणाऱ्या गैरविवरणाचे धोके शोधणे हे चुकीने निर्माण झालेल्या गैर विवरणापेक्षा मोठे असतात. कारण लबाडीमध्ये संगनमत, बनावट दस्त ऐवज, हेतुपुरस्पर माहिती वगळणे, चुकीचा अर्थ लावणे, विपर्यास करणे किंवा अंतर्गत नियंत्रणांचे उल्लंघन करणे आदि कृतींचा समावेश असतो.

- आम्ही लेखा परिक्षणासंबंधीची अंतर्गत नियंत्रणे समजावून घेतली आहेत. त्यामधुन परिस्थिती नुरूप योग्य लेखा परिक्षण कार्यपद्धतीची रचना केली आहे. कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३(३)(१) नुसार आम्ही कंपनीमध्ये अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आहे किंवा कसे आणि वित्तीय विवरण पत्रके नियंत्रणे योग्य व प्रभावीरित्या कार्यरत आहेत किंवा कसे यावर आमची मते देण्याची आमच्यावर जबाबादारी आहे.

- कंपनीने वापरलेल्या लेखा धोरणांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, तसेच व्यवस्थापनाने केलेल्या लेखाचे अंदाज आणि प्रकटने समर्थनीय असल्याचे निश्चित करणे.

- कंपनी ही सतत चालु राहणारी संस्था आहे; असे गृहित धरून व्यवस्थापनाने त्याच्या आधारे मांडलेल्या लेख्यांच्या योग्यते विषयी निष्कर्ष काढणे. त्यासाठी लेखा परिक्षणात्मक पुरावे मिळविणे, कंपनीमध्ये घडलेल्या संबंधित घटना आणि स्थिती यांच्यावरून मोठी अनिश्चितता अस्तित्त्वात आहे किंवा कसे या आधारे कंपनीकडे 'कार्यरत संस्था' यासाठी सामर्थ्य आहे किंवा कसे या बाबतचे निष्कर्ष नोंदवणे. जर कंपनी विषयी अशी अनिश्चितता मोठ्या प्रमाणात अस्तित्त्वात आहे असा आमचा निष्कर्ष असेल तर, आम्ही त्याकडे आमच्या लेखापरिक्षण अहवालात लक्ष वेधणे आवश्यक असते आणि स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाच्या संबंधित प्रकटनात तसे उल्लेख असले पाहिजे. आमचे मतात रुपभेद करण्यासाठी ही प्रकटने अपूर्ण असतील तर त्याकडे लक्ष वेधणे ही आमची जबाबदारी आहे. आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालाच्या तारखेपर्यंत जे लेखापरिक्षणाचे पुरावे आम्ही मिळविले, त्यावर आमचे निष्कर्ष आधारलेले आहेत. मात्र भविष्यात अन्य काही घटना किंवा स्थिती यांचा सुद्धा परिणाम होऊन कंपनी 'सतत चालु राहणारी संस्था' या प्रमाणे काम करणे थांबु शकते.

- स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांचे सर्वांगिण सादरीकरण, रचना आणि त्यातील समाविष्ट विषय यांचे मुल्यांकन करणे, यात प्रकटने ही येतात आणि या स्वायत्ता वित्तीय विवरण पत्रकातुन कंपनीचे व्यवहार आणि प्रसंग यांचे योग्यरित्या दर्शन होते आहे. त्याबद्दल मत देणे.

आम्ही ज्याच्याकडे कंपनीचे प्रशासनाचा कार्यभार आहे, अशा सर्वांसोबत संपर्क केला त्यामध्ये इतर विषयांसोबत लेखा परिक्षणाची व्याप्ती, वेळ आणि आढळलेली महत्त्वाची माहिती यावर चर्चा केली. यात आमच्या लेखा परिक्षणात आम्हाला आढळलेल्या अंतर्गत नियंत्रणातील महत्त्वांच्या उणिवाचाही समावेश होता.

तसेच आम्हाला आवश्यक असलेल्या आमच्या स्वातंत्र्यासंबंधीच्या नैतिक आवश्यकतेची पूर्तता करण्यासाठी आम्ही संबंधित कार्यभार सांभाळणाऱ्यांना यांना एक निवेदनपत्र दिले. आमच्या स्वतंत्र कामाच्या जबाबदारीसाठी आम्हाला सर्व नाते हित संबंध आणि इतर विषयी माहिती दिली तसेच जेथे लागू असेल तेथे सुरक्षेसंबंधीची माहिती दिली.

संबंधितांशी या विषयी संपर्क केल्यानंतर, आम्ही विद्यमान कालावधीत स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांच्या लेखा परिक्षणाच्यासाठी महत्त्वाचे विषय निश्चित केले. आम्ही या महत्त्वाच्या विषयांचे वर्णन आमच्या लेखा परिक्षकांच्या अहवालात दिले आहे. मात्र जर अन्य कायदा किंवा नियमाने असे जाहीर प्रकटनास अवरोध करत असेल किंवा अतिशय दुर्मिळ परिस्थितीत जी माहिती आमच्या अहवालात आणणे इष्ट नाही. कारण त्याचे विपरीत परिणाम जनहिताला बाधक ठरू शकतील असे आमचे मत झाले तर ती प्रकटने करणे आम्ही टाळत असतो.

**इतर कायदेशीर नियमनाच्या आवश्यकता**

१) कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३(५) यातील आवश्यकतेनुसार आम्ही भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या निर्देशानुसार जोडपत्र (१)देत आहोत. लेखापरिक्षणासाठी सुचविण्यात आलेल्या पद्धतीची पूर्तता केल्यानंतर आणि त्यावर केलेली कार्यवाही आणि तिचा कंपनीच्या लेख्यांवर आणि स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांवर झालेले परिणाम या जोडपत्रात दिले आहेत.

२) कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ मधील उपकलम (११) यामधील अटीनुसार, केंद्र शासनाने काढलेला कंपन्याचे (लेखा परिक्षकाचे अहवाल) आदेश, २०१६ (आदेश) यातील आवश्यकतेप्रमाणे आम्ही जोडपत्र (२) यामध्ये या आदेशातील परिच्छेद ३ व ४ यात विनिर्देशित केलेल्या विषयासंबंधी लागू होणाऱ्या मर्यादानुसार एक निवेदन देत आहोत.

३) अधिनियम कलम १४३ (३) नुसार आम्ही अहवाल देत आहेत.

ए) आमचे सर्वोतोपरी ज्ञान आणि विकास यानुसार आमचे लेखा परिक्षणाच्या हेतुसाठी आवश्यक ती सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे मिळविले आहेत. *फक्त वरील ''पात्र मत्तांचा आधार'' या परिच्छेदात वर्णन केलेली तिसऱ्या पक्षांकडील शिलकींची निश्चिती, मेळ आणि समायोजन करणे यांचा अपवाद आहे. त्याचा जर काही परिणाम या वित्तीय विवरण पत्रांवर होणार असेल तर त्याचे अंदाज करता येत नाहीत.*

बी) *आमच्या मते, वरील पात्र मतांचा आधार या परिच्छेदात वर्णन केलेल्या विषयांचा अपवाद करून,* कायद्याप्रमाणे आवश्यक अशा प्रकारे लेख्यांच्या वह्या योग्य प्रकारे जतन केल्या आहेत, असे आम्ही केलेल्या या वह्यांच्या तपासणी मधुन दिसुन आले.

सी) या अहवालाशी संबंधित वित्तीय विवरण पत्रके म्हणजेच ताळेबंद, नफा-तोटा पत्रक (इतर सर्वकष उपन्न यासह) समभागातील बदल आणि रोकडता पत्रक ही कागदपत्रे लेखा वह्यांशी सुसंगत आहेत.

डी) *वरील आमच्या पात्र मतांचा आधार या परिच्छेदात वर्णन केलेल्या या विषयाचे संभाव्य परिणाम याला अधीन राहून* आमचे असे मत आहे की, उपरोक्त स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके ही संबंधित कायद्याचे कलम क्र.१३३ ज्याचे सहवाचन अनुषंगीक नियमावली या दिलेल्या विनिर्देशित लेखा मानकांचे अनुपालन करतात.

इ) महानिर्मिती शासकीय कंपनी असल्याने, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्र.जी एस आर ४६३(इ) दिनांक ०५ जुन २०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १६४(२) यामधील ''संचालकाची अपात्रता'' याविषयीच्या तरतुदी महानिर्मिती कंपनीला लागू होत नाहीत.

एफ) आम्ही वरिल ''पात्र मतांचा आधार'' या परिच्छेदात दिलेली परिक्षणे यांचे कंपनीच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही.

जी) कंपनीचे वित्तीय अहवाला संबंधीत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा पुरेसपणा आणि या नियंत्रणाचा प्रभाव या विषयी आमचा ''स्वतंत्र अहवाल जोडपत्र तीन'' मध्ये दिला आहे.

एच) ही कंपनी शासकीय असल्याने, भारत सरकारची अधिसुचना क्र.४६३(इ) दि.५ जुन २०१५ याप्रमाणे कायद्यातील कलम १९७ च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

आय) कंपनी (लेखा परिक्षण व लेखा परिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम क्र.११ नुसार जे अन्य विषय या अहवालात समाविष्ट करावयाचे असतात त्याबाबत आम्ही आमचे सर्वोतोपरी ज्ञान आणि आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही खालील मते नोंदवितो.

१. महानिर्मिती कंपनीने तिच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रामध्ये प्रलंबित कायदेशीर बाबींचे परिणामाचे परिणाम प्रकट केले आहेत. त्यासाठी स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांची टिपा क्र.४२ पहावी.

२. ज्यात भविष्यात तोटे येऊ शकतील असे कोणतेही दीर्घ मुदतीचे करार कंपनीने केलेले नाहीत (यात डेरिव्हेटीव्ह कंत्राटे पण समाविष्ट आहेत)

३. कंपनीद्वारे या वर्षी गुंतवणूकदार शिक्षण आणि रक्षण निधीत स्थानांतरित करण्यास आवश्यक रकमा नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन १००१८६ डब्ल्यु**
**यूडीआयएनः २१०३८५२६एएएएइएच५३४४**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३८५२६**

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन ११०५०४ डब्ल्यु**
**यूडीआयएनः२१०३९५५५एएएएआयटी२६५०**

**सी. ए. बी.एन. राव**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३९५५५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२१

## जोडपत्र क्र. १: महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड च्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रकावरील स्वायत्त स्वतंत्र लेखा लेखापरिक्षकांचा अहवाल वित्तीय संदर्भाप्रमाणे

## कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ मधील ३उपकलम ( ५ ) अंतर्गत

**१ ) कंपनीमध्ये सर्व लेखे व्यवहार माहिती तंत्रज्ञान प्रणाली मार्फत करण्याची प्रक्रिया आहे किंवा कसे? जर उत्तर होय असल्यास लेखे व्यवहार बाह्य प्रक्रियेद्वारे केल्यास त्याचे लेख्यांची- एकात्मीकता यावर कोणते परिणाम होतात आणि जर त्यांचे वित्तीय परिणाम होय असतील तर त्यांची माहिती.**

होय कंपनीने तिचे सर्व लेखे व्यवहार प्रक्रिया सॅप-इआरपी प्रणाली मार्फत केले जातात. आमचे सर्वोपरी ज्ञान आणि माहिती यानुसार कंपनीने माहिती तंत्रज्ञान प्रणाली बाहेर कोणतेही व्यवहार केले जात नाही.

**२ ) कंपनीची कर्जाची परतफेड करण्याची क्षमता नाही म्हणून कोणत्याही धनकोने विद्यमान कर्जाची पूनर्रचना केली किंवा कर्जे/ऋण/व्याज इत्यादी. निर्लेखित केली/सोडून दिली असे घडले काय? उत्तर होय असल्यास त्याचे वित्तीय परिणाम विषद करावेच. अशा प्रकरणांचे योग्य लेखे केले काय? ( जर धनको सरकारी कंपनी असेल तर हा निर्देश धनको कंपनीच्या सांविधिक लेखापरिक्षांकांना देखील लागू आहे. )**

आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती तसेच लेखा अहवाल प्रमाणे विद्यमान कर्जाची धनकोन पुनर्रचना करणे किंवा कर्ज/ऋण/व्याज यांना सोडून देणे किंवा त्यांचे निर्लेखन करणे असे एकही प्रकरण नाही.

**३ ) केंद्र/राज्य शासने किंवा त्यांच्या संस्था यांचे कडून प्राप्त विशिष्ट निधी ( अनुदान/अर्थ सहाय्य इत्यादी. ) यांचे योग्य प्रकारे लेखे केले जातात काय? त्यांचा अटी व शर्तीनुसार वापर होत काय?**

आमचे सर्वोतपरी ज्ञान आणि माहिती तसेच लेखा अहवालात दाखविलेल्या नोंदी यानुसार विशिष्ट योजनासाठी केंद्र/राज्य शासन किंवा त्यांचा संस्थाचा  निधीचा योग्य लेखे केले आहेत आणि वापर त्यांच्या अटी व शर्तीनुसार करण्यात आला आहे.

**४ ) जर काही कर्जे / ऋणे / व्याज / उसनवारी इत्यादी सोडून देणे / निर्लेखित करण्याची प्रकरणे असल्यास त्याचा अहवाल तसेच त्याची कारणे व त्यातील रक्कम याची माहिती.**

आमच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत तसेच आम्हांस दिलेली माहीती आणि स्पष्टीकरणे यावरून वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मध्ये कंपनीने कोणतीही कर्जे / ऋणे / व्याज / उसनवारी इत्यादी सोडून देणे / निर्लेखित केली नाहीत.

**५ ) तिसऱ्या पक्षांकडे राहिलेल्या वस्तूमालाचे तसेच शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून देणगी रूपाने मिळालेल्या मत्ता यांचे योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे?**

कंपनी तिचा वस्तूमाल / साहित्य तिसऱ्या पक्षाकडे फक्त देखभाल / जोडणी करणे या कामांसाठी पाठविते. आम्हास दिलेल्या माहितीप्रमणे भांडार विभाग (कक्ष) आणि सुरक्षा विभाग अशा प्रकारच्या वस्तूमाल साठ्यांचे योग्यप्रकारे दस्तऐवज व नियंत्रण ठेवून त्यासाठी त्या विभाग कक्षात टिपणी केल्या जातात आणि परत केले जाणारे / न केले जाणारे प्रवेश पत्र (गेट पास) तयार केले जातात. त्याची माहिती सॅप प्रणालीच्या 'मटेरियल मोड्यूल' यामध्ये सुद्धा पाहता येते. तसेच आम्हांस सांगण्यात आले की, यावर्षी शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून कोणत्याही मत्ता देणगी स्वरूपात मिळाल्या नाहीत.

**६ ) प्रलंबित न्यायालयीन वाद / न्यायाधिकरणाचे खटले यांचा वर्ष निहाय अहवाल देणे त्यात प्रलंबनाची कारणे आणि कायदेविषयक प्रकरणे ( परदेशी व स्थानिक ) यांच्यावरील खर्चावर लक्ष देणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्व आणि प्रभाव या माहितीचा समावेश करावा.**

कंपनी प्रलंबित कायदेविषयक दावे / न्यायाधिकरणाकडील खटले यांची ओळख निश्चिती करून त्याचे प्रकटन 'आकस्मित दायित्वे' यात करीत असते. एकूण ३८५ कायदेशीर / लवादातील खटल्यांचे त्याचे वयानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| प्रकरणाची वर्षे | प्रकरणांची संख्या |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | १८ |
| १ ते २ वर्षे | ९८ |
| २ ते ३ वर्षे | ८५ |
| ३ ते ५ वर्षे | ९१ |
| ५ वर्षापेक्षा जास्त | ९३ |
| **एकूण** | **३८५** |

आम्हांस असे सांगण्यात आले की, वरील प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे प्रत्येक प्रकरणात वेगवेगळी आहेत तसेच आम्हांला अशी माहिती दिली की, कायेदशीर प्रकरणांचा खर्च हा वरील प्रकरणांमध्ये अभियोक्ता / सल्लागार यांच्या शूल्काच्या मंजुरीच्या रचनेप्रमाणे आहे, कंपनीकडून संबंधित माहिती उपलब्ध झाली नसल्याने प्रलंबनाच्या कारणाविषयी आणि कायदेशीर खटल्यांच्या खर्चासंबधीच्या विद्यमान यंत्रणेच्या प्रभावीपणा बाबत कोणतेही मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

७) **जर या कंपनीची निर्गुंतवणूक करण्यासाठी निवड झाली असेल तर ( अमूर्त मत्ता व जमिनी यासह ) मत्ता आणि दायित्वे यांचे ( बांधिलकी व सामान्य राखीव यासह ) मूल्यांकनाबाबत संपूर्ण स्थितीदर्शक अहवालाचे परिक्षण करावे. त्यात कंपनीची निर्गुंतवणूक प्रक्रियेची कार्यपद्धती आणि विद्यमान स्थिती यांचा समावेश करावा.**

महानिर्मिती कंपनीची निर्गुंतवणूक हेतूसाठी निवड झालेली नाही म्हणून मागवलेली माहिती कंपनीस लागू नाही.

<u>सेक्टर विशिष्ट उप-आदेशांवर अभिप्राय</u>

८) **कंपनीने मागविलेल्या कोळशांची संख्या/दर्जा यांचा मेळ करण्यास कंपनीकडे योग्य यंत्रणा आहे काय? आणि कोळशाचा दर्जा/त्याचा ओलसरपणा आणि विलंब आकार यांच्या लेखा वह्यात योग्य नोंदी केल्या जातात काय?**

महानिर्मिती कंपनीने कोळसा कंपन्यांनी तयार केलेल्या आणि प्राप्त झालेल्या कोळशांच्या देयकांचा मेळ करण्यासाठी एक कार्यपद्धती आहे परंतु मागणी केलेला आणि प्रत्यक्ष मिळालेला कोळसा यांची संख्या/दर्जा यासाठी मेळ करण्याच्या विद्यमान कार्यपद्धतीस अधिक बळकटी देण्याची गरज आहे. महानिर्मिती कंपनीने कोळसा पृथ:करण करणाऱ्या एका मान्यता प्राप्त संस्थेची नियुक्ती केली आहे तिच नाव 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ मायनींग अँड फ्युअल रिसर्च' असे आहे. (सी आय एम एफ आर) ही संस्था कोळसा कंपनीचा माल भरण्याच्या जागेवर तांत्रिक पृथ:करण करते. सी आय एम एफ आर यांनी दिलेल्या पृथ:करण अहवालाच्या आधारे कोल ऑफिस, नागपूर बीजकात नमुद केलेला दर्जा आणि अहवालातील दर्जा यांचा मेळ करते आणि दर्जा घसरला असल्यास त्यांचे कोळसा कंपनीकडे दावे केले जातात.

कोळसा पुरवठादारांनी ₹३१६०.४५ कोटींची मागणी केली आहे (या मागील वर्षा ३०४५.६० कोटी) कमी माल उचलणे, कामगिरीसाठी प्रोत्साहन आणि व्याज आदी कारणास्तव केलेल्या वरील रकमेच्या मागणी महानिर्मितीने वादग्रस्त असल्याचे सांगितले याविषयी योग्य ते कागदोपत्री पुरावे नसल्याने मागणीची अचुकतेबाबत निष्कर्ष काढता येणे अवघड झाले आहे. कोळसा पुरवठादारांची ही मागणी कंपनीने दि.३१ मार्च २०२१ रोजी 'आकस्मित दायित्त्व' म्हणून घोषित केली.

महानिर्मितीने कोळसा पुरवठादारांच्या विरोधात अपुरा माल देणे, ओलसर कोळसा देणे, कमी माल भरणे आणि व्याजाच्या मागणी इत्यादी बाबत करारानुसार ₹७७९०.३५ कोटींचे (मागील वर्षी ₹६७६४.३४ कोटी) दावे दि.३१ मार्च २०२१ मध्ये अस्तित्त्वात होते. त्यांना दि.३१ मार्च २०२१ रोजी 'आकस्मिक मत्ता' म्हणून कंपनीने घोषित केले आहे.

९) **राज्य शासनाला देय असलेल्या विनामुल्य विजेचा वाटा किती आहे? स्वीकृत लेखे प्रमाणकांनुसार व करारातील अटीनुसार त्याचा हिशेब करुन तो लेखांमध्ये दाखविला जातो काय?**

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार कोणत्याही करारानुसार राज्य शासनाला विनामुल्य वीज पुरवठा केला जात नाही.

१०) **वस्तूमाल सूचीमध्ये भंगार, निकामी साहित्य इत्यादीचे मूल्यासह योग्य वर्गीकरण केले आहे का?**

कंपनीमध्ये भंगार आणि निकामी साहित्य यांची निश्चित ओळख केली जाते मात्र अशी निश्चित ओळख करण्याच्या वेळी त्यांचे लेखे केले

जात नाहीत. भंगाराचे मुल्य लेखावहीत नोंदले जात नाही आणि त्यांच्या वसुलींची लेखा, जेव्हा लिलाव केला जातो तेव्हा होते. रिकामी साहित्याचे मूल्यांकन ऐतिहासिक खर्चानुसार केले जाते आणि त्याचवेळी निकामी जुनाट साधनासाठी लेखा वहीत १०० टक्के तरतूद केली जाते. अशाप्रकारे केलेल्या तरतुदीचे समायोजन सदर निकामी वस्तूच्या लिलावा सोबत केले जाते. कंपनी तांत्रिक मूल्यांकनाच्या आधारे वस्तुमाल निकामी झाल्याबद्दल ओळख निश्चिती करते. आमच्या लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीच्या आधारे असे म्हणता येते की, वरील काही उणीवा वगळल्यास, कंपनीची वस्तुमाल सूचीचे वर्गीकरण करण्याची कार्यपद्धती योग्य आहे.

**११ ) लेखा परिक्षणात नमुद केलेला नफा/तोटा हा कंपनीच्या नफा आणि तोटा यांच्या लेखांप्रमाणे आहे किंवा कसे?**

कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केल्याप्रमाणे लेखापरिक्षण अहवालात वर्षाचा नफा/तोटा याची आकडेवारी देण्याची आवश्यकता नसते तरीसुद्धा आम्ही येथे निवेदन करतो की इतर सर्वकष उत्पन्नाची नोंद व करखर्चापूर्वीचा या अहवालाच्या वर्षामध्ये महानिर्मिती कंपनीला ₹४२४.६० कोटीचा नफा झाला. याबाबत आम्ही आमचा पात्र केलेला लेखा परीक्षण अहवाल दि. २३ नोव्हेंबर २०२१ रोजी दिला आहे.

**१२ ) जल विद्युत प्रकरणातील जैविक विविधता जतन करण्याचे धोरण/सूचना यानुसार पाणी सोडले जाते का? तसे केले नाही म्हणून जर काही दंड भरला असले तर त्याची माहिती द्यावी.**

पाणी सोडण्याचे कार्य राज्य शासनाच्या जल संसाधन विभागामार्फत अंमलात येते. आम्हास दिलेल्या माहितीनुसार या कामात कंपनीची काहीही भूमिका नसते. यासाठी कोणताही दंड भरलेला नाही/देय नाही.

**१३ ) कंपनी अधिनियमामध्ये दिलेल्या कंपनीच्या सामाजिक जबाबदारी ( सीएसआर ) तरतूदीसंबंधी अहवाल देणे आणि प्रकटने करणे याविषयी अनुसरण केले किंवा कसे याचे परिक्षण करावे.**

कंपनी अधिनियमातील तरतुदीनुसार कंपनीचा मागील तीन वित्तीय वर्षातील सरासरी निव्वळ तोटा ₹७८.१७ कोटी (मागील वर्षी ४२२.८३ कोटी) इतका आहे. नफा नसल्याने सी एस आर खर्च, सरासरी नफ्याच्या २ टक्केप्रमाणे 'निरंक' आहे.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन १००१८६ डब्ल्यु**
**यूडीआयएन: २१०३८५२६एएएएइएच५३४४**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३८५२६**

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन ११०५०४ डब्ल्यु**
**यूडीआयएन:२१०३९५५५एएएआयटी२६५०**

**सी. ए. बी.एन. राव**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३९५५५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२१

## जोडपत्र क्र.२: महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रक या वरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालातील संदर्भानुसार.

१. **स्थिर मत्तांच्या संदर्भात:**

अ) महानिर्मिती कंपनीने तिच्या स्थिर मत्तांच्या संख्यात्मक स्थितीचा तपशील देणाऱ्या माहितीच्या अभिलेखाचे योग्यरित्या जतन केले आहे.

ब) आम्हास दिलेल्या माहितीनुसार, स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे काम दर तीन वर्षाने करावे असे कंपनीचे धोरण आहे. कंपनीने २०१९-२० या वित्तीय वर्षात सनदी लेखा परीक्षकांच्या एका बाह्य संस्थेकडून स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली. मुख्यालय वगळता सर्वत्र पडताळणीचे काम करण्यात आले. म्हणून चालू वर्षात स्थिर मतांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही.

क) *आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आमचे अभिलेखांचे परिक्षण यानुसार सर्व स्थावर, अचल मालमत्ता या कंपनीच्या नावे आहेत किंवा कसे याची निश्चिती करण्यासाठी त्यांचे मालमत्ता नावाचे विलेख (टायटल डिड्स) मिळविण्यासाठी प्रक्रिया कंपनीने चालू केली आहे. उपलब्ध माहितीनुसार खालील प्रकरणी टायटल डिड्स कंपनीच्या नावे धारण केलेली नाहीत.*

*(१) ४ लेखा युनीट्सचा संबंध असलेली मालकीची जमीन, जिचे प्रचलीत मूल्य वर्षांच्या अखेरीस ४५.६२ कोटी होते, ती आणि अन्य एका लेखा युनीट्सची भाडेपट्टीची जमीन, जिथे प्रचलीत मूल्य वर्षांच्या अखेरीस ४६.७२ कोटी होते, या सर्व जमीनी अद्यापही पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ नावे आहेत. आम्हांला असे सांगण्यात आले की, या जमिनी हस्तांतरण योजनेनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या आदेशातील अटींनुसार कंपनीकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.*

*(२) दोन लेखा युनीट्स संबंधित मालकीच्या जमिनी, ज्यांचे एकूण मूल्य ३१६.८१ कोटी आहे. या महानिर्मिती आणि महाराष्ट्र थर्मल पॉवर स्टेशन या नावे धारणा केलेल्या आहेत. त्या कंपनीच्या संस्थापन समयलेखानुसार कंपनीला दिलेल्या आणि रजिस्ट्रार ऑफ कंपनी, मुंबई यांचेकडे नोंदणी केलेल्या नावावर नाहीत.*

२. **वस्तूमालाच्या संबंधी:**

अ) आंम्हास असे स्पष्टीकरण देण्यात आले की, वर्षभरात वस्तुमाल सूचीनुसार माल साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने योग्य प्रकारे योग्य काळानंतर करण्यात येते ही प्रत्यक्ष पडताळणी व्यवस्थापनाने नियुक्त केलेल्या बाहेरच्या सनदी लेखापालांच्या संस्थातर्फे करण्यात आली.

ब) आमच्या मते, आणि वस्तुमाल साठ्यांच्या अभिलेखांचे आम्ही केलेल्या परिक्षणाच्या आधारे, कंपनीने वस्तूसूचींचे अभिलेख योग्य प्रकारे जतन केलेले आहेत. वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणी करून तिची तुलना अभिलेखानुसार केल्यावर काही किरकोळ विसंगती आढळल्या त्या फारशा महत्वाच्या नव्हत्या. त्यांचे योग्य ते समायोजन लेखा नोंदवहीत करण्यात आले आहे.

३. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ज्या अन्य कंपन्या, फर्म्स किंवा इतर व्यक्ति, संस्था यांचा समावेश कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १८९ नुसार तयार केलेल्या यादीत केला आहे, अशांना यावर्षी महानिर्मितीने कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे मंजूर केलेली नाहीत. यामुळे संबंधित आदेशातील परिच्छेद क्र. ३ यामधील खंड(३) अंतर्गत (ए), (बी), आणि (सी) यातील तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

४. आम्हांस दिलेली माहीती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कर्जे, गुंतवणूकी आणि हमी याविषयी सदर अधिनियमाचे कलम १८५ व १८६ यातील तरतुदीचे पालन केले आहे.

५. आम्हांस दिलेली माहीती व स्पष्टीकरणे यानुसार, कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम ७३ ते ७६ यातील तरतुदीच्या अर्थानुसार महानिर्मिती कंपनी ने जनतेकडून अनामत अथवा ठेवी स्वीकारलेल्या नाहीत.

६. केंद्र सरकारने, कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४८(१) यानुसार, खर्चे अभिलेखाचे जतन कंपन्यांनी केले पाहिजे असे विहित केले आहे. आम्ही या कंपनीतील या संबंधीत अभिलेखांचा स्थूल आढावा घेतला आणि आमच्या मते आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरण यानुसार विहित अभिलेखांचे जतन कंपन्यांनी केले पाहिजे असे विहित केले आहे. आम्ही या कंपनीतील या संबंधीत

अभिलेखांचा स्थूल आढावा घेतला आणि आमच्या मते आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार अशा विहित अभिलेखांचे जतन केले आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. मात्र कंपनीज् (कास्ट अकाऊंटीग रेकॉर्डस्) नियमावली २०१४ नुसार जतन केल्या जाणाऱ्या खर्चाचे अभिलेख अचूक आणि परिपूर्ण आहेत किंवा कसे याचे परिक्षण आम्ही केलेले नाही.

**७. सांविधिक देण्याच्या संबंधी:**

अ) आंम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि लेखा वह्या व दस्तऐवज यानुसार कंपनीने सामान्यत: निर्विवाद स्वरूपाच्या सांविधिक देणी नियमितपणे योग्य प्राधिकाऱ्यांकडे जमा करीत असते यामध्ये भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्री कर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मूल्य वर्धित कर, वस्तू व सेवा कर (जीएसटी) व उपकर याशिवाय इतर सांविधिक देणी आदींचा समावेश होतो. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार यावर्षी अखेरीपर्यंत म्हणजे दि. ३१ मार्च २०२१ रोजी पुढील कोणत्याही सांविधिक देण्यांचा भरणा ती देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ थकित नव्हती. यामध्ये भविष्य निर्वाह निधी, आयकर, विक्री कर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मूल्य वर्धीत कर, जीएसटी व उपकर आदि समाविष्ट आहेत.

ब) आंम्हास दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणे यानुसार आयकर, संपत्तीकर, विक्री कर, सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मूल्य वर्धीत कर, जीएसटी व उपकर यांची खालील *काही वादग्रस्त प्रकरणे वगळता,* अन्य कुठलीही सांविधिक देणी शिल्लक राहिली नव्हती. वादग्रस्त प्रकरणांची यादी खालील प्रमाणे आहे.

(₹ कोटीत)

| संविधानाचे नाव | देण्याचे स्वरूप | देय रक्कम (₹ कोटीत) | रकमेचा संबंधित कालावधी | जेथे वाद प्रलंबित आहेत त्यामंचाचे नाव |
|---|---|---|---|---|
| आयकर अधिनियम | सेवाकर – स्त्रोतापाशी कपात | ०.०९ | २००६–०७ आणि २००७–०८ | आयटीएटी, पुणे |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम) ₹१३.३६ कोटी (कलम १४३ (३)नुसार | १३.३६ | निर्धारण वर्ष २०१४–१५ | सीआयटी (ए) मुंबई |
| आयकर अधिनियम | मागणी (टीडीएस) ट्रेसनुसार | १.५८ | निर्धारण वर्ष २०२०–२१ | एओ, मुंबई |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम) ₹३९६४८* कोटी (कलम १४३ (३)नुसार | ०.००* | निर्धारण वर्ष २०१३–१४ | सीआयटी (ए) मुंबई |
| आयकर अधिनियम | दंड (वादग्रस्त रक्कम) ₹३५४५०* कोटी (कलम १४३ (३) नुसार | ०.००* | निर्धारण वर्ष २०१२–१३ | सीआयटी (ए) मुंबई |
| आयकर अधिनियम | आयकराची मागणीचा कलम १४३(३) च्या आदेश यावर कंपनीने अपील केले | ०.८२ | निर्धारण वर्ष २०१८–१९ | सीआयटी (ए) मुंबई |
| केंद्रीय उत्पादन शुल्क अधिनियम | एक कंत्राटदार, सी.डी. शेठ यांनी चंद्रपुर येथे कामाच्या जागी दीर्घ व्यासाच्या एमएस पाईपची जोडणी केली (यावर दंड आकारण्यात आले) हे प्रकरण पून्हा सुरु केले | ०.०२ | ३/१९८९ मे ते ३/१९९० | केंद्रीय उत्पादन शुल्क नागपुर |
| केंद्रीय सेवा कर | पाणी हक्कावर सेवा कर – कोल्हापुर | ५.६० | निर्धारित वर्ष २०१६–१७ | सेवा कर आयुक्त (अपील्स) मुंबई |
| | **एकूण** | **२१.४८** | | |

८. आमच्या मते आणि आम्हांला दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार महानिर्मिती कंपनीने बँका, वित्तीय संस्था किंवा सरकार यांची कर्जे किंवा उसनवारी इत्यादी ची परतफेड करण्यास कसूर केलेली नाही. या कंपनीने ऋणपत्रे (डिबेंचर्स) मार्फत कोणतीही रक्कम उसनी घेतली नाही.

९. कंपनीने यावर्षी इनिशियल आणि / किंवा त्यापुढील पब्लिक ऑफर (ह्यामध्ये कर्जाची साधने समाविष्ट आहेत) याद्वारे, या चालू वर्षात कोणताही निधी उभारलेला नाही. मुदतीची कर्जे ज्या कामांसाठी उभारली त्यासाठीच ती वापरण्यात आलेली आहेत.

१०. आंम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरण यानुसार यावर्षी लेखापरिक्षणाच्या कालावधीत कंपनीकडून किंवा कंपनी संबंधीत तिचे अधिकारी किंवा कर्मचारी यांचेकडून कोणतीही लबाडी झाल्याचे आढळले नाही.

११. आंम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरण यानुसार महानिर्मिती ही दि. ०५ जून २०१५ रोजी ची अधिसूचना क्रमांक जी एस आर ४६३ इ. नुसार एक शासकीय कंपनी आहे. त्यामुळे अधिनियमाचे कलम १९७ च्या तरतूदी तिला लागू नाहीत.

१२. आमच्या मते आणि आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून महानिर्मिती ही निधी कंपनी नाही. त्यामुळे संबंधित आदेशातील खंड - १२ हा लागू नाही.

१३. आम्हांस दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही केलेल्या कंपनीच्या अभिलेख परिक्षण यावरून कंपनीने संबंधितांशी केलेले सर्व व्यवहार हे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १७७ व १८८ यांचे अनुपालन करणारे आहेत. लागू होणाऱ्या लेखा मानकांच्या आवश्यकतेप्रमाणे सर्व व्यवहाराचे प्रकटीकरण भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकात करण्यात आलेले आहे.

१४. आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरण तसेच आम्ही केलेले कंपनीच्या अभिलेखांचे परिक्षण यावरून असे दिसते की, यावर्षी कंपनीने शेअर्सचे किंवा परिवर्तनीय ऋण विमोचन पत्र (कन्व्हर्टीबल डिबेंचर्स) यांचे पूर्ण किंवा अशंत: स्वरूपाने पसंतीनुसार वितरण किंवा खाजगी वाटप केलेले नाही त्यामुळे आदेशाचे खंड १४ लागू होत नाही.

१५. आंम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आम्ही केलेल्या कंपनीच्या अभिलेखापरिक्षण यानुसार कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९२ यानुसार संबंध असेलेले संचालक किंवा व्यक्ती यांचे सोबत कोणतेही बिन रोखीचे व्यवहार केलेले नाहीत. त्यानुसार आदेशाचे खंड - १५ लागू नाही.

१६. भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ चे विभाग ४५-आय ए यानुसार नोंदणी करण्याचे महानिर्मिती कंपनीला आवश्यकता नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन १००१८६ डब्ल्यु**
**यूडीआयएन: २१०३८५२६एएएएइएच५३४४**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३८५२६**
स्थळ : मुंबई
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२१

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन ११०५०४ डब्ल्यु**
**यूडीआयएन:२१०३९५५५एएएएआयटी२६५०**

**सी. ए. बी.एन. राव**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३९५५५**

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितच्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके वरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र - ३

### कंपनी अधिनियम २०१३ ( सदर कायदा ) चे कलम १४३ यातील उपकलम ३ च्या खंड ( १ ) अंतर्गत आर्थिक नियंत्रणाबाबत अहवाल

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या (कंपनी) दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या स्वायत्त विवरणपत्रके यांचे लेखापरिक्षण करून त्यासोबत कंपनीचे वित्तीय अहवाल देताना वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण करण्याचे अधिकार आम्हांला दिले आहे.

### वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी

सनदी लेखापालांच्या संस्थेने (आय्.सी.ए.आय् ) वित्तीय अहवाल लेखासंदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करणे या विषयावर, एक मार्गदर्शक टिपणी (सदर मार्गदर्शक टिपणी) दिली आहे. त्यामध्ये दिलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक विचारात घेउन कंपनीने निश्चित केलेल्या वित्तीय अहवाल देण्याबाबतचे निकषावर आधारित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची स्थापना करून त्याची कार्यवाही करणे याची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थानाची असते. या जबाबदारीमध्ये पुढील कार्ये समाविष्ट असतात, ती अशीः अंतर्गत नियंत्रणाची संकल्प रचना चित्र तयार करणे, कंपनीच्या औद्योगिक व्यवहारात शिस्त आणि कार्यक्षमता यांची हमी देणे, कंपनीच्या धोरणांना धरून राहणे, तिची मत्ता सुरक्षित ठेवणे, लबाडी व चूका शोधणे व त्यांना आळा घालणे, लेख्यांचे अभिलेख अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनियम २०१३ नुसार आवश्यक अशी वित्तीय माहिती विश्वासपूर्णारित्या वेळेवर पूर्ण करून देणे.

### लेखापरिक्षकांची जबाबदारी

वित्तीय अहवाल देण्यासाठी कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी असते. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) यात विहीत केलेली मानके आणि वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण यासंबंधीची मार्गदर्शक टिपणी यानुसार लागू होणाऱ्या मर्यादेत आम्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरीक्षण केले. उपरोक्त लेखा मानके व मार्गदर्शक टिपणी यांच्या आवश्यकतेनुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे आणि वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी आहेत किंवा कसे याची योग्य व कारणयुक्त हमी मिळविणे या उद्दिष्टाने आम्हाला लेखापरिक्षणाची योजना करून ते पूर्ण करावे लागते, तसेच ही नियंत्रणे प्रत्यक्षात प्रभावीरित्या कार्यरत आहेत किंवा नाही आणि ती संस्थापित असून त्याचे पालन केले जात आहे याची खातरजमा करावी लागते.

वित्तीय अहवाल देण्यासाठी असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असल्याबाबत आणि ही नियंत्रणे परिणामकारकरित्या कार्यरत असल्याबद्दल लेखापरिक्षणातून पुरावे मिळावेत यादृष्टीने लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीद्वारे कार्य करावे लागते. यामध्ये सदर अंतर्गत वित्तीय नियंत्रणे समजून घेणे, प्रत्यक्ष कार्यवाहीत अस्तित्वात असलेल्या दुर्बल जागा व त्यातील धोके याचे निर्धारण करणे या निर्धारीत धोक्यांच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची रचना व त्याची परिणामकारकता यांचे परिक्षण आणि मूल्यमापन करणे या दृष्टीने आमचे लेखापरिक्षण केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखापरिक्षकांच्या न्याय निर्णयशक्तीवर अवलंबून असते. भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेल्या कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकांमध्ये लबाडी किंवा चुका यामुळे काही गैरमाहिती देण्याच्या धोक्यांचे निर्धारण करणे याचासुद्धा अंतर्भाव लेखा परिक्षणात केला जातो.

या कंपनी वित्तीय अहवालासाठीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे, पुरेशी व योग्य प्रमाणात असल्याबद्दल आम्ही मिळविलेले पुरावे कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमचे मत व्यक्त करण्यासाठी तात्विक आधार देत आहेत, असा आम्हांला विश्वास आहे.

### वित्तीय अहवालाकरीता असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ

कंपनीत वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना कंपनीच्या वित्तीय अहवालाच्या विश्वसनीयते संबंधी आणि ही वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचे कार्य हे भारत देशात सर्वसाधारणपणे स्वीकारल्या गेलेल्या लेखा मानकांशी सुसंगत असल्याची रास्त हमी देण्यासाठी आहे. वित्तीय अहवाल देण्यासाठीच्या कंपनीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणामधे धोरणे व कार्यपद्धती यांचा समावेश असतो त्याचे उद्देश खालीलप्रमाणे असतात.

१. अभिलेख/दस्तऐवज जतन करणे, त्यात कंपनीचे व्यवहार आणि मत्ता कामी लावणे याबद्दल तपशीलवार अचूक व योग्य माहिती असावी.

२. भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेखा तत्वांशी सुसंगत असतील अशा प्रकारे स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी सर्व व्यवहारांची नोंद केली आहे आणि कंपनीची प्राप्ती व खर्च हे कंपनीच्या व्यवस्थापन आणि संचालक यांच्या अधिकारान्वये झाल्याची रास्त हमी मिळविणे.

३. कंपनीच्या मत्तांचा अनधिकृत वापर, संपादन किंवा विल्हेवाट होत असल्यास त्याचा शोध घेऊन त्याला आळा घातला आहे. याची रास्त हमी मिळविणे अशा व्यवहाराचा स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकावर मोठा परिणाम होऊ शकला असता.

**अंतर्गत वित्तीय विवरण पत्रकाच्या अंगभूत मर्यादा**

अंतर्गत वित्तीय अहवाल देण्यासाठी केलेल्या वित्तीय नियंत्रणाच्या काही अंगभूत मर्यादा आहेत, या मर्यादांमध्ये अयोग्य व्यवस्थापनाद्वारे नियंत्रणांना ओलांडणे किंवा त्याच्याशी संघर्ष करणे चुका किंवा लबाडी करणे व गैरमाहिती मांडली जाणे आणि त्यांचा शोध न घेणे याची शक्यता असते. तसेच भविष्याविषयी वित्तीय नियंत्रण यंत्रणेकडून जे काही अंदाज केले जातात जोखीमा आणि धोके यांच्या अधीन असतात. परिस्थिती बदलल्याने ते अपूरे ठरतात किंवा धोरणे किंवा अनुपालनाची परिस्थिती खराब होऊ शकते.

**पात्रमतांचा आधार**

आम्हास दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आमच्या लेखापरिक्षणांच्या आधारे ३१ मार्च २०२१ रोजी जेथे अंतर्गत नियंत्रणे प्रभावी नव्हती अशा जागा आढळल्या.

१. पुरवठादारांना दिलेल्या अग्रिमे आणि त्याबाबतच्या दायित्वांची तरतूद यांचे वेळेवर समायोजन करण्या बाबत कंपनीचे अंतर्गत नियंत्रण.

२. परिसमापनातील नुकसानाचे वेळेवर अंतिमीकरण आणि वसुली याविषयी कंपनीची अंतर्गत नियंत्रणे/धोरणे.

३. कर्मचाऱ्यांसंबंधीत दस्तऐवज जतन करणे तसेच सॅप निर्मित वेतनपत्रक (पेरोल) या मानव संसाधन मॉडयूल सोबत वित्तीय मॉडयूलचे एकात्मीकता साधलेली आहे. परंतु तसे दिसणे किंवा त्यात मेळ असणे याबाबत कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रण असणे.

आर्थिक अहवालातील अंतर्गत आर्थिक नियंत्रणातील मोठी दुर्बलता ही एक किंवा अनेक उणीवांचे मिश्रण आहे. त्यामुळे कंपनीचे वार्षिक किंवा अंतरिम वित्तीय विवरण पत्रकांत मोठे गैर विवरण वर आळा न घालणे किंवा वेळेवर शोध घेता येत नाही.

**पात्र मत**

महानिर्मितीही शासकीय उपक्रम आहे. त्यामुळे वित्तीय अहवाल देण्याच्या अंतर्गत नियंत्रण कार्यपद्धतीची रचना विविध प्रकारच्या हस्त पत्रिका, नियमावली, परिपत्रके आणि वेळोवेळी दिलेले आदेश यांच्या आधारे केली जाते. त्यामुळे व्याख्यांकित केलेल्या वित्तीय अहवालासाठीच्या अंतर्गत नियंत्रण प्रक्रियेवर आमचे मत आधारित आहे. वित्तीय विवरण पत्रकाच्या आमच्या लेखापरिक्षणाच्या काळात आम्ही प्रायोगिक तत्वावर परिक्षण केले आणि त्यामुळे अंतर्गत नियंत्रणाच्या कार्यप्रणालीचा आढावा घेतला. त्यातून आम्ही नियंत्रण प्रक्रियेची रचना आणि तिची परिणामकारकता या दोन्ही मध्ये काही कमतरता ओळखून काढल्या आणि त्यावरील आमच्या "पात्र मतांचा आधार" यामध्ये नोंदविल्या आहेत.

*आमच्या मते, "नियंत्रणाच्या निकषांची उद्दीष्टे" या विषयी वरील परिच्छेद (१) यात वर्णन केलेल्या प्रत्यक्ष दुर्बळ जागांचे परिणाम/ संभाव्य परिणाम यांचा अपवाद करता कंपनीची वित्तीय अहवालासाठीची नियंत्रणे दि. ३१ मार्च २०२१ रोजी प्रभावीरित्या कार्यरत होती.* आम्ही ओळख निश्चिती केलेल्या मोठ्या दुर्बळ जागांचा विचार केला आणि त्याची वर नोंद केली.

कंपनीच्या ३१ मार्च २०२१ रोजीच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकाचे लेखा परिक्षण करताना आम्ही लावलेल्या लेखापरिक्षणाच्या प्रायोगिक परिक्षणाचे स्वरूप, वेळ निश्चित करणे आणि त्याच्या मर्यादा यानुसार आम्ही ओळखून काढलेल्या मोठ्या दुर्बळ जागा विचारात घेतल्या आहेत.

"पात्र मतांचा आधार" यातील वरील परिच्छेद(१) मध्ये दुर्बळ जागा नमूद केल्या आहेत. त्यात पुरवठादारांना दिलेल्या अग्रिमांचे वेळेवर समायोजन करणे आणि त्यासाठी दायित्वांची तरतूद करणे यांचा कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांवरील आमच्या मतांवर परिणाम झाला आहे आणि आम्ही त्यावर आमचे पात्र मत आमच्या पुरक लेखा परिक्षण अहवालात दिले आहे.

वरील पात्र मतांचा आधार, यातील परिच्छेद (२ आणि ३) यातील इतर मोठ्या दुर्बल जागा यांचा कंपनीच्या स्वायत्त वितीय विवरण पत्रकांवरील आमच्या मतावर परीणाम होत नाही.

**इतर बाबी**

या वित्तीय वर्षात, सरकारने कोवीड-१९ चा प्रार्दुभाव रोखण्यासाठी पूर्णपणे लॉकडाऊन लागू केल्यामुळे आम्ही आमची लेखा परिक्षणाची प्रक्रीया करण्यासाठी कंपनीच्या विविध कारखान्यांना किंवा जागांना प्रत्यक्ष भेटी देऊ शकलो नाही. म्हणून सांविधिक लेखा परिक्षण ''घरी थांबून काम'' याप्रकारे करण्यात आले म्हणजेच कंपनीचे अन्य जागी असलेले कारखाने आणि कार्यालये यांचे लेखा परीक्षणाच्या व्यवस्थापनाने डिजीटल माध्यमातून उपलब्ध केलेली आकडेवारी / माहीती / अभिलेखे / दस्तऐवज / आधारभूत माहिती याआधारे केले आहेत. त्यासाठी सॅप प्रणाली आणि व्ही पी एन लिंक मार्फत डॅशबोर्ड यांचा उपयोग करण्यात आला.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन १००१८६ डब्ल्यु**
**यूडीआयएन:** 21038526AAAAEH5344

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३८५२६**

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन ११०५०४ डब्ल्यु**
**यूडीआयएन:** 21039555AAAAIT2650

**सी. ए. बी.एन. राव**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०४६२८५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२१

# ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद पत्रक ( स्वायत्त )

(₹ कोटीत)

| तपशील | संख्या क्र. | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पूर्व निर्देशित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|---|
| मत्ता | | | | |
| चालू नसलेल्या मत्ता | | | | |
| मालमत्ता, कारखाने व साधने | १ | ३४,२८६.३५ | ३६,२७५.४९ | ३८,२८९.४६ |
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | २ | ३,६७६.६९ | २,११९.६३ | १,००९.१५ |
| मत्ता वापरण्याचे हक्क | १ए | ३,९२८.६९ | ४,१८२.७३ | |
| अमूर्त मत्ता | १बी | २.६३ | ४.३० | ७.१२ |
| अमूर्त मत्ता विकसनशील | २ | २३९.६८ | १३३.९३ | १३३.७६ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| उपकंपन्या, सहयोगी कंपन्या यातील गुंतवणूकी | ३ | २.११ | २.१० | २.०३ |
| **इतर चालू नसलेल्या मत्ता** | ४ | ५७६.९९ | ५८७.१० | १,३७४.४९ |
| **एकुण चालू नसलेल्या मत्ता** | | **४२,७१३.१४** | **४३,३०५.२९** | **४०,८१६.००** |
| चालू मत्ता | | | | |
| वस्तूमाल सूची | ५ | ९३०.०९ | १,७६३.०३ | १,४१७.८९ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| व्यापारी येणी | ६ | २४,५१८.१८ | १७,८०३.६८ | १३,५५१.३५ |
| रोख व रोख समतूल्य | ७ | ५७.५१ | ४.९३ | ०.०७ |
| कर्जे | ८ | ५.७७ | ७.६५ | १०.६४ |
| इतर वित्तीय मत्ता | ९ | ३,०५९.३८ | २,७८४.७५ | २,९०६.७९ |
| **इतर चालू मत्ता** | १० | ६४८.४९ | १,०८२.५३ | १,२८४.५३ |
| **एकुण चालू मत्ता** | | **२९,२१९.४२** | **२३,४४६.५६** | **१९,१७१.२६** |
| इतर मत्ता | | | | |
| विक्री / विल्हेवाटीसाठी वर्गीकरण केलेल्या मत्ता | १सी | २२२.६१ | २२५.८३ | २००.८४ |
| **एकुण इतर मत्ता** | | २२२.६१ | २२५.८३ | २००.८४ |
| **एकुण मत्ता** | | **७२,१५५.१७** | **६६,९७७.६८** | **६०,१८८.११** |
| **समभाग ( इक्विटी ) आणि दायित्वे** | | | | |
| समभाग आणि दायित्वे | | | | |
| समभाग भांडवल | ११ | २५,४०७.९५ | २५,३४३.९५ | २५,२८४.१३ |
| इतर समभाग | १२ | (६,३६०.२६) | (६,६१४.९५) | (६,७१५.९३) |
| **एकुण समभाग** | | **१९,०४७.६९** | **१८,७२९.००** | **१८,५६८.२०** |
| **दायित्वे** | | | | |
| **चालू नसलेली दायित्वे** | | | | |
| वित्तीय दायित्वे | | | | |
| कर्जे | १३ | २२,४५२.२० | २२,७२७.०१ | २३,०१२.११ |
| तरतुदी | १४ | १,०६२.६६ | १,०५५.७७ | ८२७.९२ |
| स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | १५ | १,०३२.१६ | ८३६.१८ | ८६०.४६ |
| इतर चालू नसलेली दायित्वे | १६ | ३,२३१.२८ | ३,३८४.७३ | - |
| **एकुण चालू नसलेली दायित्वे** | | **२७,७७८.३०** | **२८,००३.६९** | **२४,७००.४९** |
| **चालू दायित्वे** | | | | |
| कर्जे | १७ | १०,४७३.५५ | ८,१०१.७९ | ८,०६०.६२ |
| व्यापारी देणी (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक) | १८ | - | ०.०३ | ०.१२ |
| व्यापारी देणी (सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योजक) व्यक्तिरिक्त | १८ | ३,२८१.५७ | २,२५१.८९ | १,३२८.२० |
| इतर वित्तीय दायित्वे | १९ | ११,२१८.५४ | ९,५२१.०८ | ७,२३६.११ |
| इतर चालू दायित्वे | २० | १०७.४२ | ८२.८९ | ५९.१९ |
| तरतुदी | २१ | २४८.१० | २८७.३० | २३५.१८ |
| **एकुण चालू दायित्वे** | | **२५,३२९.१८** | **२०,२४४.९९** | **१६,९१९.४२** |
| **एकुण समभाग आणि दायित्वे** | | **७२,१५५.१७** | **६६,९७७.६८** | **६०,१८८.११** |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यु)

**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३८५२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यु)

**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)

मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा आणि तोटा पत्रक ( स्वायत्त )

(₹कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पूर्व निर्देशित |
|---|---|---|---|
| **महसूल** | | | |
| प्रवर्तनातील महसूल | | | |
| वीज विक्री | २२ | २०,८९१.५८ | २१,९६३.९८ |
| इतर प्रवर्तन महसूल | २३ | २,६८३.८८ | २,६९२.३३ |
| इतर उत्पन्न | २४ | ४९.५३ | ८०.०६ |
| एकूण उत्पन्न | | २३,६२४.९९ | २४७३६.३७ |
| **खर्च** | | | |
| वापरलेल्या साहित्याचा खर्च | २५ | १३,४९२.९८ | १४,३९८.२७ |
| कर्मचारी लाभ खर्च | २६ | १,४२८.९९ | १,८२८.४२ |
| वित्त खर्च | २७ | ३,६३७.०४ | ३,५७८.७९ |
| घसारा आणि कर्जफेडची खर्च | १ व १ अ | २,७३७.७९ | २,७७८.७३ |
| इतर खर्च | २८ | १,९०३.६० | १,९२८.३२ |
| एकूण खर्च | | २३,२००.३९ | २४,५१२.५३ |
| **करपूर्व नफा/( तोटा )** | | **४२४.६०** | **२२३.८४** |
| **कर खर्च** | | | |
| नफा/तोटा बाबींवर चालू कर | | (४६.८३) | ४६.८३ |
| इतर सर्वकष उत्पन्न (ओ सी आय) बाबींवर चालू कर | | (०.१९) | ४१.३६ |
| स्थगित कर खर्च/(प्राप्ती) | १५ | १९५.९८ | (२४.२८) |
| एकूण कर खर्च | | १४८.९७ | ६३.९० |
| **कालावधीतील नफा/( तोटा )** | | **२७५.६३** | **१५९.९४** |
| **इतर सर्वकष उत्पन्न** | | | |
| नफा आणि तोटा यात विवरण न केलेल्या बाबी | | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांची पूर्नमोजणी | २६अ | ०.७५ | (१६४.३२) |
| इतर सर्वकष उत्पन्नावरील चालू कर खर्च लाभ/(व्यय) | | (०.१९) | ४१.३६ |
| कालावधीतील इतर सर्वकक्ष उत्पन्नांकडून (करांची मिळकत) | | **०.५६** | **( १२२.९६ )** |
| **कालावधीतील एकूण सर्वकक्ष उत्पन्न ( करांची निव्वळ )** | | **२७६.१९** | **३६.९८** |
| **प्रतिभाग मिळकत ( मूळ )** | | ०.११ | ०.०६ |
| **प्रतिभाग मिळकत ( सौम्यकृत - प्रतिभाग )** | | **०.११** | **०.०६** |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यु)

**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३८५२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यु)

**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)

मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## समभागातील बदलांचे विवरण पत्रक ( स्वायत्त )

### १. समभाग भांडवल

| तपशील | रक्कम ( ₹ कोटीत ) |
|---|---|
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **२५,२८४.१३** |
| समभाग भांडवलीतील बदल | ५९.८२ |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **२५,३४३.९५** |
| समभाग भांडवलीतील बदल | ६४.०० |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **२५,४०७.९५** |

### २. इतर समभाग

(₹ कोटीत)

| तपशील | वाटप प्रलंबित असलेल्या भाग अर्जाची रक्कम | ठेवलेली मिळकत | इतर सर्वकष उत्पन्न | एकूण इतर समभाग |
|---|---|---|---|---|
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **०.००** | **( ६,६१८.४७ )** | **( ९७.४६ )** | **( ६,७१५.९३ )** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | १५९.९४ | | १५९.९४ |
| वर्षातील इतर सर्वकष उत्पन्न | | | (१२२.९६) | (१२२.९६) |
| भाग अर्जाच्या रक्कममध्ये झालेली भर | १२३.८२ | | | १२३.८२ |
| वर्षभरात वितरण केलेले शेअर्स | **( ५९.८२ )** | | | **( ५९.८२ )** |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | ६४.०० | (६,४५८.५३) | (२२०.४२) | (६,६१४.९५) |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | २७५.६३ | | २७५.६३ |
| वर्षातील इतर सर्वकष उत्पन्न | | | ०.५६ | ०.५६ |
| भाग अर्जाच्या रक्कममध्ये झालेली भर | ४२.५० | | | ४२.५० |
| वर्षभरात वितरण केलेले शेअर्स | (६४.००) | | | (६४.००) |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | ४२.५० | ( ६,१८२.९० ) | ( २१९.८६ ) | ( ६,३६०.२६ ) |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यु)

**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३८५२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यु)

**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)

मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा रोकडता प्रवाह ( स्वायत्त )

(₹ कोटीत)

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पूर्व निर्देशित |
|---|---|---|
| अ ) प्रवर्तन कार्यापासूनचा रोकडता प्रवाह | | |
| करोत्तर नफा/तोटा | २७६.१९ | ३६.९८ |
| **कर पूर्व नफ्याचा प्रवर्तन कार्यात वापरलेल्या निव्वळ रोखींशी मेळ करण्यासाठीची समायोजने** | २,७३७.७९ | २,७७८.७३ |
| मालमत्ता, कारखाना व उपकरणे आणि अमूर्त मत्ताचा कमी केलेला घसारा | | |
| प्राधान्याचे शेअर्सच्या व्याजाचे उत्पन्न | | |
| मालमत्ता, कारखाने व साधने विक्रीतील (प्राप्ती/हानी) | | |
| व्याख्यांकित लाभ योजनाची प्राप्ती/(हानी) यांची पूनर्मोजणी | | |
| परकिय चलनातील नाणे विषयक बाबींच्या रूपांतरणातील फरकांची परतफेड | | |
| निर्लेखित केलेले सुटे भाग | | |
| गुंतवणूकीच्या मुल्यामधील कमतरता | | |
| एफ व्ही टी पी एल नुसार चालू गुंतवणूकीचे रास्त मुल्य | | |
| चालू गुतंवणूकीच्या विक्रीतील (प्राप्ती)/हानी | ३,६३७.०४ | ३,५७८.७९ |
| वित्त खर्च | (१०.६५) | १०.८३ |
| विनमय दरातील वसूल न झालेला फरक | ७४.२० | १३४.७१ |
| अपेक्षीत पत तोटा तरतूद | | |
| निर्लेखित केलेली बुडीत कर्जे | | |
| व्याजाचे उत्पन्न | (०.५९) | (०.३१) |
| निकामी वस्तू मालासाठी तरतूद | (१९.७९) | (८६.२९) |
| **खेळत्या भांडवलातील बदलापूर्वीचा प्रवर्तनातील नफा ( उपबेरीज- ) १** | **६,६९४.२०** | **६,४५३.४३** |
| | | |
| **खेळत्या भांडवलातील स्थलांतर** | | |
| व्यापारी येण्यातील (वाढ)/घट | **( ६,७८८.७० )** | **( ४,३८७.०४ )** |
| कर्जे, अग्रिमे व इतर मत्ता यातील (वाढ)/घट | **१७४.६०** | **१,०८९.४४** |
| वस्तूमाल सूचीतील (वाढ)/घट | ८५२.७४ | (२५८.८५) |
| दायित्वे व इतर येणी यातील वाढ/घट | १,३४८.३६ | ५,२३९.११ |
| **उपबेरीज-( २ )** | **( ४,४१२.९९ )** | **१,६८२.६६** |
| **प्रवर्तनातून निर्माण झालेली रोकड ( ( १ )+( २ ) )** | २,२८१.२० | **८,१३६.०९** |
| **वजा: थेट कर/एफ बी टी परतावा / भरलेले - निव्वळ** | | |
| प्रवर्तन कार्यातील निव्वळ रोकड ( अ ) | **२,२८१.२०** | (६,०५५.३३) |
| ब) गुंतवणूक कार्यापासूनचा रोकड प्रवाह | | |
| मालमत्ता, कारखाना व साधनांची खरेदी (यामध्ये प्रगतीपथावरील भांडवली कामे समाविष्ट/ | | |
| व्याजाचे भांडवलीकरण वगळता) | (०.००) | (०.०७) |
| मालमत्ता, कारखाने साधने विक्री | | |
| गुंतवणूक खरेदी (वाटप प्रलंबित भाग अर्ज निधी समाविष्ट) | | |

| | | |
|---|---|---|
| उपकंपन्यातील गुंतवणूक | | |
| चालू गुंतवणूकीच्या विक्रीची मिळकत | | |
| उपकंपन्यांना दिलेली कर्जे | | |
| **मिळालेले व्याज** | ०.५९ | ०.३१ |
| **मिळालेला लाभांश** | | |
| **गुंतवणूक कार्यातून निर्मिलेला/( वापरलेला ) निव्वळ रोकड प्रवाह ( ब )** | **( २,१५५.१७ )** | **( ६,०५५.०९ )** |
| क) वित्तीय कामातील रोकडता प्रवाह | | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची मिळकत | ३,७५६.६५ | ३,०७८.१४ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड | (३,३७३.४९) | (२,४८९.६३) |
| शेअर्स देण्यातील मिळकत | ४२.५० | १२३.८२ |
| उभारलेली अल्पमुदतीची कर्जे/(परतफेड) | २,३७३.७० | ५१.९४ |
| भांडवली अनुदान प्राप्ती | ३३.४६ | ०.२२ |
| वित्तीय खर्च (दिलेला) | (३,४१७.९२) | (३,३५४.९२) |
| भाडेपट्टी | **५१३.५८** | ५२५.०६ |
| **वित्तीय कामातून निर्मिलेली/वापरलेली निव्वळ रोकड ( क )** | **( ७१.५१ )** | **( २,०६५.३८ )** |
| **रोख व रोख समतूल्य यातील रोखीत निव्वळ वाढ/( घट )** | **५४.५३** | **१५.६३** |
| **वर्षारंभीची रोख व रोख समतूल्य** | **४.९३** | **०.०७** |
| **वर्षाच्या अखेरीस रोख व रोख समतूल्य यांचा तपशील** | **५९.४६** | **१५.७०** |
| **रोख व रोख समतूल्य रोजी** | | |
| **बँकातील शिलकी** | | |
| - चालू खाते | - | ४.९२ |
| - कार्यरत नसलेली चालू खाती | ५७.४९ | - |
| ओव्हर ड्राफ्ट | १.९५ | १०.७७ |
| हातातील रोख | ०.०२ | ०.०२ |
| **वर्षाअखेरची रोख व रोख समतूल्य** | **५९.४६** | **१५.७०** |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यु)

**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३८५२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यु)

**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)

मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर टिपा

**कंपनीचे स्वरूप आणि महत्वाची लेखा धोरणे:**

**अ ) कंपनीची माहिती**

'महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी', मर्यादित 'सदर कंपनी' ही एक पब्लिक लिमिटेड कंपनी असून तिची संस्थापना कंपनी अधिनियम १९५६ नुसार झाली आहे आणि ती भारतातील निवासी कंपनी आहे. ही कंपनी काही सूची वरील कंपनी नाही आणि तिचे सर्व शेअर्स म्हणजे १०० टक्के शेअर्स महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीने धारण केले आहेत. कंपनी वीज निर्मिती करते यासाठी औष्णिक, जलविद्युत, वायू आणि सौर या स्त्रोतावर आधारीत कंपनीची वीज निर्मिती केंद्रे महाराष्ट्र राज्यभरात आहेत.

महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेली वीज प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) या (सहोदर) उपकंपनीला पूरविते. यासाठीचे वीज दरपत्रक महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग या नियामक संस्थेतर्फे निश्चित केले जात असते.

**महत्वाची धोरणे:**

**ब )** महानिर्मितीचे स्वायत्त वित्तीय विवरणपत्रके तयार करण्यासाठी आणि सादरीकरणासाठी खालील महत्वाची लेखा धोरणे अंगिकारण्यात आलेली आहेत. या लेखा धोरणांचे सातत्याने कंपनीद्वारे अनुसरण केले गेले आहे.

**वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठीची आधारभूत तत्वे:**

**१. भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन केल्याचे निवेदन**

ही स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके सर्वार्थाने भारतीय लेखा मानके (यापुढे ह्याचा उल्लेख भारतीय लेखा मानक असा केला जाईल) यांचे अनुपालन करून तयार केली आहेत, ही भारतीय लेखा मानके कंपनी अधिनियम २०१३ (कलम) १३३, ज्याचे सहवाचन 'कंपन्यासाठी (भारतीय लेखा मानके) नियमावली २०१५', यातील नियम क्र.३ आणि कंपन्यांची (भारतीय लेखा मानके) दुरूस्त केलेली नियमावली २०१६ यासोबत होते. त्यानुसार अधिसूचित केल्याप्रमाणे तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या संबंधित तरतुदीचे अनुपालन करतात.

कंपनीचे सादरीकरणासाठी 'भारतीय रूपया' हे चलन वापरले आहे. तसेच तिच्या व्यवहाराचे चलनसुद्धा 'भारतीय रूपया' हेच आहे. वित्तीय विवरण पत्रकातील सर्व रकमांच्या आकडेवारीचे त्याजवळच्या कोटी रूपयामध्ये रूपांतरण केले आहे. (जेथे इतर काही निर्देश असेल त्याला अपवाद)

ही वित्तीय विवरणपत्रके महानिर्मितीच्या संचालक मंडळाने दि. २३/११/२०२१ रोजीच्या ठरावाने मंजूर केली आहेत.

**२. चालू/चालू नसलेल्या मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण**

कंपनी अधिनियम २०१३ ची सूची क्र. तीन यात दिलेले निकष आणि कंपनीचे सामान्यत: कार्यचक्र यानुसार कंपनीच्या मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण 'चालू आणि चालू नसणाऱ्या' या प्रकारांमध्ये केले आहे. स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांचे त्यांच्या निव्वळ तत्वावर 'चालू नसणाऱ्या' असे वर्गीकरण केले आहे.

वरील हेतूसाठी कंपनीने तिचे कार्यचक्र बारा महिन्यासाठी निश्चित केले आहे, तसेच ते उत्पादनाचे स्वरूप आणि उत्पादनासाठी लागणारे निवेश साहित्य यांचे संपादन करून व त्यांचे रोख आणि रोख समतूल्य यात रूपांतरण करण्यासाठी लागणारा वेळ यावर आधारलेले असते.

या कंपनीवर विद्युत अधिनियम २००३ चा अंमल आहे. विद्युत अभिनियम २००३ मधील तरतुदींचे त्यातील नियमावली सोबत सहवाचन केले जाते आणि जेव्हा त्या कंपनी अधिनियम २०१३ च्या लागू होणाऱ्या तरतुदींशी सुसंगत होत नसतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १७४ च्या अटींनुसार विद्युत अधिनियम २००३ आणि त्याची नियमावली अभिभावी होतील.

**३. ऐतिहासिक खर्च संकेतावर टिपा**

ऐतिहासिक खर्च संकेतानुसार वित्तीय पत्रके तयार करण्यासाठी कंपनी ही सतत कार्यरत संस्था असल्याचे मानले जाते. तसेच

विवरण पत्रके उपार्जन तत्वावर आधारित आहेत. मात्र त्याला खालील बाबींचा अपवाद आहे.

अ) काही वित्तीय विलेख

ब) रास्त मुल्यावर आधारीत कर्मचारी व्याख्यांकित लाभ योजना आणि

क) विक्रीसाठी काढलेल्या मत्ता, ज्यांचे मापन त्यांच्या चालू रकमांपेक्षा कमी झाले आहे आणि रास्त मूल्य वजा विक्रीचा खर्च असे केले आहे, त्यांचे मापन प्रत्येक अहवाल कालावधीच्या अखेरीस रास्त मुल्याने केले जाते; याबाबतचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या लेखा धारेणात केले आहे.

## ४. सूज्ञ निर्णय आणि अंदाज याचा उपयोग करणे

कंपनीची वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी व्यवस्थापनाला काही न्याय निर्णय, अंदाज करावी लागतात तसेच गृहिते धरावी लागतात. त्याचा परिणाम अहवालात दिलेल्या महसुल, खर्च, यांच्या रकमांवर तसेच मत्ता व दायित्वे यावर आणि सोबतची प्रकटने व आकस्मिक दायित्वे यांच्यावर होत असतो. या अंदाज व गृहितकातील अनिश्चिततेचा परीणाम भविष्यकालात मत्ता व दायित्व यांच्या लेखात नोंदविलेल्या रकमांमध्ये प्रभावी समायोजन असा होऊ शकतो. अंदाज व गृहिते यांचे कंपनी सर्वोतपरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे सतत मूल्यमापन करते.

विशेषत: लेखा धोरणे लागू करताना महत्वाच्या क्षेत्रातील अंदाज व न्याय निर्णय यांच्या माहितीचे वित्तीय विवरण पत्रातील मान्य रकमांवर होणारे महत्वाचे परिणाम खाली दिले आहेत.

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आणि उर्वरित आयुष्य याविषयीचे अंदाज करणे.
- वित्तीय मत्ता कमी करणे.
- वित्तीय विलेखांच्या रास्त मुल्यांची मोजणी
- व्याख्यांकित लाभ बंधनाचे व महत्वाच्या विमागणिती गृहितांचे मापन
- तरतूदी आणि आकस्मिक परिस्थिती
- स्थगित कर मत्ता यांच्या वसुली योग्यतेचे मूल्य मापन

लेखांचे अंदाजामध्ये सुधारणा केल्यास वित्तीय विवरण पत्राच्या कालावधीकरिता भविष्यातील परिणाम विचारात घेऊन त्यांना प्रक्षेपाने मान्यता दिली जाते, जर भविष्यातील काळात बाधा येणार असेल तर, संबंधित लेखा मानकानुसार त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने समजणे आवश्यक असेल, तशी मान्यता देण्यात येते.

## ५. मत्ता, कारखाने आणि साधने

१. मालकीची जमीन खरेदी किंमती प्रमाणे नमूद केली जाते. मत्ता, कारखाने आणि साधने यांचे मूल्य हे संचित घसारा व मूल्य घट विचारात घेऊन नमूद केले जाते.

२. कोणत्याही मत्तांच्या प्रारंभिक खर्चात पुढील बाबी समाविष्ट असतात, खरेदीची किंमत किंवा मत्ता उभारणीचे खर्च (यांमध्ये आयात शूल्क, माल वाहतूक भाडे, परतावा न मिळणारे कर यांचा अंतर्भाव असतो) याशिवाय सदर मत्ता तिच्या जागेवर आणण्यासाठी प्रत्यक्ष केलेले खर्च, ती इच्छित कामासाठी संचलीत करण्यासाठी केलेले खर्च आणि पात्र मत्तेसाठी कर्ज खर्च (पात्र मत्ता म्हणजेच अशी मत्ता जी त्यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यासाठी आवश्यक असणारा बराच वेळ घेते).

मत्तेचे खरेदी मूल्य म्हणजे एकत्रित दिलेली रक्कम आणि सदर मत्ता संपादनासाठी विचारात घेतलेल्या इतर बाबींचे रास्त मूल्य होय. यंत्राच्या खर्चात यंत्र प्रायोगिक तत्वावर चालविण्याचे खर्च प्रायोगिक तत्वावर चालविण्याच्या कालावधी दरम्यान उत्पादित कोणत्याही बाबींच्या विक्रीतून मिळणारी रक्कम वजा केल्यावर आणि प्रवर्तनाचे इतर खर्च म्हणजे वाहतूक खर्च, स्थापन करण्याचे आकार, इत्यादी बांधकाम उभारणी कालावधीतील इतर उत्पन्नाची निव्वळ रक्कम इत्यादी यांचा समावेश केला जातो. ज्या प्रकल्पांचे काम चालू आहे त्याचा प्रचलीत खर्च धरला जातो. त्यात थेट खर्च. संबंधित प्रवर्तन पूर्व प्रासंगिक खर्च आणि देय व्याज यांचा समावेश असतो.

जर एखाद्या बाबीपासून कंपनीला भविष्यात आर्थिक लाभ मिळणे संभवनीय असेल आणि अशा मत्तांचा खर्च जर

विश्वसनीयरीत्या मोजता येत असेल तरच असे नंतरचे खर्च त्या मतांच्या प्रचलीत रकमेत समाविष्ट केले जातात किंवा त्यांना स्वतंत्र मत्ता म्हणून मान्यता देण्यात येते.

३. जर कंपनीने केलेल्या भांडवली खर्चातून जिच्यावर कंपनीची मालकी किंवा नियंत्रण नाही अशी मत्ता निर्माण केली जात असेल तर असे खर्च मत्तांचे बांधकाम चालू असे पर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये दाखविले जातात आणि त्यांच्या समतूल्य रक्कम निकामी कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांची तरतूद खर्च म्हणून वजा केली जाते आणि ती ज्यावर्षी खर्च केली त्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकात आकारली जाते. बांधकाम पूर्ण झाल्यावर वरील भांडवली खर्चाचे भांडवलीकरण केले जाईल आणि त्याचे समायोजन 'कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्ता' यांच्या तरतुदीत केले जाईल. कंपनीची मालकी नसलेला मत्ता आणि कंपनीच्या सामाजिक जबाबादाऱ्यांच्या कार्यासाठी दिलेले अंशदान जेव्हा खर्च होईल तेव्हा त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाईल.

४. पूरक मालमत्ता: (प्रकरण निहाय तत्वानुसार) कंपनीला तिच्या अन्य काही मत्तांद्वारे भविष्यात आर्थिक लाभ मिळविण्यासाठी मालमत्ता, कारखाने व साधने यातील काही उपयुक्त बाबी संपादन कराव्या लागतात. (या बाबी स्वत: भविष्यात आर्थिक लाभ मिळवून देतीलच असे नसते) अशा बाबींना मत्ता म्हणून मालमत्ता, कारखाने व साधने यात पात्रता द्यावी) लागते. कारण त्यामुळे कंपनीला भविष्यात अन्य संबंधीत मत्तांद्वारे आर्थिक लाभ मिळविता येतात. या बाबी संपादन केल्या नसल्या तर असे जादा आर्थिक लाभ मिळू शकले नसते. मात्र कंपनी या मत्तांचे त्यांच्या प्रकरण निहाय स्वरूपाची पडताळणी केल्यानंतर, त्यांचे भांडवलीकरण करते.

५. प्रगतीपथावरील भांडवली कामांमध्ये कंत्राटदाराचे देयकाचे अंतिमीकरण करणे राहिले आहे, त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर केले जाते. मात्र ते अंतिम चुकते होण्याच्या वर्षात समायोजन करण्याचे अधीन असते.

६. भांडवली कंत्राटाच्या किमतीच्या विचलनाच्या दाव्यांच्या प्रकरणी, कंपनीचे दावे स्वीकारले तरच त्यांचे लेखे केले जातात.

७. जेव्हा मत्ता, कारखाने व साधने आणि एखादा महत्वाचा भाग ज्याला सुरूवातीपासून 'मत्ता, कारखाने व साधने' म्हणून मान्यता दिलेली आहे. याची विल्हेवाट केल्यास त्याची मान्यता काढून घेतली जाते किंवा जर अशा मत्ताच्या वापरातून भविष्यात कोणतेही आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा नसते तेव्हा त्यांची मान्यता काढून घेतली जाते. ही मान्यता काढल्यानंतर होणारी प्राप्ती किंवा हानी यांचा समावेश नफा-तोटा पत्रकात समाविष्ट केला जातो.

८. नव्याने कार्यान्वित केलेल्या प्रकल्पांच्या भांडवली खर्चाकरिता कंपनी निम्नलिखित धोरणाचे पालन करते महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांची "बहुवर्षि वीज दर नियमने २०१९" यांच्याशी हे धोरण सुसंगत आहेत.

कंपनी अधिकचे अनिवार्य जादा भाग/गंभीर स्पेअर्स/सुरुवातीचे स्पेअर्स जे मूळ प्रकल्प स्थापणे बरोबर घेतले जातात किंवा स्थापणे नंतर ३ वर्षात घेतले जातात ज्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याची परवानगी असते याचे भांडवलीकरण प्रकल्प खर्चाच्या ४% इतकी केली जाते.

९. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या आवश्यक सुट्ट्या भागाचे मूल्य त्यांच्या विहीत मर्यादापेक्षा जास्त असेल तर त्यांचे भांडवलीकरण मालमत्ता, कारखाने आणि साधने यामध्ये केले जाते. अन्य प्रकरणी सुटे भाग संपादन केल्याबरोबर त्या वस्तूमालासाठी सूचीमध्ये समाविष्ट केल्या जातात आणि त्या वापरल्यानंतर त्यांची आकरणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

१०. यंत्रांचे जे सुटे भाग ज्या वर्षी निकामी होतात, त्यावर्षी त्यांचे कमी केलेले लिखित मूल्य नफा-तोटा पत्रकात आकारले जाते. मात्र या जुन्या भागाच्या ऐवजी नवे भाग कार्यान्वित झाले पाहिजेत आणि जुने भाग निरूपयोगी झाले पाहिजेत. जर जुने भाग दुरूस्त करून पुर्नवापरासाठी योग्य झाले तर त्या दोन्ही भागांचे त्यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्याच्या काळासाठी घसारा करण्यात येईल. जूनया संबंधीत भागांच्या दुरूस्तीच्या खर्चाची आकारणी नफा-तोटा पत्रकात होईल.

११. जेव्हा मत्ता किंवा भांडवली सुटे भाग बदलल्यास मत्ता / भांडवली सुटे भागाच्या मुळ भागाचे कमी झालेली मूल्य माहिती नसेल तर. मत्ता/यंत्र यांचा नव्या भागांची/भांडवली सुट्ट्या भागांची किंमत/निव्वळ पुस्तकी मूल्य निर्लेखित केले जाईल.

१२. कंपनीने पूर्वीच्या सर्वसामान्य मान्य केलेली लेखा तत्वानुसार मालमत्ता, कारखाने यांचे चालू मुल्य हेच भारतीय लेखा

मानकाच्या संक्रमण तारखेस अभिदत्त मूल्य म्हणून मानन्याचे ठरविले आहे आणि त्यानंतर त्यांची आकारणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

६. **अमूर्त मत्ता**

अमूर्त मत्ता या संचित घसारा आणि मूल्यघट हे विचारात घेऊन नोंदल्या जातात. अमूर्त मत्ता (सॉफ्टवेअर व्यतिरिक्त) यांची त्यांचे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने घसाराची तरतूद केली जाते आणि जेव्हा अमूर्त मत्तांचे मूल्यघट झाल्याची चिन्हे असतील तेव्हा त्यांचे मूल्यघट करण्यासाठी मुल्यांकन केले जाते. सॉफ्टवेअरच्या घसाराची तरतूद. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी विहीत केलेल्या आयुष्यासाठी केली जाते. अमूर्त मत्तांचे घसारा व मूल्यघट यांची नोंद नफा व तोटा पत्रकात करण्यात येते. कंपनीने अस्तित्वातील अमूर्त मत्तांचे पूर्वीच्या सर्वसामान्य मान्य केलेल्या लेखा तत्वानुसार विद्यमान मुल्य. यालाच भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेचे अभिदत्त मूल्य मानण्याचे ठरविले आहे.

७. **प्रगतीपथावरील भांडवली कामे**

नवीन प्रकल्प सुरू करणे/प्रकल्पाची क्षमता वाढविणे यांच्या प्रकरणी असे प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत मालमत्ता, कारखाना व साधने यांच्या संबंधाचे खर्च आणि कर्जावरील व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते. तसेच संबंधित प्रकल्पांची इष्टतो बद्दलचे तांत्रिक आणि वाणिज्य वर्धनक्षमता या विषयीचे अभ्यास पूर्ण करून नंतर त्यांची अंमलबजावणीचा प्रारंभ करण्यासाठी करण्यात येत असलेल्या खर्चाचे कंपनीच्या संचालक मंडळाच्या मंजूरीनंतर भांडवलीकरण करणे सुरू केले जाते. अशा प्रकल्पांच्या शक्यते विषयी अभ्यास करण्याचे खर्च जेव्हा आणि जसे केले जातात, त्याप्रमाणे त्यांची आकारणी नफा-तोटा पत्रकात करण्यात येते.

अ) वेतनावरील खर्च थेट प्रकल्पांशी संबंधित असेल तर त्यांना बॉयलर टर्बाइन जनरेटर संबंधित कामे आणि कारखाना संबंधित इतर कामे पूर्ण होईपर्यंत केलेला खर्च प्रकल्प खर्चाचा भाग असेल.

ब) प्रकल्प संबंधित शिल्लक कामे पूर्ण होण्याच्या दृष्टिने, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ही एक वर्षापर्यंतचे प्रशासकीय व सामान्य खर्च जे प्रकल्प निर्मितीसाठी थेट कारणीभूत असतील त्यांचे भांडवलीकरण केले जाते. त्यानंतर त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाईल.

क) कोराडी येथील निर्मिती बांधकाम कार्यालयाचे आणि मुख्यालयाचे खर्चाचे कोणतेही लघू भांडवल योजनेमध्ये वाटप होणार नाही. लघू भांडवल योजना म्हणजे ज्या योजनांच्या बांधकामास रचनेला, बारा महिन्यांपेक्षा कमी काळ लागतो अशा योजना आहेत.

ड) जर कंपनी एकापेक्षा जास्त प्रकल्प/भांडवली योजनांची (लघू योजना वगळून) अंमलबजावणी करीत असेल तर कोराडी निर्मिती बांधकाम कार्यालय आणि मुख्य कार्यालय येथील सामाईक खर्चांचे वाटप वर्षभरातील प्रगती पथावरील कामातील वाढीच्या आधारे केले जाईल.

८. **परिसमापनातील नुकसान ज्यावर्षी निश्चित होईल त्यावर्षी मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या खर्चात समायोजित केले जातात.**

९. **कर्ज खर्च**

कर्ज खर्चांमध्ये, कर्जाचे घेण्यासंबंधीचे इतर खर्च आणि व्याज यांचा समावेश असतो. ज्या मत्ता यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यास बराच वेळ घेतात, त्यांच्या संपादनासाठी केलेल्या कर्जाच्या खर्चाचे थेट भांडवलीकरण ज्या महिन्यात या मत्ता तयार होतील तो पर्यंतचा खर्चाचा भाग म्हणून केले जाते. जोपर्यंत दीर्घमुदतीचा निधी मिळत नाही तो पर्यंत पात्रता मालमत्तासाठी घेतलेल्या सर्वसामान्य कर्जावरच्या व्याजाचे सुद्धा भांडवलीकरण केले जाते. याशिवाय पात्रता मालमत्ता संबंधित बांधिलिकी आकारणीचे कर्जाच्या परतफेडीच्या वेळेप्रमाणे नफा-तोटा पत्रकात नोंद केली जाते. भांडवली मत्ता संपादन किंवा उभारणी यांच्याशी संबंधित कालीवधीमध्ये केले जातात तेव्हा त्याची नोंद नफा-तोटा पत्रकात खर्च म्हणून केली जाते.

**१०. अवित्तीय मत्तांची मुल्यघट**

वस्तूसूची, स्थगित कर मत्ता आणि विक्रीस योग्य असे वर्गीकरण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता वगळून इतर अवित्तीय मत्तांचे ताळेबंदाच्या तारखेस मूल्यघट झाल्याबाबतचा आढावा घेतला जातो.

जर अशी चिन्हे दिसली तर किंवा जर मूल्यघट शोधण्यासाठी वार्षिक परिक्षणांची गरज असेल तर कंपनी समुहातर्फे या मत्ताच्या वसूल होऊ शकणाऱ्या रकमांचा अंदाज केला जातो. अशी वसूली योग्य किंमत अशा मत्ता पासूनचा रोख निर्मितीचे रास्तमूल्य त्यांच्या वजा विल्हेवाटीचा खर्च आणि वापराचा खर्च यापेक्षा जास्त असावी एखादी मत्ता इतर मत्तांपासून किंवा मत्तांच्या गटापासून वेगळी असून रोखीचा प्रवाह आत आणत नसेल तर त्या मत्तेची वसूली योग्य किंमत निश्चित केली जाते.

जेव्हा एखाद्या मत्तेची किंवा रोकड निर्माण कर्त्या घटकाची काळाप्रमाणे कमी झालेली रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त होत असेल तर त्या मत्तांचे मुल्यघट झाले असे समजून, तिचे रास्तमुल्य हे मुल्यघट विचारात घेऊन नोंदले जाते.

वापरमुल्यांचे निर्धारण करताना, भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह हा त्याच्या विद्यमान मूल्य इतका कमी केला जातो. त्यासाठी कर-पूर्व सवलत दर वापरला जातो. कारण करपूर्व दरात, पैशाचे वेळेनुसार मुल्यांचे चालू बाजाराप्रमाणे निर्धारण व मत्तेचे विशिष्ट धोके अंतर्भूत असतात. विल्हेवाटीचा खर्च वजा करून रास्त मूल्य निश्चित करण्यासाठी सध्याच्या बाजारभावातील व्यवहार विचारात घेतले जातात. असे निश्चित व्यवहार ओळखून काढता येत नसेल तर योग्य मूल्यांकनाचे प्रारूप वापरले जाते.

**११. घसारा तरतूद**

अ) **भाडेपट्टीच्या जमिनीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, नियमनाने विहित केलेल्या सरळ रेखा तत्व पद्धतीनुसार ३.३४ टक्के दराने घसाराची तरतूद केली जाते.**

ब) **मत्ता, कारखाने आणि साधने**

१. कंपनी ही दर नियमन असणारी संस्था असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहीत केल्याप्रमाणे घसाऱ्याचे दर कार्यपद्धती आणि मत्तांचे आयुष्य मापन अनुसरण्यात येतात. त्याचप्रमाणे कंपनी सरळ रेषा पद्धतीनुसार मत्तांच्या खर्चाच्या ९० टक्के पर्यंत घसारा आकारते.

२. वर्षभरात मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्यातील दर/विल्हेवाट/काढून टाकणे यासाठीचा घसारा वरील कृतींच्या महिन्यात 'यथा प्रमाण' तत्वाने केला जातो. ग्रीन फिल्ड/ब्राऊन फिल्ड यांचे वाणिज्यिक कार्य सुरू होण्याच्या तारखेपासून त्यांचे भांडवलीकरण तोटा पत्रकात आकारले जाते.

३. ज्या मत्तांच्या (खालील परिच्छेद ४ यात नमूद केलेल्या मत्ता वगळून) कार्यान्वयानंतर घसारा ७० टक्क्यापर्यंत आकारलेला नाही, त्यांच्या ठोक किमतीवर घसाऱ्याची आकारणी ७० टक्के होण्याचा वर्षापर्यंत येथे खाली दिलेल्या घसारा दराने आकारते. घसारा आकारणी ७० टक्के पर्यंत पोहचल्यानंतर मत्तांचे उर्वरीत आयुष्यावर ९० टक्के घसारा शिल्लक ठेऊन आकारणी ही केली जाते. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार औष्णिक व वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रासाठी २५ वर्षे आणि जल विद्युत केंद्रासाठी ३५ वर्षे असे उपयुक्त आयुष्य विहित केले आहे.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| जल विद्युत, वाफ वीज, वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रातील कारखाने व यंत्रे, कुलींग टॉवर्स, जलविद्युत बांधकामे, ट्रान्सफॉर्मर्स व इतर स्थापित साधने, पारेषणाच्या तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८% |
| इमारती आणि इतर स्थापत्य कामे | ३.३४% |

४. खालील मत्तांच्या साठी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या मूल्यांचा ९० टक्के पर्यंत घसारा खालील दराने आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| फर्नीचर जोडणी व कार्यालयाचे साहित्य | ६.३३% |
| वाहने | ९.५०% |
| माहिती तत्रंज्ञान साधने | १५.००% |

५. मालमत्ता, कारखाने व साधने यातील ज्या वस्तू नगांचा खर्च कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नाही. त्यांचा घसारा संपादन वर्षात १०० टक्के केला जातो. मोबाईल फोन टॅबलेट खर्चाचे भांडवलीकरण आणि त्यांचा १०० टक्के घसारा, खरेदी वर्षात केला जातो. यासाठी कंपनीची विहित मर्यादा विचारात घेतली जात नाही.

**क. अमुर्त मत्ता**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी केल्याचा भांडवली खर्च, बाह्य तृतीय पक्ष सल्लागाराकडून तयार केलेल्या सॉफ्टवेअरची अंमलबजावणी, सॉफ्टवेअरच्या परवान्याचे खरेदी, या सर्व मत्तांचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केल्याप्रमाणे खालील दराने घसारा आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| सॉफ्टवेअर | ३०% |

## १२. चालू नसलेल्या मत्तांची विक्री करणे

चालू नसलेल्या ज्या मत्ता वापरात ठेवण्यापेक्षा विकल्यास त्यांच्या प्रचलीत रकमा वसूल होऊ शकते त्यांचे वर्गीकरण विक्री योग्य चालू मत्ता असे केले जाते. जर विक्रीची चांगली शक्यता असेल आणि मत्ता विद्यमान स्थितीत तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर वरील अट पूर्ण झाली असे मानले जाते. अशा विक्री योग्य चालू नसणाऱ्या मत्तांची मोजणी त्यांच्या लेख्यांमधील किंमत आणि रास्त मूल्यातून विक्रीचा खर्च वजा केल्यानंतरची किंमत यापैकी किमान किंमतीस केली जाते. ज्या मालमत्ता कारखाने व साधने आणि अमूर्त मत्ता विक्रीसाठी काढल्या जातात, त्यांचा घसाऱ्याची किंवा कर्जफेडीची तरतूद केली जात नाही.

## १३. वस्तूसूची

भांडारातील सामान, सुटे भाग यासह मालसाठ्यांचे मूल्यांकन त्यांच्या खर्च आणि त्यांचे वसुली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते आणि खर्च हा वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो. मात्र, वीज निर्मितीसाठीचे साहित्य व इतर बाबी यांचे लेखन किंमतीपेक्षा कमी दराने केले जात नाही. कारण विजेची विक्री निर्मिती खर्चा इतक्या किंवा त्यापेक्षा जास्त दराने केली जाते. खर्चामध्ये खरेदी खर्च (मिळण्याजोग्या इनपूट टॅक्स क्रेडीटची निव्वळ) आणि त्या वस्तू त्यांच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा इतर खर्च समाविष्ट असतात. भांडारातील सेवेस निरूपयोगी व निकामी झालेल्या वस्तूंचा आढावा घेऊन त्याबाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते.

## १४. महसूल मान्यता

१. विजेच्या विक्रीतून मिळणाऱ्या महसुलाचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वर्षाच्या सुरूवातीस पूर्वनिर्धारित केलेल्या वीज दर पत्रकाच्या आधारे केले जातात. त्यात इंधन समायोजन आकार समाविष्ट असतो, तसेच लेख्यांच्या आधारे कालावधीच्या अखेरीस उपार्जित झालेला विनादेयाचा महसूल सुद्धा समाविष्ट केला जातो. मात्र तो त्यापुढील वर्षात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या समायोजनाच्या प्रक्रियेच्या अधीन असतो.

२. महावितरण सोबत केलेल्या वीज खरेदी करारातील अटीनुसार महानिर्मिती कंपनी विलंब भरणा अधिभाराला 'स्टेट बँक ऑफ इंडियाच्या 'मार्जिन कॉस्ट ऑफ फंड बेस्ड लेडींग रेट' (एमसीएलआर) अधिक ३५० बेसिक पॉईंट्स उपार्जिन त्यानुसार, या प्रमाणे मान्यता देते.

३. व्याजाचे उत्पन्न हे मुद्दल/थकबाकी आणि लागू होणारा व्याज दर यानुसार मान्य केले जाते.

४. फ्लाय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहकाने मान्य केलेला दराने केला जातो. त्याची रक्कम फ्लाय ॲश वापर निधी या वेगळ्या लेखा शीर्षात आणि पर्यावरण व वन मंत्रालयाने दि. ०३.११.२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार केला जातो. या निधीचा वापर राख वापराच्या प्रोत्साहनासाठी करावयाच्या खर्चासाठी केला जातो.

५. अन्य उत्पन्नाला उपार्जन तत्वावर मान्यता दिली जाते. भंगार व नाकारलेला कोळसा इत्यादीची विक्री जेव्हा खरेदीदार कंपनीच्या जागेतून करतो व कंपनी त्याची बीजके तयार करतो, तेव्हाच त्याचा लेखा होतो. परिसमापनातील नुकसान जेव्हा ते प्रत्यक्ष ओळखले जातात त्यावर्षी आणि त्याची आकारणी झाल्यावर त्यांच्या वसुलीचे समायोजन प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट केले जाते. त्यातून प्रकल्पाचे जादा खर्च काही प्रमाणात कमी होतात. प्रकल्पाच्या कंत्राटदारांना दिलेल्या अग्रिमांच्या समायोजन जेव्हा उपार्जन होईल त्याप्रमाणे प्रकल्प खर्चात केले जाते. इतर सर्व प्रकरणी, वसूल केलेले परिसमापनातील नुकसान व इतर उत्पन्नात जमा केले जाते.

६. विक्री झाली नाही अशा ऊर्जा बचतींच्या प्रमाणपत्रांच्या मूल्याला कंपनी वित्तीय वर्षाच्या अखेरीस मान्यता देते व ते उपार्जन तत्वानुसार महसूलात जमा करते. ही प्रमाणपत्रे विकल्यास त्याचे उपार्जन मूल्य आणि प्रत्यक्ष मूल्य याचे समायोजन करून ते प्रत्यक्ष विक्रीच्या वर्षाच्या नफा-तोटा पत्रकात दाखविले जाते.

## १५. खर्च आणि उत्पन्न यांचे लेखे करणे/वर्गीकरण करणे

जर मागील काही वर्षातील एकत्रीत उत्पन्न/खर्च प्रारंभीच्या विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर ते पूर्वलक्षी प्रभावाने दुरूस्त केले जाईल. विम्याचे दावे स्विकारल्यानंतरच त्यांचे लेखे केले जातील.

इतर सर्व दावे/हक्क यांचे लेखे प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार केले जातात.

## १६. उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकी

उपकंपन्या आणि संयुक्त उपक्रम कंपन्या तसेच सहयोगी कंपन्या यांच्या समभागातील नोंदणी, खर्च वजा संचित मूल्यघट (जर काही असेल तर) याप्रमाणे केली जाते आणि प्रत्येक अहवाल तारखेला गुंतणूकीच्या कमतरतेसाठी परिक्षण केले जाते.

कंपनीने जेव्हा पूर्वीच्या सर्वसामान्यपणे मान्य केलेल्या लेखा पद्धतीतून भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण केले त्यावेळी उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकीला त्यांच्या प्रचलीत विद्यमान मूल्यानुसार मान्यता देण्याचे ठरविले होते.

## १७. परकीय चलनातील व्यवहार

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्यांच्या व्यवहाराच्या तारखेला प्रचलीत असलेल्या संबंधित विनिमय दराने नोंदवले जातात. परकीय चलनानुसार असलेली पैशातील मत्ता व पैशामधील दायित्वे यांचे रूपांतरण अहवाल तारखेला असलेल्या विनिमयाच्या स्पॉट रेट नुसार केले जाते.

हिशेबानंतर किंवा पूनर्लेखनानंतर विनिमयात उद्भवलेले फरकांना नफा व तोटा पत्रकात 'विनिमय दर' विचलन किंवा 'वित्त खर्च' (कर्जाच्या खर्चाचे समायोजन म्हणून विचारात घेतलेल्या मर्यादेपर्यंत) म्हणून मान्यता दिली जाते.

## १८. कर्मचारी लाभ

### अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ

कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी सेवा दिल्या, त्यावर्षीच्या नफा-तोटा पत्रकात अल्पकालीन कर्मचारी लाभ यांना खर्चाच्या विना सवलत रकमेला मान्यता देण्यात येते. कंपनी,

**सानुग्रह –** सानुग्रह खर्च जेव्हा ते घोषित होतात, तेव्हा त्यांचे उपार्जनासाठी लेखावहयांत नोंदणी करते.

**नियुक्तिनंतरचे लाभ**

**व्याख्यांकित लाभ योजना**

अ) भविष्य निर्वाह निधी व वेगळा विश्वस्त संस्थेत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ गटातील कंपन्याच्या अंशदानाचे व्यवस्थापन होते, त्यामध्ये कंपनी पूर्व निश्चित दराचे तिचे आणि कर्मचाऱ्यांचे अंशदान भरते. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतीमध्ये केले जाते. या निधीत केलेले प्रत्येक कालावधीतील अंशदान यास 'व्यय' म्हणून मान्यता दिली जाते आणि त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

ब) उपदान या सारख्या व्याख्यांकित कर्मचाारी लाभाचे दायित्व विमागणित शार्धीच्या मूल्यांकनानूसार ठरविले जाते. हे मूल्यांकन स्वतंत्र विमागणित तंज्ञाकडून वर्षाच्या अखेरीला प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड वापरून करून घेण्यात येते. पुनर्मापन केलेल्या निव्वळ व्यांख्यांकित लाभ दायित्वांना इतर सर्वकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते. या दायित्वामध्ये विमागणिती प्राप्ती व हानी, नियोजन मत्तांचा परतावा (व्याज वगळून) आणि मत्ता मर्यादा (जर काही असेल तर व्याजाशिवाय) यांचा समावेश होतो.

**क ) इतर दिर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ**

इतर दीर्घ मुदतीचे लाभ म्हणजे रजेचे रोखीकरण याचे दायित्व प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड ही पद्धत वापरून स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून विमागणिती मूल्यांकनानुसार ठरविले जातात.

**१९. भाडेपट्टी**

दि. ०१ एप्रिल २०१९ रोजीचे किंवा त्यानंतर जे करार करण्यात आले ते करार भाडेपट्टीचे असल्याबद्दल किंवा त्यात भाडेपट्टी समाविष्ट आहे किंवा कसे याचे कंपनी निर्धारण करते. जर कराराच्या मुदतीत संबंधित ओळख निश्चिती केलेल्या मत्तांच्या वापराचे नियंत्रणाचा हक्क मोबदल्याच्या बदल्यात दिले गेले असतील तर तो करार भाडेपट्टीचा आहे याबद्दल निश्चिती करण्यासाठी, कंपनी खालील बाबींचे अंदाज करते.

- संबंधित करारात ओळख निश्चिती केलेल्या मत्तांचा वापर करण्यासंबंधी असल्यास त्यात असा वापर करण्याचे स्पष्ट केलेले असावे किंवा तशी सूचना असावी. त्यात तसा प्रत्यक्ष वापरास नेमकेपणाने मान्यता दिलेली असली पाहिजे किंवा त्यात एका प्रत्यक्ष अस्तित्वातील मत्तेच्या सर्व बाजूने सुस्पष्ट वेगळेपण दर्शविलेले पाहिजे. जर संबंधित मत्ता देणाऱ्याला मोठ्या प्रमाणात पर्यायी वापराचा हक्क त्यात असेल तर अशा मत्तांची तशी ओळख निश्चिती केली जात नाही.
- कंपनीला भाडेपट्टीच्या संपूर्ण कालावधीमध्ये अशा भाडेपट्टीच्या मत्ताच्या वापरातून मिळणारे सर्व आर्थिक लाभ प्राप्त करण्याचा हक्क असलाच पाहिजे.
- अशा मत्तांचा वापर करण्याविषयीचे आदेश देण्याचे हक्क कंपनीकडे असले पाहिजेत.

दि. ०१ एप्रिल २०१९ आधी केलेल्या कराराबद्दल कंपनीने असा निर्णय घेतला की, भाडेपट्टी आधारीत व्यवस्थेमध्ये खालील बाबींचे निर्धारण होते किंवा नाही हे निश्चित केले पाहिजे.

- व्यवस्थेची पूर्तता विशिष्ट मालमत्ता किंवा मालमत्तेच्या वापरावर अवलंबून होतो किंवा कसे.
- या व्यवस्थेत मत्ता वापराचा हक्क दिला आहे किंवा कसे.

**१. कंपनी भाडेकरू असल्यास**

वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचा घसारा भाडेपट्टीची मुदत संपेपर्यंत 'सरळ रेषा' पद्धतीने केला जातो. याशिवाय अशा वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचे ठराविक अंतराने, जर काही कमी करण्याजोगी हाती असल्यास ती कमी करण्यात येते. तसेच जर काही भाड्याच्या दायित्वाचे संबंधी काही पूनर्मोजणी करावयाची असल्यास ती करून समायोजन केले जाते.

भाडेपट्टीचे दायित्वाच्या प्रारंभी करार सुरू होण्याच्या तारखेला न भरलेल्या भाडेपट्टीचे विद्यमान मूल्याप्रमाणे मोजणी

केली जाते आणि कंपनीच्या इन्क्रीमेंटल डिस्काउंट रेटनुसार कपात करण्यात येते. भाडेपट्टीचे दायित्व मुल्यघट तत्वानुसार मोजण्यात येते.

अल्पमुदतीचे भाडेपट्टी करार म्हणजे ज्यांची मुदत बारा महिने किंवा त्यापेक्षा कमी असेल आणि कमी किंमतीच्या भाडेपट्टीचे करार यांना कंपनीने 'वापरण्याचा अधिकार' या मत्तेत मान्यता न देण्याचे ठरविले आहे. कंपनी अशा भाडेपट्टी संबंधित देयकांना खर्च म्हणून मान्यता देते.

**२. कंपनी भाड्याने देणारी संस्था असल्यास**

ज्यावेळी आगा कंपनी स्वत: भाडेपट्याने देते तेव्हा त्यांचे लेखे भारतीय लेखा मानक क्रमांक ११६ यामध्ये विहित केलेल्या पद्धतीने केले जातात.

## २०. शासकीय अनुदान

शासकीय अनुदानाबाबत जेव्ही ते मिळण्याची योग्य हमी असेल आणि जेव्हा संलग्न शर्तींचे अनुपालन करण्यात येते, तेव्हाच त्याला लेख्यांमध्ये मान्यता देण्यात येते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबींशी निगडीत असते, तेव्हा त्या संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी आणि त्याच्या हेतुच्या भरपाईसाठी खर्च करण्यात येते तेव्हा तिला नफा व तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे मान्यता दिली जाते.

भाारतीय लेखामानक २० यातील तरतुदीनुसार, भारत सरकारने २० सप्टेंबर रोजी जारी केलेल्या सुधारित नियमावलीनुसार, मत्तांशी संबंधित शासकीय अनुदाने, स्थगित उत्पन्न म्हणून किंवा मत्तांच्या वहन रकमेतून अनुदान वजा करून त्याप्रमाणे ताळेबंदात दाखवाण्यात, असे बदल केले. परिणामी, वि. वर्ष २०२०-२१ मध्ये कंपनीने मत्तांच्या मूल्याकन अनुदाने वजा करण्याचा पर्याय निवडेलेला आहे.

## २१. तरतुदी, आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता

जेव्हा एखाद्या भूतकालीन घटनेमुळे सद्यस्थितीत काही बंधने आली असतील तर त्या बंधनाच्या तरतुदींना मान्यता देण्यात येते. ही बंधने पूर्ण करण्यासाठी संसाधनांचे बहिर्गमन होणे संभवनीय असावे. या बंधनातील रकमांचे विश्वासनीय अंदाज केलेले असावेत.

| श्रेणी - १ (ब) | ६.४७ टक्के | ६.९९ टक्के |
| श्रेणी - २ (अ) | २९.९७ टक्के | २७.६४ टक्के |
| श्रेणी - २ (ब) | १.९८ टक्के | २.१२ टक्के |
| श्रेणी - ४ (क) | २.४९ टक्के | २.३७ टक्के |
| विशेष ठेव योजना | २०.९५ टक्के | २३.७० टक्के |

**टिपा क्र. ३० भांडवल / शासकिय अनुदान** (₹ कोटीत)

| | |
|---|---|
| **३१.०३.२०१९ रोजी** | **६.४९** |
| वित्तीय वर्ष २०१९-२० दरम्यान प्राप्त | ०.२२ |
| वजा: मत्ता व खर्चात समायोजित अनुदान | ०.५० |
| वजा: वित्तीय वर्ष २०१९-२०२० मध्ये कर्जफेड केलेले शासकिय अनुदान | |
| **३१.०३.२०२० रोजी** | **६.२१** |
| वित्तीय वर्ष २०२०-२१ दरम्यान प्राप्त | ३३.४६ |
| वजा: मत्ता व खर्चात समायोजित अनुदान | ९.६७ |
| वजा: वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मध्ये कर्जफेड केलेले शासकिय अनुदान | |
| **३१.०३.२०२१ रोजी** | **३०.००** |

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| चालू | ३०.०० | ६.२१ |
| चालू नसलेले | - | - |
| एकूण | ३०.०० | ६.२१ |

**टिपा क्र. ३१ ) विकसित होणाऱ्या अमूर्त मत्ता**

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | १३३.९३ | १३३.७६ |
| वर्षातील भर | १०५.७५ | ०.१७ |
| खर्चाचे स्वरूपाचे स्पष्टिकरण | | |
| कमी केलेली उलट फिरविणे (आकारणे) | - | |
| परकिय चलनातील फरक | | |
| **अखेरची शिल्लक** | **२३९.६८** | **१३३.९३** |

कंपनीने गारे पालमा, छत्तीसगढ येथील कोळसा खाण विकसित करण्याचे हक्क मिळविले आहेत आणि या हेतूसाठी खाण विकासक नियुक्त करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**टिपा क्र. ३२ ) संबंधित संस्थामधील गुंतवणूकी**

(₹ कोटीत)

| व्यवहाराचा तपशील | महागूज | धोपावे | महाजेम्स | युसीएम | औरंगाबाद | सीकेडीआरएल |
|---|---|---|---|---|---|---|
| **३१.०३.२०१९ रोजी** | | | | | | |
| - समभागात गुंतवणूकी | ०.०३ | ०.०५ | ०.०५ | ०.०३ | | ०.५२ |
| - समभागात समकक्ष गुंतवणूकी | ३६.४० | ६.१८ | १.४६ | ०.४६ | ४.८५ | |
| **वर्षभरात समभाग समकक्ष गुंतवणूक** | १.१५ | ०.०० | ०.०७ | - | - | - |
| **३१.०३.२०२० रोजी** | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| - समभागात गुंतवणूकी | ०.०३ | ०.०५ | ०.०५ | ०.०३ | | ०.५२ |
| - समभागात समकक्ष गुंतवणूकी | ३७.५५ | ६.१९ | १.५३ | ०.४६ | ४.८५ | |
| वर्षभरात समभाग गुंतवणूक | - | - | - | - | - | - |
| **वर्षभरात समभाग समकक्ष गुंतवणूक** | १.१९ | ०.०० | ०.०० | - | - | - |
| **३१.०३.२०२१ रोजी** | | | | | | |
| - समभागात गुंतवणूकी | ०.०३ | ०.०५ | ०.०५ | ०.०३ | | ०.५२ |
| - समभागात समकक्ष गुंतवणूकी | ३८.७५ | ६.१९ | १.५४ | ०.४६ | ४.८५ | |

**टिपा क्र. ३३ ) प्रतिभूतीसाठी गहाण ठेवलेल्या मत्ता**

चालू किंवा चालू नसलेल्या कर्जासाठीच्या प्रतिभूती म्हणून/गहाण ठेवलेल्या मत्तांची रक्कम खालीलप्रमाणे आहेत

**( ₹ कोटीत )**

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| **चालू नसलेल्या कर्जासाठी निर्माण केलेल्या प्रतिभूती** | | |
| मत्ता, कारखाना व साधन - भाडेपट्टीच्या जमिनी वगळून | ३३,०२०.२४ | ३५,१९२.८७ |
| **चालू कर्जासाठी निर्माण केलेल्या प्रतिभूती** | | |
| १) वस्तूमाल सूची | ९३०.०९ | १,७६३.०३ |
| २) व्यापारी येणी | २४,५१८.१८ | १७,८०३.६८ |
| **प्रतिभूती म्हणून ठेवलेल्या एकूण मत्ता** | **२५,४४८.२६** | **१९,५६६.७१** |

**टिपा क्र.: ३४**

चालू वित्तीय वर्ष २०२०-२१ दरम्यान, सौर विक्रीसाठी केंद्र सरकारकडून महसुली मिळालेल्या अर्थ सहाय्याची रक्कम ₹ २ कोटी (२०१९-२०: ₹ ०.९२ कोटी) यांचे लेखे केले आहेत.

**टिपा क्र.: ३५**

आंतर कंपनी व्यवहारांचा मेळ सतत चालू तत्वानुसार केला जातो. मात्र वर्षा अखेरच्या शिलकी या ज्यांचे मोठे परिणाम होणार नाहीत अशा प्रकारे कायम मेळ करणे यांच्या अधीन आहेत.

**टिपा क्र.: ३६**

सूक्ष्म व लघू उद्योजक ज्या मर्यादेत निश्चित केले त्यानुसार त्यांच्या थकीत रकमा आणि जर ताळेबंद तारखेपर्यंत त्यावर काही व्याज असेल तर ते समाविष्ट करून, ते प्रकट केले आहे आणि त्यावर लेखापरिक्षकानी विश्वास ठेवला आहे.

**( ₹ कोटीत )**

| अनु.क्र. | तपशील | २०२०-२१ | २०१९-२० |
|---|---|---|---|
| १ | सूक्ष्म लघू व मध्यम उद्योग विकास कायद्या अंतर्गत पूरवठादारांना देय असलेल्या रकमा ३१/०३/२०२१ रोजी | | |
| | - मुद्दल | - | ०.०३ |
| | - व्याज | ०.५० | ०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | सूक्ष्म लघू व मध्यम उद्योग विकास कायद्यानुसार ''पूरवठादारांना'' त्या या वित्तीय वर्ष मध्ये निश्चित केलेल्या तारखेनंतर २०१९-२० मध्ये दिलेल्या रकमा (त्या चालू वर्षीच्या किंवा मागील वर्षाच्या आहेत किंवा कसे याचा संबंध नाही) | | |
| | - मुद्दल | | - |
| | - व्याज | ०.००४ | - |
| ३ | चालू वर्षी यापूर्वीच दिलेल्या (सव्याज किंवा व्याजाचा काही भाग यासंह) मुद्दलावर देय असलेले व्याज विलंबाने मुद्दल दिल्यामुळे देय झालेली व्याजाची क्कम | - | १.५५ |
| ४ | लेखा वर्षाच्या अखेरीस उपर्जित झालेली आणि देणे प्रलंबित असलेली रक्कम | ०.०७ | ०.४३ |
| ५ | व्याजाची थकीत व देय असलेली परंतु मागील वर्षानंतर पुढे केलेली रक्कम | ०.४३ | ०.३५ |

**टिपा क्र. ३७ संबंधित संस्था / पक्षाबाबतची प्रकटने**

**अ) संबंधित संस्था/पक्षाची नावे आणि नातेसंबंध**

**१. सूत्रधारी संस्था**

- मे. मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड्

**२. सहयोगी संस्था**

- मे. युसीएम कंपनी लिमिटेड
- मे. छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे लिमिटेड

**३. उपकंपन्या**

- मे. धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड
- मे. महाजेनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लिमिटेड
- मे. महागूज कोलायरीज लिमिटेड

**४. सहोदर उपकंपन्या**

- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड
- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड

**ब) कंपनीचे भारतीय लेखामानक २४ ला अनुसरून खालील शासन संबंधित संस्था या शासनाशी संबंधित असल्याने, त्यांच्या विषयीचे प्रकन समविष्ट केलेले नाही.**

**१. सहयोगी संस्था**

- मे. युसीएम कोल कंपनी लिमिटेड
- मे. छत्तीसगढ कटघोरा डोंगरगढ रेल्वे तिमिटेड

**२. उपकंपन्या**

- मे. थोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड
- मे. महाजेनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लिमिटेड
- मे. महागूज कोलायरीज लिमिटेड

**३. सहोदर उपकंपन्या**

- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड
- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड

## ४. व्यवस्थापनातील महत्वाची पदे धारणकर्त्या व्यक्ती आणि त्यांचा कार्यकाल

| अनु. क्र | पदनाम | व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावरील व्यक्तीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | श्रीमती शैला ए. | ०१.०४.२०२० ते १०.०८.२०२० |
| २ | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | श्री संजय जे. खंडारे | ११.०८.२०२० ते ३१.०३.२०२१ |
| ३ | संचालक (खाणकाम) | श्री. पी. व्ही. जाधव | ०१.०६.२०१९ पासून |
| ४ | संचालक (संचलन) | श्री. चंद्रकांत थोटवे | १९.०९.२०१९ पासून ३१.०८.२०२० आणि १६.०३.२०२१ |
| ५ | संचालक (वित्त) | श्री. एस. जे. आंबेरकर | ११.०८.२०१७ ते १०.०८.२०२० |
| ६ | संचालक (वित्त) | श्रा. बाळासाहेब थिटे | ११.०८.२०२० पासून |
| ७ | संचालक (प्रकल्प) | श्री. व्ही थंगपंडीयन | १०.०४.२०१९ पासून |
| ८ | कंपनी सचिव | श्री राहुल दुबे | १७-०१-२००६ पासून |

## ५. अकार्यकारी संचालक

| अनु. क्र | पदनाम | व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावरील व्यक्तीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | संचालक | श्रीमती स्वाती व्यवहारे | २२.०१.२०२१ |

## क) व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्तींनां दिलेले पारिश्रमिक

(₹ कोटीत)

| अनु. क्र | संबंधित व्यक्तीचे नाव | नाते संबंधाचे स्वरूप | २०२०-२१ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बिपीन श्रीमाळी | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | - | ०.१६ |
| २ | श्रीमती शैला ए. | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | ०.१८ | ०.०७ |
| ३ | श्री. संजय जे. खंदारे | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | ०.३१ | - |
| ४ | श्री. चंद्रकांत थोटवे | संचालक (संचलन) | १.५३ | ०.५१ |
| ५ | श्री. वैथिलिंगणधार थंगपंडियन | संचालक (प्रकल्प) | ०.५० | ०.३४ |
| ६ | श्री. विकास जयदेव | संचालक (प्रकल्प) | - | ०.१९ |
| ७ | श्री. पी.व्ही.जाधव | संचालक (खाणकाम) | ०.३४ | ०.२० |
| ८ | श्री. संतोष आंबेरकर | संचालक (वित्त) | ०.३७ | ०.५० |
| ९ | श्री. बाळासाहेब बी. थिटे | संचालक (वित्त) | ०.२१ | - |

| व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावरील व्यक्तींनां दिलेले पारिश्रमिक | | | | (₹ कोटीत) |
|---|---|---|---|---|
| अनु. क्र | संबंधित व्यक्तीचे नाव | नाते संबंधाचे स्वरूप | २०२०-२१ | २०१९-२० |
| १ | श्री. विनोद बोंद्रे | कार्यकारी संचालक (मा.सं.) | - | ०.१२ |
| २ | श्री. बी.वाय. मंता | कार्यकारी संचालक (मा.सं.) | ०.४३ | ०.१८ |
| ३ | श्री. राजू बुरडे | कार्यकारी संचालक | - | ०.१६ |
| ४ | श्री. कैलास चिरुटकर | कार्यकारी संचालक | ०.४७ | ०.३३ |
| ५ | श्री. नितीन चांदूरकर | कार्यकारी संचालक | ०.४४ | ०.३२ |
| ६ | श्री. संजय मारुडकर | कार्यकारी संचालक | ०.४६ | ०.२५ |
| ७ | श्री. अभय ए. हरणे | कार्यकारी संचालक | ०.४४ | |
| ८ | श्री. राहुल दुबे | कंपनी सचिव | ०.४१ | ०.२९ |

भारतीय लेखा मानक-१९ कर्मचारी लाभ : या मानकानुसार वित्तीय विवरण पत्रकात मान्यता दिलेले नोकरीसंरचनेचे लाभ आणि इतर दीर्घ मुदतीचे लाभांस व्यवस्थापकातील महत्वाच्या व्यक्ती पात्र आहेत. सदर कर्मचारी लाभ हे विभागाणिती मूल्यांकन प्रमाणे एकत्रिपणे दिले जातात. त्यामुळे त्यांचा समावेश वरील माहितीत केलेला नाही.

**ड) अकार्यकारी संचालकाना बैठक उपस्थिती शुल्क** (₹ कोटीत)

| बैठकांचा तपशील | श्रीमती स्वाती व्यवहारे |
|---|---|
| मंडळ बैठका | ०.०००५ |
| लेखापरिक्षण समिती | - |
| एकूण उपस्थितीचे शुल्क प्राप्ति | ०.०००५ |

**टिपा क्र. ३८**

**भारतीय लेखा मानक ३७-स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रके यातील आवश्यक माहिती तक्त्यात दिलेली आहे.** (₹ कोटीत)

| अनु. क्र | तपशील | कंपनीचा देश | गुंतवणूकीचे स्वरूप | मालकीची हिताची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
| १ | मे. महागूज कोलायरीज लिमिटेड | भारत | उपकंपनी | ६०.०० % | ६०.०० % |
| २ | मे. धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड | भारत | उपकंपनी | १००.०० % | १००.०० % |
| ३ | मे. महाजेनको ॲश मॅनेजमेंट सर्विस लिमिटेड | भारत | उपकंपनी | १००.०० % | १००.०० % |
| ४ | मे. यू सी एम कोल कंपनी लिमिटेड | भारत | सहयोगी कंपनी | १८.७५ % | १८.७५ % |
| ५ | मे. छत्तीसगढ कटघोरा डोंगरगढ रेल्वे लिमिटेड | भारत | सहयोगी कंपनी | २६.०० % | २६.०० % |

**टिपा क्र. ३९**

खालील सहयोगी उपकंपन्या यांचे निव्वळ मोल कमी झाले, त्यामुळे व्यवस्थापनाने त्यांच्या गुंतवणुकीचे मूल्य कमी करण्याचा विचार केला आणि त्यानुसार लेखावहयात तरतूद करण्यात आली आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | गुंतवणूक अग्रीमासह | कमी करण्याची तरतूद |
|---|---|---|
| में. महागूज कोलायरीज लिमिटेड | ३८.७८ | ३८.७८ |
| में. यू सी एम कोल कंपनी लिमिटेड | ०.४९ | ०.४९ |
| में. धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड | ६.२४ | ६.२४ |

**टिपा क्र. ४०**

महानिर्मितीच्या सहोदर कंपन्यासोबत वित्तीय वर्षाअखेरच्या व्यापारी येण्या व्यक्तिरीत अन्य थकीत शिल्लकी.

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
|---|---|---|
| महावितरणला देय | ५४५.२१ | ५४४.२२ |
| महापारेषण कडून येणे | १५.३४ | २.२८ |

**टिपा क्र. ४० अ**

संबंधित संस्थांकडून व्यापारी येणी

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
|---|---|---|
| महावितरण | २४,५३२.३३ | १७,८२०.४९ |
| महापारेषण | १४३.५२ | १२८.८३ |

**टिपा क्र. ४१**

कंपनीची सामाजिक जबाबदारी

वर्षभरात कंपनीने कंपन्यांची सामाजिक जबाबदारी यासाठी ₹ ३०.६७ कोटी खर्च केले. (मागील वर्षी ३.४७ कोटी)

(₹ कोटीत)

| अनु. क्र | खर्चाचे लेखाशीर्षक | २०२०-२१ | २०१९-२० |
|---|---|---|---|
| १ | कोविड-१९ सहायता निधीसाठी योगदान | ०.०१ | - |
| २ | सामुदायिक विकास आणि कल्याण खर्च | ०.६९ | ०.५४ |
| ३ | मृत्यू भरपाई आणि विमा वेतन सुरक्षा रक्षकांना विद्यावेतन | २.८४ | २.७८ |
| ४ | रस्ते, कुंपणाच्या भिंती, आरसीसी ड्रेनेज, बांधकाम भिंती व दुरुस्ती इत्यादी | ०.२५ | - |
| ५ | कोराडी तलाव क्र. ३ चे सौंदर्यीकरण आणि मृदा संशोधण, निष्कासन, बांधकाम, विकासासाठी तपशिलवार अभ्यास | २६.८८ | - |
| ६ | रायगड, छतीसगढ येथील चक्रधर समारंभ २०१८ साठी देणगी | - | ०.०१ |
| ७ | शिक्षकांना मानधन (गारे पाल्मा - सीएसआर) | - | ०.१५ |
|  | एकूण | ३०.६७ | ३.४७ |

**टिपा क्र. ४२**

**आकस्मिक दायित्वे आणि बांधिलकी**

(₹ कोटीत)

| अ. क्र. | आकस्मिक दायित्वे | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
|---|---|---|---|
| १ | महानिर्मिती कंपनीला पुढील आकस्मिक दायित्वे संभवनीय आहेत. एस इ सी एल, डब्ल्यु सी एल-सिंगरेनी आणि आणि एम सी एल यांचे व्याजाची दावे ₹१३०९.८९ कोटी (मा. वर्षी एस ई सी एल, डब्ल्यू सी एल आणि एम सी एलचे ₹९६५.२६ कोटी) अधिक कार्यक्षमता प्रोत्साहन ₹८३७.६० कोटी आणि (मा. वर्षी ₹७०४.२२ कोटी) कमी उचल केल्याचे ₹९८३.३४ कोटी (मा. वर्षी ९८३.३४ कोटी) अधिक डब्ल्यू सी एल चा दंडाचा दावा ₹२९.६२ कोटी, विनिर्देशित खाणीसाठी डब्ल्यू सी एल चे ₹ निरंक (मा. वर्षी डब्ल्यू सी एल च्या दंडाचा ₹२९.६२ कोटी आणि डब्ल्यू एस सी एलच्या विनिर्देशित खाणीसाठी ₹३६२.७२ कोटी) एकूण आकस्मिक दायित्वे रुपये ३१६०.४५ कोटी (मा. वर्षा ३०४५.१६ कोटी) | ३,१६०.४५ | ३,०४५.१६ |
| २ | परळी युनीट-८ प्रकल्पाच्या उर्वरित कारखान्याची स्थापत्य पुरवठा, उभारणी आणि कार्यान्वयन याची विविध कामाच्या कंत्राटासंबंधी मेसर्स सुनील हायटेक इंजि. लि., नागपुर आणि महानिर्मिती यांच्यात बरेच वाद असून ते लवादाकडे आहे. याची रक्कम ₹९५३.८६ कोटी आहे (मा. वर्षा ९५३.८६ कोटी | ९५३.८६ | ९५३.८६ |
| ३ | जलसंचन विभागाचे, जादा पाणी आकार व आस्थापना आकार यासाठी दायित्व २,८३,५६,४०,८३२ (मा. वर्षी ₹२,७७,६४,६६,७९९/-) जादापाणी आकार ९९,११,४०,८३२/- (+अधिक) आस्थापना आकार १,८४,४५,००,०००/- | २८३.५६ | २७७.६५ |
| ४ | महालक्ष्मी इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड, कोल्हापुर यांचे आकस्मिक दायित्वे ₹२९३.०१ कोटी अधिक व्याजाचे ₹४५ कोटी असे एकूण ₹३३८.०९ कोटी उद्भव शकते (मा. वर्षी ₹२४८.३१ कोटी अधिक व्याजाचे ₹४५ कोटी एकूण २९३.०१ कोटी) यांचा संबंध आरसीसी (लोअर) मून बॅरेजचे बांधकाम आणि संलग्न कामे म्हणजेच रेडियल, गेट स्टॉप लॉग गेट, गोलीएथ क्रेन आणि रोप ड्रमचे आरोहण ई. चे उत्पादन, पुरवठा, उभारणी, परिक्षण आणि कार्यान्वयन करणे याच्याशी आहे या कंपनीने लवादातील सदस्यांना निविदाच्या अटीनुसार निर्णय करता यावा यासाठी लवादाने या कंपनीत रकमेचा आधारानुसार मागण्या करण्यास सांगितले.<br><br>लवादाचे एकमेव सदस्य श्री एस.पी. कुरडूकर यांनी ₹५६ कोटी देण्याचा निर्णय २०-११-२०१४ रोजी जाहीर केला.<br><br>याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. (संदर्भ - ओएसएआरबीपी/४६६/२१५).<br><br>वादातील संस्थेने विनंती अर्ज (क्र. ५२६०/२०१५) दाखल केले. महानिर्मितीने नवीन वकील श्री. एस.आर. नारगोळकर यांची नियुक्ति केली. मुंबई उच्च न्यायालयने पुढील कामकाजासाठी एकमेव लवाद म्हणून श्री. ठक्कर यांना नियुक्त केले (उच्च न्यायालय आदेश दिनांक १६.१०.२०२०) महानिर्मिती कंपनीने ₹ ५७ कोटी आणि बँक हमीचे ₹ ४८,४९,२८,६२८/- जमा केले. | २३२.५१ | २९३.०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | महानिर्मिती आणि मे. टाटा प्रकल्प लि. यांच्यातील वाद लवादाकडे आहे. तो भुसावळ २×५०० मे. वॅ. प्रकल्पासंबंधी आहे. मे. टाटा यांनी दीर्घ कालाचा खर्च, बँक हमी आकार, कार्यक्षमता, हमीच्या परिक्षणानुसार पैसे देणे आणि बँक गॅरेंटीची जादा रक्कम आकारणी तसेच महानिर्मितीने केलेली वसूली चुकीची असल्याबद्दल आहेत. तसेच जादा काम व कंत्राटाच्या कामगिरीसाठी बँक गॅरंटी परत करण्याची मागणी केली आहे.<br>एकूण परत करावयाची बँक हमी - ₹ १८९,००,००,०००/-<br>एकूण दाव्याची रक्कम - ₹ ११८,१२,०८,९७६/-<br>एकूण मागणी केलेले व्याज - ₹ ७९,३३,५४,१८५/-<br>(११८,१२,०८,९७६ + ७९,३३,५४,१८५ + = १९७,४५,६३,१६१) | १९७.४६ | १९७.४६ |
| ६ | न्या. श्री. व्ही.जी.पळशीकर यांचेकडे लवाद क्र. ए.बी.एन/सी/क्र/६३/२०१४ एकमेव लवाद न्यायाधीश, ॲड. राठोड एशियन नॅचरल रिसोर्सेस लि. (पूर्वीची मेसर्स भाटीया इंटरनॅशनल लि. इंदूर) विरूद्ध महानिर्मिती, मुख्य प्रलंबित विषय रेल्वे मालवाहतूक आकारातील बदल आणि १६ रेफ्री सँपल्स आणि विविध कारणांचे आयात कोळसा संबंधने मधील दावे आहेत. मे. एशियन नॅचरल रिसोर्सेस लिमिटेड यांनी प्रलंबित पैशांसाठी लवादाकडे विनंती केली. त्या वर्षी २०१०-११ मध्ये परदेशातून पूरवलेला अखाद्य वापराचा (बाष्प) कोळसा नाशिक, भुसावळ, खापरखेडा आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रांना पुरविण्याचा कंत्राट घेतला होता.<br>एकमेव लवादाधिकारी न्या. व्ही. जी. पळशीकर (सेवानिवृत्त) यांची दोन्ही बाजूच्या संमतीने १७.०४.२०१४ रोजी नियुक्ती झाली. दावे व प्रतिदावे दाखल करण्यात आले. सुनावणीची प्रक्रीया चालू आहे. दाव्याची रक्कम ₹१२७.४५ कोटी (मा. वर्षी ₹१२७.४५ कोटी) | १२७.४५ | १२७.४५ |
| ७ | आकस्मिक दायित्वे सूमारे ₹१०३.२१ कोटी (मा.वर्षी ₹१०३.२० कोटी) जलसिचंन विभागाने, रत्नागिरी पॉवर ॲण्ड गॅस कंपनीला, शिराळ पंप हाऊस मधून दिलेल्या पाण्यासाठी. | १०३.२१ | १०३.२० |
| ८ | वॉशरी ऑपरेटर यांनी केलेल्या प्रतिदाव्याचे महानिर्मितीवर आकस्मिक दायित्व ₹ ५९.४४ कोटी (मा.वर्षी. ₹१२९.०२ कोटी) उद्भवू शकते. | ५९.४४ | १२९.०२ |
| ९ | कंपनीच्या विरोधाला इतर संकीर्ण दावे - मात्र त्यांना कर्ज अशी मान्यता नाही. | २९५.२० | २५१.९४ |
| १० | नवे प्रकल्प असे - कोराडी ३×६०० मे.वॅ, चंद्रपूर महा औ.वि.केंद्र २×५०० मे.वॅ, आणि परळी १×२५० मे.वॅ. येथे. नवीन प्रकल्पांच्या बांधकामावरील बीओसीडब्ल्यु सेस - १ टक्के दराने (बांधकाम व रचना कामगार कल्याण उपकर अधिनियम) याप्रमाणे कंपनीने काही रकमांचा भरणा न केल्याचे आकस्मिक दावे आहेत. | शोध सुरु आहे | शोध सुरु आहे |
| | **एकूण दावे** | **५,४१३.१३** | **५,३७८.७४** |
| | कंपनीच्या मते वादग्रस्त व थकीत कराच्या मागण्या | २१.४८ | १५२.४० |
| | कंपनीने विस्तृत केलेल्या हमी | ९७७.५६ | १,४२५.९२ |
| | **एकूण आकस्मित दायित्वे** | **६,४१२.१८** | **६,९५७.०६** |
| २ | **भांडवली बांधिलकी** | | |
| अ | भांडवली खात्यात कार्यवाही करावयाची असलेल्या आणि तरतूद नसलेल्या कंत्राटाची अंदाजे किंमत | ७३४.६४ | ८३१.०८ |

**३ . महत्वाच्या इतर बांधिलकी**

अ) महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेल्या वीज विक्रीसाठी महावितरण या कंपनी सोबत करार केला आहे आणि जर हा करार मधेच खंडीत केला नाही किंवा त्यांची मुदत वाढविली नाही तर तो पंचवीस वर्षे अंमलात राहील.

ब) फ्लाय ॲश विक्री/विल्हेवाटीसाठी महानिर्मितीने मेसर्स अल्ट्राटेक सिमेंट लि. यांचे सोबत वित्तीय वर्ष २०२३-२४ पर्यंतचा १५ वर्ष दीर्घ मुदतीचा करार केला आहे/आदेश दिला आहे.

क) कंपनीला ५२.५३७ दशलक्ष मेट्रीक टन कोळशासाठी कोल लिंकेज मिळाले आहे. (यामध्ये ब्रीज लिंकेज व सामंजस्य करार समाविष्ट आहे) त्यानुसार - कोळसा कंपन्याकडून प्रचलीत बाजारभावाने कोळसा घेण्यास बांधील आहे.

ड) कंपनीने गॅस कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. सोबत दि. ०६-०७-२०२६ पर्यंत ३.५ एम एम एस सी एम डी गॅस खरेदी व वाहतूकीचा करार केला आहे.

**४. आकस्मिक मत्ता:**

१. महानिर्मिती कंपनीने वीज खरेदी करारानुसार महावितरण कंपनीला विलंब भरणा अधीभार लावला. या अधिभाराची रक्कम ₹३७२५ कोटी याला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दर बाह्य उत्पन्न मानले आणि महानिर्मितीची वार्षिक महसूलीची आवश्यकता वित्तीय वर्ष २०१०-२०११ ते २०१५-१६ या कालखंडासाठी कमी केली. या विरोधात कंपनीने अपील न्यायाधिकरणाकडे या कार्यपद्धतीत बदल अपील दाखल केले होते. पण ते फेटाळण्यात आले. आता सदर प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.

नुकतेच अन्य पारेषण परवानाधारकाच्या यासारख्या प्रकरणात लवादाने निर्णय दिला की, विलंब भरणा आकाराला दर-बाह्य (नॉन टॅरीफ) उत्पन्न मानले जाऊ नये आणि त्यामुळे ते वार्षिक महसूल आवश्यकता मधून वजा करू नये.

या निकालामुळे महानिर्मितीच्या ₹ ३७२५ कोटीची पुनर्स्थापना होण्याची अनुकूलता वाढली आहे. तसा अनुकूल निकाल मिळाला तर महानिर्मितीची मिळकत ₹ ३७२५ कोटी वाढण्याची शक्यता आहे.

२. महनिर्मितीने कोळसा कंपन्या आणि वॉशरीचे संचालक यांचे विरोधात केलेले प्रतिदावे यांना ऋण मानलेले नाही. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | तपशील | ₹ कोटीत |
|---|---|---|
| १ | कोळशातील दगडा संबंधीचे दावे | २९.४१ |
| २ | एस आर एन दावे | १००.८१ |
| ३ | व्याजाचे दावे | १,८४६.०४ |
| ४ | दर्जा कमी होणे | २,६६३.१७ |
| ५ | कोळसा ओला असणे | १५२.५६ |
| ६ | अपूरा माल देणे | २,८४१.४३ |
| | एकूण | ७,६३३.४२ |

३. महानिर्मितीने तीन संपर्क कंत्राटदार, अनुक्रमे मे. नायर, मे. नरेश कुमार आणि मे. करमचंद थापर यांच्या विरोधात ₹ ४०९.९५ कोटीचा भरपाईचा अर्ज एन सी एल ए टी नवी दिल्ली यांचेकडे दाखल केले आहे. श्री. के.के.शर्मा. केस नं एटी ०२/२०१८.

४. महानिर्मितीने एशियन नॅचरल रिसोर्सेस लि. (पूर्वीच्या भाटीया इंटरनॅशनल लि. इंदौर) यांच्या विरोधात प्रतिदावे दाखल केले आहेत. त्याला कर्ज मानलेले नाही.

| तपशील | ₹ कोटीत |
|---|---|
| कमी पुरवठ्यामुळे ए एफ सी नामंजूरी | ४७.२६ |
| उष्णता दरात वाढ झाल्याने तोटा | २३.०३ |
| साह्यकारी वीज वापर करावा लागल्याने तोटा | २८.५५ |
| माल पाठविण्यातील विलंबासाठी आकार | ३.०६५ |
| एकूण | १०१.९१ |

५. महानिर्मितीने मे. सुनील हायटेक इंजि. लि. नागपूर विरोधात विविध कंत्राटांच्या वादांच्या संबंधात प्रतिदावे दाखल केले. हे दावे परळी युनीट ८ प्रकल्पाचे स्थापत्य पुरवठा, उभारणी, परिक्षण आणि कार्यान्वयन यासंबंधीचे तसेच प्लांट पॅकेजमधील शिल्लक कामाचे आहेत त्यांचा तपशील असा:

| तपशील | ₹ कोटीत |
|---|---|
| एस एच इ एल ची देय वसूली | २२४.२९ |
| प्रतिवादाने केलेली हानी / तोटा | ८१२.४० |
| आरक्षित रकमेची कॅरिंग कॉस्ट (वहन किंमत) | ७०.५६ |
| प्रतिवादीने केलेला जादा तोटा/हानी | ४२३.८० |
| एकूण | १,५३१.०५ |

६. दक्षिण पूर्व रेल्वे कडून जादा माल भाडयाचे ₹ ४.०७ कोटी मिळण्या जोगे आहेत. (सरडेगा सायडीगच्या दाव्याची रक्कम (एमएसएफजे कॉलरी) एमसीएल.

७ जादा माल भाडयाचे दावे (रिकाम्या वॅगन्स, जादा टीओआरओ, कमी सवलत, जादा डीपीसी डब्ल्यूएल, एफआरटी रेट डीआयएफएफ/सीएएलसी डीआयएफएफ, जादा ऑईल, जादा एफएयूसी, जादा पीसीएलए, जादा ईएनएचसी). रक्कम ३.१५ कोटी.

**टिपा क्र. ४२ अ विभागश: अहवाल देणे**

महानिर्मिती कंपनीचे मुख्य कार्य 'वीज निर्मिती करणे आणि वीज पुरवठा करणे' हे आहे. या कंपनीची सर्व कामे भारत देशांतर्गतच चालतात. त्यामुळे तिच्या कार्याचा भौगोलिक विभाग एकच आहे. भारतीय लेखा मानक १०८-प्रवर्तन विभाग यातील आवश्यकतानुसार विभागश: माहिती, कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांमध्ये दिलेली आहे.

**टिपा क्र.: ४२ ब**

**वित्तीय विवरण पत्रकाच्या विहीत मर्यादा खाली दिल्या आहेत**

| विहीत मर्यादांच्या बाबी | | मापनाचे एकक | विहीत मर्यादा |
|---|---|---|---|
| मालमत्ता, कारखाना व साधने यांच्या व्याख्येनुसार असलेल्या सुट्या भागांचे भांडवलीकरण | वैयक्तिकरित्या | ₹ कोटीत | १०.०० |
| मागील वर्षाचे एकूण उत्पन्न / खर्च | संचयी | ₹ कोटीत | ५०.०० |
| आकस्मिक दायित्वाचे प्रकटन | वैयक्तिकरित्या | ₹ कोटीत | १.०० |
| भांडवली बांधिलकींचे प्रकटन | वैयक्तिकरित्या | ₹ कोटीत | १.०० |
| ज्या स्थिर मत्तांची किंमत ₹ ५०००/- पर्यंत आहे आणि सर्व मोबाईल फोन यांचा त्यांच्या खरेदी वर्षात पूर्ण घसारा केला जातो. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| वित्त उभारणी साठीची कर्जे, अग्रिमे व त्यांचे खर्च | वैयक्ति कर्ज | **₹ कोटीत** | १.०० |
| **मत्ता व भाडेपट्टी, दायित्वे वापरण्यास मान्यता देणे** | | | |
| अ) वार्षिक भाडेपट्टी | प्रत्येक बाबतीस | **₹ कोटीत** | १.०० |
| बा) संबंधित मत्तांचे मूल्य | प्रत्येक बाबतीस | **₹ कोटीत** | १०.०० |

**टिपा क्र. ४३( अ )**

महानिर्मिती कंपनी महावितरण कंपनीला ऊर्जा विक्रीचे देयक, इंधन समायोजनाच्या आकाराचे देयक आणि अधिभार इत्यादी देयके देते. महावितरण कंपनीकडून मिळणाऱ्या पैशाचे विनियोजन प्रथम प्राप्ती प्रथम वजा या तत्वावर करण्यात येते. असे करण्यासाठी मिळालेली प्राप्त रक्कमेचा हिशेब विनियोजन विलंब भरण्याच्या आकाराच्या व्याजासोबत करण्यात येते. त्यानंतर महावितरणकडून देय असलेल्या मुद्दलांसोबत विनियोजन करण्यात येते.

व्यापारी येणी, कर्जे आणि अग्रिमे यांच्या शिलकी तो कायम होणे आणि जर असल्यास त्याचा मेळ करणे यांच्या अधीन आहे

**टिपा क्र. ४३( ब )**

महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड सोबत वीज खरेदी करार केलेला आहे. त्यातील अटींनुसार महानिर्मितीने विलंब भरणा अधिभार यावरील व्याजाची रक्कम ₹२५११.५१ कोटी यास महसुली मान्यता दिली. तसेच या अधिभाराचा वित्तीय वर्ष २००९-१० ते २०२०-२१ या कालावधीची संचित रक्कम ₹१४८६२.१० कोटीला सुद्धा महसूल मान्यता दिली. या रकमा कंत्राटानुसार मिळण्यास योग्य आहेत. तसेच बहुवर्षीय वीजदर नियमनाने या अधिभारासाठी नियमीत वीज दराच्या व्यतिरिक्त तरतूद केलेली आहे.

दि ३१.०३.२०१८ रोजी महानिर्मिती आणि महावितरण या दोन्ही कंपन्यांची त्यांच्या लेखा नोंद वह्यांमध्ये विलंब भरणा अधिभार ₹ ७४८५.६१ कोटी दर्शविला. दि ३१-०३-२०१९ रोजी ‘ डी पी एस ची संचित रक्कम ₹ ९८०६.३० कोटी झाली होती. मात्र वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये महावितरणने एकतर्फी मताने या भरण्याच्या विनियोजनाच्या आदेशात बदल केला आणि डी पी एस ऐवजी थकीत मुद्दलचे समायोजन केले. तसेच हा बदल पूर्वलक्षी प्रभावाने करून टाकला आणि अधिभाराची रक्कम एकतर्फी ₹४८४३.२३ कोटीने कमी केली व तसे २८-०८-२०१९ रोजी कळविले. २०२०-२१ मध्ये कंपनीने विना देयक अधिभार प्राप्ती योग्य ₹ २५११.५१ कोटीला आधीपासून चालत आलेल्या कार्यपद्धतीनुसार मान्यता दिली.

महानिर्मिती सातत्याने हिशेब करून अधिभाराचे देयक विनियोजनाच्या आधारे करीत आहे. त्यानुसार प्रथम डीपीएसच्या पैशाचे समायोजन करून नंतर थकीत रकमेच मुद्दलाचे समायोजन केले जाते. कंपनीच्या व्यवस्थापनाचे असे मत आहे की या व्यवहाराचे वाणिज्यिक स्वरूप पाहता ही कार्यपद्धती अधिक योग्य आणि एकमेकांच्या सामंजस्याची आहे.

**टिपा क्र.४३( क ) कोविड १९ चे आघात**

भारतात आणि संपूर्ण जगात कोवीड-१९ ने सामान्यत: सर्वच आर्थिक व्यवहारांवर आघात केला आहे. वीजग्राहकांसाठी वीज निर्मिती करणे आणि तिची विक्री महावितरण कंपनीला करणे हा महानिर्मितीचा व्यवसाय आहे. वीज मत्तांची उपलब्धता वीज ग्राहकांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे हे कंपनीचे महत्वाचे काम आहे म्हणून कंपनीने लॉकडाऊनच्या अवघड काळातही मागणीप्रमाणे वीज निर्मिती करण्याचे कर्तव्य चालू ठेवले. याशिवाय भारताच्या रिझर्व बँकेने सुरू केलेल्या कर्जफेड सुविधेचाही दिलासा मिळाला, त्यामुळे येत्या वर्षातील रोकड सुलभतेच्या समस्या सुटण्यास हातभार लागला. वीज पुरवठा करणे ही एक जीवनावश्यक सेवा आहे, म्हणून व्यवस्थापन असे मानते की महासाथीचा गंभीर परिणाम कंपनीवर झालेला नाही. त्यातील वित्तीय दायित्वे सुद्धा पूर्ण होऊ शकतील असा व्यवस्थापनाला विश्वास आहे.

**टिपा क्र. ४३( ड )**

महानिर्मिती कंपनी वित्तीय वर्ष २०१३-२०१४ पासून राज्याच्या वीज जाळयात रिॲक्टीव्ह वीज पुरवठा करीत आहे. महनिर्मितीने यासाठी महापारेषण कंपनीकडे ₹१४३.५२ कोटीची वीज देयके वित्तीय वर्ष २०२०-२०२१ पर्यत पाठविला. परंतू महाराष्ट्र विज नियामक आयोगाने त्यांच्या वीज दराच्या आदेशात म्हटले आहे की, भूतकाळात रिॲक्टीव्ह ऊर्जाचा समन्वय करण्याची यंत्रणा पूर्णपणे अंमलात आणली नसल्याने, तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ यासह मागील वर्षातील समायोजनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे आयोगाने त्या कालावधीतील रिॲक्टीव्ह ऊर्जा आकारांना मान्यता दिलेली नाही. (वर्ष २०१८-१९ पर्यंतची). कंपनीने वित्तीय वर्ष २०१८-१९ पर्यंतच्या रिॲ

क्टीव्ह वीज आकार याच्या समतूल्य रक्कम ₹१२६.९८ कोटी इतकी बुडीत कर्जासाठी तरतूद वित्तीय वर्षे २०१९-२० मध्ये केली आहे. मात्र वरील आदेशाविरोधात ॲपलेट न्यायाधिकरणाकडे तक्रार दाखल केली आहे,

**टिपा क्र.: ४३( इ )**

सर्वोच्च न्यायालयाने दि २८ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रादेशीक भविष्य निर्वाह निधी विरूद्ध विवेकानंद विद्यामंदीर आणि इतर या प्रकरणी निर्णय दिला. भविष्य निर्वाह निधीमध्ये अन्य काही मत्तांचा समावेश करण्यासंबंधीचा हा निर्णय आहे. कंपनी या आदेशाच्या प्रभावाने मूल्यमापन करीत आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कंपनी समूहाच्या भविष्य निर्वाह निधी विश्वस्त यांच्याशी कर्मचाऱ्यांनाही जो नियमित भरणा दिला जातो त्याचे आकस्मिक दायित्व यामुळे परिणात होऊ शकेल. त्यातील महानिर्मितीच्या रकमेचा अंदाज अद्याप निश्चित नाही. याविषयी स्पष्टता झाल्यावर रक्कम निश्चित होईल. मात्र हा परिणाम खूप मोठा नसेल असे व्यवस्थापनाचे मत आहे.

**टिपा क्र. ४४ वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांचे वर्गीकरण**

खालील तक्ता रोकडता प्रवाह दाखवते (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | | | ३१.०३.२०२० | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नफा व तोटा या पत्रकाद्वारे रास्त मूल्य | इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य | कर्जफेडीचा खर्च | नफा व तोटा या पत्रकाद्वारे रास्त मूल्य | इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य | कर्जफेडीचा खर्च |
| **वित्तीय मता** | | | | | | |
| (१) व्यापारी येणी | | | २४,५१८.१८ | | | १७,८०३.६८ |
| (२) रोख व रोख सममूल्य | | | ५७.५१ | | | ४.९३ |
| (३) वरील (२) व्यतिरिक्त बँकेतील शिल्लक | | | | | | |
| (४) कर्जे | | | ५.७७ | | | ७.६५ |
| (५) इतर वित्तीय मत्ता | | | ३,०५९.३८ | | | २,७८४.७५ |
| एकूण | - | - | २७,६४०.८४ | - | - | २०,६०१.०० |
| **वितीय दायित्वे** | | | | | | |
| (१) कर्जे - उसनवारी | | | ३२,९२५.७५ | | | ३०,८२८.८० |
| (२) व्यापारी देणी | | | ३,२८१.५७ | | | २,२५१.९३ |
| (३) इतर वित्तीय दायित्वे | | | ११,२१८.५४ | | | ९,५२१.०८ |
| एकूण | - | - | ४७,४२५.८७ | - | - | ४२,६०१.८१ |

**वित्तीय जोखीमांचे व्यवस्थापन:**

**जोखीम व्यवस्थापनांचा आकृतीबंध**

सर्व सामान्य कार्य करताना, कंपनीच्या कृतींना विविध धोक्यांना सामोरे जावे लागते. त्यातील काही धोके वित्तीय विलेखासंबंधीचे आणि हे विलेख ज्या बाजारपेठेत कार्यरत असतात त्यासंबंधी असतात. महानिर्मिती कंपनीची स्वत:ची जोखीम व्यवस्थापनाची यंत्रणा असून तिचे नियमित अंतराने संचलन केले जाते. महत्वाच्या जोखीमा संक्षिप्त स्वरूपात खाली दिलेल्या आहेत.

**४४ अ नियमकांमुळे जोखिम**

महानिर्मिती कंपनी तिच्या वार्षिक महसूल गरजा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना सादर करते. त्यांनी मंजूर केलेल्या दरपत्रकाच्या आधारे महानिर्मिती ग्राहकांना मासिक उर्जा देयके देते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेले दर या आयोगाच्या (बहुवर्षीय वीज दर) पत्रकावर आधारलेले असतात. या दरात ठराविक कालावधीनंतर सुधारणा होते. या आयोगाच्या नियमकांच्या प्रमाणक मापदंडानुसार दर निश्चिती

होते. या प्रमाणित मापदंडात किंवा नियमनाच्या मार्गदर्शक तरतुदीमध्ये कोणतेही बदल झाल्यास त्यांचे परिणाम महानिर्मितीच्या वीज विक्रीच्या महसूलावर होतात.

**४४ ब. कंपनीचे वित्तीय धोके ओळखून त्याच्या तीन श्रेणी केल्या आहेत त्या अशा १) पत जोखीम २) रोकड सुलभता ३) बाजारातील जोखीमा, या प्रत्येक श्रेणीतील धोक्यांचे उगमस्थानाचा तपशील आणि कंपनी या धोक्यांचे करीत असलेले व्यवस्थापन याचे स्पष्टीकरण खालील टिपांमध्ये केले आहे.**

**टिपा क्र. ४४ ब - १ पत जोखीमा:**

जेव्हा कंपनीचा ग्राहक किंवा अन्य व्यवहारातील संस्था तिचे करारानुसार असलेली बंधने पूर्ण करू शकत नाही, तेव्हा कंपनीला वित्तीय नुकसान करणारी पत विषयक जोखीम उद्भवते. त्यामूळे ग्राहकांकडील येणी आणि गुंतवणूकीच्या प्रतिभूती याबाबत धोके निर्माण होतात. म्हणून कंपनी संशयास्पद ऋणे, येणी आणि कमी होणारी प्राप्ती यासाठी भरपाईची तरतूद करते. तसेच व्यापारातून आणि इतर येणी व गुंतवणूकी यांचे तोट्यांचा अंदाज कंपनी करून ठेवते.

खाली दिलेल्या वित्तीय विलेखांच्या प्रकरणी पत पुरवठ्यांवर होणारे कमाल धोके हे त्यांच्या निर्देशित रकमांच्या संदर्भात मर्यादित केले जातात.

**व्यापारी येणी**

व्यापारी येण्यांच्या (चांगली मानलेल्या) अपेक्षित पत तोट्यांचा अंदाज करण्यासाठी कंपनी शासकीय बॉण्डचा, उत्पन्नाच्या संबधित वर्षासाठी सवलत घटक म्हणून वापर करते आणि अशा व्यापारी येण्यांशी संलग्न असणाऱ्या वेळेच्या मुल्यांच्या धोक्यांचे निर्धारण करते. व्यापारी येण्याचा संबंध महावितरणाला पुरविलेल्या वीजेच्या येण्याशी आहे. ही सहोदर कंपनी असल्याने तसेच सार्वभौम संस्था असल्याने तिच्या व्यवहारात पत संबंधीचा धोका असल्याचे वाटत नाही. पत संबंधातील धोके दर्शन व तोट्यांची तजवीज (अपेक्षित पत तोट्याच्या तरतुदीसह) यांची माहिती खालील तक्यात दर्शविली आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | | ३१.०३.२०२० | |
|---|---|---|---|---|
| | ठोक धरलेली रक्कम | तोट्यासाठी तजवीज | ठोक धरलेली रक्कम | तोट्यासाठी तजवीज |
| मागील येणे ०-१८० दिवस | २४,५१८.१८ | | १७,८०३.६८ | |
| मागील येणे १८०-३६० दिवस | | | | |
| ३६० पेक्षा जास्त दिवस | १६७.१५ | १६७.१५ | १६७.१५ | १६७.१५ |
| एकूण | २४,६८५.३२ | १६७.१५ | १७,९७०.८२ | १६७.१५ |

**सूचना:** वरील माहितीमधून विनादेयकाचा महसूल वगळला आहे.

या वर्षात व्यापारी येण्याच्या संदर्भातील अपेक्षित पत तोट्यासाठी केलेल्या तजवीजीचे स्थानांतर खालील तक्त्यात दिले आहे.

(₹ कोटीत)

| | |
|---|---|
| **३१.०३.२०१९ ची शिल्लक** | **१६७.१५** |
| अधिक: मान्य केलेला अपेक्षित पत तोटा | - |
| वजा: निलंबित केलेली रक्कम | |
| **३१.०३.२०२० ची शिल्लक** | **१६७.१५** |
| अधिक: मान्य केलेला अपेक्षित पत तोटा | |
| वजा: निलंबित केलेली रक्कम | |
| **३१.०३.२०२१ ची शिल्लक** | **१६७.१५** |

**रोख व रोख सममूल्य**

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| **रोख व रोख सममूल्य** | ५७.४१ | ४.९३ |

**टिपा क्र.४४ ब-रोकड सुलभतेचे धोके**

रोकड सुलभतेचे धोके म्हणजे जेव्हा कंपनी तिची वित्तीय बंधने वेळेत पूर्ण करू शकत नाही ते धोके. कंपनी तिचे व्यवहार आणि वित्तीय आश्वासने वेळेवर पूर्ण करण्याची हमी मिळावी म्हणून रोकड सुलभतेचे प्रभावी व्यवस्थापन करण्यावर लक्ष केंद्रीत करते. कंपनीच्या कर्जावर पूरेशा मर्यादा असतात, त्याला भागधारक व मंडळाची योग्य मान्यता असते. कंपनीच्या रोकड सुलभतेच्या स्त्रोतामध्ये प्रवर्तनीय रोकडता प्रवाह. रोख व समतूल्य बँकाचे निधी व विना निधी आधारीत प्रवाह यांचा समावेश होतो. उद्योग व्यवसायाचे काम सुरळीत व सतत चालू रहावे यासाठी रोख व निधी प्रवाह व्यवस्थापन याकडे लक्ष दिले जाते.

**१ ) वित्तीय रचना:**

कंपनीच्या विविध बँकातील निधी व विनानिधी यावर मर्यादा असतात. कंपनीचे भागधारक आणि मंडळ यांनी मंजूर केलेल्या कर्ज, उसनवारी यांच्या मर्यादा पुरेशा आहेत. कंपनीच्या पतस्थितीला दर्जा देणाऱ्या नामांकित संस्थांकडून चांगला दर्जा मिळाल्यास देशांतर्गत बाजारपूठेकडून निधी प्राप्त होण्यास त्याची मदत मिळते. निधीच्या स्त्रोताची विविधता आणि शक्तीवान रोकडता प्रवाह आवश्यक भांडवली शिस्त राखण्यासाठी सक्षम असते. महानिर्मिती कंपनीने तिच्या भांडवली पुरवठ्याच्या रचनेत विविधता ठेवली आहे. यामध्ये कालानुसार मुदत पूर्ण होणाऱ्या ठेवी आणि चलनी पैसा यांच्या वित्तीय उत्पादनाचे मिश्रण आहे. या वित्तीय उत्पादनामध्ये खरेदीदारांचे क्रेडीट लोन, स्वच्छ व प्रतिभूती असलेली देशातंर्गत मुदतीची कर्जे (भारत सरकार, महाराष्ट्र शासनाकडून व महाराष्ट्र सरकारकडून परतफेडीची वसूली करण्याचा तत्त्वावर) इत्यादी यांचा समावेश होतो. महानिर्मिती कंपनी देशातंर्गत तसेच जागतिक बँक, आय. बी. आर. डी. आणि के एफ डब्ल्यू यासारख्या परदेशी वित्तीय संस्थांशी संपर्क साधून योग्य प्रकारे विविध स्वरूपात निधी मिळविते. यामध्ये भौगोलिक वैविध्यही आहे.

**२ ) वित्तीय दायित्वांची मुदत पूर्ण होणे**

करारानुसार आणि पात्र नसलेल्या रोकडता प्रवाहातील रकमा खालील तक्त्यात प्रकट केल्या आहेत

(₹ कोटीत)

| तपशील | कंत्राटचा रोकडता प्रवाह | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०२१ | | | ३१.०३.२०२० | | |
| | १ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा अधिक | १ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा अधिक |
| **डेरिव्हेटीव्ह नसलेले वित्तीय दायित्वे** | | | | | | |
| कर्जे (दीर्घ मुदतीत) | ३,९९८.४३ | ६,११०.७६ | १६,३४१.४४ | ३,३४०.४५ | ६,१६२.५० | १६,५६४.५१ |
| खेळत्या भांडवलातील उसनवारी | १०,४७३.५५ | | | ८,१०१.७९ | | |
| व्यापारी येणी | ३,२८१.५७ | | | २,२५१.९३ | | |
| इतर दायित्वे | ११,२१८.५४ | | | ९,५२१.०८ | | |
| **एकूण** | **२८,९७२.०९** | **६,११०.७६** | **१६,३४१.४४** | **२३,२१५.२५** | **६,१६२.५०** | **१६,५६४.५१** |

**टिपा क्र. ४४ क - बाजारपेठेतील धोके**

**बाजारातील धोक्यांचे पुढील तीन धोक्यांमध्ये वर्गीकरण केले आहे.**

**टिपा क्र. ४४ क - चलनातील धोके**

कंपनीने के एफ डब्ल्यू जर्मनी आणि जागतिक बँक (आय बी आर डी) यांचेकडून परकीय चलनात घेतलेल्या कर्जांना परकीय चलनातील बदलाचे धोके संभवतात. आम्हांला ४.९२ कोटी यूरो आणि ३.८६ कोटी यू एस डॉलर अशी कर्जे आढळली. मात्र कंपनी दर नियमनाच्या वातावरणात काम करते परिणामी परकीय चलनातील बदलाची समस्या प्रत्यक्ष ग्राहकांकडील वसूलीने हातात येऊ शकते. म्हणून परकीय चलनातील बदलांचा मोठा धोका कंपनीला नाही.

**टिपा क्र. ४४ क - २ व्याजदरातील धोके**

व्याज दरातील धोके हाताळणे.

| तपशील | निर्देशित रक्कम ₹ कोटीत | |
|---|---|---|
| | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० |
| **स्थिर दरांचे विलेख** | | |
| वित्तीय मत्ता | - | - |
| वित्तीय दायित्वे | ४०५.९६ | ४०८.९४ |
| **दर बदल होणारे विलेख** | | |
| वित्तीय मत्ता | - | - |
| वित्तीय दायित्वे | ३६,५१८.२३ | ३३,७६०.३२ |

**दर बदल होणाऱ्या विलेखासाठी रोकडता प्रवाहाचे सूक्ष्म ग्रहीता विश्लेषण**

अहवालाच्या तारखेला व्याज दरात २५ आधार बिंदू इतका रास्त व शक्य बदल झाला असता तर त्यामुळे नफा किंवा तोटा यात होणारी वाढ/(घट) खालील तक्त्यात दिली आहे. तसेच निर्दशक २५ आधार बिंदू (०.२५ टक्के) स्थलांतर हे केवळ दिशादर्शक आहे आणि त्यातून व्यवस्थापनाचे व्याज दर बदलाचे अंदाज व्यक्त होत नाहीत.

या विश्लेषणात असे गृहित धरले आहे की, इतर सर्व फरक, विचलन विशेषतः परकिय चलन विनिमय दर हे स्थिर आहेत.

| तपशील | नफा किंवा तोटा | | | |
|---|---|---|---|---|
| | २५ आधार बिंदू वाढ | २५ आधार बिंदू घट | २५ आधार बिंदू वाढ | २५ आधार बिंदू घट |
| | ३१.०३.२०२१ | | ३१.०३.२०२० | |
| तरता दराचे कर्ज | ९१.३० | (९१.३०) | ८४.४० | (८४.४०) |
| व्याज दर अदलाबदल (संकल्पनेतील मुद्दल रक्कम) | - | - | - | - |
| रोकडता प्रवाहाची संवेदनशिलता (निव्वळ) | ९१.३० | (९१.३०) | ८४.४० | (८४.४०) |

**टिपा क्र.४४ सी - ३ वस्तू संबंधी धोके**

कंपनीचे कार्य हे जेथे दराचे नियमन केले जाते अशा वातावरणात चालते. कंपनीच्या खर्चात मुख्य वाटा कोळशाच्या खर्चाचा आहे. कोळसा खर्चातील प्रत्यक्ष बदलाची वसूली ग्राहकांच्या येण्यातून करण्यास परवानगी आहे. मात्र ती कामगिरीचे मापदंड पूर्ण करण्याच्या अटीच्या अधीन आहे. म्हणून कोळसा किंमतीतील बदलाचा कंपनीस मोठा धोका नाही.

**टिपा क्र. ४५ भाडेपट्टी**

**अ ) भाडेकरू म्हणून भाडेपट्टी**

महानिर्मिती कंपनी जलविद्युत निर्मिती केंद्रे, जमिनी, कार्यालयाच्या जागा, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने आदि हेतूसाठी भाड्याने जागा कराराने घेते. हे करार रद्द करणे / न करणे अशा स्वरूपाचे असतात. भारतीय लेखा मानक ११६ यातील बंधनकारक तरतूदीनुसार कंपनीने तिच्या ताळेबंदात मत्ता वापरण्याचे हक्क आणि त्यानुसार भाड्याचे दायित्व यांना मान्यता दिलेली आहे. याचा परिणाम म्हणून भाड्याच्या मत्तांचा घसारा आणि भाडेपट्टीच्या दायित्वांचे व्याज याना नफा-तोटा पत्रकात मान्यता देण्यात आलेली आहे.

रद्द न करण्याच्या भाडेपट्टीच्या देय रक्कमेचा संदर्भात अघोषित रोख बहिर्गमन.

**अ ) भाड्याच्या दायित्वांतील बदल** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरीता | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षाकरीता |
|---|---|---|
| **१ एप्रिल २०२० रोजीची शिल्लक** | **३,५३८.१८** | **-** |
| भर | | ३६८५.५१ |
| या मुदतीत उपार्जित वित्त खर्च | ३६२.६९ | ३७७.७२ |
| भाडेपट्टी दायित्वाचा भरणा | ५१३.५८ | ५२५.०६ |
| **३१ मार्च २०२१ रोजीची शिल्लक** | **३३८७.२९** | **३५३८.१८** |

**ब ) भाडेपट्टी दायित्वाच्या मुदतपूर्तीचे विश्लेषण** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरीता | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षाकरीता |
|---|---|---|
| मुदतपूर्तीचे विश्लेषण-कंत्राटानुसार विना सवलतीचा रोकडता प्रवाह | | |
| एक वर्षासाठी | ४७१.०५ | ४८०.७८ |
| एक ते पाच वर्षासाठी | १७९६.५९ | २२६७.६४ |
| पाच वर्षापेक्षा जास्त | ४६९५.५४ | ४६९५.५४ |
| **एकूण विनासवलत भाडे दायित्व** | **६९६३.१८** | **७४४३.९६** |

**क ) नफा तोटा पत्रकात मान्यता दिलेल्या रकमा** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरीता | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षाकरीता |
|---|---|---|
| भाडेपट्टी दायित्वाचे व्याज | ३६२.६९ | ३७७.७२ |
| भाडेपट्टीच्या मत्ताचा घसारा | २५४.०४ | २५३.९४ |

**वीज खरेदी व्यवस्थेत भाडेपट्टीची निश्चिती**

महानिर्मिती कंपनीने महावितरण या कंपनी सोबत वीज खरेदी करार केलेला आहे. महानिर्मितीने निर्माण केलेल्या विजेचा बहुतांश वाटा महावितरणला विकण्यात येतो, म्हणून भारतीय लेखा मानक १७ मधील परिशिष्ट सी यातील अटीनुसार कंपनीने वीज खरेदी कराराचे परिक्षण केले. जेणेकरून या व्यवस्थेत भाडेपट्टी संबंधी तरतूद आहे किंवा कसे हे समजावे. त्यातून असे निदर्शनास आले की, या करारानुसार महावितरण कंपनीला मत्ता वापरण्याचा हक्क आहे. मात्र वीज निर्मितीसाठी उपलब्ध वीज केंद्राची देखभाल केलेली नसल्यामुळे होणारे तोटे महानिर्मिती कंपनीला सोसावे लागतील. त्यासाठी या मर्यादेतील जोखिमा आणि मोबदले यांचे महावितरणकडे हस्तांतरण केलेले नाही. यामुळे ही व्यवस्था

वित्तीय भाडेपट्टीचे निकष पूर्ण करीत नाही.

**टिपा क्र. ४६ प्रतिभाग मिळकत**

समभाग धारकांना देय असलेल्या प्रतीभाग मिळकतीचा हिशेब वर्षातील नफ्याला त्यावर्षातील वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सच्या संख्येने भागून केला जातो.

सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीचा हिशेब भागधारकांना देय असलेल्या वर्षातील निव्वळ नफा किंवा तोटा यास वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सच्या संस्थेने भागून काढला जातो.

त्यासाठी सौम्य करण्याजोग्या जे सर्व संभाव्य इक्विटी शेअर्स दिले गेले असते त्याची वेटेड ॲव्हरेज संख्या प्रतिभाग मिळकतीचा हिशेब करण्यासाठी विचारात घेण्यात येते, महाराष्ट्र शासनाने सूत्रधारी कंपनीमार्फत जी बांधिलकी वाटप प्रलंबित असलेल्या शेअर ॲप्लीकेशन मनीसाठी दिलेला आहे, त्याचे वाटप कायम झालेले आहे असे समजण्यात आले आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| समभाग धारकांना देय नफा: मूळ प्रतिभाग मिळकतीसाठी (₹) | २७५.६३ | १५९.९४ |
| समभाग धारकांना देय नफा: सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीसाठी (₹) | २७५.६३ | १५९.९४ |

**२. सामान्य वेटेड ॲव्हरेज शेअर्सची संख्या:** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० |
|---|---|---|
| दिलेल्या तारखेला समभागाची संख्या | २५,४१०,०९६,९११ | २५,४१७,३८१,०४८ |
| मूळ आणि सौम्यकृत प्रतिभाग मिळकती साठा वेटेड ॲव्हरेज शेअर्सची संख्या | २५,४१०,०९६,९११ | २५,४१७,३८१,०४८ |
| मूळ आणि सौम्यकृत प्रतिभाग मिळकत (₹) | ०.११ | ०.०६ |

**टिपा क्र. ४७ भांडवल व्यवस्थापन**

कंपनीच्या भागधारकांना विश्वास कायम असावा आणि भविष्यात उद्योग कायम चालावा यासाठी शक्तीशाली भांडवल पाया असला पाहिजे असे कंपनीचे धोरण आहे. भांडवलाच्या परताव्याकडे व्यवस्थापन लक्ष देत असते. त्यासाठी कंपनी कर्ज व समभाग यांच्या गुणोत्तराचा उपयोग करून भांडवलाचे निरिक्षण करते.

दि. ३१ मार्च २०२१ रोजी कंपनीचे कर्ज समभाग गूणोत्तर खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० |
|---|---|---|
| दिर्घ मुदतीची कर्जे (₹ कोटीत) | २२,४५२.२० | २२,७२७.०१ |
| समभाग भांडवल (₹ कोटीत) | २५,४०७.३९७ | २५,३४३.९७ |
| कर्ज व समभाग यांचे गुणोत्तर | ०.८८ | ०.९० |

**टिपा क्र. ४८ लाभांश**

कंपनीने आतापर्यंत लाभांश घोषित केलेला नाही.

**टिपा क्र. ४९ मागील वर्षाच्या आकडेवारीचे जेथे गरज असेल तेथे पुर्नवर्गीकरण केलेले आहे.**

## स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति, मा. सदस्य, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,

**एकत्रित वित्तीय विवरण अहवाल**

**पात्रतेचे मत**

**आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड** (या पुढे या कंपनीचा उल्लेख ''सुत्रधारी कंपनी''/महानिर्मिती/महाजनको असा केला आहे) आणि या कंपनीच्या तीन उपकंपन्या, (कंपनी आणि तिच्या ३ उपकंपन्या यांचा पुढे उल्लेख ''कंपनी समुह'' असा केला आहे) आणि दोन सहयोगी कंपन्या यांचा ३१ मार्च २०२१ रोजीचे एकत्रित ताळेबंद पत्रक, याच तारखेला संपलेल्या वर्षांचे एकत्रित नफा व तोटा पत्रक (इतर सर्वकष उत्पन्नासह), एकत्रित रोकडता प्रवाह, एकत्रित वर्षभरातील समभाग शेअर बदलाचे पत्रक तसेच संक्षिप्त महत्त्वाची लेखा धोरणे आणि इतर माहितीची स्पष्टिकरण यांचा समावेश होतो. (यानंतर यांचा उल्लेख एकत्रित वित्तीय विवरण असा केला आहे.)

आमच्या मते, आणि आमचे सर्वोतोपरी ज्ञान तसेच आम्हास दिलेली स्पष्टिकरणे त्यानुसार *आमच्या अहवालातील 'पात्र मताचा आधार यात वर्णन केलेल्या विषयांचे संभाव्य परिणाम आणि त्याच्या रोकडता यांचा अपवाद वगळता,* वरील एकत्रित वित्तीय विवरण पत्रके कंपनी अधिनियम २०१३ ('अधिनियम') यातील आवश्यकता प्रमाणे आणि त्यात विहित असलेल्या पद्धतीनुसार आणि भारतात सर्व सामान्यपणे स्वीकृती असलेल्या लेखा तत्वांशी सुसंगत ठरेल अशा प्रकारे उपरोक्त एकत्रित वित्तीय विवरण पत्रके या कंपनी समुहातील स्थितीचे, त्यांचा एकत्रित नफा (इतर सर्वकष उत्पन्नासह) आणि एकत्रित समभागाचे आणि एकत्रित रोकडता प्रवाहाचे सत्य आणि रास्त दर्शने घडवितात.

**पात्रतेच्या मतांचा आधार**

१. *सूत्रधारी कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) च्या चालू वित्तीय वर्षाच्या देयकांच्या विलंबित भरणा आकाराचे (डी पी एस) व्याजाला महसूलात मान्यता देण्यांची पध्दत चालू ठेवली आहे. चालू आर्थिक वर्षासाठी ही रक्कम ₹२५११.५१ कोटी झाली आहे (३१ मार्च २०२१ पर्यंतची संचित रक्कम ₹१४८६२.१० कोटी झाली आहे.) ही रक्कम कंपनीने वीज खरेदी करारातील अटी आणि संबंधित बहू वर्षीय वीज दर नियमने यानुसार अंगिकारलेल्या हिशेबाच्या पद्धतीनुसार आहे. दि. ३१ मार्च २०२१ पर्यंतच्या देयकातील विलंब भरणा आकाराची रक्कम पूर्णपणे वसूली होऊ शकणार नाही आणि वसूली संशयास्पद आहे कारण महावितरणने या विषयी वाद व्यक्त केला असून तिचा स्वीकार आय भरणा केलेला नाही. महावितरणने सूत्रधारी कंपनीला कळविले आहे की, महावितरणने या डी पी एस साठी एकतर्फी वेगळी हिशेब पद्धती अंगिकारली आहे. महावितरणच्या मत्ते ही रक्कम फक्त ₹४११२.२७ कोटी होती. यामुळे महानिर्मितीच्या देयकातील डी पी एस रक्कम आणि महावितरणने तिच्या पद्धतीने हिशेब केलेली डी पी एस रक्कम यात ₹१०७४९.८३ कोटीचा एवढा प्रचंड फरक आहे. या वादाचा अंतिम निर्णय, अंतिम समझोता प्रलंबित आहे. महावितरण सोबतचा वाद चालू असल्याने या संशयास्पद वसुलीच्या डी पी एस साठी कोणतीही निश्चिती नसल्याने आणि महावितरण व महानिर्मिती यांना मान्य होईल असा तोडगा झाला नसल्याने यातील अपेक्षित पत हानीसाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. (संदर्भ एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांची टिपा क्र. ४३ बी).*

२. *विशेषत: पुढील बाबींकडे लक्ष वेधण्यात येते – अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला वीज खरेदी करारानुसार पुरवठा केलेल्या विजेचे ₹ २७०४०.४८ कोटी (यात चालू वर्षाच्या विना देयक महसूल ₹ २५११.५१ कोटी समाविष्ट आहे) एवढी शिल्लक वर्षाअखेर वसूली योग्य आहे. महावितरणने महानिर्मितीला देय असलेल्या पैकी ₹१५९५७.२४ कोटी कायम केली आहे. या शिल्लकीचा मेळ दोन्ही कंपन्यांनी संयुक्तपणे केला. आम्हास देण्यात आलेल्या माहिती प्रमाणे या समस्येचे निराकरण झाल्यानंतर वादग्रस्त रकमेचा अंतिम लेखा सुधारणा आणि समायोजन केले जाईल. ब) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (महापारेषण) यांच्याकडे वसुली योग्य शिल्लक ₹१४३.५२ कोटी ही कायम व मेळ करण्याच्या अधीन आहे. मात्र आम्हास माहिती देण्यात आली की, कंपनीने पुष्टी करण्यासाठी पत्रे व स्मरण पत्रे पाठविली परंतु त्याची उत्तरे मिळाली नाहीत. लेखापरिक्षणासाठी पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने वरील (अ) आणि (ब) यांचे नफ्यावर होऊ शकणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत मत देण्यात आम्ही असमर्थ आहोत.*

३. कोळसा कंपन्याच्या शिल्लकी संबंधित कंपन्यांकडून खात्री व मेळ करण्याच्या अधीन आहेत आमच्या मते कंपनी मध्ये सामान्य खातेवही शिल्लकवर आधारीत मेळ करण्यात आला नाही, त्यामुळे त्याचा कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर आम्हाला भाष्य करता येत नाही.

कंपनी निहाय थकीत अग्रिमाचा तपशील खालीलप्रमाणे (₹ कोटीत)

| *पुरवठादारांची नावे* | *महानिर्मितीच्या लेख्याप्रमाणे ३१.०३.२०२१ रोजीची शिल्लक* |
|---|---|
| *सिंगरेनी कोलायरीज लिमिटेड* | *१२४.८४ जमा नोंद* |
| *साऊथ इस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड* | *२५२.१७ खर्च नोंद* |
| *वेस्टर्न कोल्डफिल्ड लिमिटेड* | *२०१३.४४ जमा नोंद* |
| *महानदी कोल्डफिल्ड लिमिटेड* | *१२०.१६ जमा नोंद* |
| ***एकूण*** | ***२००६.२७ जमा नोंद*** |

*खात्री आणि मेळ पूर्ण करणे प्रलंबित असल्याने आणि कोळसा कंपन्यांनी पाठवलेल्या प्रोत्साहक देयकांसाठी, कोळसा कमी उचलण्याबद्दल तरतुद केलेली नाही. कमी पुरवठा आणि दर्जा घट या विषयी कोळसा कंपन्यांकडे काही प्रतिदावे मांडले आहेत जमे कोणश्याचा कमी पुरवठा, कमी गुणवत्ता इत्यादी. हे दावे आणि प्रतिदावे अमल्यामुळे या सर्वाचा प्रभाव अनिश्चित आहे. जसे कोळश्याचा कमी पुरवठा, कमी गुणवत्ता इत्यादी. हे दावे आणि प्रतिदावे असल्यामुळे या सर्वांचा प्रभाव अनिश्चित आहे. या कारणांमुळे कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकांवर पडू शकणाऱ्या प्रभावाविषयी अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत*

४. *रेल्वे कंपन्यांकडील शिल्लकी कायम होण्याच्या अधीन आहेत. बहुतेक शिल्लकी मागील वर्षातील जुन्या असमायोजित थकीत रकमेबाबत आहेत. त्याची ठळक माहिती खालीलप्रमाणे आहे.*

(₹ कोटीत)

| *पुरवठादारांची नावे* | *महानिर्मितीच्या लेख्याप्रमाणे ३१.०३.२०२१ रोजीची शिल्लक* |
|---|---|
| *दक्षिण मध्य रेल्वे (खाते क्र. ३००००)* | *६.८६ खर्च नोंद* |
| *दक्षिण पुर्व मध्य रेल्वे (खाते क्र. ३०००१)* | *४३.६६ खर्च नोंद* |
| *मध्य रेल्वे (खाते क्र. ४३०००)* | *३१.१५ खर्च नोंद* |
| ***एकूण*** | ***८१.६८ खर्च नोंद*** |

*कायम / मेळ पुर्ण करणे प्रलंबित असल्याने, त्याचे वित्तीय नोंदवह्यात परिणामकारक समायोजने करता आलेली नाही. त्यामुळे या बाबींचे कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकावर होऊ शकणाऱ्या परिणामांबाबत आम्ही मत देऊ शकत नाही.*

५. *व्यापारी येणे कर्ज आणि अग्रिमे, ठेवी आणि व्यापारी देणी यांच्या शिल्लकी, संबंधित व्यक्ती - संस्था यांचेकडून खातरजमा करणे आणि/किंवा त्याप्रमाणे मेळ केला जाणे यांच्या अधीन आहेत अशी निश्चिती आणि मेळ करणे प्रलंबित असल्याने त्यांची परिणाम स्वरूप समायोजने केलेली नाहीत. मात्र आम्हांला माहिती देण्यात आली की, कंपनीने तिच्या पुरवठादारांना याविषयी पत्रे दिली असून जेथे जेथे शिलकीची खातरजमा मिळत आहे त्यांचा मेळ करण्यात येत आहे. तसेच आम्हांला सांगण्यात आले की, असे मेळ करणे ही कंपनीत सतत चालू असलेली प्रक्रिया असते. लेखा परिक्षणासाठी पुरेसे आणि योग्य पुरावे नसल्यामुळे या शिलकीचा जर काही प्रभाव होणार असेल तर त्याबाबत आणि त्यामुळे कंपनीच्या या वर्षीच्या फायद्याबाबत मात्र आम्ही अभिप्राय देण्यास असमर्थ आहोत.*

आम्ही आमचे लेखापरिक्षण कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३(१०) यात निर्देशित केलेल्या लेखा परिक्षणाची मानके याप्रमाणे पार पाडले केली आहे. या प्रमाणकांप्रमाणे आमच्या जबाबदाऱ्यांचे अधिक तपशीलवार वर्णन आमच्या अहवालातील एकत्रित वित्तीय विवरण पत्राचे लेखापरिक्षणा संबंधी लेखापरिक्षणाच्या जबाबदाऱ्या या विभागात दिल्या आहेत. कंपनी कायदा २०१३ यातील तरतुदीनुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या आमच्या लेखा परिक्षणा संबंधीत नैतिक आवश्यकता आणि भारतीय सनदी लेखापाल संस्थाने जारी केलेली आचारसंहिता यांच्या अनुषंगाने आम्ही या कंपनीपासून स्वतंत्र आहोत आणि आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत आणि आमचा विश्वास आहे की, आमच्या मतांना योग्य तो आधार देणारे पुरेसे आणि योग्य पुरावे आम्ही मिळविले आहेत.

**भर देण्याची प्रकरणे -**

आम्ही खालील टिपांकडे लक्ष वेधतो.

**सूत्रधारी कंपनी:**

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.**

१. टिपा क्र. ४५(ए-ए): ही विविध जलविद्युत केंद्रातील सुविधांबाबत महाराष्ट्र शासना सोबत करावयाच्या भाडेपट्टी करारा संबंधी असून त्याबाबत कार्यवाही अद्याप करावयाची आहे..

२. टिपा क्र. ४३(इ) मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांसंबंधी आहे. त्यानूसार कर्मचाऱ्यांना दिलेल्या काही विशिष्ट भत्यांना मिळकतीचा भाग समजून त्याचा विचार कर्मचारी भविष्य निर्वाह निधीत समाविष्ट करण्यासंबंधी हा निर्णय आहे. याबाबत कंपनीच्या व्यवस्थपनाचे मत अद्याप निश्चित आकारात यावयाचे आहे त्यामुळे त्याच्या परिणामांना अंदाज करता येत नाही.

वरील विषयाचे आमचे अभिप्राय पात्रतेनुसार नाही.

**उपकंपनी महागूज कोलायरीज लिमिटेड**

१. एकत्रित वित्तीय विवरण पत्राचा भाग असलेली टिपा क्र. ४१(ए) यामधे या कंपनीने मच्छाकाटा महानदी कोळसा ब्लॉक च्या विकासासाठी मागील काही वर्षात केलेला खर्च ₹ ५४,४०,७०,१११/- याची तरतूद केलेली नाही. सदर ब्लॉक मा. सर्वोच्च न्यायालयात २०१४ मध्ये दिलेल्या निर्णयानंतर रद्द झाला आणि त्याच्या खर्चाच्या प्रतिपूर्तिचा विचार कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी अद्याप केलेला नाही. कारण त्या ब्लॉकचे वितरण अन्य नव्या संस्थेला आजपावेतो केले नाही. व्यवस्थापनाचे असे मत आहे की मूल्यांकनाची प्रक्रियांचे अंतिमीकरण झाल्यावर आणि सदर कोळसा ब्लॉक अन्य संस्थेला देण्याचे भारत सरकार कोळसा मंत्रालयाने मंजूर केल्यावरच याबाबत समायोजन/तरतूद करता येईल.

२. लेख्यांच्या टिपा यामधील टिपा क्र. १.१: महत्वाची लेखा धोरणे याविषयी आहे. त्यात असे निर्देशित केलेले आहे की, या कंपनीचे तोटे संचित झाले आणि या कंपनीने तिच्या पालक कंपन्यांकडून घेतलेला कर्ज वगळता, कंपनीचे निव्वळ मोल पूर्णपणे संपले. या कंपनीला चालू व मागील वर्षी निव्वळ तोटा ₹ ३,२७,५६,३९३/- झाला. तसेच ताळेबंदाच्या तारखेला चालू दायित्वे चालू मत्ता पेक्षा जास्त झाली. या स्थितीमुळे कंपनी 'चालू असणारी संस्था' या प्रकारे अस्तित्वात राहील काय याविषयी मोठ्या प्रमाणात संशय आहे. मात्र कंपनीची वित्तीय विवरण पत्रके 'चालू असलेली संस्था' या तत्वाच्या आधारे तयार करण्यात आलेले आहेत. त्यासाठी वित्तीय विवरण पत्रकाचा भाग असलेल्या लेखा धोरणा संबंधीची टिपा क्र. १.१ यात कारणे नमूद केली आहे.

मात्र त्याचा एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावर परिणाम होत नाही कारण सुत्रधारी कंपनीने 'लाइन बाय लाइन एकत्रिकरण' केले आहे.

३. वित्तीय विवरण पत्राची टिपा क्र. ४१ (१) (११) यामध्ये कंपनी विरोधात मेसर्स अदानी एंटरप्रायझेस लिमिटेड ने दाखला केलेल्या कायदेशीर दाव्याच्या निर्णयासंबंधात अनिश्चितता वर्णन केलेली आहे आणि लवादाच्या निर्णयावर अनिश्चितता व्यक्त केली आहे.

या विषयावर आमचे पात्र मत नाही.

**लेखा परिक्षणातील महत्त्वाच्या बाबी**

**सूत्रधारी कंपनी : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.**

लेखा परिक्षण विषयक महत्वांची प्रकरणे म्हणजे अशी की जी विद्यमान काळातील एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे आम्ही केलेल्या लेखा परिक्षणात, आमच्या व्यवसायिक न्याय निर्णय बुद्धीच्या मते आम्हांला महत्वाची वाटली. आम्ही एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाचे संपूर्णपणे लेखा परिक्षण केले. त्या संदर्भात या महत्वाच्या विषयावर आम्ही लक्ष दिले आणि आमचे मत तयार करताना आम्ही त्यावर वेगळे मत दिलेले नाही. सूत्रधारी कंपनीच्या बाबत आम्ही या वर्षात खालील प्रकरणे ही लेखा परिक्षणाच्या दृष्टिने महत्वाची असल्याचे निश्चित केले आहे.

**आकस्मित दायित्वे/आकस्मित मत्ता**

कंपनीच्या विरोधात विविध मंचा समोर बरीच कायदेविषयक प्रकरणे प्रलंबित आहेत. व्यवस्थापनाने यातील रकमांबद्दल अंदाज करून तेवढे आकस्मित दायित्व प्रकट करणे आवश्यक आहे. तसेच आकस्मिक दायित्वाच्या रक्कमेचा अंदाज करण्यासाठी व्यवस्थापनाचा न्याय्य निर्णय आवश्यक आहे. कोळसा कंपन्यानी महानिर्मितीवर विविध दावे केले असून व्यवस्थापनाने त्याच्या आकलनानुसार प्रतिदावे केले आहेत.

आम्ही याबाबीची महत्वाची लेखा परिक्षण बाब अशी निश्चिती केली आहे. कारण या प्रकरणांचा अर्थ, व्यवस्थापनाच्या न्याय निर्णय बुद्धीवर

अवलंबून असतो. तो व्यवस्थापनाच्या पूर्वग्रहाच्या अधीन असतो. असे दावे व प्रतिदावे करण्यासाठी व्यवस्थापनाने अंदाज करणे विविध विषयांचे मर्म ओळखणे, त्यातील समस्यांचे आकलन करणे आवश्यक असून त्यांचे स्वरूप व्यक्तिगत असते.

(एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाची टिपा क्र. ४१(१) आणि ४१(४) एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे वाचन लेखा धोरणातील परिच्छेद क्र. २१ सोबत करण्यात येते.)

आम्ही कंपनीची आकस्मिक दायित्वे आणि आकस्मिक मत्ता यांचे अंदाज व प्रगटन करणे याविषयाची कंपनीच्या अंतर्गत सूचना व कार्यपद्धती जाणून घेतली आणि खालील कार्यपद्धती अनूसरली.

- प्रलंबित कायदे विषयक खटले बाबत सर्वोतोपरी माहिती मिळविण्यासाठी व्यवस्थापनाची जी रचना व नियंत्रणे स्थापित केली ती समजून घेऊन तिचे परिक्षण केले.
- या कायदे विषयक प्रकरणातील प्रत्येक आणि अद्यावत घडामोडी याविषयी व्यवस्थापनाशी चर्चा केली.
- या कायदे विषयक प्रकरणासंबंधीत विविध पत्रव्यवहार, कागदपत्रे आणि जर काही व्यवस्थापनाने कायदे विषयी बाह्य मते मिळवली असतील तर त्यांचे अवलोकन केले आणि आकस्मित दायित्वे व मत्ता यांच्या प्रकटनाला पुष्टि देण्याऱ्या महत्वाच्या बाबींचा हिशेब तपासला.
- व्यवस्थापनाचे न्यायनिर्णय आणि आवश्यक तरतूदींचे निर्धारण प्रमाण यांचे परिक्षण केले.
- प्रकटनांची परिपूर्णता व योग्यता यांचा आढावा घेतला.

वरील कार्य पद्धतीच्या अंमजबजावणीच्या आधारे असे अनेक आकस्मिक दायित्वे आणि आकस्मिक मत्ता यविषयीचे अंदाज आणि प्रकटने ही पुरेशी आणि योग्य आहेत.

**उपकंपनी : धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड**

**१. 'चालू असणारी कंपनी' या स्थिती संबंधी अनिश्चिती :**

या कंपनीचे लेखे 'चालू असलेली संस्था' या तत्वाच्या आधारे केलेले नाही कारण व्यवस्थापनाने ही कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. (वित्तीय विवरण पत्रकातील या कंपनीचा टिपा क्र. २.१ विभाग पहावा)

**२. कोविड-१९ चा बिझनेस मॉडेल वर प्रभाव :**

ही कंपनी निष्क्रीय स्थितीत आहे आणि तिची वित्तीय विवरण पत्रके 'चालू असलेली कंपनी' या तत्वानुसार तयार केलेली नाही. म्हणून बिझनेस मॉडेल वर कोविड-१९ चा प्रभाव झालेला नाही.

**३. प्रगती पथावरील कामावर ₹ ८.२३ कोटी खर्च झाला असून त्याची वसुली योग्य मूल्य रु. निरंक आहे.**

चालू नसलेल्या मत्ता यामध्ये 'प्रगती पथावरील कामे' यांचा खर्च ₹ ८.२३ कोटी दाखविले आहे. मात्र ज्या प्रकल्पावर हा खर्च केला ते बंद करण्यात आले आहेत त्यामुळे त्यांचे वसुलीयोग्य मूल्य नाही.

मात्र याचा एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावर कोणताही परिणाम होणार नाही कारण सूत्रधारी कंपनीने 'लाईन बाय लाईन' एकत्रीकरण केले आहे.

**उपकंपनी : महाजनको ॲश मॅनेजमेंट सर्विसेस लिमिटेड :**

या कंपनीला दिनांक ३१.०३.२०२१ रोजी ₹ ५०५४/- तोटा झाला असून संचित तोटा ₹ १,४७,०२,९८६/- इतका आहे. यामुळे कंपनीचे निव्वळ मोलात घट झाली आहे. या कंपनीच्या 'चालू असलेली संस्था' या दर्जाला बाधा निर्माण झाली आहे. व्यवस्थापनाचा दृष्टिकोन असा आहे की येत्या काळात विविध कामे आणि प्रकल्प सुरु करावेत. सूत्रधारी कंपनीचे उद्योग चालन आणि स्थिती या विचाराने या कंपनीचे लेखे 'चालू असलेली संस्था' या प्रकारे केले आहे.

**कोविड-१९ मुळे झालेली गुंतागुंतीची स्थिती :**

या विद्यमान अहवालात व्यक्त केलेले मत हे प्रामुख्याने व्यवस्थापनाने इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून उपलब्ध केलेली माहिती, वस्तूस्थिति आणि अंतर्गत आधार सामग्री याच्या आधारे तयार केलेली आहे. यामुळे लेखा परिक्षणासाठी आम्ही डिजीटल प्रकाराने पुरविलेल्या माहितीवर विसंबून काम केले. याशिवाय व्यवस्थापनाच्या अंदाजानुसार, भारत सरकारच्या लॉकडाऊनमुळे आणि या आजाराच्या जागतीक

व्यापामुळे कंपनीने काही कामे प्रकल्प सुरु करणे यास आणखी विलंब लागू शकेल.

आम्ही या उपकंपनी विषयी टिपा क्र. १५ कडे आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यामध्ये कोविड-१९ साथ, त्यामुळे झालेले लॉकडाऊन आणि अनिश्चितता यामुळे वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठीच्या अंदाज करण्यात महत्त्वापूर्ण समस्या आल्या, असे व्यवस्थापनाने निर्धारित केले. हे अंदाज रोकड सुलभता आणि चालू असलेली संस्था, मत्तांचे वसुलीयोग्य मूल्य आणि इतर मत्तांचे निव्वळ वसुली योग्य मूल्य या विषयीच फक्त मर्यादित नाहीत. आम्हाला दिलेली अद्ययावत माहिती या नुसार व्यवस्थापनाचा असा विश्वास आहे की, वित्तीय निष्कर्षासाठी आणखी समायोजने करण्याची आवश्यकता नाही. वरील विषयावर आमचे पात्र मत दिलेले नाही.

मात्र याचा एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावर मोठा परिणाम होत नाही कारण सूत्रधारी कंपनीने 'लाईन बाय लाईन' पध्तीने एकत्रीकरण केलेले आहे.

**''एकत्रित वित्तीय विवरण पत्रके आणि त्यावरील लेखापरिक्षणांचा अहवाल या व्यतिरिक्त इतर माहिती''**

कंपनीचे संचालक मंडळ हे इतर माहितीसाठी जबाबदार असतात. कंपनीची इतर माहिती संचालक मंडळाचा अहवाल आणि इतर जोडपत्रे परिशिष्टे यात समाविष्ट असते. परंतु त्याला एकत्रित वित्तीय विवरण पत्रके आणि त्यावरील लेखा परिक्षकांचा अहवाल यात समाविष्ट नसतो.

एकत्रित वित्तीय विवरण पत्रावरील अहवालामध्ये इतर माहिती समाविष्ट नसल्याने आम्ही त्यासंबंधीची आश्वासने आणि निष्कर्ष इत्यादी रुपाने आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही.

आम्ही एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या लेखापरिक्षणाच्या निमित्ताने आमच्या जबाबदारीमध्ये इतर माहिती वाचनाचाही समावेश होतो तसे करताना आम्हाला इतर माहिती एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांसोबत प्रत्यक्ष विसंगत आहे किंवा कसे किंवा लेखापरिक्षणाची आम्ही मिळविलेल्या ज्ञान किंवा अन्यथा मोठ्याप्रमाणात गैर विवरण झाले किंवा नाही याचा विचार करावा लागतो.

आम्हाला सांगण्यात आले की, संचालकांचा अहवाल आणि संबंधित जोडपत्रे यांचे ३१ मार्च २०२१ संपते त्या वर्षासाठी अंतिमीकरण झाल्यावर त्याचा नंतर संचालक मंडळातर्फे स्वीकार केला जातो. त्यामुळे आम्हाला आजच त्याविषयी मत देता येणे शक्य झालेले नाही.

**व्यवस्थापनाच्या आणि एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांच्या कार्याचा भार असणारे इतर यांच्या जबाबदाऱ्या:**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम (अधिनियम) यामधील दिलेल्या विषयांसाठी सूत्रधारी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. त्यामध्ये भारतातील सर्वसाधारणपणे स्वीकृत केलेली लेखाविषयीची तत्त्वे आणि कलम १३३ यात विहित केलेली लेखा मानके यांच्याशी सुसंगत असे कंपनीच्या 'समूह' ज्यात त्यांच्या सहयोगी आणि संयुक्त नियंत्रित संस्था समाविष्ट आहेत. त्यांच्या एकत्रित वित्तीय स्थितीचे, वित्तीय कामगिरीचे, आणि एकत्रित रोकडता प्रवाह याचे यथार्थ आणि योग्य दर्शन घडविणारी एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करून सादर करण्याची जबाबदारी समाविष्ट आहे. कंपनीच्या 'समूह' आणि त्यांच्या सहयोगी संस्थांच्या संबंधित संचालक मंडळाकडे असलेल्या जबाबदाऱ्यांमध्ये पुढील बाबींचाही समावेश होतो. समुहाच्या मत्तांचे संरक्षण करणे, लबाड्या व इतर अनियमितता यांना शोधणे किंवा आळा घालणे, योग्य लेखा धोरणे निवडून ती लागू करणे, प्रमाणबद्ध व सुज्ञ असे निर्णय व अंदाज करणे, अंतर्गत लेखा नियंत्रणाची रचना, अंमलबजावणी करुन ती व्यवस्थित कार्यरत ठेवणे आणि कंपनीचे सत्य आणि योग्य दर्शन घडविणारी आणि अन्य कोणतीही मोठी लबाडी किंवा चूकभूल यापासुन मुक्त असलेली एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करणे.

एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करताना, जर समूहाचे परिसमापन करावे किंवा काम थांबवावे किंवा तसे करण्यापासुन अन्य पर्याय नाही असे जर संचालक मंडळाचे मत नसेल तर, संचालक मंडळास 'सतत कार्यरत असलेली संस्था' असे काम करण्यासाठी कंपनी समूह समर्थ असल्याबद्दल निर्धारीत करावे लागते. सतत कार्यरत संस्था संबंधी तसे प्रकटन करणे त्या आधारे लेखे करणे ही सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाची जबाबदारी असते.

संबंधित संचालक मंडळाकडे समूहातील समाविष्ट कंपन्यांच्या व सहयोगी कंपन्या प्रक्रियेवर लक्ष ठेवण्याचीही जबाबदारी असते.

**एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण करण्यासाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी**

आमचे लेखा परिक्षणाचे उद्दिष्ट असे आहे की, ही एकत्रित वित्तीय विवरण पत्रके संपूर्णत: कोणतेही मोठे गैर विवरण मग ते फसवणुकीमुळे किंवा चुकीमुळे असोत यापासुन मुक्त आहेत किंवा कसे याचे योग्य कारणांसह हमी मिळविणे आणि लेखा परिक्षणाच्या अहवाल देऊन आमची मते व्यक्त करणे. आमची प्रमाणशीर हमी उच्च स्तरावरील खात्री असते. मात्र लेखा मानकांनुसार करण्यात आलेले, लेखापरिक्षणातून अस्तित्वात असलेली मोठी चूक किंवा गैरविवरण नेहमीच शोधता येते अशी हमी देता नाही. फसवणूक किंवा चुकीमुळे गैरविवरण होऊ शकते आणि एकत्रित

आर्थिक विधानांच्या आधारे घेतलेल्या वापरकर्त्यांच्या आर्थिक निर्णयावर, व्यक्तिश: किंवा एकूणच हे गैरविवरण प्रभाव टाकत असेल तर ते मोठ्या प्रमाणातील गैरविवरण आहे असे समजण्यात येते.

लेखामानकांनुसार केलेल्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही व्यावसायिक निर्णयबुद्धीचा वापर केला आहे आणि आमच्या संपूर्ण लेखापरिक्षणात व्यावसायिक संशयबुद्धी वापरली आहे. आम्ही खालील बाबी सुध्दा अनुसरल्या आहेत.

- एकत्रित वित्तीय विवरण पत्रकातील महत्त्वाची गैरविवरणाचे धोके शोधणे आणि त्यांचे मुल्यमापन करणे, ही गैरविवरणे लबाडीमुळे किंवा चुकीमुळे झालेली आहेत किंवा कसे ते शोधणे. या जोखीमांना प्रतिबंधात्मक लेखा परिक्षण पद्धतीची संरचना करणे व त्यादृष्टीने काम करणे आणि आमच्या मतांना आधार देणारे पुरेसे व योग्य पुरावे लेखापरिक्षणातुन मिळविणे. लबाडी मधुन होणाऱ्या गैरविवरणाचे धोके शोधणे हे चुकीने निर्माण झालेल्या गैर विवरणापेक्षा मोठे असतात. कारण लबाडीमध्ये संगनमत, बनावट दस्त ऐवज, हेतु पुरस्सर माहिती वगळणे, चुकीचा अर्थ लावणे, विपर्यास करणे किंवा अंतर्गत नियंत्रणांचे उल्लंघन करणे आदि कृतींचा समावेश असतो.

- आम्ही लेखा परिक्षणासंबंधीची अंतर्गत नियंत्रणे समजावुन घेतली आहेत. त्यामधुन परिस्थिती अनुरूप योग्य लेखा परिक्षण कार्यपद्धतीची रचना केली आहे. कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३(३)(१) नुसार आम्ही कंपनीमध्ये अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणाली आहे किंवा कसे आणि वित्तीय विवरण पत्रके नियंत्रणे योग्य व प्रभावीरित्या कार्यरित आहेत किंवा कसे यावर आमची मते देण्याची आमच्यावर जबाबादारी आहे.

- व्यवस्थापनाने वापरलेल्या लेखा धोरणांच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, तसेच व्यवस्थापनाने केलेल्या लेख्यांचे अंदाज आणि ते प्रकटने समर्थनीय असल्याचे निश्चित करणे.

- कंपनी समूह सतत चालू राहणारी आहे. असे गृहित धरून व्यवस्थापनाने त्याच्या आधारे मांडलेल्या लेख्यांच्या योग्यते विषयी निष्कर्ष काढणे त्यासाठी लेखा परिक्षणात्मक पुरावे मिळविणे, कंपनीमध्ये घडलेल्या संबंधित घटना आणि स्थिती यांच्यावरून मोठी अनिश्चितता अस्तित्त्वात आहे किंवा कसे या आधारे कंपनीकडे 'कार्यरत संस्था' यासाठी सामर्थ्य आहे किंवा कसे या बाबतचे निष्कर्ष नोंदवणे.

  जर समुहाविषयी अशी अनिश्चितता मोठ्या प्रमाणात अस्तित्त्वात आहे असा आमचा निष्कर्ष असेल तर, आम्ही त्याकडे आमच्या लेखापरिक्षण अहवालात लक्ष वेधणे आवश्यक असते आणि एकत्रित वित्तीय विवरण पत्रकाच्या संबंधित प्रकटनात तसे उल्लेख असले पाहिजे. आमचे मतात रुपभेद करण्यासाठी ही प्रकटने अपूर्ण असतील तर त्याकडे लक्ष वेधणे ही आमची जबाबदारी आहे. आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालाच्या तारखेपर्यंत जे लेखापरिक्षणाचे पुरावे आम्ही मिळविले, त्यावर आमचे निष्कर्ष आधारलेले आहेत. मात्र भविष्यात अन्य काही घटना किंवा स्थिती यांचा सुद्धा परिणाम होऊन समूहाचे 'सतत चालु राहणारी संस्था' या प्रमाणे काम करणे थांबु शकते.

- एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे सर्वांगिण सादरीकरण, रचना, समाविष्ट बाबी आणि त्यांचे प्रकटने यांचे मुल्यांकन करणे आणि एकत्रित वित्तीय विवरण पत्रके त्यातील व्यवहारांचे आणि प्रसंगांचे दर्शन उद्दिष्टानुसार घडविते किंवा कसे हे पाहणे.

- एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी ही कंपनी समूह, त्याच्या नियंत्रणातील सहयोगी आणि संयुक्त कंपन्या यांचे उद्योंगाचे कार्य किंवा वित्तीय माहिती यांचे लेखापरिक्षणाच्या दृष्टिने योग्य पुरावे मिळविणे, एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे आम्ही स्वतंत्र लेखापरिक्षक आहोत, त्यामुळे त्यात समाविष्ट असलेल्या कंपन्यांच्या वित्तीय विवरण पत्रकांची दिशा, त्यांचे पर्यवेक्षण आणि कार्यपालन यांचे लेखापरिक्षण करणे, यासाठी आम्ही जबाबदार आहोत. या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकात समाविष्ट केलेल्या इतर कंपन्या संस्था यांचे लेखापरिक्षण करणे अन्य लेखा परिक्षकांनी केलेले आहे. म्हणून त्या वित्तीय विवरण पत्रकांची दिशा, पर्यवेक्षण आणि कामगिरी यासाठी इतर लेखापरिक्षक जबाबदार आहेत. आमच्या लेखापरिक्षणातील मतांसाठीच फक्त आम्ही जबाबदार आहोत.

  सूत्रधारी कंपनीच्या कार्यभारावर ज्यांचा अंमल व प्रशासन आहे अशा सर्वांसोबत आम्ही चर्चा करतो. त्यामध्ये इतर विषयांसोबत लेखा परिक्षणाची नियोजित व्याप्ती आणि वेळ तसेच आमच्या लेखा परिक्षणात सापडलेल्या महत्त्वांच्या बाबी आणि आम्हांला जाणवलेल्या अंतर्गत नियंत्रणातील त्रुटी यांचा समावेश असतो. तसेच आम्ही सुत्रधारी कंपनीच्या प्रशासकांना एक निवेदन पत्र देतो त्यात आम्ही स्वातंत्र्याच्या दृष्टीने संबंधित आवश्यक अशा नैतिक बाबी संकलित केलेल्या असतात. आमच्या स्वातंत्र्याशी संबंधित प्रमाणशीर व योग्य असणारे इतर विषय यावर संबंधित सुरक्षा रक्षण जेथे लागू असते त्यावर चर्चा करतो व आमच्या स्वातंत्रपणा बद्दल योग्य धारणा असली पाहिजे याची जाणीव करून देतो.

  प्रशासनाचा कार्यभार सांभाळणाऱ्यांशी वरील विषयाची माहिती दिल्यानंतर, एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांच्या विद्यमान कालावधीतील महत्वाच्या बाबी आणि विषय आम्ही निश्चित करतो. जर अशा विषयांच्या जाहीर करण्याबाबत कायदा किंवा नियमने यांची आडकाठी

नसली तर, आम्ही अशा विषयांचा आमच्या लेखा परिक्षणात परामर्श घेतो. अगदी दुर्मिळ परिस्थितीत ज्या बाबी प्रकट केल्यास सार्वजनिक हिताच्या लाभांवर विपरीत परिणाम होऊ शकतील अशांचा समावेश आम्ही आमच्या लेखा परिक्षणात करीत नाही.

**इतर विषय :**

**सूत्रधारी कंपनी : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि.**

१) सूत्रधारी कंपनीच्या प्रकरणी यावर्षी आमची लेखा परिक्षणाची कार्ये करण्यासाठी आम्ही कंपनीच्या कोणत्याही कारखान्यांना किंवा कामाच्या अन्य जागांना प्रत्यक्ष भेट देऊ शकलो नाही, कारण सरकारने कोवीड-१९ आजाराचा प्रसार रोखण्यासाठी लॉकडाऊन संचारबंदी लागू केली होती. या अहवाल वर्षातील लेखापरिक्षण कामाची प्रक्रीया 'घरून काम करणे' या पद्धतीने करावे लागले म्हणजेच कंपनीचे कारखाने आणि अन्य जागा व कार्यालये येथील आर्थिक माहिती/आकडेवारी//अभिलेख/आधारभूत दस्तऐवज व्यवस्थापनाने सॅप प्रणालीच्या मार्फत डीजिटल माध्यमातून उपलब्ध करून दिले. तसेच व्ही पी एन लिंकद्वारे डॅश बोर्ड चा उपयोग करण्यात आला आहे.

२) कंपनीच्या अंतर्गत लेखा परिक्षणाचे काम बाह्य सनदी लेखापालांच्या फर्म्स द्वारे केले जाते. त्यातील चालू वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहीचे अहवाल आम्हास उपलब्ध करुन दिले. काही कारखाने आणि जागांचे तिसऱ्या आणि चौथ्या तिमाहीचे अहवाल आम्हास उपलब्ध होऊ शकलेले नाहीत; कारण कोविड-१९ संबधित लॉक डाऊनमुळे येथीळ अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम चालू आहे.

३) तीन उपकंपन्याची वित्तीय विवरण पत्रके/वित्तीय माहिती यांचे लेखा परिक्षण आम्ही केलेले नाही. त्यांच्या वित्तीय विवरण पत्रकात / वित्तीय माहीती मध्ये दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी त्यांच्या एकूण मत्ता ₹ ६२.८४ कोटी आणि त्या तारखेला संपलेल्या वर्षातील त्यांच्या एकूण महसूल ₹ ७०१४८/- (*) आणि निव्वळ रोकडता प्रवाह ₹ २०५६/- (*) असल्याचे दर्शविले आहे आणि तसे एकत्रित वित्तीय विवरण पत्रात समाविष्ट केले आहे.

४) एकत्रित वित्तीय विवरण पत्रकात ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षातील तोट्यात कंपनी समुहाचा वाटा ₹ ०.०५ कोटी असल्याची बाब समाविष्ट केली आहे. ही माहिती ज्यांचे लेखापरिक्षण केलेले नाही, अशा वित्तीय विवरण पत्रकांवर/आर्थिक माहितीवर आधारित आहे. व्यवस्थापनाला ती माहिती तशी देण्यात आली आहे.

५) तीन उपकंपन्यांची वित्तीय विवरण पत्रके/आर्थिक माहिती यांचे लेखा परिक्षण आम्ही केलेले नाही हे नमूद करण्यात येते. या वित्तीय विवरण पत्रकांचे/आर्थिक माहितीचे लेखा परिक्षण अन्य लेखा परिक्षकांनी केले आणि त्याचे अहवाल व्यवस्थापनाने आम्हांला दिले. दोन सहयोगी कंपन्याची ज्याचे लेखापरिक्षण केलेले नाही, अशा हंगामी वित्तीय विवरण पत्रके/आर्थिक माहिती यांच्यावर त्यांची माहिती आधारीत आहे. व्यवस्थापनाला ती जशी मिळाली तशीच ती आम्हांला देण्यात आली.

६) एकत्रित वित्तीय विवरण पत्रकात तसेच त्यामध्ये समाविष्ट केलेल्या उपकंपन्या व सहयोगी कंपन्यांच्या रकमा आणि प्रकटने या संबंधाचे आमचे मत तसेच कंपनी कायद्यातील कलम १४३ चे उपकलम (३) यातील अटीनुसार उपरोक्त उपकंपन्या संबंधीचे आमचे मत हे पूर्णपणे इतर लेखापरिक्षकाच्या अहवालावर आधारीत आहे.

एकत्रित वित्तीय विवरण वरील आमचे मत आणि येथे खाली दिलेल्या प्रमाणे इतर कायदेशिर व नियामक आवश्यकता वर आमचा अहवाल हा वरील मजकूरानुसार पात्र केलेले नाही त्यासाठी आणि इतर लेखा परिक्षणकांचे काम आणि अहवाल तसेच व्यवस्थापनाने प्रमाणित केलेली एकत्रित वित्तीय विवरण पत्रके/वित्तीय माहिती यानुसार आहे.

**इतर कायदेशीर नियमनाच्या आवश्यकता**

१) कंपनी कायदा २०१३ चे कलम १४३(५) यातील आवश्यकतेनुसार आम्ही भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या आदेशानुसार आणि लेखा परिक्षणात सुचविलेल्या कामपद्धतीचे अनुपालन करून व त्यावर केलेली कार्यवाही तिचे भारतीय लेखा मानकानुसार केलेले संपूर्ण कंपनी समुहाची एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील परिणाम विचारात घेऊन त्यांचे जोडपत्र-१ दिलेले आहे.

२) कायद्याचे कलम १४३(३) यातील आवश्यकतानुसार आमचे लेखापरिक्षण आणि वरील ''इतर विषय'' या परिच्छेदात संदर्भ दिल्याप्रमाणे इतर लेखापरिक्षकांचे अहवाल यांच्या आधारे आणि लागू होणाऱ्या मर्यादेपर्यंत आम्ही खालील प्रमाणे अहवाल देत आहोत की-

ए) आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि विश्वास यानुसार वरील एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांचे लेखा परिक्षण करण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी माहिती आणि स्पष्टीकरणे मिळविले आहेत. *याला फक्त तिसऱ्या पक्षांकडील शिल्लकी कायम करण्याच्या माहितीचा अपवाद आहे. वरील परीच्छेद ५ मध्ये म्हटल्याप्रमाणे सूत्रधारी कंपनीच्या बाबत या तिसऱ्या पक्षाच्या शिलकीचे एकत्रित वित्तीय*

*विवरण पत्रकात जर काही परिणाम होणार असतील तर त्याचा अंदाज आम्हास सांगता येणार नाही.*

बी) आमच्या मते, *वरील "पात्र मत्तांचा आधार" या परिच्छेदात वर्णन केलेल्या विषयांचा अपवाद करून,* कायद्याप्रमाणे आवश्यक अशा प्रकारे लेख्यांच्या नोंद वह्या योग्य प्रकारे जतन केल्या आहेत, असे आम्ही केलेले वह्यांचे परिक्षण आणि इतर लेखापरिक्षकांचे अहवाल यावरून दिसून आलेले आहे.

सी) या अहवालाशी संबंधित वरील एकत्रित वित्तीय विवरण पत्रके म्हणजेच ताळेबंद, एकत्रित नफा-तोटा पत्रक (इतर सर्वकष उपन्नासह) समभागातील बदलांचे एकत्रित पत्रक आणि एकत्रित रोकडता प्रवाह पत्रक ही त्या हेतूने जतन केलेल्या संबंधित लेखा नोंद वह्यांशी सुसंगत आहेत.

डी) ***वरील पात्र मतांचा आधार या परिच्छेदात वर्णन केलेली आमची निरिक्षणे,*** यांच्या अधीन राहुन, आमचे असे मत आहे की, उपरोक्त एकत्रित वित्तीय विवरण पत्रके ही कायद्याचे कलम क्र.१३३ ज्याचे वाचन लागू होणाऱ्या नियमावलीसोबत केले जाते, त्यामध्ये विहीत केलेल्या लेखा मानकांचे अनुपालन करतात.

इ) महानिर्मिती शासकीय कंपनी असल्याने, भारत सरकारने जारी केलेली अधिसूचना क्र.जी एस आर ४६३(इ) दिनांक ०५ जुन २०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १६४(२) यामधील "संचालकाची अपात्रता" याविषयीच्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.

एफ) आम्ही वरील "पात्र मतांचा आधार" या परिच्छेदात दिलेली निरिक्षणे यांचे सूत्रधारी कंपनीच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही.

जी) या समुहाच्या वित्तीय अहवाला संबंधीत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा पुरेसापणा आणि या नियंत्रणाचा प्रभाव या विषयी आमचा "स्वतंत्र अहवाल जोडपत्र दोन" मध्ये दिला आहे.

एच) ही कंपनी शासकीय असल्याने, भारत सरकारची अधिसुचना क्र.४६३(इ) दि.५ जुन २०१५ याप्रमाणे कायद्यातील कलम १९७ च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

आय) कंपनी (लेखा परिक्षण व लेखा परिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम क्र.११ नुसार जे अन्य विषय या अहवालात समाविष्ट करावयाचे असतात त्याबाबत आम्ही आमचे सर्वोतोपरी ज्ञान आणि आम्हाला दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही खालील मते नोंदवितो.

१. एकत्रित वित्तीय विवरण पत्रे प्रलंबित कायदेविषयक बाबींचे परिणाम प्रगट केले आहे असे दर्शवितात त्यासाठी एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांची टिपा क्र.४१ पहावी.

२. ज्यात भविष्यात तोटे येऊ शकतील असे कोणतेही दीर्घ मुदतीचे करार समुहाने केलेले नाहीत (यात डेरिव्हेटीव्ह कंत्राटे पण समाविष्ट आहेत)

३. सूत्रधारी कंपनीने, तिच्या उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या यांना यावर्षी "गुंतवणूकदार शिक्षण आणि रक्षण निधीत" आवश्यक रकमा स्थानांतरीत करण्यात दिरंगाई केलेली नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन १००१८६ डब्ल्यु**
**यूडीआयएन: २१०३८५२६ ए ए ए ए इ आय ७३९९**
**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३८५२६**
स्थळ : मुंबई
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२१

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन ११०५०४ डब्ल्यु**
**यूडीआयएन: २१०३९५५५ ए ए ए ए आय यू ७१६२**
**सी. ए. बी.एन. राव**
भागीदार
**आयसीएआय एम नं. ०३९५५५**

## जोडपत्र १ : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड च्या दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील स्वतंत्र लेखा परिक्षकांच्या आश्वासन दिलेल्या संदर्भा प्रमाणे.

### सुत्रधारी कंपनीच्या प्रकरणी

### ( कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ मधील उप कलम ( ५ ) दिलेले आदेश.

**१ ) कंपनीमध्ये सर्व लेखे व्यवहार माहिती तंत्रज्ञान ( आयटी ) प्रणाली मार्फत करण्याची प्रक्रिया आहे किंवा कसे? कंपनीचे जर उत्तर होय असल्यास लेखे व्यवहार माहिती तंत्रज्ञान लेखे बाह्य प्रक्रियेद्वारे केल्यास येथे संख्याची एकात्मिकता यावर कोणते परिणाम होतात आणि जर त्यांचे वित्तीय विवरण परिणाम होत असतील तर त्याची माहिती द्यावी.**

होय, कंपनीने तिचे सर्व लेखे व्यवहार प्रक्रिया सॅप-ईआरपी प्रणाली मार्फत करण्याची कार्यवाही अमलात आणले आहे. आमचे सर्वोतपरी ज्ञान आणि माहिती यानुसार कंपनीमध्ये माहिती लेखे प्रणालीच्या बाहेर कोणतेही व्यवहार केले जात नाहीत.

**२ ) कंपनीची कर्जाची परतफेड करण्याची क्षमता नाही म्हणून कोणत्याही धनकोने विद्यमान कर्जाची पुनर्रचना केली किंवा कर्जे/ऋणे/व्याज ई. निर्लेखित केली/सोडून दिली असे घडले काय?** होय असल्यास त्याचे वित्तीय परिणाम विशूद करावेत. अशा प्रकरणांची योग्य नोंद केली आहे का? (जर धनको सरकारी कंपनी असेल तर हा निर्देश धनको कंपनीच्या सांविधिक लेखा परिक्षकांना सूध्दा लागु होतो.

आमचे सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार तसेच लेखा अहवाल प्रमाणे कोणत्याही विद्यमान कर्जाची धनकोने पुनर्रचना करणे किंवा कर्जमाफी/निर्देश धनको कर्ज/ऋण/व्याज यांना सोडून देणे किंवा त्यांचे निर्लेखन करणे असे एकही प्रकरण नाही.

**३ ) केंद्र/राज्य शासने किंवा त्यांच्या संस्था यांचे कडून विशिष्ट योजनेसाठी प्राप्त/ मिळण्याजोगे निधी ( अनुदाने/अर्थसहाय ई. ) यांचे योग्य प्रकारे लेखे केले जातात काय? त्यांच्या अटी व शर्तीनुसार वापर होतो काय? न होणाऱ्या प्रकरणांची यादी द्यावी.**

आमचे सर्वोत्तपरी ज्ञान, माहिती तसेच लेखा वह्यातील दाखविलेल्या नोंदी यानुसार विशिष्ट योजनेसाठी केंद्र/राज्य शासन किंवा त्यांचे संस्थाच्या निधीची योग्य लेखे केले आहे आणि त्याचा वापर त्यांच्या अटी व शर्तीनुसार करण्यात आला होता.

**४ ) जर काही कर्जे / ऋणे / व्याज / उसनवारी इ. सोडून देणे / निर्लेखित करण्याची प्रकरणे असल्यास त्याचा अहवाल तसेच त्याची कारणे व त्यातील रक्कम याची माहिती.**

आमच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत तसेच आम्हांस दिलेली माहीती आणि स्पष्टीकरणे यावरून वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मध्ये कंपनीने कोणतीही कर्जे / ऋणे / व्याज / उसनवारी इ. सोडून देणे / निर्लेखित केली नाहीत.

**५ ) तिसऱ्या पक्षांकडे राहिलेल्या वस्तूमालाचे तसेच शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून देणगी रूपाने मिळालेल्या मत्ता यांचे योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे?**

सूत्रधारी कंपनी तिचा वस्तूमाल/साहित्य तिसऱ्या पक्षाकडे फक्त देखभाल/जोडणी करणे या कामांसाठी पाठविते. आम्हास दिलेल्या माहितीप्रमणे भांडार विभाग (कक्ष) आणि सुरक्षा विभाग अशा प्रकारच्या वस्तूमाल साठ्यांचे योग्यप्रकारे दस्तऐवज व नियंत्रण ठेवून त्यासाठी त्या विभाग कक्षात टिपणी केल्या जातात आणि परत केले जाणारे/न केले जाणारे प्रवेश पत्र (गेट पास) तयार केले जातात. त्याची माहिती सॅप प्रणालीच्या मटेरियल मोड्यूल यामध्ये सुद्धा पाहता येते. तसेच आम्हांस सांगण्यात आले की, या वर्षी शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांचेकडून कोणत्याही मत्ता देणगी स्वरूपात मिळाल्या नाहीत.

**६ ) प्रलंबित न्यायालयीन वाद / न्यायाधिकरणाचे खटले यांचा वर्ष निहाय अहवाल देणे त्यात प्रलंबनाची कारणे आणि कायदेविषयक प्रकरणे ( परदेशी व स्थानिक ) यांच्यावरील खर्चावर लक्ष देणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्व आणि प्रभाव या माहितीचा समावेश करावा.**

सुत्रधारी कंपनी प्रलंबित कायदेविषयक दावे / न्यायाधिकरणाकडील खटले यांची ओळख निश्चिती करून त्याचे प्रकटन 'आकस्मित दायित्वे' यात करीत असते. एकूण ३८५ कायदेशीर / लवादातील खटल्यांचे त्याचे वयानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| प्रकरणाची वर्षे | प्रकरणांची संख्या |
|---|---|
| एक वर्षापेक्षा कमी | १८ |
| १ ते २ वर्षे | ९८ |
| २ ते ३ वर्षे | ८५ |
| ३ ते ५ वर्षे | ९१ |
| ५ वर्षापेक्षा जास्त | ९३ |
| **एकूण** | **३८५** |

आम्हांस असे सांगण्यात आले की, वरील प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे प्रत्येक प्रकरणात वेगवेगळी आहेत तसेच आम्हांला अशी माहिती दिली की, कायदेशीर प्रकरणांचा खर्च हा वरील प्रकरणांमध्ये अभियोक्ता / सल्लागार यांच्या शूल्काच्या मंजुरीच्या रचनेप्रमाणे आहे, कंपनीकडून संबंधित माहिती उपलब्ध झाली नसल्याने प्रलंबनाच्या कारणाविषयी आणि कायदेशीर खटल्यांच्या खर्चासंबधीच्या विद्यमान यंत्रणेच्या प्रभावीपणा बाबत कोणतेही मत व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

७ ) **जर या कंपनीची निर्गुंतवणूक करण्यासाठी निवड झाली असेल तर ( अमूर्त मत्ता व जमिनी यासह ) मत्ता आणि दायित्वे यांचे ( बांधिलकी व सामान्य राखीव यासह ) मूल्यांकनाबाबत संपूर्ण स्थितीदर्शक अहवालाचे परिक्षण करावे. त्यात कंपनीची निर्गुंतवणूक प्रक्रियेची कार्यपद्धती आणि विद्यमान स्थिती यांचा समावेश करावा.**

महानिर्मिती कंपनीची निर्गुंतवणूक हेतूसाठी निवड झालेली नाही. म्हणून मागवलेली माहिती कंपनीस लागू नाही.

**क्षेत्र विशिष्ट उपदिशा वर टिपणी**

८ ) **कंपनीने मागविलेल्या कोळशांची संख्या/दर्जा यांचा मेळ करण्यास कंपनीकडे योग्य यंत्रणा आहे काय? आणि कोळशाचा दर्जा/ त्याचा ओलसरपणा आणि विलंब आकार यांच्या लेखा वह्यात योग्य नोंदी केल्या जातात काय?**

महानिर्मिती कंपनीकडे कोळसा कंपन्यांनी तयार केलेल्या आणि प्राप्त झालेल्या कोळशांच्या देयकांचा मेळ करण्यासाठी एक कार्यपद्धती आहे. मागणी केलेला आणि प्रत्यक्ष मिळालेला कोळसा यांची संख्या/दर्जा यासाठी मेळ करण्याच्या विद्यमान कार्यपद्धतीस अधिक बळकटी देण्याची गरज आहे. महानिर्मिती कंपनीने कोळसा पृथःकरण करणाऱ्या एका मान्यता प्राप्त संस्थेची नियुक्ती केली आहे तिच नाव ‘सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ मायनिंग ॲन्ड फ्यूएल रिसर्च’ असे आहे. (सी.आय.एम.एफ.आर.) ही संस्था कोळसा कंपनीचा माल भरण्याच्या जागेवर तांत्रिक पृथःकरण करते. सी आय एम एफ आर यांनी दिलेल्या पृथःकरण अहवालाच्या आधारे कोल ऑफिस, नागपूर बीजकात नमुद केलेला दर्जा आणि अहवालातील दर्जा यांचा मेळ करते आणि दर्जा घसरला असल्यास त्यांचे कोळसा कंपनीकडे दावे केले जातात.

कोळसा पुरवठादारांनी ₹३१६०.४८ कोटींची मागणी केली आहे (मा. वर्षी रु. ₹३०४५.१६ कोटी) कमी माल उचलणे, कामगिरीसाठी प्रोत्साहन, मत्ता आणि व्याज आदी कारणास्तव केलेल्या वरील रकमेच्या मागणी महानिर्मितीने वादग्रस्त असल्याचे सांगितले. याविषयी योग्य ते कागदोपत्री पुरावे नसल्याने मागणीची अचुकतेबाबत निष्कर्ष काढता येणे अवघड झाले आहे कोळसा पुरवठादारांची ही मागणी कंपनीने दि. ३१ मार्च २०२१ रोजी ‘आकस्मित दायित्त्व’ म्हणून घोषित केली.

महानिर्मितीने कोळसा पुरवठादारांच्या विरोधात अपुरा माल देणे, ओलसर कोळसा देणे, कमी माल भरणे आणि व्याजाच्या मागणी इत्यादी बाबत करारानुसार ₹ ७७९०.३५ कोटींचे (मा. वर्षी ₹ ६७६४.३४ कोटी) दावे दि. ३१ मार्च २०२१ मध्ये अस्तित्त्वात होते. कोळसा कंपनी सोबत वाद असल्याकारणाने त्यांचा हिशेष ठेवला नाही त्यांना दि. ३१ मार्च २०२१ रोजी ‘आकस्मिक भत्ता’ म्हणून कंपनीने घोषित केले आहे.

९ ) **राज्य शासनाला देय असलेल्या विनामुल्य विजेचा वाटा किती आहे ? स्वीकृत लेखे प्रमाणकांनुसार व करारातील अटीनुसार त्याचा हिशेब करुन तो लेखांमध्ये दाखविला जातो काय ?**

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार कोणत्याही करारानुसार राज्य शासनाला विनामुल्य वीज पुरवठा केला जात नाही.

**१०) वस्तूमाल सूचीमध्ये भंगार, निकामी साहित्य इत्यादीचे मूल्यासह योग्य वर्गीकरण केले आहे का?**

कंपनीमध्ये भंगार आणि निकामी साहित्य यांची निश्चित ओळख केली जाते मात्र अशी निश्चित ओळख करण्याच्या वेळी त्यांचे लेखे केले जात नाहीत. भंगाराचे मुल्य लेखावहीत नोंदले जात नाही आणि त्यांच्या वसुलीची लेखा, जेव्हा लिलाव केला जातो तेव्हा होते. निकामी साहित्याचे मूल्यांकन ऐतिहासिक खर्चानुसार केले जाते आणि त्याचवेळी निकामी जुनाट साधनासाठी लेखा वहीत १०० टक्के तरतूद केली जाते. अशाप्रकारे केलेल्या तरतुदीचे समायोजन सदर निकामी वस्तूच्या लिलावा सोबत केले जाते. कंपनी तांत्रिक मूल्यांकनाच्या आधारे वस्तुमाल निकामी झाल्याबद्दल ओळख निश्चिती करते. आमच्या लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीच्या आधारे असे म्हणता येते की, वरील काही उणीवा वगळल्यास, कंपनीची वस्तुमाल सूचीचे वर्गीकरण करण्याची कार्यपद्धती योग्य आहे.

**११) लेखा परिक्षणात नमूद केलेला नफा/तोटा हा कंपनीच्या नफा आणि तोटा यांच्या लेखांप्रमाणे आहे किंवा कसे?**

कंपनी अधिनियम २०१३ यात विहित केल्याप्रमाणे लेखा परिक्षण अहवालात वर्षाचा नफा/तोटा याची आकडेवारी देण्याची आवश्यकता नसते. तरीसुद्धा आम्ही येथे निवेदन करतो की इतर सर्वकष उत्पन्नाची नोंद केल्यानंतर या अहवालाच्या वर्षामध्ये महानिर्मिती कंपनीला करपूर्व आणि इतर सर्वकष उत्पन्न (ओसीआय) यापूर्वी ₹ ४२१.२७ कोटी नफा झाला. याबाबत आम्ही आमचा पात्र केलेला लेखापरीक्षण अहवाल दि. २३ नोव्हेंबर २०२१ रोजी दिला आहे.

**१२) जल विद्युत प्रकरणातील जैविक विविधता जतन करण्याचे धोरण/सूचना यानुसार पाणी सोडले जाते का ? तसे केले नाही म्हणून जर काही दंड भरला असेल तर त्याची माहिती द्यावी.**

पाणी सोडण्याचे कार्य राज्य शासनाच्या जल संसाधन विभागामार्फत अंमलात येते. आम्हास दिलेल्या माहितीनुसार या कामात कंपनीची केलेली भूमिका नसते. यासाठी कोणताही दंड भरलेला नाही/देय नाही.

**१३) कंपनी अधिनियमामध्ये दिलेल्या कंपनीच्या सामाजिक जबाबदारी (सीएसआर) तसदीसंबंधी अहवाल देणे आणि प्रकटने करणे याविषयी अनुसरण केले किंवा कसे याचे परिक्षण करावे.**

कंपनी अधिनियमातील तरतुदीनुसार कंपनीचा मागील तीन वित्तीय वर्षातील सरासरी निव्वळ तोटा ₹ ७८.१७ कोटी (मा. वर्षी ४२२.८३ कोटी) इतका आहे. नफा नसल्याने सी एस आर खर्च, सरासरी नफ्याच्या २ टक्के प्रमाणे 'निरंक' आहे.

**उपकंपन्यांच्या प्रकरणी:**

**अ) महागुज कोलायरीज लि.**

१) आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच वित्तीय वर्ष २०२०-२१ च्या लेखा नोंदीच्या वह्या यातुन आम्ही केलेली पडताळणी यानुसार लेखापरिक्षण वर्षात कोणतेही कर्जे / ऋणे / व्याज इ. निर्लेखित केल्याचे प्रकरण आढळलेले नाही.

२) तिसऱ्या पक्षांकडे कोणताही वस्तूमाल साठा पडुन राहिलेला नाही. आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार तसेच वित्तीय वर्षातील लेखा नोंदीच्या वह्यांची आम्ही केलेली पडताळणी यानुसार शासन किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांचेकडुन कुठल्याही मत्ता भेट स्वरुपात कंपनीला मिळालेल्या नाहीत.

३) प्रलंबित न्यायालयीन / न्यायाधिकरणाचे खटले यांचा वर्ष निहाय अहवाल द्यावा त्यात प्रलंबनाची कारणे आणि कायदेविषयक प्रकरणे (परदेशी व स्थानिक) यांच्या खर्चावर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्व आणि प्रभाव यांच्या माहितीचा समावेश करावा.

कंपनी तिचे प्रलंबित / न्यायाधिकारी यांचेकडील प्रकरणांनी कंपनीने 'आकस्मिक दायित्त्व' अशी ओळख देऊन त्याचे प्रकटीकरण **करते.** एकूण ४ प्रलंबित / न्यायाधिकरणाकडील प्रकरणे असुन त्यांचे वयोनिहाय विश्लेषण खाली दिले आहे.

| तपशील | प्रकरणांची संख्या |
|---|---|
| १ ते ५ वर्षे | २ |
| ५ वर्षापेक्षा जास्त | २ |
| एकूण | ४ |

आम्हांस दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार प्रलंबित प्रकरणे आणि प्रलंबनाची कारणे खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | खटला क्र. तारीख आणि तपशील | अर्जदार / पदकार | प्रसंवनाची कारणे |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु पी (सी) १४९२४ / २०१२ दि.१४ ऑगस्ट २०१२ ओडिसा उच्च मध्यम मच्छकाटा कोळसा खाण जागा संपदानची प्रक्रीया विरोधात | श्री.नविन प्रधान आणि इतर विरुद्ध भारत सरकार महागुज कोलायरीज लि. समाविष्ट | मा.सर्वोच्च न्यायालयाने त्याचा आदेश दिनांक २४.०९.२०१४ नुसार कोळसा खाजगी वाटप रद्द केले. त्यावर जमीन संपादन प्रक्रिया विरोधात दाखल केलेल्या याचिकेत कंपनी नाही. आवश्यक प्रतिपक्ष राहिलेला नाही. त्याशिवाय आम्हास माहिती देण्यात आली की, कोळसा खाणी (विशेष तरतुदी) कायदा २०१५ नुसार राज्य शासनाने जागा संपादित प्रक्रिया चालु ठेवणे आवश्यक आहे. |
| २ | डब्ल्यु पी (सी) २२३९२/ २०१२ दि.२३.११.१२ आदेशात उच्च न्यायालय मच्छ काटा कोळसा खाण जागा संपादनाच्या प्रक्रीये विरोधात | मधवा साहु आणि इतर विरुद्ध भारत सरकार व इतर महागुज कोलायरीज लि. समाविष्ट | |
| ३ | एमडीओ मे.अडानी एंटरप्रायजेस लिमिटेड (ए इ एल) यांनी त्यांचा ₹३९९.७९ कोटीच्या मागणीसाठी, कोळसा जागा रद्द करण्याच्या संदर्भात लवादाकडे दावा केला आहे. कंपनी आणि मे.ए इ एल यांच्यात कोळसा खाण सेवेच्या करारा संबधीचे प्रकरण लवादाचे आहे. | दावेकर्ते मे. ए इ एल आणि इतर विरुद्ध महागुज कोलायरीज लि. समाविष्ट | आम्हास सांगण्यात आलेली दोन्ही पक्षांच्या साक्षीदारांचे उत्तर तपासणी नोंदण्याचे काम लवादापुढे पूर्ण झाले आहे. तोडी युक्तिवाद करणे चालु आहे. |
| ४ | चालविण्यात लवाद अर्ज (एल) क्र.४६१ वर्ष २०१८ दि.२१.०४.२०१८ मुंबई उच्च न्यायालयात कलम ३४ नुसार अर्ज पाहिला अंतरिम आदेश दि.०१.०२.२०१८ च्या विरुद्ध कंपनीने मे.ए इ एल '३२.८० कोटी देणेसंबंधी | महागुज कोलायरीज लि. विरुद्ध एम डी ओ मे.अदानी एंटरप्रायजेस लि. | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने वाणिज्य विभाग मुंबई उच्च न्यायालयात दि.२१.०४.२०१८ रोजी यांचेकडे नोटीस ऑफ मोशन दाखल केला. सदर नोटीस ऑफ मोशन (एल) चा क्रमांक १०२१ वर्षे २०१८ असुन ती अंतिम सुनावणीसाठी प्रलंबित आहे. |

आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार, तसेच इतर अभिलेखावरुन आम्ही केलेली पडताळणी याच्या आधारे, कंपनीने वर्ष २०२०-२१ मधे कायदा प्रकल्पे आणि व्यवसायिकता याचे शुल्क ₹ २,८१,८५,२१७/- दिले. यासाठी कंपनीने खर्च करण्यापूर्वी उच्च व्यवस्थापनाच्या मंजुऱ्या संबधित कार्यालयीन ज्ञापनांवर घेतल्या होत्या. या मंजुऱ्या कंपनीतील सर्व कायदेविषयक बाबींवरील खर्चावर लक्ष व नियंत्रणाचे काम करतात.

४. आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीची 'निर्गुंतवणूकीच्या' हेतूसाठी निवड केलेली नाही. म्हणून यासंबंधीची मागवलेली माहिती देणे या कंपनीस लागू नाही.

**भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखा यांनी परिक्षक कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (५) नुसार दिलेल्या उपनिदेशावर अहवाल :**

१. लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेली 'तोटा' हा कंपनीच्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या नफा व तोटा पत्रकात नोदविल्याप्रमाणे आहे.

२. मा.सर्वोच्च न्यायालय यांनी कंपनीला वितरीत केलेली कोळसा खाण जागा ऑगस्ट २०१४ मधे रद्द केली त्यामुळे ३१ मार्च २०२१ पर्यंत

कंपनीकडे कोणत्याही कोळसा खाण जागा नाहीत. त्यामुळे कंपनीने तिच्या ३१ मार्च २०२१ रोजीच्या वित्तीय विवरण पत्रकात पुनर्वसन कार्य आणि कोळसा खाणी बंद करणे / झाकून टाकणे यांचे लेखे केलेले नाहीत.

३. ३१ मार्च २०२१ पर्यंत या कंपनीने कोणत्याही खाण जागा धारण केलेल्या नाहीत. म्हणून खाणी आणि पर्यावरण विषयक आणि नियमनेनुसार आवश्यक सांविधिक परवानग्या कंपनीने मिळविणे आवश्यक नाहीत.

४. मा.सर्वोच्च न्यायालय यांनी ऑगस्ट २०१४ मधे कोळसा खाण व्यवसायातून बाहेर पडणे किंवा तो व्यवसाय खंडित करणे असे काहीही केलेले नाही. म्हणून ३१ मार्च २०२१ पर्यंत कंपनी विरोधात संबंधित डेड रेंट भरण्याचा विषय उद्धवलेला नाही.

५. कंपनीला मागील तीन वर्षात मोठ्या प्रमाणात तोटा झालेला आहे, त्यामुळे कंपनी अधिनियम २०१३ मधील तरतुदीप्रमाणे सामाजिक जबाबदारीची कामे करण्याची कंपनीला आवश्यता नाही.

**ब) धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड**

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(५) मधील आदेश आणि उप-आदेश**

**१. कोणतीही कर्जे / ऋणे / व्याज इ. सोडून देणे, निर्लेखित करणे अशी प्रकरणे झाली असल्यास त्याचा अहवाल देणे 'होय' असल्यास त्याची कारणे व त्यातील रक्कम याची माहिती द्यावी.**

लेखा परिक्षणाच्या कालावधीत आणि आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार वर्षे २०२०-२०२१ या वर्षात कर्जे / ऋणे / व्याज इ. सोडून देणे / निर्लेखित करणे अशी कोणतीही प्रकरणे कंपनीत झालेली नाहीत.

**२. तिसऱ्या पक्षांकडे ठेवलेल्या वस्तूमालाचा आणि शासन किंवा इतर प्राधिकरणे यांनी भेट स्वरुपात दिलेल्या मत्तांचे योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे ?**

लागू नाही.

**३. कायदेविषयक / न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असणाऱ्या खटल्यांचे वयानुसार विश्लेषणाचा अहवाल द्यावा. त्यात प्रलंबनाची कारणे आणि सर्व कायदेविषयक (परदेशी आणि स्थानिक) खटल्यांवरील खर्चावर लक्ष / नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्त्व / प्रभाव यांचाही त्यात समावेश करावा.**

लागू नाही.

**४. या कंपनीची निवड निर्गुंतवणूकीसाठी झाली असल्यास त्याचा तिच्या मत्ता (अमूर्त मत्ता आणि जमिनी यासह) आणि दायित्वे (आश्वासन आणि सामान्य राखीव यांचे सह) यांच्या मूल्यांकनाच्या संदर्भात स्थिती दर्शक अहवाल देऊन त्याचे परिक्षण करावे. त्यात निर्गुंतवणूक प्रक्रियेची पद्धत आणि सद्यस्थिती यांचाही समावेश करावा.**

लागू नाही. या कंपनीची निर्गुंतवणूकीसाठी निवड झालेली नाही.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(५) मधील उप-आदेश**

**१. कंपन्यांमध्ये, कंत्राटाच्या अटी व तरतुदी प्रमाणे महसूल वसुलीची प्रभावी व्यवस्था आहे किंवा कसे? महसूलाचे लेखा नोंद वहीत योग्य प्रकारे आणि लागू होणाऱ्या लेखा मानकांप्रमाणे नोंद होते काय?**

होय

**२. नविन प्रकल्पाच्या स्थापनेसाठी जमिनीचे संपादन करावे लागते काय? यातील सर्व प्रकरणात थकबाकी त्वरीत चूकती केली जाण्याबाबतची कामे पारदर्शक पद्धतीने झाले काय? याचा अहवाल देणे जेथे विचलन झाले असेल त्याचा तपशील द्यावा.**

कंपनी कार्यरत नसल्यामुळे लागू नाही.

**३. लेखा परिक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा हा कंपनीच्या नफा आणि तोटा पत्रकाप्रमाणे आहे काय?**

होय

**क) महाजेनको ॲश मॅनेजमेंट सर्व्हिसेस लिमिटेड**

**१. कोणतीही कर्जे / ऋणे / व्याज इ. सोडून देणे, निर्लेखित करणे अशी प्रकरणे झाली असल्यास त्याचा अहवाल देणे 'होय' असल्यास त्याची कारणे व त्यातील रक्कम याची माहिती द्यावी.**

वर्षे २०२०-२०२१ या वर्षात कर्जे / ऋणे / व्याज इ. सोडून देणे / निर्लेखित करणे अशी कोणतीही प्रकरणे कंपनीत झालेली नाहीत.

**२. तिसऱ्या पक्षांकडे ठेवलेल्या वस्तूमालाचा आणि शासन किंवा इतर प्राधिकरणे यांनी भेट स्वरुपात दिलेल्या मत्तांचे योग्य अभिलेख जतन केले आहेत किंवा कसे?**

लागू नाही. कोणतीही वस्तुसूची नाही.

**३. कायदेविषयक / न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असणाऱ्या खटल्यांचे वयानुसार विश्लेषणाचा अहवाल द्यावा. त्यात प्रलंबनाची कारणे आणि सर्व कायदेविषयक (परदेशी आणि स्थानिक) खटल्यांवरील खर्चावर लक्ष / नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणेचे अस्तित्त्व / प्रभाव यांचाही त्यात समावेश करावा.**

लागू नाही.

**४. या कंपनीची निवड निर्गुंतवणूकीसाठी झाली असल्यास त्याचा तिच्या मत्ता (अमूर्त मत्ता आणि जमिनी यासह) आणि दायित्त्वे (आश्वासन आणि सामान्य राखीव यांचे सह) यांच्या मूल्यांकनाच्या संदर्भात स्थिती दर्शक अहवाल देऊन त्याचे परिक्षण करावे. त्यात निर्गुंतवणूक प्रक्रियेची पद्धत आणि सद्यस्थिती यांचाही समावेश करावा.**

लागू नाही. या कंपनीची निर्गुंतवणूकीसाठी निवड झालेली नाही.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(५) मधील उप-आदेश**

**५. कंपन्यांमध्ये, कंत्राटाच्या अटी व तरतुदी प्रमाणे महसूल वसुलीची प्रभावी व्यवस्था आहे किंवा कसे? महसूलाचे लेखा नोंद वहीत योग्य प्रकारे आणि लागू होणाऱ्या लेखा मानकांप्रमाणे नोंद होते काय?**

होय, कंपनीकडे फक्त ठराविक मुदतीची ठेवीवरचे व्याज हे महसूल आहे.

**६. नविन प्रकल्पाच्या स्थापनेसाठी जमिनीचे संपादन करावे लागते काय? यातील सर्व प्रकरणात थकबाकी त्वरीत चूकती केली जाण्याबाबतची कामे पारदर्शक पद्धतीने झाले काय? याचा अहवाल देणे जेथे विचलन झाले असेल त्याचा तपशील द्यावा.**

लागू नाही.

**७. लेखा परिक्षण अहवालात नमूद केलेला नफा/तोटा हा कंपनीच्या नफा आणि तोटा पत्रकाप्रमाणे आहे काय?**

होय.

**८. कंपनीने ऑर्डर देऊन मागविलेल्या आणि मिळालेल्या कोळशाची गुणवत्ता/संख्या यांचा मेळ करण्याची योग्य ती व्यवस्था आहे काय? कोळशाचा दर्जा/ओलेपणा आणि विलंब आकार इ. योग्य नोंदणी लेखा वह्यात करण्यात येते काय किंवा कसे?**

लागू नाही. कारण कोळशाची ऑर्डर दिली नाही किंवा तो मिळालेला नाही.

**९. राज्य शासनाला विनामूल्य वीज किती प्रमाणात देय केली? त्याचा संमत अटीप्रमाणे हिशेब करून तो लेख्यांचा प्रमाणकाप्रमाणे लेख्यामध्ये दर्शविला काय?**

लागू नाही.

**१०. वस्तूमाल सूचीमध्ये भंगार, निकामी साहित्य इत्यादीचे मूल्यासह योग्य वर्गीकरण केले आहे का?**

लागू नाही.

**११. हायड्रोइलेक्ट्रीक प्रकल्पाच्या प्रकरणात पाण्याचा विसर्ग राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे/मार्गदर्शक सूचनाप्रमाणे आणि जैविक विविधता जपण्याच्या दृष्टिने होतो. तसे केले नाही म्हणून दंड भरला/भरावयाचा असल्यास त्याची माहीती द्यावी.**

लागू नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन १००१८६ डब्ल्यु**
**यूडीआयएनः २१०३८५२६ ए ए ए ए इ आय ७३९९**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३८५२६**

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन ११०५०४ डब्ल्यु**
**यूडीआयएनः २१०३९५५५ ए ए ए ए आय यू ७१६२**

**सी. ए. बी.एन. राव**
भागीदार
**आयसीएआय एम नं. ०३९५५५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२१

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाची भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालातील जोडपत्र क्र.२

### कंपनी अधिनियम २०१३ ( कायदा ) चे कलम १४३ चे उपकलम क्र. ३ मधील खंड क्र. ( १ ) नुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणावरील अहवाल

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (यापुढे सूत्रधारी कंपनी असा उल्लेख केला आहे) आणि तिच्या सर्व उपकंपन्या आणि तिचा सहयोगी कंपनी या सर्व भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या असून त्यांच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा वित्तीय अहवाल देण्यासाठी आम्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखे परिक्षण पूर्ण केले. हे काम आम्ही या कंपनीच्या एकत्रित लेख्यांचे परिक्षण करताना त्यासोबत पार पाडले.

### अंतर्गत वित्तीय नियंत्रणासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी

भारतीय सनदी लेखापालांच्या संस्थेने "(आय्.सी.ए.आय्.)" वित्तीय अहवाल लेखासंदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण करावे या विषयावर, एक मार्गदर्शक टिपणी (सदर मार्गदर्शक टिपणी) दिली आहे. त्यामध्ये दिलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक विचारात घेऊन कंपनीने निश्चित केलेल्या वित्तीय अहवाल देण्याबाबतचे निकषावर आधारित अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची स्थापना करून त्याची कार्यवाही करणे याची जबाबदारी कंपनीच्या आणि उपकंपनीच्या आणि सहयोगी कंपन्याच्या संबंधित संचालक मंडळाची असते. या जबाबदारीमध्ये पुढील कार्ये समाविष्ट असतात, ती अशी अंतर्गत नियंत्रणाची संकल्प रचना चित्र तयार करणे, कंपनीच्या औद्योगिक व्यवहारात शिस्त आणि कार्यक्षमता यांची हमी देणे, कंपनीच्या धोरणांना धरून राहणे, तिची मत्ता सुरक्षित ठेवणे, लबाडी व चूका शोधणे व त्यांना आळा घालणे, लेख्यांचे अभिलेख अचूक व परिपूर्ण ठेवणे आणि कंपनी अधिनियम २०१३ नुसार आवश्यक अशी वित्तीय माहिती विश्वासपूर्णरित्या वेळेवर पूर्ण करून देणे.

### लेखापरिक्षकांची जबाबदारी

वित्तीय अहवाल देण्यासाठी कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आमच्या लेखापरिक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी असते. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३(१०) यात विहीत केलेली लेखा मानके आणि वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण यासंबंधीची मार्गदर्शक टिपणी यानुसार लागू होणाऱ्या मर्यादेत आम्ही अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण केले. उपरोक्त लेखा मानके व मार्गदर्शक टिपणी यांच्या आवश्यकतेनुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे आणि वित्तीय अहवाल देण्यासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी आहेत किंवा कसे याची योग्य व कारणयुक्त हमी मिळविणे या उद्दिष्टाने आम्हाला लेखापरिक्षणाची योजना करून ते पूर्ण करावे लागते, तसेच ही नियंत्रणे प्रत्यक्षात प्रभावीरित्या कार्यरत आहेत किंवा नाही आणि ती सुस्थापित असून त्याचे पालन केले जात आहे याची खातरजमा करावी लागते.

वित्तीय अहवाल देण्यासाठी असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असल्याबाबत आणि ही नियंत्रणे परिणामकारकरित्या कार्यरत असल्याबद्दल लेखापरिक्षणातून पुरावे मिळावेत यादृष्टीने लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीद्वारे कार्य करावे लागते. यामध्ये सदर अंतर्गत वित्तीय नियंत्रणे समजून घेणे, प्रत्यक्ष कार्यवाहीत अस्तित्वात असलेल्या दुर्बल जागा व त्यातील धोके याचे निर्धारण करणे व निर्धारीत धोक्यांच्या आधारे अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची रचना व त्याची परिणामकारकता याचे परिक्षण आणि मूल्यमापन करणे या दृष्टीने आमचे लेखापरिक्षण केले जाते. यासाठी निवडलेली कार्यपद्धती लेखापरिक्षकांच्या न्याय निर्णय शक्तीवर अवलंबून असते. भारतीय लेखा मानकांनुसार तयार केलेल्या कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांमध्ये लबाडी किंवा चुका यामुळे काही गैरमाहिती देण्याच्या धोक्यांचे निर्धारण करणे याचासुद्धा अंतर्भाव लेखापरिक्षणात केला जातो.

आमचा विश्वास आहे की, आम्ही आमच्या लेखा परिक्षणातून मिळविलेले पुरावे तसेच, खाली दिलेल्या 'इतर विषय' या परिच्छेदासह संदर्भानूसार उपकंपन्याचे (ह्या कंपन्या भारतात समाविष्ट आहेत) लेखापरिक्षण करणारे अन्य लेखा परिक्षक यांनी लेखा परिक्षणात्मक मिळविलेले पुरावे हे सूत्रधारी व तिच्या सर्व उपकंपन्या यांचे वित्तीय अहवाल देण्यासाठी केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीचे लेखापरिक्षण करून त्यावर आमचा लेखापरिक्षणाचा अभिप्राय देण्यास पूरेसा आणि योग्यप्रकारे आधार देतात.

### वित्तीय अहवालाकरीता असलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ:

कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची रचना कंपनीच्या अहवालाच्या विश्वसनीयते संबंधी आणि ही वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचे कार्य हे भारत देशात सर्वसाधारणपणे स्वीकारल्या गेलेल्या लेखा मानकांशी सुसंगत असल्याची रास्त हमी देण्यासाठी आहे. वित्तीय अहवाल देण्यासाठीच्या कंपनीने केलेल्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणामधे खालील धोरणे व कार्यपद्धती यांचा समावेश असतो.

१. अभिलेख/दस्तऐवज जतन करणे, त्यात कंपनीचे व्यवहार आणि मत्ता कामी लावणे याबद्दल तपशीलवार व अचूक माहिती असावी.

२. भारतात सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखा तत्वानुसार एकत्रित वित्तीय विवरण पत्रके भारतीय लेखा मानकानुसार तयार करण्यासाठी आवश्यक ते सर्व व्यवहार नोंदले गेले आहेत आणि कंपनीची सर्व जमा आणि खर्च ही व्यवस्थापन आणि संचालकांच्या अधिकाराने केलेली आहेत याची रास्त हमी मिळविणे आणि

३. भारतीय लेखा मानकानुसार केलेल्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावर ज्याचा प्रत्यक्ष व थेट परिणाम होऊ शकेल अशा प्रकारे मतांचे अनधिकृत संपादने, वापर किंवा विल्हेवाट असे व्यवहारांना आळा घातला आहे किंवा ती वेळेवर शोधून काढली आहेत याची रास्त मते मिळविणे.

**अंतर्गत वित्तीय विवरण पत्रकाच्या अंगभूत मर्यादा:**

वित्तीय अहवाल देण्यासाठी केलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या काही अंगभूत मर्यादा असतात. त्यांना अयोग्य व्यवस्थापनामुळे नियंत्रणे ओलांडून जाणे किंवा त्याच्या संघर्ष होणे, चुक किंवा लबाडीने गैरविवरण केले जाणे आणि त्यांचा शोध न लागणे आदी बाबी समाविष्ट असतात. तसेच भविष्य कालीन अंतर्गत वित्तीय नियंत्रणांकडून केले जाणारे मूल्यांकनाचे प्रक्षेप या जोखीमांच्या अधीन असतात. वित्तीय अहवाल देण्यासाठीची वित्तीय नियंत्रणे, परिस्थितीत बदल झाल्याने अपूरी पडतात किंवा धोरण किंवा प्रक्रिया याची पूर्तता कमी प्रमाणात होते.

**पात्र मतांचा आधार:**

आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आमच्या लेखापरिक्षणांच्या आधारे दि. ३१ मार्च २०२१ रोजी सूत्रधारी कंपनीत जेथे अंतर्गत नियंत्रणे प्रभावी नव्हती अशी काही प्रत्यक्ष दुर्बलता निश्चित करण्यात आल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१. पुरवठादारांची अग्रिमे व त्यांची दायित्वे यांचे वेळेवर समायोजन करण्यासाठी कंपनीचे अंतर्गत नियंत्रण हवे.

२. परिसमापनातील नुकसानीचे अंतिमीकरण आणि वसुली आकारणी वेळेवर होण्यासाठी कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे हवीत.

३. कर्मचाऱ्यांच्या दुय्यम स्वरूपाच्या अभिलेखाचे तसेच सॅप प्रणालीद्वारे, मानव संसाधन मोड्यूल मधील पगार पत्रकाची माहिती यांच्या अंतर्गत वित्तीय प्रणालीचे सॅप प्रणालीचे एकत्रिक भाग आहेत, त्यामुळे ते बघता आलेले नाहीत किंवा त्याचा मेळ करता आलेला नाही.

**एक उपकंपनी महागूज कोलायरीज लिमिटेड हिचे लेखा परीक्षण आम्ही केलेले नाही. अन्य लेखापरिक्षकांनी खालील मत दिले आहे.**

**मताचा अस्वीकार**

*आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे, यानुसार भारताच्या सनदी लेखापाल संस्थेने वित्तीय अहवालासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यांचे लेखा परिक्षण विषयी केलेल्या मार्गदर्शक सूचनामधे अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक दिले आहेत. त्यातील निकषांच्या नुसार या कंपनीने वित्तीय अहवालांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केलेली नाहीत. या कारणांमुळे, या कंपनीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणे होती किंवा कसे आणि ती दि. ३१ मार्च २०२१ रोजी प्रभावीरित्या कार्यरत होती किंवा कसे हे कळाले नाही. त्यामुळे कंपनीच्या अंतर्गत नियंत्रणाबद्दल पुरेसे लेखा परिक्षणात्मक पुरावे आम्ही मिळवू शकलो नाही त्या आधारे मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

आम्ही वर दिलेले अस्वीकारक मत विचारात घेऊन त्याप्रमाणे कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकाचे लेखापरिक्षण करण्याकरता लावावयाच्या कसोट्या, निकष यांचे स्वरुप, वेळ आणि मर्यादा निश्चित केल्या सदर अस्वीकार हा आमच्या लेखा परिक्षण अहवालातील भर देण्याची प्रकरणे या परिच्छेदाच्या अधीन आहे आणि त्याने कंपनीच्या वित्तीय विवरण पत्रकावरील आमच्या मतांना बाधा येत नाही.

'प्रत्यक्ष दुर्बलता' ही एक उणीव आहे किंवा आणखी काही उणीवांचे मिश्रण आहे. वित्तीय अहवालासाठीच्या अंतर्गत नियंत्रणामध्ये, अशा उणीवांमुळे कंपनीच्या वार्षिक किंवा अंतरिम वित्तीय विवरण पत्रकांमध्ये जे वेळीच शोधता येणार नाही, अशा प्रकारचे गैरविवरण होण्याची शक्यता असते.

**पात्र मत:**

सदर कंपनी ही एक शासकीय उपक्रम असल्यामुळे वित्तीय अहवालांसाठी कंपनीची अंतर्गत नियंत्रणांच्या प्रक्रियांची रचना ही विविध प्रकारची मॅन्यूअल्स, नियमावली, परिपत्रके आणि वेळोवेळी दिले जाणारे आदेश यांच्या आधारे केली आहे. त्यामुळे वित्तीय अहवालासाठीची अंतर्गत

वित्तीय नियंत्रणे यावरील आमचे मत त्यातील व्याख्येंवर आधारले आहे. वित्तीय विवरण पत्रकाच्या आमच्या लेखापरिक्षणात आम्ही प्रायोगिक तपासणीच्या आधारे आणि वित्तीय अहवालासाठीचा अंतर्गत नियंत्रण प्रक्रियेच्या पुरेशी असल्याबाबत आम्ही घेतलेल्या आढाव्याच्या आधारे आणि वित्तीय अहवालासाठीचा अंतर्गत नियंत्रण प्रक्रियेच्या रचनेच्या प्रमाणामध्ये काही उणींवा निश्चित केल्या आहेत तसेच प्रक्रियेच्या उपयुक्ततेबाबत वरील ''पात्र मतांचा आधार'' या परिच्छेदात माहिती दिली आहे.

*वरील ''पात्र मतांचा आधार'' या परिच्छेद (१) यात वर्णन केलेल्या प्रत्यक्ष घटक यांचे नियंत्रण निकषाच्या उद्देशावर झालेले / होऊ शकणारे परिणाम वगळता,* आमची सर्वोतापरी उत्कृष्ट माहिती व आम्हांस दिलेली स्पष्टीकरणे यांच्या आधारे या कंपनीमध्ये दि. ३१ मार्च २०२१ रोजी वित्तीय अहवालासाठी अंतर्गत नियंत्रणे अस्तित्वात होती आणि ती प्रभावीपणे कार्यरत होती.

आम्ही वरीलप्रमाणे दुर्बल घटकांची ओळख निश्चिती केली व ती विचारात घेतली. ३१ मार्च २०२१ रोजीचे आम्ही केलेले कंपनीचे भारतीय लेखा मानकाप्रमाणे तयार केलेली एकत्रित वित्तीय विवरण पत्रे यांचे लेखापरिक्षण करताना आमच्या लेखापरिक्षणाच्या चाचण्यांची मर्यादा, स्वरूप व वेळ ठरविण्यासाठी दुर्बल घटक विचारात घेतले.

वरील पात्र मतांचा आधार यात परिच्छेद(१) यात सांगितलेल्या पुरवठादारांच्या अग्रिमांचे व दायित्वांच्या तरतूदीचे वेळेवर समायोजन करणे या विषयीची प्रत्यक्ष दुर्बलता याचा परिणाम कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवरील आमच्या मतांवर परिणाम झालेला आहे त्याचे पात्र मत आम्ही मुख्य लेखा परिक्षणात दिलेले आहे.

वरील पात्र मतांचा आधार, यातील परिच्छेद (२ आणि ३) यात दिलेले इतर प्रत्यक्ष दुर्बल घटक यामुळे कंपनीच्या एकत्रित वितीय विवरण पत्रांवरील आमच्या अभिप्रायास बाधा येत नाही.

इतर विषय:

आम्ही या अहवाल वर्षात आमची कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या लेखा परिक्षणाच्या कामांची सूत्रधारी कंपनीच्या फक्त काही कारखान्यांना किंवा जागाना प्रत्यक्ष भेट देऊ शकलो. कारण सरकारने कोविड १९ च्या पसार रोखण्यासाठी लॉकडाऊन लावला होता. आम्ही ज्या कारखाने आणि जागांना आमच्या आयएफसी संबंधित या वर्षीच्या लेखा परिक्षणाच्या कामाकरिता प्रत्यक्ष भेटी देऊ शकलो नाहीत, ते काही ''घरुन काम करणे या प्रकारे करण्यात आले. म्हणजे कंपनीचे कारखाने व इतर कार्यकर्ते या व्यतिरिक्त अन्य जागी हे काम व्यवस्थापनाने अहवाल वित्तीय आधार सामग्री/माहिती/अभिलेख/पुष्टि देणारे कागदपत्र इ. डिजीटल माध्यमातून आणि ॲप प्रणालीद्वारे व्हीपीएन लिंकने डॅश बोर्ड मार्फत उपलब्ध करुन दिले आहेत.

कंपनीच्या समुहातील तीन उपकंपन्या या भारतात संस्थापित झालेल्या कंपन्या आहेत. त्यांच्या लेखा परिक्षकांनी दिलेले संबंधित अहवाल याच्या आधारे त्यांच्या कंपन्या संबंधित वित्तीय निवेदनासाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रयाच्या लेखा परिक्षणाचा पुरेसेपणा आणि प्रवर्तन कार्यनिधी प्रभाव या प्रमाणे कायदयाचे कलम १४३(३)(१) यानुसार आम्ही उपरोक्त अहवाल दिले आहे आणि येथे नमूद करतो की कंपनीच्या दोन सहयोगी कंपन्याकडून असे अहवाल आम्हाला मिळलेले नाहीत.

वरील विषयावर आमचे पात्र मत नाही.

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन १००१८६ डब्ल्यु**
**यूडीआयएन: २१०३८५२६ ए ए ए ए इ आय ७३९९**

**सी.ए.राजेश जोशी**
भागीदार
**आयसीएआय एम नं.०३८५२६**

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
**एफआरएन ११०५०४ डब्ल्यु**
**यूडीआयएन: २१०३९५५५ ए ए ए ए आय यू ७१६२**

**सी. ए. बी.एन. राव**
भागीदार
**आयसीएआय एम नं. ०३९५५५**

स्थळ : मुंबई
दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२१

# ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे ताळेबंद पत्रक ( एकत्रित )

(₹ कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|---|
| **मत्ता** | | | | |
| **चालू नसलेल्या मत्ता** | | | | |
| मालमत्ता, कारखाने व साधने | १ | ३४,२८६.३६ | ३६,२७५.५१ | ३८,२८९.४७ |
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | २ | ३,६७६.६९ | २,११९.६३ | १,००९.१५ |
| वापरहक्काच्या- मत्ता | १अ | ३,९२८.६९ | ४,१८२.७३ | - |
| अमूर्त मत्ता | १ब | २.६३ | ४.३० | ७.१२ |
| अमूर्त मत्ता विकसनशील | २ | २३९.६८ | १३३.९३ | १३३.७६ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| उपकंपन्या, सहयोगी कंपन्या यातिल गुंतवणूकी | ३ | (४४.९७) | (४३.७२) | (४२.६१) |
| **इतर चालू नसलेल्या मत्ता** | ४ | ६३१.४० | ६४१.५१ | १,४२८.९० |
| **एकूण चालू नसलेल्या मत्ता** | | **४२,७२०.४८** | **४३,३१३.८९** | **४०,८२५.७८** |
| **चालू मत्ता** | | | | |
| वस्तू सूची | ५ | ९३०.०९ | १,७६३.०३ | १,४१७.८९ |
| वित्तीय मत्ता | | | | |
| व्यापारी येणी | ६ | २४,५१८.१८ | १७,८०३.६८ | १३,५५१.३५ |
| रोख व रोख समतूल्य | ७ | ५७.५४ | ४.९६ | ०.३२ |
| कर्जे | ८ | ५.७७ | ७.६५ | १०.६४ |
| इतर वित्तीय मत्ता | ९ | ३,०५९.५० | २,७८४.८६ | २,९०६.८९ |
| **इतर चालू मत्ता** | १० | ६४८.५० | १,०८२.५३ | १,२८४.५३ |
| **एकूण चालू मत्ता** | | **२९,२१९.५७** | **२३,४४६.७०** | **१९,१७१.६२** |
| इतर मत्ता | | | | |
| विक्री / विल्हेवाटीसाठी वर्गीकरण केलेल्या मत्ता | १क | २२२.६१ | २२५.८३ | २००.८४ |
| **एकूण इतर मत्ता** | | **२२२.६१** | **२२५.८३** | **२००.८४** |
| **एकूण मत्ता** | | **७२,१६२.६६** | **६६,९८६.४१** | **६०,१९८.२४** |
| **समभाग आणि दायित्वे** | | | | |
| **समभाग** | | | | |
| समभाग भांडवल | ११ | २५,४०७.९७ | २५,३४३.९७ | २५,२८४.१५ |
| इतर समभाग | १२ | (६,३७५.६६) | (६,६२८.३३) | (६,७२७.८९) |
| **एकूण समभाग भांडवल ( महानिर्मितीस )** | | **१९,०३२.३१** | **१८,७१५.६४** | **१८,५५६.२६** |
| महानिर्मितील व्यतिरिक्त नियंत्रक हितसंबंध | | २१.४२ | २१.५३ | २१.७१ |
| **एकूण समभाग** | | **१९,०५३.७३** | **१८,७३७.१७** | **१८,५७७.९७** |
| **दायित्वे** | | | | |
| चालू नसलेली दायित्वे | | | | |
| वित्तीय दायित्वे | | | | |
| कर्जे | १३ | २२,४५२.२० | २२,७२७.०१ | २३,०१२.११ |
| तरतुदी | १४ | १,०६२.६६ | १,०५५.७७ | ८२७.९२ |
| स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | १५ | १,०३२.१६ | ८३६.१८ | ८६०.४६ |
| इतर चालू नसलेली दायित्वे | १६ | ३,२३१.२८ | ३,३८४.७३ | - |
| **एकूण चालू नसलेली दायित्वे** | | **२७,७७८.३०** | **२८,००३.६९** | **२४,७००.४९** |
| **चालू दायित्वे** | | | | |
| वित्तीय दायित्वे | | | | |
| कर्जे | १७ | १०,४७३.५५ | ८,१०१.७९ | ८,०६०.६२ |
| व्यापारी देणी (सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योजक) | १८ | - | ०.०३ | ०.१२ |
| व्यापारी देणी (सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योजक) व्यतिरिक्त | १८ | ३,२८१.५९ | २,२५१.९१ | १,३२८.२२ |
| इतर वित्तीय दायित्वे | १९ | ११,२१९.९७ | ९,५२१.६३ | ७,२३६.४५ |
| इतर चालू दायित्वे | २० | १०७.४२ | ८२.८९ | ५९.१९ |
| तरतुदी | २१ | २४८.१० | २८७.३० | २३५.१८ |
| **एकूण चालू दायित्वे** | | **२५,३३०.६३** | **२०,२४५.५६** | **१६,९१९.७८** |
| **एकूण समभाग आणि दायित्वे** | | **७२,१६२.६६** | **६६,९८६.४१** | **६०,१९८.२४** |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**के.एस.अय्यर अ‍ॅन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यु)
**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३८५२६)

**आरएसव्हीए अ‍ॅन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यु)
**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)
मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा आणि तोटा पत्रक ( एकत्रित )

(₹ कोटीत)

| तपशील | टिपा क्र. | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|---|
| **महसूल** | | | |
| प्रवर्तनातील महसूल | | | |
| वीज विक्री | २२ | २०,८९१.५८ | २१,९६३.९८ |
| इतर प्रवर्तन महसूल | २३ | २,६८३.८८ | २,६९२.३३ |
| इतर उत्पन्न | २४ | ४९.५३ | ८०.०७ |
| **एकूण उत्पन्न** | | **२३,६२५.००** | **२४,७३६.३८** |
| **खर्च** | | | |
| वापरलेल्या मालाचा खर्च | २५ | १३,४९२.९८ | १४,३९८.२७ |
| कर्मचारी लाभ खर्च | २६ | १,४२९.४२ | १,८२८.९७ |
| वित्त खर्च | २७ | ३,६३७.०४ | ३,५७८.७९ |
| घसारा तरतूद | १ व १ अ | २,७३७.८० | २,७७८.७४ |
| इतर खर्च | २८ | १,९०६.४४ | १,९३०.१७ |
| **एकूण खर्च** | | **२३,२०३.६८** | **२४,५१४.९४** |
| नफा/(तोटा)सहयोगी कंपन्यांच्या नफ्यातील वाटा, अपवादात्मक बाबी आणि कर या पूर्वीचा | | ४२१.३२ | २२१.४५ |
| सहयोगी कंपन्यांच्या नफ्यातील वाटा | २४ अ | (०.०५) | ०.०४ |
| **करपूर्व नफा/( तोटा )** | | **४२१.२७** | **२२१.४९** |
| कर खर्च | | | |
| नफा/तोटा बाबींवर चालू कर | | (४६.८३) | ४६.८३ |
| इतर सर्वकष उत्पन्न बाबींवर चालू कर | १५ | (०.१९) | ४१.३६ |
| स्थगित कर खर्च | | १९५.९८ | (२४.२८) |
| **एकूण कर खर्च** | | **१४८.९७** | **६३.९०** |
| **कालावधीतील नफा/( तोटा )** | | **२७२.३०** | **१५७.५९** |
| इतर सर्वकष उत्पन्न | | | |
| **नफा आणि तोटा यात विवरण न केलेल्या बाबी** | | | |
| स्थगित लाभ योजनांची पूर्नमोजणी | | ०.७५ | (१६४.३२) |
| **इतर सर्वकष उत्पन्नावरील चालू कर खर्च लाभ/( व्यय )** | | (०.१९) | ४१.३६ |
| **इतर सर्वकक्ष उत्पन्नांकडून ( करांची मिळकत )** | | **०.५६** | **( १२२.९६ )** |
| कालावधीतील एकूण सर्वकक्ष उत्पन्न (करांची निव्वळ) | | **२७२.८६** | **३४.६३** |
| **खालील बाबींना देय** | | | |
| कंपनीच्या मालकांना | | २७३.६१ | १५८.५२ |
| नियंत्रण नसलेले हितसंबंध | | (१.३१) | (०.९३) |
| **वर्षभरात नफा** | | २७२.३० | १५७.५९ |
| **खालील बाबींना लागू असलेले इतर सर्वकष उत्पन्न** | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| कंपनीचे मालकांना | | ०.५६ | (१२२.९६) |
| नियंत्रण नसलेले हितसंबध | | - | - |
| **इतर सर्वकष उत्पन्न** | | **०.५६** | **( १२२.९६ )** |
| एकूण सर्वकष उत्पन्न प्रमाणे देय | | | |
| कंपनीचे मालकांना | | २७४.१८ | ३५.५६ |
| नियंत्रण नसलेले हितसंबध | | **( १.३१ )** | **( ०.९३ )** |
| **एकूण सर्वकष उत्पन्न** | | २७२.८६ | ३४.६३ |
| प्रतिभाग मिळकत (मूळ) | ४४ | ०.११ | ०.०६ |
| प्रतिभाग मिळकत (सौम्यकृत) | | ०.११ | ०.०६ |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यु)

**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ३८५२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यु)

**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)
मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## समभागातील बदलांचे विवरण पत्रक ( एकत्रित )

### १. समभाग भांडवल

| तपशील | रक्कम ( ₹ कोटीत ) |
|---|---|
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **२५,२८४.१५** |
| समभाग भांडवलीतील बदल | ५९.८२ |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **२५,३४३.९७** |
| समभाग भांडवलीतील बदल | ६४.०० |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **२५,४०७.९७** |

(₹ कोटीत)

| तपशील | वाटप प्रलंबित असलेल्या भाग अर्जाची रक्कम | ठेवलेली मिळकत | इतर सर्वकष उत्पन्न | इतर समभाग | एकूण इतर समभाग | कंपनीच्या मालकांना एकूण देय | अनियंत्रित समभाग धारकांना देय | एकूण इतर समभाग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दि. ३१.०३.२०१९ रोजी** | **०.००** | **( ६,६३५.०८ )** | **( ९७.४५ )** | **२६.३५** | **( ६,७०६.१८ )** | **( ६,७२७.८९ )** | **२१.७१** | **( ६,७०६.१८ )** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | – | – | – | – | – | – | – |
| वर्षातील इतर सर्वकष उत्पन्न | | १५७.५९ | – | – | १५७.५९ | १५८.५२ | (०.९३) | १५७.५९ |
| | | – | (१२२.९६) | – | (१२२.९६) | (१२२.९६) | – | (१२२.९६) |
| भाग अर्जाच्या रक्कममध्ये झालेली भर | १२३.८२ | – | – | ०.७४ | १२४.५६ | १२३.८२ | ०.७४ | १२४.५६ |
| वर्षभरात वितरण केलेले समभाग | (५९.८२) | – | – | – | (५९.८२) | (५९.८२) | – | (५९.८२) |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **६४.००** | **( ६,४७७.४८ )** | **( २२०.४१ )** | **२७.०९** | **( ६,६०६.८० )** | **( ६,६२८.३३ )** | **२१.५२** | **( ६,६०६.८० )** |
| वर्षातील नफा किंवा तोटा | | २७२.३० | | | २७२.३० | २७३.६१ | (१.३१) | २७२.३० |
| वर्षातील इतर सर्वकष उत्पन्न | | | ०.५६ | | ०.५६ | ०.५६ | – | ०.५६ |
| भाग अर्जाच्या रक्कममध्ये झालेली भर | ४२.५० | | | १.२० | ४३.७० | ४२.५० | १.२० | ४३.७० |
| वर्षभरात वितरण केलेले समभाग | (६४.००) | | | | (६४.००) | (६४.००) | – | (६४.००) |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **४२.५०** | **( ६,२०५.१९ )** | **( २१९.८५ )** | **२८.३०** | **( ६,३५४.२४ )** | **( ६,३७५.६६ )** | **२१.४२** | **६,३५४.२४ )** |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन – १००१८६ डब्ल्यु)

**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३८५२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन – ११०५०४ डब्ल्यु)

**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)
मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे एकत्रित रोकडता प्रवाह विवरण पत्रक

(₹ कोटीत)

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| अ ) प्रवर्तन कार्यातून रोकडता प्रवाह | | |
| निव्वळ नफा/( तोटा ) कर पूर्व आणि असाधारण बाबी पूर्वीचा | २७२.८६ | ३४.६३ |
| **कर पूर्व नफा आणि प्रवर्तन कार्यासाठी वापरलेली निव्वळ रोकड यांचा मेळ करण्यासाठी केलेली समायोजने** | | |
| मालमत्ता कारखाना, साधने व अमूर्त मत्ता यांचा घसारा/कमी करणे | २,७३७.८० | २,७७८.७४ |
| प्राधान्य शेअर्सचे व्याज | - | - |
| मालमत्ता, कारखाना, साधने विक्रीचा (लाभ)/तोटा | - | - |
| व्याख्यांकित लाभ योजनांची हानी/(तोटा) यांचे पूनर्मापन | - | - |
| परकीय चलन विनिमय फरकातील अवमूल्यन | | |
| निर्लेखित केलेले सुटे भाग | - | - |
| गुंतवणुकीचे मूल्य कमी होणे | - | - |
| एफ व्ही टी पी एल नुसार चालू गुंतवणूकीचे रास्त मूल्य | - | - |
| चालू गुंतवणुकीच्या विक्रीचा (लाभ)/तोटा | - | - |
| वित्त खर्च | ३,६३७.०४ | ३,५७८.७९ |
| परकीय चलनातील वसूली न झालेला खर्च | (१०.६५) | १०.८३ |
| येणी ई सी ए एल साठी तरतूदी | ७४.२० | १३४.७१ |
| निर्लेखित केलेली बुडीत कर्जे | - | - |
| व्याज उत्पन्न | (०.५९) | (०.३१) |
| निकामी वस्तूमालासाठी तरतूद | (१९.७९) | (८६.२९) |
| **मत्ता व तरतूदी यातील बदलापूर्वीचा प्रवर्तनीय नफा ( उपबेरीज १ )** | **६,६९०.८७** | **६,४५१.०९** |
| **खेळत्या भांडवलीतील हालचाली** | - | - |
| व्यापारी येण्यातील (वाढ)/घट | (६,७८८.७०) | (४,३८७.०४) |
| कर्जे, अग्रिमे व इतर मत्ता यातील (वाढ)/घट | १७४.६० | १,०८९.४३ |
| वस्तूमाल (वाढ)/घट | ८५२.७४ | (२५८.८५) |
| दायित्वे आणि इतर देणी यातील (वाढ)/घट | १,३४९.२४ | ५,२३९.३२ |
| **उपबेरीज ( २ )** | **( ४,४१२.१३ )** | **१,६८२.८७** |
| **प्रवर्तनातील रोख निर्मिती ( १ ) + ( २ )** | **२,२७८.७५** | **८,१३३.९५** |
| वजा: थेट कर/एफ बीटी रिफन्ड/भरलेले) निव्वळ | - | - |
| प्रवर्तन कार्यातून निव्वळ - रोख ( अ ) | २,२७८.७५ | ८,१३३.९५ |
| **ब ) गुंतवणूक कार्यापासून रोकडता प्रवाह** | | |
| मालमत्ता, कारखाने, साधने खरेदी (प्रगतीपथावरील भांडवली कामे समाविष्ट) | (२,१५५.७५) | (६,०५५.३५) |
| मालमत्ता, कारखाने साधने विक्री | - | - |
| गुंतवणूक खरेदी (वाटप प्रलंबित असलेला शेअर ॲप्लीकेशन मनी समाविष्ट) | - | - |
| उपकंपन्यात गुंतवणूकी | ०.०५ | (०.१२) |

| | | |
|---|---|---|
| चालू गुंतवणूक विक्रीची मिळकत | - | - |
| उपकंपन्यांना दिलेली कर्जे | | |
| व्याज प्राप्ती | ०.५९ | ०.३१ |
| लाभांश प्राप्ती | | |
| गुंतवणूक कार्यातून निर्माण केलेला/( वापरलेला ) निव्वळ रोख प्रवाह ( ब ) | (२१५५.२१) | (६०५५.१५) |
| **क ) वित्त कार्यातून रोकडता प्रवाह** | | |
| दीर्घ मुदतीची कर्जे उभारणी | ३,७५९.०५ | ३,०८०.११ |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाची परतफेड | (३,३७३.४८) | (२,४८९.६३) |
| समभाग प्राप्ती | ४२.५० | १२३.८२ |
| अल्प मुदतीची कर्जे उभारणी/(परतफेड) | २,३७३.७० | ५१.९४ |
| भांडवली अनुदानाची प्राप्ती | ३३.४६ | ०.२२ |
| वित्त खर्च केलेला | (३,४१७.९२) | (३,३५४.९२) |
| | ५१३.५८ | ५२५.०६ |
| वित्तीय कार्यातून निर्माण केलेला/(वापरलेला) निव्वळ रोख प्रवाह (क) | **( ६९.११ )** | **( २,०६३.४० )** |
| रोख व रोख समतूल्य यांत निव्वळ वाढ/(घट) (अ + ब + क) | ५४.५३ | १५.४१ |
| वर्षारंभीची रोख व रोख समतूल्य | ४.९६ | ०.३२ |
| वर्षा अखेरची रोख व रोख समतूल्य | ५९.४९ | १५.७२ |
| **रोख व रोख समतूल्य रोजी** | | |
| **बँकातील शिलकी** | | |
| - चालू खाते | ०.०३ | ४.९४ |
| - कार्यरत नसलेली चालू खाती | ५७.४९ | - |
| ओव्हर ड्राफ्ट | १.९५ | १०.७७ |
| हातातील रोख | ०.०२ | ०.०२ |
| **वर्षाअखेरची रोख व रोख समतूल्य** | **५९.४९** | **१५.७२** |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**के.एस.अय्यर ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यु)

**सी.ए. राजेश जोशी**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३८५२६)

**आरएसव्हीए ॲन्ड कंपनीकरिता**
सनदी लेखापाल
(एफआरएन - ११०५०४ डब्ल्यु)

**( सी. ए. बी. एन. राव )**
भागीदार (आयसीएआयएम नं. ०३९५५५)

मुंबई, २३ नोव्हेंबर २०२१

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड करीता**

**बाळासाहेब थिटे**
संचालक (वित्त) आणि मुख्य वित्त अधिकारी
डी.आय.एन.नं. ०८९२३६७६

**संजय खंदारे**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डी.आय.एन.नं. ०२२४४९८५

**पंकज शर्मा**
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

**राहुल दुबे**
कंपनी सचिव
एम नं. ए१४२१३

## दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर टिपा

**कंपनीचे स्वरूप आणि महत्वाची लेखा धोरणे:**

### अ ) कंपनीची माहिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ('सूत्रधारी कंपनी') ही कंपनी अधिनियम १९५६ नुसार संस्थापित झालेली कंपनी आहे आणि ती भारत देशातील अधिवासी संस्था आहे. सदर सूत्रधारी कंपनी आणि तिच्या उपकंपन्या या सुचिबद्ध (लिस्टेड) कंपन्या नाहीत. त्याचे १०० टक्के समभाग महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीने धारण केलेले आहेत.

सदर सूत्रधारी कंपनी ही विजेची निर्मिती करण्याच्या व्यवसायात कार्यरत आहे. त्यासाठी कंपनीची महाराष्ट्र राज्यात सर्वत्र औष्णिक, जलविद्युत, वायु आधारीत आणि सौर उर्जेचे वीज निर्मिती केंद्रे आहेत. ती प्रामुख्याने तिची सहोदर उपकंपनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) या कंपनीला महाराष्ट्र वीज नियामक आयोग या नियामक संस्थेने ठरविलेल्या दराने वीज पुरवठा करते. तसेच महानिर्मिती कंपनी सौर ऊर्जा आधारित महाराष्ट्रात वीज निर्मिती करते आणि ती महावितरण सह इतर ग्राहकांना पुरविते.

येथे जोडलेले एकत्रित वित्तीय विवरण पत्रके यामध्ये महानिर्मिती आणि तिच्या उपकंपन्याच्या वित्तीय विवरणपत्रकाचा (या सर्व समूहाला एकत्रितपणे 'कंपनी गट' असे येथे संबांधले आहे) या गटाचे संयुक्त उपक्रम कंपन्यातील हितसंबंध यांचा समावेश होतो. एकत्रित गटातील समाविष्ट कंपन्यांची माहिती खाली दिली आहे.

| अनु. क. | नाव | स्थापनेचा देश | स्वरूप | मालकीचे हितसंबंधाच्या प्रमाणे ३१.०३.२०२१ रोजीचे |
|---|---|---|---|---|
| १. | धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड | भारत | उपकंपनी | १०० % |
| २. | महाजेनको ॲश मॅनेजमेंट सर्व्हिस लिमिटेड | भारत | उपकंपनी | १०० % |
| ३. | महागूज कोलायरीज लिमिटेड | भारत | उपकंपनी | ६० % |
| ४. | यू. सी. एम. | भारत | सहयोगी | १८.७५ % |
| ५. | छत्तीसगड कटघोरा डोंगरगाव रेल्वे लिमिटेड | भारत | सहयोगी | २६ % |

**महत्वाची लेखा धोरणे:**

ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके तयार करणे आणि सादर करणे यासाठी खालील महत्वाची लेखा धोरणे अंगीकारण्यात आलेली आहेत.

### ब ) वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठीची आधारभूत तत्वे:

**१. भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन करण्यासंबंधीचे निवेदन**

ही एकत्रित वित्तीय विवरण पत्रके सर्वार्थाने भारतीय लेखा मानके यांचे अनुपालन करून तयार केली आहेत, ही भारतीय लेखा मानके कंपनी अधिनियम २०१३ (कायदा) यातील कलम १३३, ज्याचे सहवाचन कंपन्यासाठी (भारतीय लेखा मानके) नियमावली २०१५, यातील नियम ३ आणि कंपन्यांची (भारतीय लेखा मानके) दुरूस्त केलेली नियमावली २०१६ यासोबत होते) यानुसार अधिसूचित केल्याप्रमाणे तसेच कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतुदी यांचे अनुपालन करतात.

कंपनी गटाच्या सादरीकरणासाठी 'भारतीय रूपया' हे चलन वापरले आहे. तसेच तिच्या व्यवहाराचे चलनसुद्धा 'भारतीय रूपया' हेच आहे. वित्तीय विवरण पत्रकातील सर्व रकमांच्या आकडेवारीचे त्याजवळच्या कोटी रूपयामध्ये (₹ कोटी) रूपांतरण केले आहे.

ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रके वितरीत करण्यासाठी महानिर्मितीच्या संचालक मंडळाने दि. २३/११/२०२१ रोजीच्या ठरावाने मंजुरी दिली आहे.

**एकत्रिकरणाची तत्वे:**

**उपकंपन्या**

उपकंपन्या म्हणजे कंपनीतर्फे नियंत्रित केल्या जातात अशा सर्व संस्था (यांमध्ये विशेष हेतूसाठी अस्तित्वात आणलेल्या संस्थाचाही समावेश आहे.) जेव्हा अस्तित्वात आणलेल्या संस्था मधील गुंतवणूकीपासून सूत्रधारी कंपनीला परताव्याची अपेक्षा किंवा अधिकार असतो आणि संस्थेवर आपल्या शक्तीचा वापर करून त्या परताव्यांवर परिणाम करण्यासाठी सूत्रधारी कंपनीकडे सामर्थ्य असते तेव्हा ती नियंत्रणे कार्यरत आहेत असे मानले जाते. नियंत्रणाचे मूल्यांकन करण्यासाठी, जर हक्क सबल असतील तरच संभाव्य मतदानाचे हक्क विचारात घेतले जातात. नियंत्रण सुरू होण्याच्या तारखेपासून ते संपण्याच्या तारखेपर्यंतची वित्तीय विवरणपत्रके या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकामध्ये समाविष्ट केली आहेत. कंपनी, उपकंपन्या व संयुक्त नियंत्रणातील संस्था यांचे एकत्रीकरण करण्यासाठी त्यांचे समान व्यवहार व समान परिस्थितीतील इतर घटना यासाठी 'समान लेखा धोरण' वापरले आहे व त्यात नमूद केलेल्या पद्धतीचा उपयोग केला आहे. कंपनी गटाची एकत्रित वित्तीय विवरण पत्रके लाईन बाय लाईन या तत्वाने एकत्रित केली आहेत.

**सहयोगी / संयुक्त उपक्रम कंपन्या (समभागात गुंतवणूकीचे लेखे)**

संयुक्त उपक्रम कंपनी म्हणजे अशी एक रचना असते ज्यात एका संमत कराराद्वारे कंपनीचे संयुक्त नियंत्रणे संस्थापित केलेली असतात आणि त्यातील वित्तीय व प्रवर्तनाच्या निर्णयासाठी सर्वानुमते संमती आवश्यक असते. नियंत्रणातील संस्थेतील गुंतवणूकीचे लेखे करण्यासाठी इक्विटी मेथड (समभागामध्ये गुंतवणूकदारांचा समावेश) वापरली जाते व प्रारंभी तिला खर्चानुसार मान्यता दिली जाते. अशा संस्थेत जर नियंत्रण नसणाऱ्या हितसंबंधी धारणकर्त्यांकडे मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे अधिकार असतील आणि त्यामुळे त्यांना सर्वसामान्य व्यवहारातील निर्णयामध्ये प्रभाव मिळत असेल तर कंपनी अश्या संस्थाचे एकत्रीकरण करीत नाही. अशा संस्थेतील गुंतवणूकीचे लेखे इक्विटी मेथड ऑफ अकाऊंटींग या प्रकारे केले जाते.

**एकत्रिकरणासाठी काही व्यवहार वगळणे**

एकत्रित वित्तीय विवरण पत्रे तयार करताना कंपनी गटातंर्गत शिलकी, व्यवहार, वसूली न झालेले उत्पन्न व काही खर्च हे पूर्णपणे वगळले जातात. ज्यामध्ये गुंतवणूक केली आहे अशा इक्विटीमध्ये गुंतवणूकदारांचा समावेश असणाऱ्या संस्था यामधील व्यवहारातून वसूल न झालेली प्राप्ती किंवा तोटे हे कंपनीचे त्या संस्थेतील गुंतवणूकीच्या प्रमाणात वगळले जातात.

**अनियंत्रित हितसंबंधी**

अनियंत्रित समभाग धारकांच्या वाट्याचे मापन अश्या हितसंबंधीकडे असलेल्या संपादनाच्या तारखेला ज्याची निवड ओळख निश्चिती करता येईल अश्या मत्तांच्या भागाच्या प्रमाणात केली जाते. कंपनी समुहातील उपकंपन्याच्या समभागातील हितसंबधात ज्यामुळे बदल होणार नाही अश्या समभाग व्यवहाराचा विचार केला जातो.

२. **चालू / चालू नसलेल्या मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण**

कंपनी अधिनियम २०१३ ची सूची क्र. ३ यात दिलेले निकष आणि कंपनीचे सामान्यत: कार्यचक्र यानुसार गटातील मत्ता व दायित्वे यांचे वर्गीकरण चालू आणि चालू नसणाऱ्या या प्रकारांमध्ये केले आहे. स्थगित कर मत्ता आणि दायित्वे यांचे त्यांच्या निव्वळ तत्वावर चालू नसणाऱ्या असे वर्गीकरण केले आहे.

वरील हेतुसाठी कंपनी गटाने कार्यचक्र बारा महिन्यासाठी निश्चित केले आहे. ते उत्पादनाचे स्वरूप आणि उत्पादनासाठी लागणारे निवेश साहित्य यांचे संपादन करून त्यांचे रोख आणि रोख समतूल्य यात रूपांतरण करण्यासाठी लागणारा वेळ यावर आधारलेले असते.

सुत्रधारी कंपनीवर विद्युत अधिनियम २००३ चा अंमल आहे. विद्युत अधिनियम २००३ व त्याची नियमावली यातील तरतूदी जेव्हा कंपनी अधिनियम २०१३ च्या अन्वये लागू होणाऱ्या तरतूदींशी सुसंगत होत नसतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १७४ च्या अटींनुसार विद्युत अधिनियम २००३ आणि त्यांची नियमावली अभिभावी होतील.

### ३. ऐतिहासिक खर्च संकेतावर टिपा

ऐतिहासिक खर्च संकेतानुसार वित्तीय पत्रके तयार करण्यासाठी कंपनी ही सतत कार्यरत संस्था असल्याचे मानले जाते. तसेच वित्तीय विवरण पत्रके उपार्जन तत्वावर आधारित आहेत. मात्र त्याला खालील बाबींचा अपवाद आहे.

अ) रास्त मूल्यावर आधारीत काही वित्तीय विलेख

ब) रास्त मूल्यावर आधारीत कर्मचारी व्याख्यांकित लाभ योजना आणि

क) विक्रीसाठी काढलेल्या मत्ता, ज्यांचे मूल्य मापन त्यांच्या चालू मूल्य आणि रास्त मूल्य वजा विक्रिचा खर्च यातील किमान मूल्या इतके केले आहे, त्यांचे मापन प्रत्येक अहवाल कालावधीच्या अखेरीस केले जाते; याबाबतचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या लेखा धोरणात केले आहे.

मेसर्स महागूज कंपनीच्या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांचा आदेश दि.२५.०८.२०१४ (ज्याचे वाचन आदेश दि. २४.०९.२०१४ सोबत होते) यानुसार, भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने वर्ष १९९३ ते २०१३ या काळातील कोळसा खाणी वाटप रद्द केले. यामध्ये महागूज कंपनीच्या प्रवर्तकांनी दिलेल्या मच्छाकाटा – महानदी कोळसा ब्लॉकचा समावेश आहे. भारत सरकारने कोळसा खाणी (विशेष तरतूद) कायदा २०१५ (क्र. १२ वर्ष २०१५ चा) दि. २१.१०.२०१४ पासून पूर्नलक्षी प्रभावाने अमलात आणला. त्यानुसार कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी आदेश दिल्यावर या कोळसा ब्लॉकचे पूनर्वाटप व कागदपत्रांचे हस्तांरतण केले जाईल. या कागदपत्रात, भूगर्भशास्त्रीय अहवाल, खाण विकास योजना व नंतर ती बंद करण्याच्या योजना आदिंचा समावेश आहे. वरील कारणामुळे महागुज कंपनीही सतत चालू राहणारी कंपनी आहे. या तत्वानुसार तिची वित्तीय विवरण पत्रके तयार करणे चालू ठेवले आहे.

मे. डी. सी पी एल या कंपनीने प्रकरणात लेखे चालू असलेली संस्था या तत्वानुसार केलेले नाहीत. कारण सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाने सदर 'धोपावे कोस्टल पॉवर कंपनी लिमिटेड' या नावाची कंपनी बंद करण्यास मान्यता दिली असून त्याच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाशी संपर्क साधला आहे.

### ४. न्यायनिर्णय आणि अंदाज

कंपनीची वित्तीय विवरण पत्रके तयार करण्यासाठी व्यवस्थापनाला काही न्याय निर्णय, अंदाज करावे लागतात तसेच गृहिते धरावी लागतात. त्याचा परिणाम अहवालात दिलेल्या महसुल, खर्च, यांच्या रकमा तसेच मत्ता व दायित्वे यांच्यावर आणि त्यासोबतची प्रकटने, आकस्मिक दायित्वे यांच्यावर होतो. या अंदाज व गृहितकालीत अनिश्चिततेचा परिणाम, भविष्यकाळात मत्ता व दायित्वे यांच्या लेखात नोंदविलेल्या रकमामध्ये प्रभावी समायोजन असा होऊ शकतो. कंपनी समुहातर्फे अंदाज व गृहिते यांच्या सर्वोतपरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे सतत मूल्यमापन करते.

विशेषत: लेखा धोरणे लागू करताना महत्वाच्या क्षेत्रातील अंदाज व न्याय निर्णय यांच्या माहितीचे एकत्रित वित्तीय विवरण पत्रांतील मान्य रकमांवर होणारे महत्वाचे परिणाम खाली दिले आहेत.

- मालमत्ता, कारखाने, साधने आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आणि उर्वरित आयुष्य याविषयीचे अंदाज करणे.
- अवित्तीय मत्ताची मूल्यघट करणे.
- वित्तीय विलेखांच्या रास्त मुल्यांची मोजणी
- व्याख्यांकित लाभ बंधनाचे व महत्वाच्या विमागणिती गृहितांचे मापन
- तरतूदी आणि आकस्मिक परिस्थिती
- स्थगित कर मत्ता यांच्या वसुली योग्यतेचे मूल्य मापन

लेखांचे अंदाजामध्ये सुधारणा केल्यास एकत्रित वित्तीय विवरण पत्रांच्या कालावधीकरिता भविष्यातील परिणाम विचारात घेऊन त्यांना प्रक्षेपाने मान्यता दिली जाते, जर भविष्यातील काळात बाधा येणार असेल तर, संबंधित लेखा मानकांनुसार त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने समजणे आवश्यक असेल, तशी मान्यता देण्यात येते.

**५. मत्ता, कारखाने आणि साधने**

१. मालकीची जमीन खरेदी किंमती प्रमाणे नमूद केली जाते. मत्ता, कारखाने आणि साधने यांचे मूल्य हे संचित घसारा व मूल्य घट विचारात घेऊन नमूद केले जाते.

२. कोणत्याही मत्तांच्या प्रारंभिक खर्चात पुढील बाबी समाविष्ट असतात, खरेदीची किंमत किंवा मत्ता उभारणीचे खर्च (यांमध्ये आयात शूल्क, माल वाहतूक भाडे, परतावा न मिळणारे कर यांचा अंतर्भाव असतो) याशिवाय सदर मत्ता तिच्या जागेवर आणण्यासाठी प्रत्यक्ष केलेले खर्च, ती इच्छित कामासाठी संचलीत करण्यासाठी केलेले खर्च आणि पात्र मत्तेसाठी कर्ज खर्च. (पात्र मत्ता म्हणजेच अशी मत्ता जी त्यांच्या इच्छित वापरासाठी तयार होण्यासाठी आवश्यक असणारा बराच काळ घेते.)

मत्तेचे खरेदी मूल्य म्हणजे एकत्रित दिलेली रक्कम आणि सदर मत्ता संपादनासाठी विचारात घेतलेल्या इतर बाबींचे रास्त मूल्य होय. यंत्राच्या खर्चात यंत्र प्रायोगिक तत्वावर चालविण्याचे खर्च प्रायोगिक तत्वावर चालवण्याच्या कालावधी दरम्यान उत्पादीत कोणत्याही बाबीच्या विक्रीतून मिळणारी रक्कम वजा केल्यावर आणि प्रवर्तनाचे इतर खर्च म्हणजे वाहतूक खर्च, स्थापन करण्याचे आकार, इत्यादी बांधकाम उभारणी कालावधीतील इतर उत्पन्नाची निव्वळ रक्कम इत्यादी यांचा समावेश केला जातो. ज्या प्रकल्पांचे काम चालू आहे त्याचा प्रचलीत खर्च धरला जातो. त्यात थेट खर्च, संबंधित प्रवर्तन पूर्व प्रासंगिक खर्च आणि देय व्याज यांचा समावेश असतो.

जर एखाद्या बाबीपासून कंपनीला भविष्यात आर्थिक लाभ मिळणे संभवनीय असेल आणि अशा मत्तांचा खर्च जर विश्वसनीयरीत्या मोजता येत असेल तरच असे नंतरचे खर्च त्या मतांच्या प्रचलीत रकमेत समाविष्ट केले जातात किंवा त्यांना स्वतंत्र मत्ता म्हणून मान्यता देण्यात येते.

३. जर कंपनीने केलेल्या भांडवली खर्चातून जिच्यावर कंपनीची मालकी किंवा नियंत्रण नाही अशी मत्ता निर्माण केली जात असेल तर असे खर्च मत्तांचे बांधकाम चालू असे पर्यंत प्रगतीपथावरील भांडवली कामे यामध्ये दाखविले जातात आणि त्यांच्या समतूल्य रक्कम निकामी कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांची तरतूद खर्च म्हणून वजा केली जाते आणि ती ज्यावर्षी खर्च केली त्या वर्षाच्या नफा तोटा पत्रकात आकारली जाते. बांधकाम पूर्ण झाल्यावर वरील भांडवली खर्चाचे भांडवलीकरण केले जाईल आणि त्याचे समायोजन 'कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्ता' यांच्या तरतुदीत केले जाईल. कंपनीची मालकी नसलेला मत्ता आणि कंपनीच्या सामाजिक जबाबादाऱ्यांच्या कार्यासाठी दिलेले अंशदान जेव्हा खर्च होईल तेव्हा त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाते.

४. मत्ता धोरण : (प्रकरण निहाय तत्वानुसार) कंपनीला तिच्या अन्य काही मत्तांद्वारे भविष्यात आर्थिक लाभ मिळविण्यासाठी मालमत्ता, कारखाने व साधने यातील काही उपयुक्त बाबी संपादन कराव्या लागतात. (या बाबी स्वतः भविष्यात थेट आर्थिक लाभ मिळवून देतीलच असे नसते) अशा बाबींना मत्ता म्हणून मालमत्ता, कारखाने व साधने यात पात्रता द्यावी) लागते. कारण त्यामुळे कंपनीला भविष्यात अन्य संबंधीत मत्तांद्वारे आर्थिक लाभ मिळविता येतात. या बाबी संपादन केल्या नसल्या तर असे जादा आर्थिक लाभ मिळू शकले नसते. मात्र कंपनी या मत्तांचे त्यांच्या प्रकरण निहाय स्वरूपाची पडताळणी केल्यानंतर, त्यांचे भांडवलीकरण करते.

५. प्रगतीपथावरील भांडवली कामांमध्ये कंत्राटदाराचे देयकाचे अंतिमीकरण करणे राहिले आहे, त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर केले जाते. मात्र ते अंतिम चुकते होण्याच्या वर्षात समायोजन करण्याचे अधीन असते.

६. भांडवली कंत्राटाच्या किमतीच्या विचलनाच्या दाव्यांच्या प्रकरणी, कंपनीचे दावे स्वीकारले तरच त्यांचे लेखे केले जातात.

७. जेव्हा 'मत्ता, कारखाने व साधने' आणि एखादा महत्वाचा भाग ज्याला सुरूवातीपासून 'मत्ता, कारखाने व साधने' म्हणून मान्यता दिलेली आहे याची विल्हेवाट केल्यास त्याची मान्यता काढून घेतली जाते किंवा जर अशा मत्ताच्या वापरातून भविष्यात कोणतेही आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा नसते तेव्हा त्यांची मान्यता काढून घेतली जाते. ही मान्यता काढल्यानंतर होणारी प्राप्ती किंवा हानी यांचा समावेश नफा-तोटा पत्रकात समाविष्ट केला जातो.

८. नव्याने कार्यान्वित सुरु झालेल्या प्रकल्पांच्या जादा भांडवली खर्चासाठी कंपनी ज्या धोरणाचे अनुसरण करते; ते धोरण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहूवर्षीय वीज दर) नियमने २०१९ यासाठी सुसंगत आहे.

कंपनी अधिकचे अनिवार्य जादा भाग/ महत्वाचे सुटेभाग, आरंभ काळातील सुटे भाग जे मूळ प्रकल्प स्थापणे बरोबर घेतले जातात किंवा स्थापणे नंतर ३ वर्षात घेतले जातात ज्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांची परवानगी असते याचे भांडवलीकरण प्रकल्प खर्चाच्या चार टक्के इतकी केली जाते.

९. मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या आवश्यक सुट्टया भागाचे मूल्य त्यांच्या विहीत मर्यादापेक्षा जास्त असेल तर त्यांचे भांडवलीकरण मालमत्ता, कारखाने आणि साधने यामध्ये केले जाते. अन्य प्रकरणी सुटे भाग संपादन केल्याबरोबर त्या वस्तूमालसाठा सूचीमध्ये समाविष्ट केल्या जातात आणि त्या वापरल्यानंतर त्यांची आकरणी नफा व तोटा पत्रकात केली जाते.

१०. यंत्रांचे जे सुटे भाग ज्या वर्षी निकामी होतात, त्यावर्षी त्यांचे कमी केलेले लिखित मूल्य नफा-तोटा पत्रकात आकारले जाते. मात्र या जुन्या भागाच्या ऐवजी नवे भाग कार्यान्वित झाले पाहिजेत आणि जुने भाग निरूपयोगी झाले पाहिजेत. जर जुने भाग दुरूस्त करून पुर्नवापरासाठी योग्य झाले तर त्या दोन्ही भागांचे त्यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्याच्या काळासाठी घसारा करण्यात येईल. जून्या संबंधीत भागांच्या दुरूस्तीच्या खर्चाची आकारणी नफा-तोटा पत्रकात होईल.

११. जेव्हा मत्ता किंवा भांडवली सुटे भाग बदलल्यास मत्ता/भांडवली सुटे भागाच्या मूळ भागाचे कमी झालेली मूल्य माहिती नसेल तर. मत्ता/यंत्र यांचा नव्या भागांची/भांडवली सुट्टया भागांची किंमत/निव्वळ पुस्तकी मूल्य निर्लेखित केले जाईल. आणि नफा/तोटा पत्रकात आकारली जाते.

१२. कंपनीने पूर्वीच्या सर्वसामान्य मान्य केलेली लेखा तत्वानुसार मालमत्ता, कारखाने यांचे चालू मुल्य हेच भारतीय लेखा मानकाच्या संक्रमण तारखेस अभिदत्त मूल्य म्हणून मानल्याचे ठरविले आहे.

**६. अमूर्त मत्ता**

अमूर्त मत्ता या संचित घसारा आणि मूल्यघट हे विचारात घेऊन नोंदल्या जातात. अमूर्त मत्ता (सॉफ्टवेअर व्यतिरिक्त) यांची त्यांचे उपयुक्त आयुष्यासाठी सरळ रेषा पद्धतीने घसाऱ्याची तरतूद केली जाते आणि जेव्हा अमूर्त मत्तांचे मूल्यघट झाल्याची चिन्हे असतील तेव्हा त्यांचे मूल्यघट करण्यासाठी मुल्यांकन केले जाते. सॉफ्टवेअरच्या घसाऱ्याची तरतूद महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी विहीत केलेल्या आयुष्यासाठी केली जाते. अमूर्त मत्तांचे घसारा व मूल्यघट यांची नोंद नफा व तोटा पत्रकात करण्यात येते.

कंपनीने अस्तित्वातील अमूर्त मत्तांचे पूर्वीच्या महाराष्ट्र विद्युत नियामक नुसार असलेले विद्यमान मुल्य, यालाच भारतीय लेखा मानकात संक्रमण करण्याच्या तारखेचे अभिदत्त मूल्य मानण्याचे ठरविले आहे.

**७. प्रगतीपथावरील भांडवली कामे**

नवीन प्रकल्प सुरू करणे/प्रकल्पाची क्षमता वाढविणे यांच्या प्रकरणी असे प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत मालमत्ता, कारखाना व साधने यांच्या संबंधाचे खर्च आणि कर्जावरील व्याज यांचे भांडवलीकरण केले जाते. तसेच संबंधित प्रकल्पांची तांत्रिक आणि वाणिज्य वर्धनक्षमता या विषयीचे अभ्यास पूर्ण करून नंतर त्यांची अंमलबजावणीचा प्रारंभ करण्यासाठी करण्यात येत असलेल्या खर्चाचे कंपनीच्या संचालक मंडळाच्या मंजूरीनंतर भांडवलीकरण करणे सुरू केले जाते. अशा प्रकल्पांच्या शक्यते विषयी अभ्यास करण्याचे खर्च जेव्हा आणि जसे केले जातात, त्याप्रमाणे त्यांची आकारणी नफा-तोटा पत्रकात करण्यात येते.

अ) वेतनावरील खर्च थेट प्रकल्पाशी संबंधित असेल तर बॉयलर टर्बाइन जनरेटर संबंधित कामे आणि कारखाना संबंधित इतर कामे पूर्ण होईपर्यंत वेतनावर केलेला खर्च प्रकल्प खर्चाचा भाग असेल.

ब) प्रकल्प संबंधित शिल्लक कामे पूर्ण होण्याच्या दृष्टिने, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ही एक वर्षापर्यंतचे प्रशासकीय व सामान्य खर्च जे प्रकल्प निर्मितीसाठी थेट कारणीभूत असतील त्यांचे भांडवलीकरण केले जाते. त्यानंतर त्याची आकारणी नफा-तोटा पत्रकात केली जाईल.

क) कोराडी येथील निर्मिती बांधकाम कार्यालयाचे आणि मुख्यालयाचे खर्चाचे कोणतेही लघू भांडवल योजनेमध्ये वाटप होणार नाही. लघू भांडवल योजना म्हणजे ज्या योजनांच्या बांधकामास रचनेला, बारा महिन्यांपेक्षा कमी काळ लागतो अशा योजना आहेत.

ड) जर कंपनी एकापेक्षा जास्त प्रकल्प/भांडवली योजनांची (लघू योजना वगळून) अंमलबजावणी करीत असेल तर कोराडी निर्मिती बांधकाम कार्यालय आणि मुख्य कार्यालय येथील सामाईक खर्चांचे वाटप वर्षभरातील प्रगती पथावरील कामातील वाढीच्या आधारे केले जाईल.

**८. परिसमापनातील नुकसान ज्यावर्षी निश्चित होईल त्यावर्षी मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्या खर्चात समायोजित केले जातील.**

**९. कर्ज खर्च**

कर्ज खर्चामध्ये, व्याज आणि निधी उसनवारीने घेण्यासंबंधी केलेले इतर खर्च यांचा समावेश असतो. कर्ज खर्चाचे कारण एखाद्या मत्तेचे संपादन करणे किंवा ती उभारणे हे असते. मत्ता तिच्या इच्छित वापरासाठी उभारण्यास बराच वेळ लागणे आवश्यक असते म्हणून ज्या महिन्यात भत्ता इच्छित कामासाठी तयार होईल तो पर्यंतच्या मत्ताच्या खर्चाचे भांडवलीकरण केले जाते. पात्र मत्तेसाठी कारणीभूत असणारे दीर्घ मुदतीचा कर्ज निधी थेट उपलब्ध होईपर्यंत मत्तेसाठी केलेल्या सर्वसाधारण उसनवारीच्या प्रत्यक्ष व्याजाचे सुध्दा कंपनी भांडवलीकरण करते. याशिवाय कर्जाच्या उर्वरित कालावधीसाठी पात्र मत्तांवर केलेल्या कर्जाच्या बांधिलकीच्या आकारासाठी (कमिटमेंट चार्जेस) कंपनी कर्जफेडीची तरतूद करते.

कोणत्याही भांडवल मत्तांचे संपादन किंवा बांधकामे यासाठी कारणीभूत नसलेल्या इतर उसनवारी चा खर्च, ज्या कालावधीमध्ये केले जातात तेव्हा त्यांची नोंद नफा-तोटा प्रत्रकात खर्च म्हणून केली जाते.

**१०. अवित्तीय मत्तांची मूल्यघट**

वस्तूसूची, स्थगित कर मत्ता आणि विक्रीस योग्य असे वर्गीकरण केलेल्या चालू नसलेल्या मत्ता वगळून इतर अवित्तीय मत्तांचे ताळेबंदाच्या तारखेस मूल्यघट झाल्याबाबतचा आढावा घेतला जातो.

जर अशी चिन्हे दिसली तर किंवा जर मूल्यघट शोधण्यासाठी वार्षिक परिक्षणांची गरज असेल तर कंपनी समुहातर्फे या मत्ताच्या वसूल होऊ शकणाऱ्या रकमांचा अंदाज केला जातो. अशी वसूली योग्य किंमत अशा मत्ता पासूनचा रोख निर्मितीचे रास्तमूल्य त्यांच्या वजा विल्हेवाटीचा खर्च आणि वापराचा खर्च यापेक्षा जास्त असावी एखादी मत्ता इतर मत्तांपासून किंवा मत्तांच्या गटापासून वेगळी असून रोखीचा प्रवाह आणत नसेल तर त्या मत्तेची वसूली योग्य किंमत निश्श्चित केली जाते.

जेव्हा एखाद्या मत्तेची किंवा रोकड निर्माण कर्त्या घटकाची काळाप्रमाणे कमी झालेली रक्कम तिच्या वसूली योग्य रकमेपेक्षा जास्त होत असेल तर त्या मत्तांचे मुल्यघट झाले असे समजून. तिचे रास्तमुल्य हे मुल्यघट विचारात घेऊन नोंदले जाते.

वापरमुल्यांचे निर्धारण करताना, भविष्यातील अंदाजित रोकडता प्रवाह हा त्याच्या विद्यमान मूल्य इतका कमी केला जातो. त्यासाठी कर-पूर्व सवलत दर वापरला जातो. कारण करपूर्व दरात, पैशाचे वेळेनुसार मुल्यांचे चालू बाजारप्रमाणे निर्धारण व मत्तेचे विशिष्ट धोके अंतर्भूत असतात. विल्हेवाटीचा खर्च वजा करून रास्त मूल्य निश्चित करण्यासाठी सध्याच्या बाजारभावातील व्यवहार विचारात घेतले जातात. असे निश्चित व्यवहार ओळखून काढता येत नसेल तर योग्य मूल्यांकनाचे प्रारूप वापरले जाते.

मेसर्स महागूजच्या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांचे दि. २५.०८.२०१४ चे निकालपत्र आणि दि. २४.०९.२०१४ रोजी डब्ल्यू. पी. (क्रिमिनल) नं. १२० वर्ष २०१२ चे इतर संलग्न विषयी दिलेल्या आदेशात स्क्रिनिंग कमिटी आणि सरकारी वितरणाच्या मार्गे, वर्ष १९९३ पर्यंतचे सर्व कोळसा खाण वितरणे बेकायदा ठरवली आणि २०४ कोळसा खाणीचे झालेले वाटप रद्दबातल केले. कोळसा मंत्रालयाने त्याचे पत्र दि. ०१.१०.२०१४ यात त्याची माहिती दिली आणि वेबसाईटवर सुद्धा प्रदर्शित केली. त्यामध्ये मच्छेकाटा महानदी कोळसा खाणीचा समावेश आहे.

त्यानंतर कोळसा मंत्रालयाने कोळसा खाण ज्यांना आधी मिळाले होते, त्यांच्याकडून मूल्यांकनाचा तपशील मागवीत त्यानंतर, मूल्यांकनाचे तपशील शपथपत्रामधून सादर करावयाचे होते. तशी माहिती शपथपत्राद्वारे सादर करण्यात आली. ही माहिती कोळसा मंत्रालयाने मागवली आहे कारण त्यांच्याकडे पूर्वाचा वाटप झालेल्यांकडून कागदपत्र व हक्क नंतरच्या बोलीदाराकडे हस्तांतरीत करण्याची यत्रंणा आहे. या कागदपत्रात भूगर्भशास्त्रीय अहवाल, खाणी योजना, खाण बंद करण्याची पद्धत इ. समाविष्ट आहे. कोळसा मंत्रालयाने मार्च २०१५ पासून कोळसा ब्लॉकचे पूनर्वाटप केले असून त्यांच्या प्रकरणात पूर्वीच्या खाणकाम मिळालेल्या संस्थांनी केलेल्या खर्चाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया सूरू केलेली आहे.

मच्छकाटा - महानदी कोळसा खाणीचे पूनर्वाटप दि. ३१ मार्च २०१९ पर्यंत कोणत्याही बोलीदारांना झालेले नव्हते. कंपनीला कोळसा मंत्रालयानेही कंपनीने केलेल्या खर्चाच्या मूल्यांकनाबाबत कळविलेले नव्हते. यामुळे व्यवस्थापनाचे असे मत आहे की, कंपनीच्या कोणत्याही मत्तांची मूल्यघट करावयाची गरज नाही.

वित्तीय वर्ष २०१४-२०१५ पर्यंत केलेल्या खर्चाची रक्कम ५४,४०,७०,१११/- ही ताळेबंदात इतर चालू नसणाऱ्या मत्ता या शीर्षकाखाली दाखवली आहे. या खर्चात प्रामुख्याने कंपनी गठीत करण्याचे खर्च, सल्लागाराचे शुल्क देणे, भूगर्भशास्त्रीय अहवाल खरेदीसाठी सी एम पी डी आय एल कडे भरलेले शुल्क, वॉशिबिलीटीचा परिक्षा अहवाल अन्य सल्ला मसलती, कायदेशीर आणि व्यावसायिक आकार आणि कोळसा खाण विकसित करण्यासाठीचे प्रवर्तन खर्च यांचा समावेश आहे. कंपनीचे असे मत आहे की भूगर्भशास्त्रीय अहवाल खरेदीसाठी मागील काही वर्षात केलेले खर्च यांचा अन्वयार्थ खाणीचे पायाभूत खर्च असा करावा आणि तशी मागणी कोळसा मंत्रालय भारत सरकार यांचे कडे केली आहे.

मा सर्वोच्च न्यायालयने, कोळसा ब्लॉक वाटप केल्यानंतर, कोळसा मंत्रालयाने कोळसा खाणीत (विशेष तरतूद) वटहुकूम २०१४ नुसार पूर्वीच्या वाटप प्राप्त संस्थाच्या भरपाईचे मूल्यांकन सुरु केले. महागुज कंपनीत (एमजीसीएम) केलेल्या खर्चाची माहिती कळविण्यात आणि याशिवाय जेथे यशस्वी बोलीदारांना पुनर्वाटप/विहित आदेश देण्यात आले त्या पूर्वीच्या ब्लॉक प्राप्त झालेल्या संस्थाच्या खर्चाच्या मूल्याकनाची प्रक्रिया सुरु केली आहे मच्छकाटा कोळसा ब्लॉक अद्याप कुणावी बोलीदारांना दिलेला नाही त्यामुळे कोळसा मंत्रालयाने त्याच्या मूल्यांकनाचा विचार सुरु केलेला नाही.

कंपनीने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती, कोळसा खाणी (विशेष तरतूदी) वटहुकूम २०१४ यात दिलेल्या मूल्यांकन प्रक्रिया आणि तरतुदीप्रमाणे गुणवत्तेच्या आधारे होण्याची शक्यता आहे. सध्या कोळसा मंत्रालयाकडून प्रतिपूर्ती केली जाण्याची शक्यता नसलेल्या खर्चासाठी तरतूद केलेली नाही. मात्र कोळसा मंत्रालयाने मूल्यांकन प्रक्रियेचे अंतिमीकरण केल्यानंतर लेख्यांमध्ये आवश्यक ती समायोजना/तरतुदी करण्यात येतील.

## ११. घसारा / कर्जफेड तरतूद

अ) भाडेपट्टीच्या जमिनीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, नियमनाने विहित केलेल्या सरळ रेखा तत्त्व पद्धतीनुसार ३.३४ टक्के दराने घसाराची तरतूद केली जाते.

**ब) मत्ता, कारखाने आणि साधने**

१. सूत्रधारी कंपनी ही दर नियमन असणारी संस्था असल्याने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहीत केल्याप्रमाणे घसाऱ्याचे दर कार्यपद्धती आणि मत्तांचे आयुष्य मापन अनुसरण्यात येतात. त्याचनुसार कंपनी सरळ रेषा पद्धतीनुसार मत्तांच्या खर्चाच्या ९० टक्के पर्यत घसारा आकारते.

२. वर्षभरात मालमत्ता, कारखाने आणि साधने यांच्यातील दर / विल्हेवाट / काढून टाकणे यासाठीचा घसारा वरील कृतीच्या महिन्यात 'यथा प्रमाण' तत्त्वाने केला जातो. ग्रीन फिन्ड / ब्राऊन फिल्ड यांचे वाणिज्यक कार्य सुरू होण्याच्या तारखेपासुन त्यांचे भांडवलीकरण प्रकाशित घसारा नफा-तोटा पत्रकात आकारली जाते.

३. ज्या मत्तांच्या (खालील परिच्छेद ४ यात नमुद केलेल्या मत्ता वगळून) कार्यान्वयानंतर घसारा ७० टक्क्यांपर्यंत आकारलेला नाही, त्यांच्या ठोक किंमतीवर घसाऱ्याची आकारणी ७० टक्के होण्याचा वर्षापर्यंत येथे खाली दिलेल्या घसारा दराने आकारते. घसारा आकारणी ७०% पर्यंत पोहोचल्यानंतर मत्तांचे उर्वरित आयुष्यावर मत्तांच्या मूल्यांच्या ९० (टक्के) पर्यंत घसारा आकारणी केली आहे. आयोगाच्या आदेशानुसार औष्णिक वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रासाठी २५ वर्षे आणि जल विद्युत केंद्रासाठी ३५ वर्षे असे उपयुक्त आयुष्य विहित केले आहे.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| जल विद्युत, वाफ वीज, वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रातील कारखाने व यंत्रे, कुलींग टॉवर्स, जलविद्युत बांधकामे, ट्रान्स्फॉर्मर्स व इतर स्थापित साधने, पारेषणाच्या तारा, केबल नेटवर्क इ. | ५.२८% |
| इमारती आणि इतर स्थापत्य कामे | ३.३४% |

४. खालील मत्तांच्या साठी सरळ रेषा पद्धतीने मत्तांच्या मूल्यांचा ९० टक्के पर्यंत घसारा खालील दराने आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| फर्नीचर जोडणी व कार्यालयाचे साहित्य | ६.३३% |
| वाहने | ९.५०% |
| माहिती तत्रंज्ञान साधने | १५.००% |

५. मालमत्ता, कारखाने व साधने यातील ज्या वस्तू नगांचा खर्च कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नाही. त्यांचा घसारा संपादन वर्षात १०० टक्के केला जातो. मोबाईल फोन टॅबलेट खर्चाचे भांडवलीकरण आणि त्यांचा १०० टक्के घसारा, खरेदी वर्षात केला जातो. यासाठी कंपनीची विहित मर्यादा विचारात घेतली जात नाही.

**क. अमुर्त मत्ता**

नवीन ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर खरेदी केल्याचा भांडवली खर्च, बाह्य तृतीय पक्ष सल्लागाराकडून तयार केलेल्या सॉफ्टवेअरची अंमलबजावणी, सॉफ्टवेअरच्या परवान्याचे खरेदी, या सर्व मत्तांचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विहित केल्याप्रमाणे खालील दराने घसारा आकारला जातो.

| मत्तांचा प्रकार | घसारा टक्केवारी |
|---|---|
| सॉफ्टवेअर | ३०% |

कंपनी कायदा २०१३ च्या परिशिष्ट-२ मधील मत्ताचे उपयोगी आयुष्य विचारात घेऊन, उपकंपन्याच्या मत्तांचा घसारा रेखा पध्दतीने आकाराला जातो.

**१२. चालू नसलेल्या विक्रीयोग्य मत्ता:**

चालू नसलेल्या ज्या मत्ता वापरात ठेवण्यापेक्षा विकल्यास त्यांच्या प्रचलीत रकमा वसूल होऊ शकते त्यांचे वर्गीकरण विक्री योग्य चालू मत्ता असे केले जाते. जर विक्रीची चांगली शक्यता असेल आणि मत्ता विद्यमान स्थितीत तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर वरील अट पूर्ण झाले असे मानले जाते. अशा विक्री योग्य चालू नसणाऱ्या मत्तांची मोजणी त्यांच्या लेख्यांमधील किंमत आणि रास्त मूल्यातून विक्रीचा खर्च वजा केल्यानंतरची किंमत यांपैकी किमान किंमतीस केली जाते.

ज्या मालमत्ता कारखाने व साधने आणि अमूर्त मत्ता विक्रीसाठी काढल्या जातात, त्यांचा घसाऱ्याची किंवा कर्जफेडीची तरतूद केली जात नाही.

**१३. वस्तुसूची**

भांडारातील सामान, सुटे भाग यासह मालसाठ्याचे मूल्यांकन त्यांच्या खर्च आणि त्यांचे वसुली योग्य मूल्य यापैकी जे कमी असेल त्यानुसार केले जाते आणि खर्च हा वेटेड ॲव्हरेज कॉस्ट मेथडने निश्चित केला जातो. मात्र, वीज निर्मितीसाठीचे साहित्य व इतर बाबी यांचे लेखन किंमतीपेक्षा कमी दराने केले जात नाही. कारण विजेची विक्री निर्मिती खर्चापेक्षा जास्त दराने केली जाते. खर्चामध्ये खरेदी खर्च (मिळण्याजोग्या इनपूट टॅक्स क्रेडीटची निव्वळ) आणि त्या वस्तू त्यांच्या सध्याच्या जागी व स्थितीत आणण्याचा इतर खर्च समाविष्ट असतात. भांडारातील सेवेस निरूपयोगी व निकामी झालेल्या वस्तुंचा आढावा घेऊन त्याबाबतच्या तोट्याची लेख्यात तरतूद केली जाते.

**१४. महसूल मान्यता**

१. विजेच्या विक्रीतून मिळणाऱ्या महसुलाचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वर्षाच्या सुरूवातीस पूर्वनिर्धारित केलेल्या वीज दर पत्रकाच्या आधारे केले जातात. त्यात इंधन समायोजन आकार समाविष्ट असतो. तसेच लेख्यांच्या आधारे कालावधीच्या अखेरपर्यंत उपार्जित झालेला विनादेयाच्या महसुल सुद्धा समाविष्ट केला जातो. मात्र तो त्यापुढील वर्षात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केलेल्या समायोजनाच्या प्रक्रियेच्या अधीन असतो.

२. महावितरण कंपनीच्या वीज खरेदी करारातील अटींप्रमाणे कंपनी विलंब भरणा अधिभार याला स्टेट बँक ऑफ इंडिया

मार्जिनल कॉस्ट ऑफ-बेस्ड लिडींग रेट (एम सी एल आर) अधिक ३५० बेसीस पॉईंट, प्रतिमाह यानुसार मान्यता देते. ऊर्जा देयकांच्या क्रेडीट पिरियड नंतरच्या विलंबासाठी या प्रमाणे उपार्जन तत्वावर आकारणी केली जाते.

३. व्याजाचे उत्पन्न हे मुद्दल / थकबाकी आणि लागू होणारा व्याज दरानुसार मान्य केले जाते.

४. फ्लॉय ॲश (राख) विक्रीचा लेखा ग्राहकाने मान्य केलेल्या दराने केला जातो. त्याची रकम फ्लाय ॲश वापर निधी या वेगळ्या लेखा शीर्षात आणि पर्यावरण व वन मंत्रालयाने दि.०३.११.२००९ रोजी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केला जातो. या निधीचा वापर राख वापराच्या प्रोत्साहनासाठी करावयाच्या खर्चासाठी केला जातो.

५. अन्य उत्पनाला उपार्जन तत्त्वावर मान्यता दिली जाते. भंगार व नाकारलेला कोळसा इत्यादींची विक्री जेव्हा खरेदीदार कंपनीच्या जागेतून करतो व कंपनी त्याची बीजके तयार करतो, तेव्हाच त्याचा लेखा होतो. परिसमापनातील नुकसान जेव्हा ते प्रत्यक्ष ओळखले जातात त्यावर्षी आणि त्याची आकारणी झाल्यावर त्यांच्या वसुलीचे समायोजन प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट केले जाते. त्यातून प्रकल्पाचे अतिरिक्त खर्च योग्य प्रमाणात कमी केले जातात. प्रकल्पाच्या कंत्राटदारांना दिलेल्या अग्रिमांच्या समायोजन जेव्हा उपार्जन होईल त्याप्रमाणे प्रकल्प खर्चात केले जाते. इतर सर्व प्रकरणी, वसूल केलेले परिसमापनातील नुकसान इतर उत्पन्नात जमा केले जाते.

६. कंपनी वीज विक्रीच्या अशा ऊर्जा बचतींच्या प्रमाणपत्रांच्या मूल्याला कंपनी वित्तीय वर्षाच्या अखेरीस मान्यता देते व ते उपार्जन तत्त्वानुसार महसूलात जमा करते. ही प्रमाणपत्रे विकल्यास याचे उपार्जन मूल्य आणि प्रत्यक्ष विक्रीच्या वर्षाचा नफा-तोटा पत्रकात दाखविले जाते.

**१५. खर्च आणि उत्पन्न यांचे लेखे करणे / वर्गीकरण करणे**

जर मागील काही वर्षातील एकत्रीत उत्पन्न / खर्च प्रारंभीच्या विहित मर्यादेपेक्षा जास्त असेल तर ते पूर्वलक्षी प्रभावाने दुरुस्त केले जाईल.

विम्याचे दावे स्विकारल्यानंतरच त्यांचे लेखे केले जातील.

इतर सर्वदावे / हक्क यांचे लेखे प्रत्येक प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार केले जातात.

**१६. उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकी**

उपकंपन्या आणि संयुक्त उपक्रम कंपन्या तसेच सहयोगी कंपन्या यांच्या समभागातील गुंतवणूकीची नोंदणी, खर्च वजा संचित मूल्यघट (जर काही असेल तर) याप्रमाणे केली जाते आणि प्रत्येक अहवाल तारखेला गुंतवणूकीच्या कमतरतेसाठी परिक्षण केले जाते.

कंपनीने जेव्हा पूर्वीच्या सर्वसामान्यपणे मान्य केलेल्या लेखा पद्धतीतून भारतीय लेखा मानक पद्धतीत संक्रमण केले त्यावेळी उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त उपक्रम कंपन्या यातील गुंतवणूकीला त्यांच्या प्रचलीत विद्यमान मूल्यानुसार मान्यता देण्याचे ठरविले होते.

**१७. परकीय चलनातील व्यवहार**

परकीय चलनातील व्यवहार प्रारंभी त्यांच्या व्यवहाराच्या तारखेला प्रचलीत असलेल्या संबंधित विनिमय दराने नोंदवले जातात. परकीय चलनानुसार असलेली पैशातील मत्ता व पैशामधील दायित्त्वे यांचे रूपांतरण अहवाल तारखेला असलेल्या विनिमयाच्या स्पॉटरेटस् नुसार केले जाते.

हिशोबानंतर किंवा पूनर्लेखनानंतर विनिमयात उद्धवलेले फरकांना नफा व तोटा पत्रकात 'विनिमय दर' विचलन किंवा 'वित्त खर्च' (कर्जाच्या खर्चाचे समायोजन म्हणून विचारात घेतलेल्या मर्यादेपर्यंत) म्हणून मान्यता दिली जाते.

**१८. कर्मचारी लाभ**

**अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ**

कर्मचाऱ्यांनी ज्यावर्षी सेवा दिल्या, त्यावर्षीच्या नफा-तोटा पत्रकात अल्पकालीन कर्मचारी लाभ यांना खर्चाच्या विना सवलत रकमेला मान्यता देण्यात येते.

**सानुग्रह अनुदान :**

कंपनी कर्मचाऱ्यांकरिता सानुग्रह अनुदान खर्च जसे आणि तेव्हा ते घोषित होतात तेव्हा उपार्जनासाठी लेखावह्यात नोंदणी करते.

**दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ :**

**( अ ) व्याख्यांकित लाभ योजना**

भविष्य निर्वाह निधी या वेगळया विश्वस्त संस्थेत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ गटातील कंपन्याच्या अंशदानाचे व्यवस्थापन होते, त्यामध्ये कंपनी पूर्व निश्चित दराने तिचे आणि कर्मचाऱ्यांचे अंशदान भरते. या निधीची गुंतवणूक परवानगी प्राप्त प्रतिभूतीमधे केले जाते. या निधीत केलेले प्रत्येक कालावधीतील अंशदान यास व्यय म्हणून मान्यता दिली जाते आणि त्याची आकारणी नफा तोटा पत्रकात केली जाते.

( ब ) उपदान या सारख्या व्याख्यांकित कर्मचारी लाभाचे दायित्त्व विमागणित शास्त्राच्या मूल्यांकनानुसार ठरविले जाते. हे मूल्यांकन स्वतंत्र विमागणित तंज्ञांकडून वर्षाच्या अखेरीला प्रोजेक्टेड युनीट क्रेडिट मेथड वापरुन करुन घेण्यात येते.

पुनर्मापन केलेल्या निव्वळ व्याख्यांकित लाभ दायित्त्वांना इतर सर्वकष उत्पन्न यामध्ये मान्यता दिली जाते. या दायित्त्वामधे विमागणिती प्राप्ती व हानी, नियोजन मत्तांचा परतावा (व्याज वगळून). आणि मत्ता मर्यादा (जर काही असेल तर व्याजाशिवाय) यांचा समावेश होतो.

(क) **इतर दीर्घ मुदतीचे कर्मचारी लाभ**

इतर दीर्घ मुदतीचे लाभ म्हणजे रजेचे रोखीकरण याचे दायित्त्व हे प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड ही पद्धत वापरून स्वतंत्र विमागणित तज्ञांकडून विमागणिती मूल्यांकनानुसार ठरविले जातात.

१९. **भाडेपट्टी:**

दि.०१ एप्रिल २०१९ रोजीचे किंवा त्यानंतर जे करार करण्यात आले ते करार भाडेपट्टीचे असल्याबद्दल किंवा त्यात भाडेपट्टी समाविष्ट आहे किंवा कसे याचे कंपनी निर्धारण करते. जर कराराच्या मुदतीत संबंधित ओळख निश्चिती केलेल्या मत्तांच्या वापराचे नियंत्रणाचा हक्क मोबदलाच्या बदल्यात दिले गेले असतील तर तो करार भाडेपट्टीचा आहे, याबद्दल निश्चिती करण्यासाठी, कंपनी खालील बाबींचे अंदाज करते:

- संबंधित करारात ओळख निश्चिती केलेल्या मत्तांचा वापर करण्यासंबंधी असल्यास – त्यात असा वापर करण्याचे स्पष्ट केलेले असावे किंवा तशी सूचना असावी. त्यात तसा प्रत्यक्ष वापरास नेमकेपणाने मान्यता दिलेली असली पाहिजे किंवा त्यात एका प्रत्यक्ष अस्तित्त्वातील मत्तेच्या सर्व बाजूने सुस्पष्ट वेगळेपण दर्शविलेले पाहिजे. जर संबंधित मत्ता देणाऱ्याला मोठ्या प्रमाणात पर्याय वापराचा हक्क त्यात असेल तर अशा मत्तांची तशी ओळख निश्चिती केली जात नाही.
- कंपनीला भाडेपट्टीच्या संपूर्ण कालावधीमधे अशा भाडेपट्टीच्या मत्ताच्या वापरातून मिळणारे सर्व आर्थिक लाभ प्राप्त करण्याचा हक्क असलाच पाहिजे.
- अशा मत्तांचा वापर करण्याविषयाचे आदेश देण्याचे हक्क कंपनीकडे असले पाहिजेत.

दि. ०१ एप्रिल २०१९ नंतर केलेल्या कराराबद्दल कंपनीने असा निर्णय घेतला की, भाडेपट्टी आधारित व्यवस्थेमध्ये खालील बाबींचे निर्धारण होते किंवा नाही हे निश्चित केले पाहिजे.

- व्यवस्थेची पूर्तता विशिष्ट मालमत्ता किंवा मालमत्तेच्या वापरावर अवलंबून होती किंवा कसे
- या व्यवस्थेत मत्ता वापराचा हक्क दिला आहे किंवा कसे

१ ) **कंपनी भाडेकरू असल्यास-**

वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचा घसारा भाडेपट्टीची मुदत संपेपर्यंत 'सरळ रेषा' पद्धतीने केला जातो. याशिवाय अशा वापराचा अधिकार मिळालेल्या मत्तांचे ठराविक अंतराने, जर काही कमी करण्याजोगे हानी असल्यास ते कमी करण्यात

येते. तसेच जर काही भाड्याच्या दायित्त्वासंबंधी काही पूनर्मोजणी करावयाची असल्यास ती करून समायोजन केले जाते.

भाडेपट्टीचे दायित्त्वाचा प्रारंभी करार सुरु होण्याच्या तारखेला न भरलेल्या भाडेपट्टीचे विद्यमान मूल्याप्रमाणे मोजणी केली जाते आणि कंपनीच्या इन्क्रिमेंटल डिस्काऊंट रेटनुसार कपात करण्यात येते. भाडेपट्टीचे दायित्त्व मुल्यघट तत्वानुसार मोजण्यात येते.

अल्प मुदतीचे भाडेपट्टी करार म्हणजे ज्यांची मुदत बारा महिने किंवा त्यापेक्षा कमी असेल आणि कमी किंमतीच्या भाडेपट्टीचे करार यांना कंपनीने वापरण्याचा अधिकार या मत्तेत मान्यता न देण्याचे ठरविले आहे. कंपनी अशा भाडेपट्टी संबंधित देयकांना खर्च म्हणून मान्यता देते.

**२)　कंपनी भाड्याने देणारी संस्था असल्यास**

भाड्याने देणारी संस्था असल्यास, भारतीय लेखा मानक क्र. ११६ मध्ये विहित केलेल्या पद्धीने भाडेपट्टीचे लेखे केले जाते.

**२०. शासकीय अनुदान**

शासकीय अनुदानाबाबत जेव्हा ते मिळण्याची योग्य हमी असेल आणि जेव्हा संलग्न शर्तीचे अनुपालन करण्यात येते, तेव्हाच त्या लेखांमध्ये मान्यता देण्यात येते.

जेव्हा अनुदान एखाद्या खर्चाच्या बाबींशी निगडीत असते, तेव्हा त्या संबंधित खर्चाच्या मुदतीसाठी आणि त्याच्या हेतुच्या भरपाईसाठी खर्च करण्यात येते तेव्हा नफा व तोटा पत्रकात सुयोग्य पद्धतीच्या आधारे मान्यता दिली जाते.

भारत सरकाराच्या आदेशानुसार, भारतीय लेखा मानक २० सुधारित निर्णय दिनांक २० सप्टेंबर २०१८ नुसार ताळेबंदात मत्ता संबंधीची शासकीय अनुदाने स्थगित उत्पन्न म्हणून सादर केली जातात किंवा मत्ताच्या वहन रकमेतून अनुदान वजा केली त्याप्रमाणे ताळेबंदात दाखवाव्यात असे बदल केले परिणामी वित्तीय वर्षे २०२०-२१ कंपनीने मत्तांच्या मूल्यातून अनुदाने वजा करण्याचे पर्याय निवडलेला आहे.

**२१. तरतुदी, आकस्मिक दायित्त्वे व आकस्मिक मत्ता**

जेव्हा एखाद्या भूतकालिन घटनेमुळे सद्यस्थितीत काही बंधने आली असतील तर त्या बंधनाच्या तरतुदींना मान्यता देण्यात येते. ही बंधने पूर्ण करण्यासाठी संसाधनांचे बहिर्गमन होणे संभवनीय असावे. या बंधनातील रकमांचे विश्वसनीय अंदाज केलेले असावेत.

जेव्हा पैशाच्या वेळेच्या मूल्याचा परिणाम महत्त्वाचा असतो; तेव्हा योग्य कपातीच्या दराने तरतुदीमध्ये कपात केली जाते. आकस्मिक दायित्त्व म्हणजे भविष्यात घडणाऱ्या घटना ज्यावर कंपनीचे पूर्णपणे नियंत्रण नसल्यामुळे निर्माण झालेले संभाव्य बंधने किंवा ज्यासाठी संसाधनाचे बहिर्गमन आवश्यक असेल अशी शक्यता नाही किंवा ज्या बंधनातील रकमांचे मोजमाप पुढे विश्वासर्हतेने करता येत नाही.

आकस्मिक दायित्त्वांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता नसते, जर आर्थिक संसाधनाचे बहिर्गमन होण्याची शक्यता खूप कमी किंवा दुरची दुरस्थ मानली जात नाही तर आकस्मिक दायित्त्वे प्रगट केली जातात.

ज्या बाबी प्रत्येक प्रकरणातील कंपनीने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होतात तेव्हा त्या बाबतची आकस्मिक दायित्त्वे आणि भांडवल बांधिलकी प्रगट केली जाते. टिपा ४२ ब यात दिल्या प्रमाणे प्रकट केल्या जातात.

आकस्मिक मत्ता यांना वित्तीय विवरणपत्रात मान्यता दिली जात नाही. परंतु जर आकस्मिक मत्ता या विहित मर्यादेपेक्षा जास्त असतील आणि त्यातून आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता असेल तर त्या प्रगट केल्या जातात.

**२२. रास्त मूल्याची मोजणी करणे**

बाजारपेठेत सहभागी होणाऱ्यांमध्ये मत्ता विक्रीसाठी किंवा दायित्व हस्तांतरणासाठी, यापैकी जसे काही असेल त्या कायदेशीर व्यवहारात मूळ मापनाच्या तारखेला मिळणाऱ्या किमतीला किंवा तसे नसल्यास कंपनीला सहजप्राप्त असणाऱ्या सर्वात लाभदायक

बाजारपेठेला रास्त मूल्य म्हणतात.

कंपनीचा मत्ता/दायित्त्वे यांचे रास्त मूल्य मोजण्यासाठी बाजारपेठेतील निरिक्षण योग्य माहिती मिळवून, तिचा उपयोग करतो. मूल्यमापनाच्या तंत्रात वापरल्या जाणाऱ्या निविष्टी यांच्या आधारे रास्त मूल्याच्या क्रमवारीमधील श्रेणी यामध्ये खालीलप्रमाणे स्तर असतात.

**स्तर १:** समान मत्ता / दायित्त्वे यांच्या कार्यशील बाजारपेठेतील उद्धृत केल्या जाणाऱ्या किमती (असमायोजित).

**स्तर २:** मत्ता / दायित्त्वे यांच्या वरील स्तर १ मधील उद्धृत किमती व्यतिरिक्त अन्य निविष्टी शोधून त्यांचे प्रत्यक्ष (किमतीचे) किंवा अप्रत्यक्ष (किमती व्यतिरिक्त अन्य) निरीक्षण करणे.

**स्तर ३:** मत्ता / दायित्त्वे यांच्या बाजार माहिती निरिक्षणांवर आधारलेल्या नाहीत, अशा निविष्टी विचारात घेणे, (ज्यांचे निरिक्षणकरता येत नाही अशा)

वित्तीय विवरणपत्रात मत्ता व दायित्त्वे यांना आवर्ती तत्त्वावर मान्यता दिली जाते. त्यासाठी कंपनी श्रेणीकरणाचे पूर्ननिर्धारण करते आणि त्याद्वारे श्रेणीमधे स्थानांतरण झाले आहे किंवा कसे; (सर्वव्यापी रास्त मूल्य मोजणीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सर्वात खालच्या निविष्टीच्या आधारे) याचे प्रत्येक अहवालात कालावधीच्या अखेरीस निश्चिती करते.

## २३. वित्तीय विलेख

जेव्हा समुह एखाद्या कंत्राटातील विलेखाच्या तरतूदीमधे एका बाजूला पक्ष असेल तेव्हा वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्त्वे यांना मान्यता दिली जाते. समुहाच्या वित्तीय मत्तात खालील बाबींचा समावेश असतो.

१) चालू वित्तीय मत्ता यात व्यापारी येणी, रोख व रोख सममूल्य आणि बँकेतील शिल्लक, अल्प मुदतीच्या ठेवी.

२) चालू नसलेल्या मत्ता यात प्रामुख्याने उपकंपन्यातील समभाग गुंतवणूक व त्यांना कर्जे आणि दीर्घ मुदतीची येणी इत्यादी.

**वित्तीय मत्ता:**

**अ) प्रारंभिक नोंदणी व मोजणी**

सर्व वित्तीय मत्ता यांना प्रारंभी त्याचे रास्त मूल्य अधिक त्या संपादनासाठी केलेल्या व्यवहाराचे खर्च यानुसार दर्शविण्यात येतात. वित्तीय मत्तांचे व्यवहाराचे खर्च हे नफा व तोटा यातील रास्त मूल्य यानुसार काढून ते नफा-तोटा पत्रकात खर्च म्हणून दाखविले जातात.

**ब) नंतर केलेली मोजणी**

संबंधित वित्तीय मत्ताच्या वर्गीकरणाच्या संदर्भानुसार नंतरची मोजणी केली जाते.

कंपनी वित्तीय मत्ता वर्गीकरण खालीलप्रमाणे करते.

(अ) घसाऱ्या नंतरची मोजणी करणे

(ब) आर्थिक मालमत्ता मोजणी

(क) इतर सर्वकष उत्पन्नामार्फत रास्त मूल्य किंवा

(ड) नफा किंवा तोटाद्वारे रास्त मूल्य

वित्तीय मत्तांची व्यवस्थापनासाठी कंपनीचे बिझनेस मॉडेलच्या आणि वित्तीय मत्तांच्या कंत्राटातील वैशिष्ट्यानुसार केलेल्या रोकडता प्रवाहाच्या आधारे मोजणी केली जाते.

**घसारा खर्च**

वित्तीय विलेख मुल्यवापर घसारा तरतुदी नंतर खालील अटींची पूर्तता झाली तरच केली जाते.

अशी मत्ता बिझनेस मॉडेलमध्ये खालील उद्दिष्ठासाठी धारण केली असावी.

- कंत्राटानुसार रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी मत्ता धारण करणे आणि
- मत्तांच्या कंत्राटातील अटींमुळे मुद्दल रकमेचे आणि व्याज या प्रकारे रोकडता प्रवाह निश्चित तारखेस मिळणे.

प्रारंभिक मान्यतेनंतर अशा वित्तीय मत्ता पुन्हा घसारा तरतुदीच्या वजावट केल्यावर मोजल्या जातात. यासाठी परिणामकारक व्याज दर पद्धती वापरली जाते आणि अशा घसारा तरतुदींना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**कर्ज विलेख नफा तोटाद्वारे रास्त मूल्यानुसार**

नफा व तोटा याद्वारे काढलेले रास्त मूल्य हे कर्ज विलेखाच्या मोजणीसाठी उर्वरित श्रेणीचे आहे.

प्रारंभिक मोजणीनंतर रास्त मूल्यामध्ये बदल झाल्यास त्यास नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. या बदलामध्ये व्याजाचे उत्पन्न व मूल्यघट यांचा अंर्तभाव असतो.

**समभागातील गुंतवणूकी**

भारतीय लेखा मानक क्र.१०९ याच्या व्याप्तीत अंतर्भाव होणाऱ्या समभागातील सर्व गुंतवणूकींची मोजणी रास्त मूल्याने केली जाते. समभागाचे विलेख व्यापारासाठी धारण केले जातात, त्यांचे वर्गीकरण नफा व तोटा द्वारे रास्त मूल्य नुसार केले जाते. इतर सर्व समभागांच्या विलेखांच्या वर्गीकरणासाठी कंपनीने इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य किंवा नफा तोटा पत्रकातील रास्त मूल्य अशाप्रकारे वर्गीकरण करण्याबाबत कंपनी निर्णय घेते. हे वर्गीकरण प्रारंभीक मान्यतेवर केले जाते आणि ते अपरिवर्तनीय असते.

यानुसार वर्गीकरण केलेल्या समभागांच्या विलेखाच्या रास्त मुल्यातील सर्व बदलांना, (लाभांश वगळून) यांना इतर सर्वकष उत्पन्न यात मान्यता दिली जाते. अशा गुंतवणूकींची विक्री झाली तरी इतर सर्वकष उत्पन्नातील रकमांचा नफा व तोटा पत्रकामधे पूनर्चक्रीकरण केले जात नाही.

नफा व तोटा द्वारे रास्त मुल्य या श्रेणीत समाविष्ट केलेल्या समभाग विलेखांचे मापन रास्त मूल्याच्या बदलानुसार केले जाते व त्यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

उपकंपन्या, सहयोगी व संयुक्त उपक्रम कंपन्या आदि संस्थांच्या समभाग विलेखातील गुंतवणूकी खर्च वजा मूल्यघट यानुसार नोंदवल्या जातात.

**वित्तीय मत्ताची मूल्यघट**

भारतीय लेखा मानक १०९ नुसार ज्या वित्तीय मत्तांची मोजणी घसारा तरतुदीनंतर होते आणि ज्या इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मुल्यानुसार नोंदविल्या जातात, त्या मत्तांची मोजणी करणे व त्याला मान्यता देणे यासाठी कंपनी “अपेक्षित पत तोटा” हे प्रारुप लागू करते.

व्यापारी येणी यासाठीच्या तोटा भरपाईचे मापन करण्यासाठी “सोपी पद्धती” अनुसरली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला त्याच्या पूर्ण आयुष्यात “अपेक्षित पत तोटा” समान रक्कम यानुसार मापन केले जाते. या मत्तांच्या प्रारंभिक किंमती आणि वर्षाखेरीस संभाव्य धोके विचारात घेता आलेली किंमत याचा विचार करून कंपनी या मत्तांची त्याची मूल्यघट ही नफा-तोटा पत्रकात अपेक्षित मूल्यघट तत्त्वानुसार नोंदविते.

**वित्तीय मत्तांची मान्यता रद्द करणे**

कंपनीची एखादी वित्तीय मत्ता (किंवा जेव्हा लागू असेल तेव्हा वित्तीय मत्तांचा एक भाग किंवा तत्सम वित्तीय मत्तांच्या गटांचा भाग) हा प्राथमिकता पुढील कारणांकरिता रद्द करण्यात येतो.

जेव्हा या मत्तांद्वारे रोकडता प्रवाह मिळण्याचे हक्क संपले असतील किंवा

जर कंपनीने अशा मत्तांकडून रोकडता प्रवाह मिळण्याच्या हक्काचे हस्तांतरण केले असेल किंवा मिळालेले रोकडता प्रवाह संपूर्णपणे आणि प्रत्यक्ष विलंबाशिवाय तिसऱ्या पक्षाकडे पाठविण्याचे बंधन एखाद्या करार व्यवस्थेद्वारे स्वीकारले असेल आणि यापैकी

(अ) कंपनीने या मत्तेच्या सर्व जोखीमा आणि मोबदले भरीवपणे हस्तांतरित केले असतील किंवा

(ब) जर कंपनी या मत्तेच्या सर्व जोखीमा आणि मोबदले भरीवपणे त्याच स्वरूपात हस्तांतरित केल्या नसतील तर किंवा स्वत:कडे ठेवल्या नसतील मात्र या मत्तेचे नियंत्रण हस्तांतरित केले असेल तर,

वित्तीय मत्तांची मान्यता रद्द केल्यानंतर, चालू असलेले मूल्य आणि मिळालेला वाटा यांच्यातील फरकाला नफा तोटा पत्रकात मान्यता मिळते.

**ब ) वित्तीय दायित्त्वे**

**वित्तीय दायित्त्वे आणि समभाग विलेख**

**कर्ज किंवा समभाग असे वर्गीकरण:**

कंपनी जेव्हा एखाद्या विलेखाचे वितरण करते, तेव्हा विलेखाच्या कराराच्या भरीवपणानुसार विलेखाचे वर्गीकरण वित्तीय दायित्त्व किंवा सम विलेख असे करते.

**समभाग विलेख**

कंत्राटातील समभाग विलेख म्हणजे ज्यात संबंधित अस्तित्त्वात असलेल्या संस्थेंची सर्व दायित्त्वे वजा केल्यानंतर मत्तांमधील उरलेला हिताच्या भागाचा सुद्धा दाखविला जाणारा भाग होय. समभाग विलेखाच्या वितरणानंतर, कंपनी त्याच्याबद्दल मिळालेल्या रक्कमेच्या प्रमाणात समभाग विलेख दर्शविते.

**वित्तीय दायित्त्वे**

कंपनीच्या विद्यमान वित्तीय दायित्त्वामधे प्रामुख्याने (अ) कर्जे (ब) व्यापारी देणी (क) भांडवली खर्चाची दायित्त्वे (ड) सुरक्षा अनामती आणि (इ) इतर देणी यांचा समावेश होतो.

**प्रारंभिक मान्यता आणि मोजणी**

सर्व वित्तीय दायित्त्वे (नफा किंवा तोटा यांच्या रास्त मुल्यानुसार मोजणी केलेली नाही अशा) यांना प्रारंभी त्यांच्या संबधित वित्तीय दायित्त्वाला थेट लागू करणाऱ्या व्यवहार खर्चाच्या रास्त मूल्यानुसार मान्यता दिली जाते. कंपनीच्या वित्तीय दायित्त्वात व्यापारी आणि इतर देणी, कर्जे आणि उसनवारी यांचा समावेश आहे.

**नंतरची मोजणी**

वित्तीय दायित्त्वाची मोजणी त्यांच्या खालीलप्रमाणे केलेल्या वर्गीकरणावर अवलंबून असते.

**( १ ) कर्जे**

कर्जे सुरवातीला रास्त मुल्ये व केलेल्या व्यवहार खर्चाची निव्वळ याप्रमाणे त्यास मान्यता दिली जाते. नंतर उसनवारी कर्जाच्या कर्ज फेडीसाठीच्या खर्चानुसार कर्जाची मोजणी केली जाते. उत्पन्न (व्यवहार खर्चाचा निव्वळ रक्कम) व विमोचन रक्कम यात जो काही फरक असेल त्याला परिणामकारक व्याज दराची पद्धत वापरून कर्जाच्या मुदतीसाठी नफा-तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. कर्ज सुविधा स्थापित करण्यासाठी दिलेल्या शुल्काला कर्जाचा व्यवहार म्हणून मान्यता दिली जाते. मात्र या सुविधा काही प्रमाणात किंवा संपूर्णपणे काढून घेतल्या जाऊ शकतात, हे गृहित धरून त्यांच्या मर्यादेत ही मान्यता असते. अशा प्रकरणी सदर सुविधा काढून टाकण्यापर्यंत शुल्क स्थगित ठेवले जाते.

जेव्हा कर्जाच्या करारामध्ये काही बंधने विनिर्दिष्ट असतात, तेव्हा अशी बंधने चुकती / रद्द झाली असतील किंवा मुदत संपली असेल तर ती ताळेबंदातून काढून टाकली जातात. संपलेल्या वित्तीय दायित्त्वाची रक्कम आणि त्याची चुकती केलेली रक्कम

यातील फरक नफा-तोटा पत्रकात इतर प्राप्ती / (तोटे) या प्रमाणे मान्य केला जातो.

जर कंपनीला एखाद्या दायित्त्वाचा चुकता अहवाल काळापासुन किमान बारा महिने स्थगीत ठेवण्याचा विनाअट हक्क नसला, तर त्या दायित्त्वाचे 'चालू दायित्त्वे' असे वर्गीकरण केले जाते. जर कंपनीला एखाद्या दीर्घ मुदतीच्या कर्ज व्यवस्थेतील महत्त्वाच्या तरतुदींचा भंग अहवाल मुदत संपण्याची वेळी किंवा यापूर्वी झाला असला आणि ते दायित्त्व मागणीनुसार अहवालाच्या तारखेला देय होत असेल आणि जर संबंधित कर्जदारांनी अहवाल तारखेनंतर किंवा वित्तीय विवरण पत्रे मंजूर होण्यापूर्वी करारभंगासाठी कोणत्याही रक्कमेची मागणी करणार नाही असे मान्य केल्यास अशा वित्तीय दायित्त्वांना 'चालू दायित्त्वे' असे मानण्यात येणार नाही.

**(२) व्यापारी व इतर देणी**

यामध्ये वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी कंपनीला पुरविलेल्या माल व सेवा यांच्या दायित्त्वाच्या न दिलेल्या रक्कमा यांचा समावेश होतो. या रक्कमा अप्रतिभूत असतात व त्या निर्देशित केल्यानंतर बारा महिन्यात दिल्या जातात. व्यापारी व इतर देणी जर अहवालाच्या मुदतीनंतर बारा महिन्यात देय नसल्या असे नसेल तर त्यांना चालू दायित्त्व समजले जाते. त्यांनी प्रारंभी त्यांच्या रास्त मूल्यांनुसार मान्यता दिली जाते आणि नंतर परिणामकारक व्याज दर वापरून घसारा वजा करून त्यांची मागणी केली जाते.

**नोंद रद्द करणे**

जेव्हा एखाद्या वित्तीय दायित्त्वाचे बंधन चुकते केले जाते किंवा रद्द केले जाते किंवा त्याची मुदत संपते तेव्हा त्या वित्तीय दायित्त्वाची नोंद रद्द करण्यात येते. जेव्हा एका विद्यमान दायित्त्वाची जागा, त्याच कर्जदाराने वेगळ्या अटीनुसार दिलेले दुसरे दायित्त्वे घेते किंवा जर विद्यमान दायित्त्वाच्या अटींमधे महत्त्वाचे रुपभेद सुधारणा केले जातात, अशावेळी मूळ दायित्त्व रद्द केले जाते आणि नवीन दायित्त्व मान्य केले आहे असे मानण्यात येते. त्यामुळे पुस्तकी रक्कमेतील फरकाला स्वायत्त नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**वित्तीय विलेखांचे समायोजन:**

कायदेशीर तरतूदीप्रमाणे किंवा चालू काळातील संकेताप्रमाणे वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्त्व यांचे समायोजन होणार असेल तर अशा मत्ता व दायित्त्व यांची वजावट केल्यानंतर निव्वळ तत्त्वावर वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्त्व ताळेबंद पत्रकात दर्शविण्यात येतात.

**२४. रोख आणि रोख समतूल्य बाबी**

रोख आणि रोख समतूल्य बाबींमधे हातातील रोख रक्कम, बँकेतील शिल्लक, इतर अल्पमुदतीचे व चांगल्या प्रकारची रोकड सुलभता असलेल्या आणि तीन किंवा कमी महिन्यात मुदतपूर्ण होणाऱ्या मूळ गुंतवणूकी, तात्काळ रोखीत रूपांतर होऊ शकतील अशा आणि तसे करताना मूल्यात फारसा फरक पडणार नाही अशा बाबी समाविष्ट असतात.

**२५. रोकडता प्रवाह विवरण पत्रक**

भारतीय लेखा मानक क्र.७ हे रोकडता प्रवाह विवरण पत्रकासंबंधी असून, ते त्यानुसार अप्रत्यक्ष पद्धतीने तयार केले जाते. त्याच्या हेतुसाठी वरती व्याख्यांकित केलेल्या रोख व रोख समतूल्य बाबी विचारात घेण्यात येतात. तसेच बँकेच्या थकीत ओव्हरड्राफ्टची निव्वळ रक्कमही हिशेबात घेतली जाते कारण ती कंपनीच्या अंतर्गत रोकड व्यवस्थापनाचा एकात्मिक भाग आहे.

**२६. प्रतिभाग मिळकत**

करोत्तर नफा / तोटा रकमेला वर्षभरातील वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर या संख्येने भागून प्रतिभाग मिळकतीचा हिशेब केला जातो. सौम्यकृत प्रतिभाग मिळकत शोधून काढण्यासाठी करोत्तर नफा/तोटाच्या रकमेचे लाभांश, व्याज आणि सौम्यकृत संभाव्य समभागासंबंधीत इतर आकाराचे व्यय किंवा उत्पन्नाचे समायोजन केले जाते. सर्व संभाव्य समभागाचे रुपांतर केल्यानंतर ते सौम्यकृत भाग वितरित केले गेले असते अशा वेटेड ॲव्हरेज इक्विटी शेअर्सची संख्या विचारात घेतली जाते.

प्रतिभाग मिळकतीच्या हिशेबासाठी वाटप प्रलंबित असलेली शेअर अर्ज निधी हा वाटप योग्य आहे असे विचारात घेतले आहे. हा निधी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या बांधिलकीनुसार सूत्रधारी कंपनीमार्फत आणि निश्चितपणे वाटपासाठी मिळणार आहे.

## २७. कर

आयकराच्या खर्चात चालू कर खर्च आणि वर्षभरातील स्थगित कर मत्ता किंवा दायित्त्व यातील निव्वळ बदल यांचा समावेश होतो. चालू आणि स्थगित कर यांना नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा त्यांचा संबंध इतर सर्वकष उत्पन्नातील बाबीशी असतो किंवा थेट समभागाशी असतो, अशा प्रकरणी अपवाद करून, चालू आणि स्थगित कर या दोन्ही बाबींना अनुक्रमे इतर सर्वकष उत्पन्न आणि प्रत्यक्ष समभागात मान्यता दिली जाते.

**( अ ) चालू कर:**

आयकर कायदा १९६१ यातील तरतुदीनुसार वर्षातील परवानगी योग्य कर सवलती, कपाती / अमान्य करणे इत्यादी विचारात घेऊन करपात्र उत्पन्नावर चालू कर निश्चित केला जातो. अहवालाच्या वेळी कराचे दर आणि कराचे कायदे यांचा तसेच ते कायदे तयार झाले आहेत किंवा प्रामाणिकपणे होणार आहेत यांचा विचार करून अहवालाच्या वर्षाचे कराचे हिशेब केले जातात. वित्तीय वर्ष २०१९-२० पासून कंपनीने भारतीय आयकर अधिनियम १९६१ यातील कलम ११५ बी ए ए नुसार नवीन कर अमल बजावणीनुसार सवलतीच्या दराने कर भरण्याचा पर्याय निवडला आहे.

**( ब ) स्थगित कर:**

ताळेबंदाच्या दृष्टीकोनातून स्थगित कराला मान्यता दिली जाते. मत्ता आणि दायित्वे याच्या करांचा आधार त्यांचे वहन मूल्य यातील कपात योग्य आणि तात्पूरते फरक यानुसार स्थगित करमत्ता आणि दायित्वे यातील सर्व तात्पूरता करपात्र फरक मान्य केले जातात.

स्थगित कर दायित्वे यातील सर्व तात्पुरते करपात्र फरक मान्य केले जातात.

सर्व कपात योग्य हंगामी फरकाच्या रकमा, वापर न केलेल्या कराच्या जमा रकमा आणि जर काही वापर न केलेले कराचे तोटे असले तर त्यासाठी स्थगित कर मत्तांना मान्या दिली जाते. कपात योग्य हंगामी फरक, वापर न केलेले कर जमांच्या रकमा आणि न वापरलेल्या कर तोट्यांच्या रकमा यासाठी करपात्र नफ्यातून वसुली करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

प्रत्येक अहवाल तारखेला स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांचा आढावा घेण्यात येतो आणि स्थगित कर मत्ता संपूर्णपणे किंवा तिचा काही भाग वापरण्यास करपात्र नफा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत स्थगित कर मत्तांच्या पुढे न्यावयाच्या रकमांमधे कपात केली जाते. प्रत्येक अहवाल तारखेला अमान्य केलेल्या स्थगित कर मत्तांचा आढावा घेण्यात येतो आणि जर स्थगित कर मत्तांची भविष्यातील करपात्र नफ्यातून वसूल करण्यास परवानगी मिळेल याची शक्यता असल्यास त्या मर्यादेत मान्यता दिली जाते.

वर्षभरात जेव्हा मत्ता, वसूली किंवा दायित्त्वे चुकती केली जातात त्यावेळी लागू होणाऱ्या अपेक्षित कर दराने स्थगित कर मत्ता आणि दायित्त्वे यांची मोजणी केली जाते. त्यासाठी तोपर्यंत कायद्यानुसार मंजूर झालेले कराचे दर (आणि करांचे कायदे) किंवा अहवाल तारखेपर्यंत केले जाणारे कायदे यांचा आधार घेतला जातो.

जर चालू कर मत्ता व चालू कर दायित्त्वे या समवेत चुकता करण्याचा कायदेशीर अंमलबजावणी योग्य हक्क असला आणि स्थगित कर संबंधित कराची अस्तित्त्वातील बाबींशी संलग्न असेल आणि त्या समान कर प्राधिकरणाकडे असतील तर स्थगित कर दायित्त्व आणि स्थगित कर मत्ता यांची भरपाई करता येते.

## २८. व्यापारी येणी

कंपनीने व्यापारी येण्यांना त्यांच्या कर्जफेड खर्चानुसार वित्तीय विलेख म्हणून मान्यता दिली आहे. व्यापारी येणी त्यांच्या बिजकातील मूळ रक्कम वजा अपेक्षित पत तोट्याची तरतूद याप्रमाणे पुढे नेण्यात येतात. इतर वित्तीय मत्ता कमी करण्यातील तोट्याला मान्यता देण्यासाठी कंपनी त्यांचा प्रारंभिक मान्यतेनंतर पत जोखीमेने मोठी वाढ झाली आहे किंवा कसे यांचे मूल्यमापन करते.

## टिपा क्र. १ : मालमत्ता, कारखाने आणि साधने ( एकत्रित )

( ₹ कोटीत )

| खर्च | मूर्त मत्ता | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जमीन ( समाविष्टबाबी ) | | इमारती | | हायड्रॉक्लीन कामे | इतर स्थापत्य कामे | | कारखाने यंत्रे व साधने | लाइन व केबल नेटवर्क | वाहने | फर्निचर व जोडणी | कार्यालयीन साधने | कंपनीच्या मालकीच्या नसलेल्या मत्तांसाठी भांडवली खर्च | एकूण मूर्त मत्ता | वजा, घसारा भांडवली करण | नफा तोटा पत्रकात आकारलेला घसारा |
| | मालकीची | भाडेपट्टीच्या | कारखाने इमारती | इतर | | रेल्वे साइडींग | रस्ते व इतर | | | | | | | | | |
| दिनांक ०१.०४.२०१९ | १,६३८.२० | १०६.११ | ८९०.५३ | १,०९२.२२ | २,५२७.८६ | १,४७५.७९ | ४४२.४० | ३७,३२३.५८ | ४९०.४५ | १९.१२ | २८.७७ | ४५.२६ | ५७.४९ | ४६१३७.६७ | | |
| भर | १६.१० | - | १.१३ | २०.४३ | ३३.३२ | ३.८५ | १४९.१२ | ३५२.४१ | ०.०३ | ३.७७ | ३.०७ | ८.५२ | - | ५९१.७३ | | |
| कपात | - | - | ७.८९ | ६.२५ | ७८.०१ | (०.५६) | ४.७१ | ७०१.८१ | १.२२ | ०.४७ | ०.९४ | २.१५ | - | ८०२.९० | | |
| दिनांक ३१.०३.२०२० | १,६५४.३० | १०६.११ | ८८३.७८ | १,१०६.४० | २,४८३.१७ | १,४८०.२० | ५८६.८१ | ३६,९७४.१८ | ४८९.२६ | २२.४२ | ३०.९० | ५१.६३ | ५७.४९ | ४५९२६.६३ | | |
| भर | २.२७ | - | ०.७७ | ५७.९८ | २७.०५ | १०६.०५ | १०४.२४ | १७८.९७ | - | ६.४७ | ३.१० | ६.३८ | - | ४९३.२८ | | |
| कपात | - | - | - | - | - | - | - | ०.०४ | - | ०.२१ | - | ०.९५ | - | १.२० | | |
| दिनांक ३१.०३.२०२१ | १,६५६.५६ | १०६.११ | ८८४.५५ | १,१६४.३८ | २,५१०.२२ | १,५८६.२५ | ६९१.०५ | ३७,१५३.१२ | ४८९.२६ | २८.६८ | ३४.०० | ५७.०६ | ५७.४९ | ४६४१८.५८ | | |
| संचीत घसारा व मूल्यघट | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | | |
| ०१.०४.२०१९ | - | १७.५० | ६१.६६ | २४२.१० | ५६३.१० | २०७.४० | ८७.८६ | ६,५१६.७८ | १११.४५ | १.४८ | ६.५४ | १५.१२ | १७.३२ | ७८४८.२१ | | |
| भर | - | ४.३८ | ३६.७२ | ८३.५० | १३२.६३ | ६७.९२ | २०.३१ | २,१३६.९७ | २३.८२ | २.१३ | २.८८ | ५.०४ | ४.५४ | २५२०.८३ | ०.११ | २५२०.७३ |
| कपात | - | - | ७.१० | ५.८३ | ७०.१४ | (०.३४) | ४.२४ | ६२६.८१ | १.१० | ०.४२ | ०.८४ | १.९० | - | ७१८.०४ | | |
| दिनांक ३१.०३.२०२० | - | २१.८८ | ९१.२८ | ३१९.७६ | ६२५.६० | २७५.६५ | १०३.९३ | ८०२६.९४ | १३४.१७ | ३.१९ | ८.५९ | १८.२६ | २१.८६ | ९६५१.०० | | |
| कपात/समायोजने | - | ४.३८ | ३६.६८ | ७५.१९ | १३७.५९ | ६२.५२ | २५.५२ | २,१००.७८ | २३.९२ | २.५१ | २.९९ | ५.७४ | ४.५४ | २४८२.३६ | ०.२९ | २४८२.०७ |
| | - | - | - | - | - | - | - | ०.०३ | - | ०.१९ | - | ०.९१ | - | १.१३ | | |
| दिनांक ३१.०३.२०२१ | - | २६.२६ | १२७.९६ | ३९४.९५ | ७६३.१९ | ३३८.१८ | १२९.४५ | १०,१२७.६९ | १५८.०९ | ५.५१ | ११.५८ | २३.१० | २६.४० | १२,१३२.२३ | | |
| दिनांक ०१.०४.२०१९ | १,६३८.२० | ८८.६० | ८२८.८७ | ८५०.१३ | १९६४.७५ | १२६८.३९ | ३५४.५४ | ३०८०६.८० | ३७९.०० | १७.६४ | २२.२३ | ३०.१४ | ४०.१६ | ३८२८९.४६ | | |
| दिनांक ३१.०३.२०२० | १,६५४.३० | ८४.२३ | ७९२.५० | ७८६.६४ | १,८५७.५७ | १,२०४.५५ | ४८२.८७ | २८,९४७.२५ | ३५५.०८ | १९.२३ | २२.३१ | ३३.३६ | ३५.६३ | ३६,२७५.४९ | | |
| दिनांक ३१.०३.२०२१ | १,६५६.५६ | ७९.८५ | ७५६.५९ | ७६९.४४ | १,७४७.०३ | १,२४८.०७ | ५६१.६० | २७,०२५.४३ | ३३१.१६ | २३.१७ | २२.४२ | ३३.९६ | ३१.०९ | ३४,२८६.३५ | | |

**टिपा क्र. १ अ: मालमत्ता वापरण्याचा अधिकार** (₹ कोटीत)

| खर्च | किंमत |
|---|---|
| ठोक रक्कम | |
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **-** |
| भर | ४,४३६.६७ |
| कपात | - |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **४,४३६.६७** |
| भर | - |
| कपात | (३.५२) |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **४,४४०.२०** |
| संचित कर्जफेड तरतूद | |
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **-** |
| भर | २५३.९४ |
| कपात | - |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **२५३.९४** |
| भर | २५४.०४ |
| कपात/समायोजने | (३.५२) |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **५११.५१** |
| निव्वळ वहन रक्कम | |
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **-** |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **४,१८२.७३** |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **३,९२८.६९** |

**टिपा क्र. १ब : अमूर्त मत्ता** (₹ कोटीत)

| तपशील | सॉफ्टवेयर परवाना |
|---|---|
| ठोक रक्कम | |
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **३२.८८** |
| भर | १.२५ |
| कपात | ०.२१ |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **३३.९३** |
| भर | ०.४२ |
| कपात | ०.२१ |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **३४.१४** |
| संचित करफेड तरतूद | |
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **२५.७६** |
| भर | ४.०७ |
| कपात | ०.२१ |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **२९.६२** |
| भर | २.०३ |
| कपात/समायोजने | ०.१४ |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **३१.५१** |
| निव्वळ वहन रक्कम | |
| **दि. ०१.०४.२०१९ रोजी** | **७.१२** |
| **दि. ३१.०३.२०२० रोजी** | **४.३०** |
| **दि. ३१.०३.२०२१ रोजी** | **२.६३** |

**टिपा क्र. १क : 'विक्रीसाठी योग्य' असे वर्गीकरण केलेल्या मत्ता** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| कारखाने व यंत्रे | १९६.६७ | १९६.६८ | १८८.२३ |
| कारखाना - इमारती आणि इतर | ६.६३ | ६.६३ | ९.५३ |
| हायड्रॉलीक कामे | १३.७७ | १३.७७ | ८.५१ |
| रेल्वे साईडिंग रस्ते व इतर | २६.२६ | २६.२६ | २६.२५ |
| लाईन व केबल नेटवर्क | १.८३ | १.८३ | ८.८४ |
| वाहने | ०.३५ | ०.३४ | ०.३५ |
| फर्निचर व जोडण्या | ०.४५ | ०.४५ | ०.३७ |
| कार्यालयीन साधने | १.०१ | ०.९९ | ०.७८ |
| इतर संकीर्ण मत्ता | ०.०७ | ०.०७ | ०.०७ |
| निकामी साहित्यसाठी तरतूद | २४.४१ | २१.१७ | ४२.०९ |
| एकूण | २२२.६१ | २२५.८३ | २००.८४ |

**सूचना:** कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील युनीट क्र. ५ आणि परळी औष्णिक विद्युत केंद्रातील युनीट क्र. ३ आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट क्र. १ व २, भुसावळ केंद्रतील युनिट २ यांचे कार्य खंडीत करण्यात आले आहे. कंपनीने या युनीटच्या मत्तांची विल्हेवाट लावण्याचे काम सुरू केले आहे. कंपनीने या मत्तांचे पूर्नवर्गीकरण/विक्रीसाठी काढलेल्या मत्ता असे केले आहे. या पुर्नवर्गीकरणानंतर कमी केल्याची हानी याला मान्यता दिलेली नाही. कारण कंपनीची अपेक्षा आहे की मत्तांचे मूल्य वजा त्यांच्या विक्रीचा खर्च ही रक्कम यासारख्या मत्तांच्या दि. ३१ मार्च २०२१ रोजीच्या रास्तमूल्यपेक्षा जास्त असेल. (यासारख्या मालमत्तांच्या नियमन बाजार मूल्यांच्या आधारे)

## टिपा क्र. २ : प्रगतीपथावरील भांडवली कामे ( एकत्रित )

( ₹ कोटीत )

| तपशील | एकूण मूर्त प्रगती पथावरील भांडवली कामे | मालकीची जमीन | भाड्याची जमीन | कारखाने इमारती | इतर इमारती | हायड्रॉ लीक कामे | रेल्वे साईडींग | रस्ते व इतर | कारखाना व यंत्रे | लाइन, केबल नेटवर्क | वाहने | फर्नीचर व जोडण्या | कार्यालयीन साधने | सीडब्ल्यू आयपी अमुर्त मत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१.०४.२०१९ रोजी | १०४३.१२ | १४.४९ | - | ५२९.३८ | २.९६ | ०.४५ | १.९८ | ७१.८४ | ४२१.०८ | - | ०.०० | ०.०० | ०.९५ | १३३.७६ |
| भर | १,३५०.५३ | - | - | ५८०.९२ | १८.३१ | १३.४६ | | ४६.८९ | ६८९.२१ | | ०.०० | १.१८ | ०.५६ | ०.१७ |
| कमी | २३३.९४ | १३.४६ | - | ९६.९५ | २.३५ | ०.२३ | | ९.८१ | ११०.५८ | | ०.०० | - | ०.५६ | - |
| ३१.०३.२०२० रोजी | २,१५९.७२ | १.०३ | - | १,०१३.३६ | १८.९२ | १३.६८ | १.९८ | १०८.९२ | ९९९.७१ | - | ०.०० | १.१८ | ०.९५ | १३३.९३ |
| भर | १,५९६.६६ | - | - | ३४४.६२ | १०.०४ | ४.०५ | | २८.०९ | १,२०६.१६ | | - | ०.४० | ३.३२ | १०५.७५ |
| कमी | १६.१० | - | - | ८५.२१ | १.५३ | ३.६४ | | ९३.१४ | -१६९.४९ | | - | १.१७ | ०.८९ | - |
| ३१.०३.२०२१ रोजी | ३,७४०.२९ | १.०३ | - | १,२७२.७६ | २७.४२ | १४.०९ | १.९८ | ४३.८७ | २,३७५.३५ | - | ०.०० | ०.४० | ३.३८ | २३९.६८ |
| **निव्वळ प्रगतीपथावरील भांडवली कामे** | | | | | | | | | | | | | | |
| वजा : निकामी साहित्यसाठी तरतूद | ३३.९८ | | - | | | | | | ३३.९८ | | | | | |
| ०१.०४.२०१९ रोजी | १,००९.१५ | १४.४९ | - | ५२९.३८ | २.९६ | ०.४५ | १.९८ | ७१.८४ | ३८७.१० | - | ०.०० | ०.०० | ०.९५ | १३३.७६ |
| वजा : निकामसाठी तरतूद | ४०.०९ | | - | | | | | | ४०.०९ | | | | | |
| ३१.०३.२०२० रोजी | २,११९.६३ | १.०३ | - | १,०१३.३६ | १८.९२ | १३.६८ | १.९८ | १०८.९२ | ९५९.६२ | - | ०.०० | १.१८ | ०.९५ | १३३.९३ |
| वजा : निकामीसाठी तरतूद | ६३.५९ | | - | | | | | | ६३.५९ | | | | | |
| ३१.०३.२०२१ रोजी | ३,६७६.६९ | १.०३ | - | १,२७२.७६ | २७.४२ | १४.०९ | १.९८ | ४३.८७ | २,३११.७६ | - | ०.०० | ०.४० | ३.३८ | २३९.६८ |

**टिप:** अमूर्त मत्तासंबंधीच्या भांडवली कामामध्ये गारेपालमा येथील खाण विकासासाठी मिळालेला परवान्यांचा समावेश केलेला आहे.

**टिपा क्र.३: उपकंपन्या, सहयोगी आणि संयुक्त साहस कंपन्या यामधील चालू नसलेल्या दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकी** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| **समभाग विलेखातील गुंतवणूकी - किंमत वजा यातील घट यानुसार उद्धृत न केलेल्या** | | | |
| यु सी एम कोल कंपनी मर्यादित<br>३०,००० (मागील वर्षी ३०,०००) समभाग प्रत्येक ₹ १० पूर्ण भरलेले. | (०.४४) | (०.३९) | (०.४३) |
| छत्तीसगढ कटघोरा डोंगरगाव रेल्वे मर्यादित<br>५,२०,००० समभाग प्रत्येक ₹ १० पूर्ण भरलेले | ०.५२ | ०.५२ | ०.५२ |
| उपकंपन्यांमध्ये समकक्ष गुंतवणूक (अग्रिम स्वरूपाची) | ५.३२ | ५.३२ | ५.३२ |
| **एकूण** | ५.३९ | ५.४४ | ५.४० |
| वजाः अपेक्षित पत हानी आणि गुंतवणूक मूल्य घटाची तरतूद | (५०.३६) | (४९.१७) | (४८.०१) |
| **एकूण** | **( ४४.९७ )** | **( ४३.७२ )** | **( ४२.६१ )** |

**टिपा क्र.४: इतर चालू नसलेल्या मत्ता** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| **संचालन व सुव्यवस्था पुरवठा/अग्रिमे वसूली योग्य** | २५४.११ | २५४.११ | २५२.३४ |
| वजाः अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | (२५४.११) | (२५४.११) | (२५२.३४) |
| | - | - | - |
| महाराष्ट्र शासन जलसिंचन विभागातील अग्रिम | ७६.२१ | ७६.२१ | ७६.२१ |
| वजाः अपेक्षित तोट्यासाठी तरतूद | (७६.२१) | (७६.२१) | (७६.२१) |
| | - | - | - |
| आयकर परवाना योग्य (तरतुदीची निव्वळ) | ३२६.६२ | २६७.२४ | ३१३.९९ |
| कर्मचारी वृंदाला अग्रिमे | ०.८८ | ०.८८ | १.९५ |
| कर्जफेड तरतूद करण्याचा खर्च | १.१६ | - | - |
| भांडवली अग्रिमे | २४८.३३ | ३१८.९८ | ३०७.३९ |
| स्थगित भाडे (जलविद्युत) | - | - | ७५१.१६ |
| कराचे दावे | ५४.४१ | ५४.४१ | ५४.४१ |
| **एकूण** | **६३१.४०** | **६४१.५१** | **१,४२८.९०** |

**टिपा क्र. ५: चालू मत्ता - वस्तूमाल सूची** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| कच्चा माल (कोळसा) | ३१२.३० | ९९८.३८ | ६६५.३६ |
| इंधन तेल - एल डी ओ इत्यादी | १८२.४८ | २३०.८२ | २१८.६७ |
| प्रवासातील मालसाठा (कोळसा व तेल) | ४३.०५ | ७८.१२ | ३६.०९ |
| भांडारमाल व सुटे भाग | ८७७.३६ | ९२४.३० | ८८७.४१ |
| वजाः निकामी माल व सूटे भागांसाठी तरतूद | (४५६.६८) | (४३६.८९) | (३५०.६०) |
| वजाः चौकशी प्रलंबित असलेल्या साहित्यातील तुटींसाठी तरतूद | (२८.४२) | (३१.७१) | (३९.०५) |
| एकूण | ९३०.०९ | १७६३.०३ | १४१७.८९ |

**टिपा क्र. ६ चालू मत्ताः व्यापारी येणी** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| अप्रतिभूत, चांगली मानलेली | २४,५१८.१८ | १७,८०३.६८ | १३,५५१.३५ |
| संशयास्पद | १६७.१५ | १६७.१५ | ४०.१६ |
| वजाः अपेक्षित पत हानीसाठी भरपाई | (१६७.१५) | (१६७.१५) | (४०.१६) |
| एकूण | २४,५१८.१८ | १७,८०३.६८ | १३,५५१.३५ |

**टिपा क्र. ७ चालू मत्ताः रोख आणि रोख समतूल्य** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| शेड्यूल बँकातील शिलकी | | | |
| चालू खात्यात | ०.०३ | ४.९४ | ०.२४ |
| रोख समतूल्य | ५७.४९ | - | - |
| हातातील शिल्लक | ०.०२ | ०.०२ | ०.०७ |
| एकूण | ५७.५४ | ४.९६ | ०.३२ |

**टिपा क्र. ८ चालू मत्ता - चालू कर्जे** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| अप्रतिभूत - चांगली मानलेली | | | |
| कर्मचाऱ्यांना कर्जे व अग्रीमे | ५.७७ | ७.६५ | १०.६४ |
| एकूण | ५.७७ | ७.६५ | १०.६४ |

**टिपा क्र. ९ इतर चालू वित्तीय मत्ता** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| **अप्रतिभूत, चांगली मानलेली** | | | |
| कर्मचाऱ्यांकडून वसूली योग्य | ३१.६४ | ५.४२ | ४.४८ |
| विनादेयक येणी | २,७०६.५५ | २,५१६.९४ | २,६१७.१९ |
| मूल्य वर्धित कर यासह कराचे दावे | ७८.३३ | ९६.६७ | ११४.३० |
| भाडे मिळण्याजोगी | ०.४५ | ०.१२ | ०.१३ |
| दावे मिळण्याजोगी | १०९.९१ | १२४.१० | १२३.०७ |
| महानिर्मितीने संबंधितांकडे दिलेल्या अनामती | १५.८१ | ४.९४ | ४.२८ |
| ऊर्जा बचत प्रमाणपत्राचे संचित | १.९६ | - | - |
| कंत्राटदारांकडून येणे (वसूली योग्य) महानिर्मितीची अनामती | ११४.८५ | ३६.६६ | ४३.४३ |
| एकूण | **३,०५९.५०** | **२,७८४.८६** | **२,९०६.८९** |

**टिपा क्र. १० : चालू मत्ता - इतर मत्ता** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| पूर्वी केलेले खर्च | ३७.१४ | ४८.८७ | ३८.०९ |
| संचालन सुव्यवस्था पुरवठा / कामे यांची अग्रिमे | ३९७.७० | ४४०.३७ | ५८९.६२ |
| सांविधिक प्राधीकरणांकडील शिल्लक | ०.०१ | ०.०० | ०.०० |
| इंधन पुरवठा /इतर यांची अग्रिमे | ४१७.२५ | ७२४.०४ | ७८७.५७ |
| वजा-अपेक्षित पत्र हानी तरतूद | (२०३.६०) | (१३०.७५) | (१३०.७५) |
| एकूण | **६४८.५०** | **१,०८२.५३** | **१,२८४.५३** |

**टिपा क्र. ११ : भाग भांडवल ( एकत्रित )**

**१. अधिकृत भांडवल**

| समभागाचा वर्ग | सममूल्य | ३१.०३.२०२१ रोजी | | ३१.०३.२०२० रोजी | | ०१.०४.२०१९ रोजी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत |
| समभाग | १० | ४०,०००,०००,००० | ४०,०००.०० | ४०,०००,०००,००० | ४०,०००.०० | २५,०००,०००,००० | २५,०००.०० |

२ ) दिलेले, अभिदत्त आणि भरलेले भांडवल ( पूर्ण भरणा केलेले )

| शेअरचा वर्ग | सममूल्य | ३१.०३.२०२१ रोजी | | ३१.०३.२०२० रोजी | | ०१.०४.२०१९ रोजी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत |
| समभाग | १० | २५,४०७,९४६,२२६ | २५,४०७.९५ | २५,३४३,९४६,२२६ | २५,३४३.९५ | २५,२८४,१२६,२२६ | २५,२८४.१३ |

३ ) शेअर्सच्या संख्येचा केलेला मेळ

| शेअरचा वर्ग | ३१.०३.२०२१ रोजी | | ३१.०३.२०२० रोजी | | ०१.०४.२०१९ रोजी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | समभाग | | समभाग | | समभाग | |
| | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत | शेअर्सची संख्या | रक्कम ₹ कोटीत |
| वर्षारंभीचे थकीत | २५,३४३,९४६,२२६ | २५,३४३.९५ | २५,२८४,१२६,२२६ | २५,२८४.१३ | २५,२४७,१२६,१२६ | २५,२४७.१३ |
| कालावधीतील भर | ६४,०००,००० | ६४.०० | ५९,८२०,००० | ५९.८२ | ३७,०००,१०० | ३७.०० |
| वर्षाअखेरीस थकीत | २५,४०७,९४६,२२६ | २५,४०७.९५ | २५,३४३,९४६,२२६ | २५,३४३.९५ | २५,२८४,१२६,२२६ | २५,२८४.१३ |

४ ) **हक्क, पसंती निर्बंध/लाभांश वितरण आणि भांडवली परतफेड यावरील निर्बंध समाविष्ट करून**

(१) या कंपनीमध्ये फक्त एकाच वर्गातील भाग आहेत. समभाग त्याची नाममात्र किंमत ₹१०/- प्रति शेअर अशी आहे.

(२) ही कंपनी मराविमं सुत्रधारी कंपनी लि. ची उपकंपनी असून असे १०० टक्के मते आहेत. संचालक मंडळाने प्रस्तावित केलेले लाभांश वार्षिक सर्वसाधारण सभेत शेअर धारकांना मंजुरीच्या अधीन आहे.

(३) ज्यावेळी असा लाभांश जाहीर होईल तेव्हा तो प्राप्त करण्याचा कंपनीच्या शेअरधारकांना हक्क आहे.

(४) जर कंपनीचे परिसमापन झाले तर, कंपनीच्या सर्व पतधार/धनको यांना भागाचे वितरण/परतफेड केल्यानंतर समभाग धारकांचा त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात कंपनीच्या मत्ता मिळविण्याचा हक्क राहील. तसे वाटप शेअर धारकांना केलेल्या शेअरच्या संख्येच्या प्रमाणात केले जाईल.

५ ) **सूत्रधारी कंपनीने धारण केलेले प्रत्येक श्रेणीतील समभाग :**

| भाग धारकाचे नाव | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी | ०१-०४-२०१९ रोजी |
|---|---|---|---|
| | समभाग | समभाग | समभाग |
| मराविम सूत्रधारी कंपनी लिमिटेड (संख्या) | २५,४०७,९४६,२२६ | २५,३४३,९४६,२२६ | २५,२८४,१२६,२२६ |
| मराविम सूत्रधारी कंपनी लिमिटेड (रक्कम ₹ कोटीत) | २५,४०७.९५ | २५,३४३.९५ | २५,२८४.१३ |

६ ) **कंपनीचे ५ टक्के पेक्षा जास्त शेअर धारण करणारा प्रत्येक भागधारक आणि सूत्रधारी कंपनीच्या शेअर धारकांचा तपशील**

| भाग धारकाचे नाव | ३१.०३.२०२१ रोजी | | ३१.०३.२०२० रोजी | | ०१-०४-२०१९ रोजी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | समभाग | शेअर टक्केवरी | समभाग | शेअर टक्केवरी | समभाग | शेअर टक्केवरी |
| मराविम सूत्रधारी कंपनी लिमिटेड | २५,४०७,९४६,२२६ | १००.०० | २५,३४३,९४६,२२६ | १००.०० | २५,२८४,१२६,२२६ | १००.०० |

**टिपा क्र. १२ : इतर समभाग ( अ ) राखीव आणि अधिक्य** ( ₹ कोटीत )

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| **ठेवलेली मिळकत** | | | |
| मागील ताळेबंदप्रमाणे | (६,६९४.४०) | (६,७२९.९५) | (६,४१४.८१) |
| मागील ताळेबंदाप्रमाणे आणि विना नियंत्रणाचे हितसंबंध यासाठी | (३.५०) | (२.५७) | (१.५०) |
| अधिक : पालक व मालक यांना देय वर्षाचा नफा /(तोटा) | २७४.१७ | ३५.५६ | (३१५.१५) |
| अधिक : विना नियंत्रक हितसंबधाना देय वर्षाचा नफा / (तोटा) | (१.३१) | (०.९३) | (१.०८) |
| | ( ६,४२५.०४ ) | ( ६,६९७.९० ) | ( ६,७३२.५३ ) |
| **इतर समभाग ( ब ) इतर राखीव** | | | |
| पालक-मालक याचे इतर समभाग | ४४.५७ | ६६.०७ | २.०७ |
| विना नियंत्रणाचे हितसंबध यांचे इतर समभाग | २६.२३ | २५.०३ | २४.२८ |
| एकूण बेरीज | ( ६,३५४.२४ ) | ( ६,६०६.८० ) | ( ६,७०६.१८ ) |

**टिपा क्र. १३ : चालू नसलेली कर्जे** ( ₹ कोटीत )

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| मुदतीची कर्जे | | | |
| **प्रतिभूत** | | | |
| मुदतीची कर्जे वित्तीय संस्थांची | २०,५६७.१४ | २०,५२४.२७ | २०,५४७.१० |
| मुदतीची कर्जे - बँकाची | १,२४८.५४ | १,४३६.४३ | १,६२५.८२ |
| **अप्रतिभूत** | | | - |
| मूदतीची कर्जे - वित्तीय संस्थांची | | | - |
| जागतिक बँकेचे कर्ज | २५४.४२ | २७६.८२ | २६६.६२ |
| सी एस एस ई पी एल कडून कर्ज (बारामती प्रकल्प) | १७४.१९ | १८२.७९ | १९१.३९ |
| के एफ डब्ल्यूचे कर्ज | २०७.९१ | ३०६.७० | ३८१.१८ |
| एकूण | २२,४५२.२० | २२,७२७.०१ | २३,०१२.११ |

**टिपा क्र. १४ : चालू नसलेल्या तरतूदी** ( ₹ कोटीत )

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| अंशदानासाठी तरतूद | ५१८.२२ | ५२८.३७ | ४२५.४१ |
| रजा रोखीकरणासाठी तरतूद | ५४४.४४ | ५२७.४० | ४०२.५२ |
| एकूण | १,०६२.६६ | १,०५५.७७ | ८२७.९२ |

**टिपा क्र. १५ : स्थगित कर दायित्वे ( निव्वळ )**

**अ ) नफा व तोटा यात नोंदविलेले कर खर्च** ( ₹ कोटीत )

| तपशील | ३१.०३.२०२१ संपलेल्या वर्षासाठी | ३१.०३.२०२० संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **चालू कर खर्च** | | |
| चालू वर्ष | (०.१९) | ४१.३६ |
| मागील वर्षासंबंधातील अंदाजाचे बदल | - | - |
| | (०.१९) | ४१.३६ |
| **स्थगित कर खर्च** | १९५.९८ | (२४.२८) |
| मूळ केलेले आणि उलट फिरवलेले हंगामी फरक | - | - |
| कर दरातील बदल | - | - |
| मागील वर्षासंबंधातील अंदाजाचे बदल | १९५.९८ | (२४.२८) |
| **उत्पन्नाच्या विवरणपत्रकात मान्य केलेले कर** | **१९५.८०** | **१७.०८** |

**ब ) इतर सर्वंकष उत्पन्नात मान्य केलेला कर खर्च** ( ₹ कोटीत )

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी | | |
|---|---|---|---|
| | करपूर्व | कर खर्च/लाभ ) | निव्वळ कर |
| **नफा किंवा तोटा यात पुनर्वर्गीकरण होणार नसलेल्या बाबी** | | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांचे पुर्नमापन | ०.७५ | (०.१९) | ०.५६ |
| **एकूण** | **०.७५** | **( ०.१९ )** | **०.५६** |

| तपशील | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षासाठी | | |
|---|---|---|---|
| | करपूर्व | कर खर्च/लाभ ) | निव्वळ कर |
| **नफा किंवा तोटा यात पुनर्वर्गीकरण होणार नसलेल्या बाबी** | | | |
| व्याख्यांकित लाभ योजनांचे पुर्नमापन | (१६४.३२) | ४१.३६ | (१२२.९६) |
| **एकूण** | **( १६४.३२ )** | **४१.३६** | **( १२२.९६ )** |

**क ) परिणामकारक कर दराचा मेळ करणे** ( ₹ कोटीत )

| तपशील | ३१.०३.२०२१ संपलेल्या वर्षासाठी | ३१.०३.२०२० संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **कर पूर्व नफा** | ४२४.६० | २२३.८४ |
| **लागू होणारा कर दर** | २५.१७ % | २५.१७% |
| **कंपनीचा देशातंर्गत दरानुसार कर** | १०६.८६ | ५६.३४ |
| कर दरातील बदल | - | - |
| **कराचा खालील बाबींवर परिणाम** | | |

| | | |
|---|---|---|
| ज्यात कपात होत नाही असे खर्च | ४.५८ | ३.२४ |
| खालील बाबींसाठी वेळेतील फरक | | |
| - घसारा व इतर बाबी | ६९.४६ | (३३४.९७) |
| - वित्तीय मत्तेतील घट | ०.०० | (०.२९) |
| - प्रत्यक्ष देण्याच्या तत्वावर मान्य होणारे खर्च | (३०.३१) | (२६.५६) |
| - भाटेपट्टी दायित्वाचे मूल्यघट | ३८.०२ | (१,१३१.२५) |
| मागील वर्षातील स्थगित कराचे समायोजन | (०.३४) | १,४०८.३४ |
| कपात न होणारा सी एस आर खर्च | ७.७२ | ०.८७ |
| इतर सर्वकष उत्पन्नातील बाबी | (०.१९) | ४१.३६ |
| **कर खर्च** | **१९५.८०** | **१७.०८** |
| परिणामकारक कर दर | ४६.११% | ७.६३% |

**ड) स्थगित कर शिल्लकीचे स्थलांतर** (₹ कोटीत)

| तपशील | ३१ मार्च २०२१ रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | निव्वळ शिलकी १ एप्रिल २०२० | नफा किंवा तोटा यात मान्यता | इतर सर्वकष उत्पन्नामध्ये मान्यता | निव्वळ | स्थगित कर नफा | स्थगित कर दायित्व |
| **स्थगित कर मत्ता** | | | | | | |
| मालमत्ता, कारखाने आणि साधने | (४,००१.७०) | (१६३.२०) | - | (४,१६४.९०) | - | (४,१६४.९०) |
| गुंतवणूकी | १२.६८ | (०.००) | - | १२.६८ | १२.६८ | - |
| वस्तू सूची | - | - | - | - | - | - |
| व्यापारी येणी | - | - | - | - | - | - |
| भाडेपट्टी दायित्वे | ८९०.५३ | (३८.०२) | | ८५२.५१ | ८५२.५१ | |
| तरतूदी | ३३८.०२ | (८.२५) | (०.१९) | ३२९.५९ | ३२९.५९ | - |
| अघोषित घसारा | १,७६६.२० | (४.६६) | - | १,७६१.५४ | १,७६१.५४ | - |
| कर्जे आणि अग्रिमे | १५८.१० | १८.३३ | - | १७६.४३ | १७६.४३ | - |
| कर मत्ता (दायित्वे) | (८३६.१८) | (१९५.८०) | (०.१९) | (१,०३२.१६) | ३,१३२.७४ | (४,१६४.९०) |
| तपशील | ३१ मार्च २०२० रोजी | | | | | |
| | निव्वळ शिलकी १ एप्रिल २०१९ | नफा किंवा तोटा यात मान्यता | इतर सर्वकष उत्पन्नामध्ये मान्यता | निव्वळ | स्थगित कर नफा | स्थगित कर दायित्व |
| **स्थगित कर मत्ता** | | | | | | |
| मालमत्ता, कारखाने आणि साधने | (५,५३५.१४) | १,५३३.४४ | - | (४,००१.७०) | - | (४,००१.७०) |
| गुंतवणूकी | १६.७८ | (४.१०) | - | १२.६८ | १२.६८ | - |
| वस्तू सूची | - | - | - | - | - | - |
| व्यापारी येणी | - | - | - | - | - | - |
| भाडेपट्टी दायित्वे | | ८९०.५३ | - | ८९०.५३ | ८९०.५३ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तरतूदी | ३७१.४९ | (७४.८२) | ४१.३६ | ३३८.०२ | ३३८.०२ | - |
| अशोषित घसारा | ४,३७४.४० | (२,६०८.२०) | - | १,७६६.२० | १,७६६.२० | - |
| कर्जे आणि अग्रिमे | (८७.९७) | २४६.०७ | - | १५८.१० | १५८.१० | - |
| **कर मत्ता ( दायित्वे )** | **( ८६०.४५ )** | **( १७.०८ )** | **४१.३६** | **( ८३६.१८ )** | **३,१६५.५३** | **( ४,००१.७० )** |

**टिपा क्र. १६ ) इतर चालू नसलेली दायित्वे** **( ₹ कोटीत )**

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| भाडेपट्टीचे दायित्व - भारतीय लेखा मानके ११६ | ३,२३१.२८ | ३,३८४.७३ | - |
| **एकूण** | **३,२३१.२८** | **३,३८४.७३** | **-** |

**टिपा क्र. १७ ) चालू कर्जे** **( ₹ कोटीत )**

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| **मागणी केल्यास परतफेड योग्य कर्जे** | | | - |
| **प्रतिभूत** | | | - |
| **बँकातील** | | | - |
| रोख पत कर्जे | ८,६२३.९० | ५,८५१.७९ | ४,९६०.६२ |
| **अप्रतिभूत** | | | - |
| **बँकातील** | | | - |
| **खेळते भांडवल** | १,२४९.६५ | १,५००.०० | २,३५०.०० |
| इतर अल्प मुदतीची कर्जे | ६००.०० | ७५०.०० | ७५०.०० |
| **एकूण** | **१०,४७३.५५** | **८,१०१.७९** | **८,०६०.६२** |

**टिपा क्र. १८ ) चालू व्यापारी देणी** **( ₹ कोटीत )**

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक | - | ०.०३ | ०.१२ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम - व्यतिरिक्त | ३,२८१.५९ | २,२५१.९१ | १,३२८.२२ |
| **एकूण** | **३,२८१.५९** | **२,२५१.९४** | **१,३२८.३४** |

टिपा क्र. १९ ) इतर चालू वित्तीय दायित्वे (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| चालू काळात मुदत पूर्व झालेली दीघ मुदतीची कर्जे | ३,९९८.४३ | ३,३४०.४५ | २,४६६.८५ |
| ठेवून घेतलेल्या आणि देय असलेल्या रकमा | ४,७२५.८८ | ३,९०७.६० | ३,११४.८० |
| इतर ठेवी - अनामती | १४६.६८ | १४०.५३ | १०६.८५ |
| उपार्जित झालेले पण देय नसलेले व्याज | २२९.९६ | २२४.५३ | २२८.९७ |
| भाडेपट्टी दायित्व - भारतीय लेखा मानके ११६ | १५६.०२ | १५३.६१ | - |
| भांडवली मालाची देणी | ९२.२८ | ६८.९४ | ७९.२९ |
| संबंधितांची देणी | ७८३.६४ | ७७०.६५ | ७१६.८० |
| इतर | ७७८.७३ | ६११.९२ | ४४५.२९ |
| कर्मचाऱ्याची देणी | ३०८.३६ | ३०३.४० | ७७.६० |
| एकूण | ११,२१९.९७ | ९,५२१.६३ | ७,२३६.४५ |

टिपा क्र. २० ) इतर चालू दायित्वे (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| भांडवली अनुदाने | ३०.०० | ५.९९ | ६.४९ |
| **सांविधिक देणी** | | | |
| स्त्रोतापाशी कापलेला आयकर | ३७.७९ | ३२.६१ | २३.४१ |
| स्त्रोतापाशी जमा केलेला आयकर | ५.१३ | ०.०५ | ०.०१ |
| सेवा कर दायित्व आणि देय झालेले वीज शुल्क | ०.०६ | ०.०८ | ०.०५ |
| जी एस टी दायित्वे | ३४.३५ | ४४.०९ | २९.१३ |
| व्यवसायिक कराचे दायित्वे | ०.०९ | ०.०८ | ०.११ |
| एकूण | १०७.४२ | ८२.८९ | ५९.१९ |

टिपा क्र. २१ ) चालू तरतुदी (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | ०१.०४.२०१९ |
|---|---|---|---|
| उपदानासाठी तरतूद | १०९.६१ | १३२.७२ | १११.२९ |
| रजा रोखीकरणाची तरतूद | १३८.४९ | १५४.५९ | १२३.८९ |
| एकूण | २४८.१० | २८७.३० | २३५.१८ |

**टिपा क्र. २२ ) वीज विक्री** ( ₹ कोटीत )

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| वीज विक्री | २०,८९१.५८ | २१,९६३.९८ |
| एकूण | २०,८९१.५८ | २१,९६३.९८ |

**टिपा क्र. २३ ) इतर प्रवर्तनीय महसूल** ( ₹ कोटीत )

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| विलंब भरणा अधिभार | २,५११.५१ | २,५४५.४५ |
| संकीर्ण प्रवर्तन महसूल | ७.५६ | ६९.१८ |
| आय पी पी कोळसा विक्री | १६४.८१ | ७७.७० |
| फ्लाय ॲश विक्री | २८.३४ | ३५.८५ |
| वजा - फ्लाय ॲश दायित्वात स्थानांतरण | (२८.३४) | (३५.८५) |
| एकूण | २,६८३.८८ | २,६९२.३३ |

**टिपा क्र. २४ ) इतर उत्पन्न** ( ₹ कोटीत )

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| **मुल्यघट किंमतीनुसार असलेल्या वित्तीय मत्तांवरील व्याज उत्पन्न** | | |
| व्याज उत्पन्न | ०.५९ | ०.३१ |
| | **०.५९** | **०.३१** |
| गाडी, भाड्याचे आकार इत्यादी पासून उत्पन्न | ३.८४ | ६.८९ |
| मत्ता, मालसाठा, भंगार विक्री यांचा नफा | १५.४५ | २१.७८ |
| निविदा पत्रिका विक्री | १.७५ | ०.१४ |
| किरकोळ पत शिल्लक - पुनर्लिखित केलेल्या | ५.२३ | १६.३३ |
| इतर प्राप्ती | २२.६७ | ३४.६१ |
| | **४८.९५** | **७९.७५** |
| इतर उत्पन्न | ४९.५३ | ८०.०७ |

**टिपा क्र. २४ अ ) सहयोग व संयुक्त साहस उपक्रमामधील नफ्याचा वाटा** ( ₹ कोटीत )

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| सहयोगी आणि संयुक्त साहस उपक्रमामधील नफ्याचा वाटा | (०.०५) | (०.०४) |
| एकूण | ( ०.०५ ) | ( ०.०४ ) |

**टिपा क्र. २५ ) वापरलेल्या मालाचा खर्च** (₹ कोटीत)

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| कोळसा | १२१३२.४४ | १२९८१.०४ |
| कोळशाची आयपीपी खरेदी | १६५.१५ | ७७.२३ |
| विजेची आयपीपी खरेदी | ४२७.७७ | १७१.६२ |
| वायू | ३०२.७८ | ६१३.९४ |
| तेल | २०२.६५ | ४२५.७० |
| पाणी | २६२.१७ | १२८.७४ |
| एकूण | १३४९२.९८ | १४३९८.२७ |

**टिपा क्र. २६ ) कर्मचारी लाभाचे खर्च** (₹ कोटीत)

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| वेतन, रोजगार, बोनस इ. | १,०८०.३२ | १,१८७.७१ |
| भविष्य निर्वाह निधीचे अंशदान | ११३.३१ | १०६.५७ |
| उपदान, रजा रोखीकरण व इतर कर्मचारी लाभ | १५७.५५ | ४७५.९३ |
| कर्मचारी कल्याण निधी | ७८.२४ | ५८.७६ |
| एकूण | १,४२९.४२ | १,८२८.९७ |

**टिपा क्र. २६ अ ) इतर सर्वकष उत्पन्नांतर्गत कर्मचारी लाभ खर्च** (₹ कोटीत)

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| व्याख्यांकित लाभ योजनेचे पुनर्मापन | (०.७५) | १६४.३२ |
| एकूण | ( ०.७५ ) | १६४.३२ |

**टिपा क्र. २७ ) वित्त खर्च** (₹ कोटीत)

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| व्याज | ३,७६५.०१ | ३,६०३.३९ |
| विनिमय फरकाचे कर्ज खर्चात समायोजन | १२.९१ | ४७.७१ |
| इतर कर्ज खर्च | ७.९५ | ३.०९ |
| वजा – व्याजाचे भांडवलीकरण | (१४८.८२) | (७५.४०) |
| एकूण | ३,६३७.०४ | ३,५७८.७९ |

**टिपा क्र. २८ ) इतर खर्च** **( ₹ कोटीत )**

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| भाडे | २.११ | ०.०६ |
| जल विद्युत केंद्राची भाडी | ४६२.५५ | ८८.६६ |
| **खालील बाबीची दुरूस्ती व देखभाल** | | |
| कारखाने, यंत्रे व इमारती | ९९८.३१ | १,२२८.५३ |
| दुरूस्ती व देखभाल -इतर | ०.५८ | ०.७२ |
| विमा आकार | २६.०१ | २२.४१ |
| दर आणि कर | २२.४० | २४.६३ |
| **इतर** | - | - |
| वंगणे, वापरलेले साहित्य व मालसाठा | २.७० | ११.५१ |
| निकामी मालसाठा | १९.७९ | ८६.२९ |
| अंतर्गत पाणी आकार | ०.०२ | ०.०४ |
| कायदेशीर व व्यावसायिक आकार | १६.७० | १५.२८ |
| दलालांची दलाली | - | ५.०५ |
| इतर बँक आकार | ०.७० | १.९६ |
| कंपनी मालकी नसलेल्या मत्तासाठी अंशदान /सी एस आर खर्च | ३०.६७ | ३.४७ |
| संशयास्पद अग्रिमांसाठी तरतूद | ७४.२० | १३४.७१ |
| इतर सामान्य खर्च | २४४.१५ | २८५.३९ |
| निकामी स्थिर मत्तांमुळे हानी | ४.५२ | १०.०५ |
| परकीय चलन विनिमयातील फरकामुळे तोटा (निव्वळ) | - | १०.८३ |
| **लेखा परिक्षकांना खालील कामासाठी पैसे देणे** | | |
| लेखा परिक्षण शुल्क | ०.८३ | ०.४४ |
| - इतर सेवा | - | ०.०२ |
| - खर्चाची प्रतिपूर्ती | ०.०३ | ०.०२ |
| - कराची प्रतिपूर्ती | ०.१५ | ०.०८ |
| **एकूण** | **१,९०६.४४** | **१,९३०.१७** |

**टिपा क्र. २८ अ ) वित्त खर्च** **( ₹ कोटीत )**

| तपशील | २०२०-२०२१ | २०१९-२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| इतर सर्वकष उत्पन्न व्यतिरिक्त स्थगित कर प्राप्ती (खर्च) | १९५.७९ | १७.०७ |
| इतर सर्वकष उत्पन्न यावरील स्थगित कर प्राप्ती (खर्च) | ०.१९ | (४१.३६) |
| **एकूण** | **१९५.९८** | **( २४.२८ )** |

**टिपा क्र. २९ ) वित्तीय विवरण पत्रावर टिपा**

महानिर्मिती कंपनी भारतातील खालील व्याख्यांकित कर्मचारी लाभाच्या योजनांमध्ये अंशदान करीत असते.

**व्याख्यांकित लाभ योजना**

**( १ ) भविष्य निर्वाह निधी**

भविष्य निर्वाह निधीमध्ये कंपनीचे योगदान पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार, सर्व ग्रुप कंपन्यासाठी स्थगित केलेल्या एक वेगळ्या विश्वस्त निधीत जमा होते. ते अंशदान कंपनीच्या नफा व तोटा पत्रकात आकारले जाते. यामध्ये जर शासनाने विनिर्देशित केलेल्या किमान परतावा दराच्या आधारे तूट झाल्यास त्याचा भरणा कंपनी करील आणि तो नफा-तोटा पत्रकात आकारला जाईल.

कंपनी या योजनांचे देय अंशदान योजनांच्या नियमात निर्दिष्ट दराने करते.

**( २ ) उपदान व रजारोखीकरण**

दिर्घ मुदतीचे व्याख्यांकित कर्मचारी लाभ रोखीकरण, उपदान यांची निश्चिती स्वतंत्र विमागणितीतज्ञ यांनी वर्षानिहाय केलेल्या विमागणिती मुल्यांकनानुसार केली जाते. त्यासाठी प्रोजेक्टेड युनीट क्रेडीट मेथड वापरली जाते. रजा रोखीकरण व उपदान या प्रकरणी निश्चित केलेल्या दायित्वाचा निधी नसतो.

**उपदान**

**अ ) निव्वळ व्याख्यांकित लाभ ( मत्ता ) दायित्वामधील स्थानांतरण**

निव्वळ व्याख्यांकित लाभ (मत्ता), दायित्व आणि त्यांचे भाग यातील सुरवातीच्या आणि शेवटच्या शिल्लकांचे मेळ पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | व्याख्यांकित लाभ बंधन | |
|---|---|---|
| | ३१ मार्च २०२१ | ३१ मार्च २०२० |
| आरंभीची शिल्लक | ६६१.०८ | ५३६.७० |
| नफा किंवा तोटा यात समाविष्ट व्याज खर्च | ४५.४२ | ४१.६५ |
| चालू सेवा खर्च | ३२.२२ | २४.४५ |
| मागील सेवा खर्च | - | - |
| व्याज खर्च (उत्पन्न) | | |
| | ७३८.७२ | ६०२.८० |
| इतर सर्वकष उत्पन्नात समाविष्ट | | |
| पूर्नमोजणी केलेले तोटा (प्राप्ती) | | |
| विमा गणिती तोटा (प्राप्ती) खालील बाबींपासून | | |
| लोकसंख्या गृहिते | | |
| वित्तीय गृहिते | १.९७ | ३३.३८ |
| अनुभव समायोजन | (२.७२) | १३०.९४ |
| नियोजन मत्तांचा परतावा (व्याज उत्पन्न वगळून) | | |
| व्याज उत्पन्न | | |
| | **( ०.७५ )** | **१६४.३२** |

| | | |
|---|---|---|
| **इतर** | | |
| मालकाने भरलेले अंशदान | | |
| दिलेले लाभ | (११०.१४) | (१०६.०३) |
| अखेरची शिल्लक | ६२७.८२ | ६६१.०८ |
| **प्रतिनिधित्व केलेले** | | |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ - मत्ता | | |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ - दायित्व | ६२७.८२ | ६६१.०८ |
| **एकूण** | **६२७.८२** | **६६१.०८** |

**ब ) व्याख्यांकित लाभ बंधने**

**१. विमागणिती गृहिते**

भविष्यातील मृत्यूदरासंबंधीची गृहिते प्रसिद्ध झालेली आकडेवारी आणि मृत्यू विषयक तत्वे यावर आधारीत आहेत. सध्याची दिर्घायुष्यता यामध्ये व्याख्यांकित लाभ बंधने यांचे अहवाल तारखेचे मुल्य खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | ३१ मार्च २०२१ | ३१ मार्च २०२० |
|---|---|---|
| सवलत दर | ६.८२ टक्के | ६.८७ टक्के |
| वेतन वृद्धी दर | ५.०० टक्के | ५.०० टक्के |
| नोकरी दरम्यान मृत्यू दर | भारतीय आधारित जीवन मृत्यू प्रमाण (२००६-०८) | भारतीय आधारित जीवन मृत्यू प्रमाण (२००६-०८) |

**२. सूक्ष्मभेद गृहिता विश्लेषण**

संबंधित विमा गणिती गृहितांमध्ये अहवाल तारखेला होऊ शकणाऱ्या बदलांचा व्याख्यांकित लाभ बंधनांच्या रकमांवर जे योग्य परिणाम झाले असते ते खाली दर्शविले आहेत. या तारखेला इतर गृहिते स्थिर आहेत असे धरले आहे

(₹ कोटीत)

| तपशील | ३१ मार्च २०२१ | | ३१ मार्च २०२० | |
|---|---|---|---|---|
| | वाढ | घट | वाढ | घट |
| सवलत दर (१ टक्के स्थलांतर) | (१९.१४) | २०.५२ | (१८.७५) | २०.०८ |
| भविष्यातील वेतनवाढ (१ टक्के स्थलांतर) | २०.७८ | (१९.५४) | २०.३५ | (१९.१६) |
| कर्मचारी उलाढाल (१ टक्के स्थलांतर) | २.८७ | (३.०४) | २.८२ | (२.९९) |

जरी हे विश्लेषण या योजनेतील अपेक्षित रोख प्रवाहाचे पूर्ण वाटप विचारात घेत नसले तरी ते दर्शविलेल्या गृहितांची संवेदनशीलता अंदाजित स्वरूपात निश्चितपणे पुरविते.

**३. व्याख्यांकित लाभ बंधनातील परिपक्कवतेच्या संख्येचे विश्लेषण**

अहवाल तारखेनंतरच्या भविष्यातील वर्षात देय होऊ शकतील असे व्याख्यांकित लाभ

(₹ कोटीत)

| तपशील | ३१ मार्च २०२१ | ३१ मार्च २०२० |
|---|---|---|
| नंतरच्या १ ल्या वर्षात | १०९.६१ | १३२.७२ |
| नंतरच्या २ ऱ्या वर्षात | ५८.६४ | ५७.९१ |
| नंतरच्या ३ ऱ्या वर्षात | ७०.६० | ८०.६२ |
| नंतरच्या ४ थ्या वर्षात | ६१.१६ | ६७.९० |
| नंतरच्या ५ व्या वर्षात | ५५.१२ | ५८.६५ |
| ६ ते १० वर्षांची बेरीज | २१९.५८ | २२४.५१ |
| ११ व त्यावरील वर्षाची बेरीज | ५३३.१५ | ५११.८२ |

**रजा रोखीकरण**

**अ ) निव्वळ व्याख्यांकित लाभ ( मत्ता ) दायित्व यातील स्थलांतर**

निव्वळ व्याख्यांकित लाभ (मत्ता) दायित्व आणि त्यांचे घटक यांचे आरंभीच्या शिल्लकीपासून अखेरच्या शिलकीचा मेळ खालील तक्त्यात दिला आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | व्याख्यांकित लाभ बंधन | |
|---|---|---|
| | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० |
| आरंभीची शिल्लक | ६८१.९९ | ५२६.४१ |
| नफा किंवा तोटा यात समाविष्ट (व्याज खर्च) | ४६.८५ | ४०.८५ |
| चालू सेवा खर्च | १५.६६ | १२.५४ |
| मागील सेवा खर्च | | |
| व्याज खर्च (उत्पन्न) | | |
| | **७४४.५०** | **५७९.७९** |
| **पूनर्मोजणी केलेले तोटा ( प्राप्ती )** | | |
| खालील बाबींपासून विमा गणिती तोटा (प्राप्ती): | | |
| लोकसंख्या गृहिते | | |
| वित्तीय गृहिते | २.४२ | ३७.८० |
| अनुभव समायोजन | १६.१९ | १५३.११ |
| नियोजन मत्ताचा परतावा (व्याज उत्पन्न वगळून) | | |
| व्याज उत्पन्न | | |
| | **१८.६१** | **१९०.९१** |
| **इतर** | | |
| मालकाने भरलेले अंशदान | | |
| दिलेले लाभ | (८०.१८) | (८८.७१) |
| **अखेरची शिल्लक** | **६८२.९३** | **६८१.९९** |

| | | |
|---|---|---|
| **प्रतिनिधित्व केलेले** | | |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ - मत्ता | | |
| निव्वळ व्याख्यांकित लाभ - दायित्व | ६८२.९३ | ६८१.९९ |
| **एकूण** | **६८२.९३** | **६८१.९९** |

**ब) व्याख्यांकित लाभ बंधने**

**१. विमागणिती गृहिते**

अहवालाच्या तारखेला खालील प्रधान गृहिते होती. (वेटेड ॲव्हरेज म्हणून दर्शविली आहेत).

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०१९ |
|---|---|---|
| सवलत दर | ६.८२ टक्के | ६.८७ टक्के |
| वेतन वृद्धी दर | ५.०० टक्के | ५.०० टक्के |
| नोकरी दरम्यान मृत्यू दर | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण (२००६-०८) | भारतीय सरासरी जीवन मृत्यू प्रमाण (२००६-०८) |

२) कंपनीच्या भविष्य निर्वाह निधीचे संचालन "महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्था" (विश्वस्त) यांचे मार्फत केले जाते. पात्र कर्मचाऱ्यांना या भविष्य निर्वाह निधीतून लाभ मिळतात. या योजनेचे संरक्षण प्राप्त कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनाच्या विनिर्देशित केलेल्या टक्केवारीच्या समान एवढे अंशदान दरमहा कर्मचारी आणि कंपनी या दोघांतर्फे या भविष्य निर्वाह निधीमध्ये केले जाते. या विश्वस्तांकडून लाभधारकांना दरवर्षी शासनाकडून अधिसूचित केलेल्या दराने किमान व्याज देय असते. ट्रस्टच्या गुंतवणूकींचा परवाना आणि अधिसूचित व्याज दर यामध्ये काही तूट झाली तर ती भरून काढण्याचे कंपनीवर बंधन असते. (यावर्षी गुंतवणूकीचे बाजारमूल्य हे ट्रस्टच्या अंशदान दायित्वापेक्षा कमी असल्याने त्यासंबंधी नफा व तोटा पत्रकात या कारणास्तव मान्य केलेले दायित्व ₹ निरंक आहे. (मागील वर्षी दायित्व ₹ १.२१ कोटी होते.))

**नियोजन मत्तांचे वर्णन** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०१९ |
|---|---|---|
| श्रेणी - १ (अ) भारत सरकार | ७.११ टक्के | ८.१९ टक्के |
| श्रेणी - १ (अ) एस डी एल | ३१.०३ टक्के | २८.९८ टक्के |
| श्रेणी - १ (ब) | ६.४७ टक्के | ६.९९ टक्के |
| श्रेणी - २ (अ) | २९.९७ टक्के | २७.६४ टक्के |
| श्रेणी - २ (ब) | १.९८ टक्के | २.१२ टक्के |
| श्रेणी - ४ (क) | २.४९ टक्के | २.३७ टक्के |
| विशेष ठेव योजना | २०.९५ टक्के | २३.७० टक्के |

**टिपा क्र. ३० भांडवल / शासकिय अनुदान** (₹ कोटीत)

| | |
|---|---|
| **३१.०३.२०१९ रोजी** | **६.४९** |
| वित्तीय वर्ष २०१९-२० दरम्यान प्राप्त | ०.२२ |
| वजा: मत्ता व खर्चात समायोजित अनुदान | ०.५० |
| वजा: वित्तीय वर्ष २०१९-२०२० मध्ये शासकिय अनुदानाची मूल्यघट | |
| **३१.०३.२०२० रोजी** | **६.२१** |
| वित्तीय वर्ष २०२०-२१ दरम्यान प्राप्त | ३३.४६ |
| वजा: मत्ता व खर्चात समायोजित अनुदान | ९.६७ |
| वजा: वित्तीय वर्ष २०२०-२०२१ मध्ये शासकिय अनुदानाची मूल्यघट | |
| **३१.०३.२०२१ रोजी** | **३०.००** |

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| चालू | ३०.०० | ६.२१ |
| चालू नसलेले | - | - |
| **एकूण** | **३०.००** | **६.२१** |

**टिपा क्र. ३१ ) विकसित होणाऱ्या अमूर्त मत्ता** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | १३३.९३ | १३३.७६ |
| वर्षातील भर | १०५.७५ | ०.१७ |
| खर्चाचे स्वरूपाचे स्पष्टिकरण | - | - |
| कमी केलेली उलट फिरविणे (आकारणे) | - | - |
| परकिय चलनातील फरक | | |
| **अखेरची शिल्लक** | **२३९.६८** | **१३३.९३** |

कंपनीने गारे पालमा, छत्तीसगढ येथील कोळसा खाण विकसित करण्याचे हक्क मिळविले आहेत आणि या हेतूसाठी खाण विकासक नियुक्त करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**टिपा क्र. ३२ ) संबंधित संस्थामधील गुंतवणूकी** (₹ कोटीत)

| व्यवहाराचा तपशील | औरंगाबाद |
|---|---|
| **३१.०३.२०१९ रोजी** | |
| समकक्ष समभाग गुंतवणूकी | ४.८५ |
| वर्षभरातील समकक्ष गुंतवणूकी | - |
| **३१.०३.२०२० रोजी** | |
| समकक्ष समभाग गुंतवणूकी | ४.८५ |

| | |
|---|---|
| वर्ष भरातील समकक्ष सहभाग गुंतवणूक | ०.०० |
| **३१.०३.२०२१ रोजी** | |
| समकक्ष समभाग गुंतवणूक | ४.८५ |

**टिपा क्र. ३३ ) प्रतिभूतीसाठी गहाण ठेवलेल्या मत्ता**

चालू किंवा चालू नसलेल्या कर्जासाठीच्या प्रतिभूती म्हणून/गहाण ठेवलेल्या मत्तांची रक्कम खालीलप्रमाणे आहेत (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| **चालू नसलेल्या कर्जासाठी निर्माण केलेल्या प्रतिभूती** | | |
| मत्ता, कारखाना व साधन - भाडेपट्टीच्या जमिनी वगळून | ३३,०२०.२४ | ३५,१९२.८७ |
| **चालू कर्जासाठी निर्माण केलेल्या प्रतिभूती** | | |
| १) वस्तूमाल सूची | ९३०.०९ | १,७६३.०३ |
| २) व्यापारी येणी | २४,५१८.१८ | १७,८०३.६८ |
| **प्रतिभूती म्हणून ठेवलेल्या एकूण मत्ता** | **२५,४४८.२६** | **१९,५६६.७१** |

**टिपा क्र.: ३४**

चालू वित्तीय वर्ष २०२०-२१ दरम्यान, सौर विक्रीसाठी केंद्र सरकारकडून मिळालेल्या महसुली अर्थ सहाय्याची रक्कम ₹ निरंक कोटी (२०१९-२०: ₹ ०.९२ कोटी) यांचे लेखे केले आहेत.

**टिपा क्र.: ३५**

आंतर कंपनी व्यवहारांचा मेळ सतत चालू तत्वानुसार केला जातो. मात्र वर्षा अखेरच्या शिलकी या ज्यांचे मोठे परिणाम होणार नाहीत अशा प्रकारे कायम मेळ करणे यांच्या अधीन आहेत.

**टिपा क्र. ३६ संबंधित संस्था / पक्षाबाबतची प्रकटने**

**अ ) संबंधित संस्था/पक्षाची नावे आणि नातेसंबंध**

**१. सहयोगी संस्था**

- मे. युसीएम कंपनी लिमिटेड
- मे. छत्तीसगड कटघोरा डोंगरगढ रेल्वे लिमिटेड

**२. सहोदर उपकंपन्या**

- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड
- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड

**ब ) कंपनीचे भारतीय लेखामानक २४ ला अनुसरून खालील शासन संबंधित संस्था या शासनाशी संबंधित असल्याने, त्यांचा विषयीचे प्रकटन समविष्ट केलेले नाही.**

१. **सहयोगी संस्था**

- मे. युसीएम कोल कंपनी लिमिटेड
- मे. छत्तीसगढ कटघोरा डोंगरगढ रेल्वे लिमिटेड

**२. सहोदर उपकंपन्या**

- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड
- मे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड

### ३. व्यवस्थापनातील महत्वाची व्यक्ती

| अनु. क्र | पद | व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्तीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | श्रीमती शैला ए. | ०१.०४.२०२० ते १०.०८.२०२० |
| २ | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | श्री संजय खंदारे | ११.०८.२०२० ते ३१.०३.२०२१ |
| ३ | संचालक (खानकार्य) | श्री. पी. व्ही. जाधव | ०१.०८.२०१९ पासून |
| ४ | संचालक (संचलन) | श्री. चंद्रकांत थोटवे | १९.०९.२०१९ पासून ३१.०८.२०२० आणि १६.०३.२०२१ पासून |
| ५ | संचालक (वित्त) | श्री. एस. जे. आंबेरकर | ११.०८.२०१७ ते १०.०८.२०२० |
| ६ | संचालक (वित्त) | श्रा. बाळासाहेब थिटे | ११.०८.२०२० पासून |
| ७ | संचालक (प्रकल्प) | श्री. व्ही थंगपांडियन | १०.०४.२०१९ पासून |
| ८ | कंपनी सचिव | श्री राहुल दुबे | १७-०१-२००६ पासून |

### ४. अ ) कार्यकारी संचालक

| अनु. क्र | पदनाम | व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावरील व्यक्तीचे नाव | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | संचालक | श्रीमती स्वाती व्यवहारे | २२.०१.२०२१ |

### क ) व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्तींना दिलेले पारिश्रमिक (₹ कोटीत)

| अनु. क्र | संबंधित व्यक्तीचे नाव | नाते संबंधाचे स्वरूप | २०२०-२१ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बिपीन श्रीमाळी | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | - | ०.१६ |
| २ | श्रीमती शैला ए. | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | ०.१८ | ०.०७ |
| ३ | श्री. संजय जे. खंदारे | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक | ०.३१ | - |
| ४ | श्री. चंद्रकांत थोटवे | संचालक (संचलन) | १.५३ | ०.५१ |
| ५ | श्री. वैथिलिंगणधार थंगपांडियन | संचालक (प्रकल्प) | ०.५० | ०.३४ |
| ६ | श्री. विकास जयदेव | संचालक (प्रकल्प) | - | ०.१९ |
| ७ | श्री. पी.व्ही.जाधव | संचालक (खनिकर्म) | ०.३४ | ०.२० |
| ८ | श्री. संतोष आंबेरकर | संचालक (वित्त) | ०.३७ | ०.५० |
| ९ | श्री. बाळासाहेब बी. थिटे | संचालक (वित्त) | ०.२१ | - |

**व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावरील व्यक्तींना दिलेले पारिश्रमिक** (₹ कोटीत)

| अनु. क्र | संबंधित व्यक्तीचे नाव | नाते संबंधाचे स्वरूप | २०२०-२१ | २०१९-२० |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विनोद बोंद्रे | कार्यकारी संचालक (मा.सं.) | - | ०.१२ |
| २ | श्री. बी.वाय. मंता | कार्यकारी संचालक (मा.सं.) | ०.४३ | ०.१८ |
| ३ | श्री. राजू बुरडे | कार्यकारी संचालक | - | ०.१६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री. कैलास चिरुटकर | कार्यकारी संचालक | ०.४७ | ०.३३ |
| ५ | श्री. नितीन चांदूरकर | कार्यकारी संचालक | ०.४४ | ०.३२ |
| ६ | श्री. संजय मारुडकर | कार्यकारी संचालक | ०.४६ | ०.२५ |
| ७ | श्री. अभय ए. हरणे | कार्यकारी संचालक | ०.४४ | |
| ८ | श्री. राहुल दुबे | कंपनी सचिव | ०.४१ | ०.२९ |

**ड) अकार्यकारी संचालकाना बैठक उपस्थिती शुल्क** (₹ कोटीत)

| बैठकांचा तपशील | श्रीमती स्वाती व्यवहारे |
|---|---|
| मंडळ बैठका | ०.०००५ |
| लेखापरिक्षण समिती | - |
| एकूण उपस्थितीचे शुल्क प्राप्ति | ०.०००५ |

**टिपा क्र. ३७**

**भारतीय लेखा मानक २७-स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रके यांच्या अनुपालनासाठी यातील आवश्यक माहिती तक्त्यात दिलेली आहे.** (₹ कोटीत)

| अनु. क्र | तपशील | कंपनीचा देश | गुंतवणूकीचे स्वरूप | मालकीची हिताची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
| १ | में. महागूज कोलायरीज लिमिटेड | भारत | उपकंपनी | ६०.०० % | ६०.०० % |
| २ | में. धोपावे कोस्टल पॉवर लिमिटेड | भारत | उपकंपनी | १००.०० % | १००.०० % |
| ३ | में. महाजेनको ॲश मॅनेजमेंट सर्विस लिमिटेड | भारत | उपकंपनी | १००.०० % | १००.०० % |
| ४ | में. यू सी एम कोल कंपनी लिमिटेड | भारत | सहयोगी कंपनी | १८.७५ % | १८.७५ % |
| ५ | में. छत्तीसगढ कटघोरा डोंगरगढ रेल्वे लिमिटेड | भारत | सहयोगी कंपनी | २६.०० % | २६.०० % |

**टिपा क्र. ३८**

महानिर्मितीच्या सहोदर कंपन्यासोबत वित्तीय वर्षाअखेरच्या व्यापारी येण्या व्यतिरीक्त अन्य थकीत शिल्लकी. (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
|---|---|---|
| महावितरणला देय | ५४५.२१ | ५४४.२२ |
| महापारेषण कडून येणे | १५.३४ | २.२८ |

**टिपा क्र. ३९**

**संबंधित संस्थांकडून व्यापारी येणी** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
|---|---|---|
| महावितरण | २४,५३२.३३ | १७,८२०.४९ |
| महापारेषण | १४३.५२ | १२८.८३ |

**टिपा क्र. ४० कंपनीची सामाजिक जबाबदारी**

वर्षभरात कंपनीनेयांची सामाजिक जबाबदारी यासाठी ₹ ३०.६७ कोटी खर्च केले. (मागील वर्षी ३.४७ कोटी) (₹ कोटीत)

| अनु. क्र | खर्चाचे लेखाशीर्षक | २०२०-२१ | २०१९-२० |
|---|---|---|---|
| १ | कोविड-१९ सहायता निधीसाठी योगदान | ०.०१ | - |
| २ | सामुदायिक विकास आणि कल्याण खर्च | ०.६९ | ०.५४ |
| ३ | मृत्यू भरपाई आणि विमा वेतन सुरक्षा रक्षकांना विद्यावेतन | २.८४ | २.७८ |
| ४ | रस्ते, कुंपणाच्या भिंती, आरसीसी ड्रेनेज, बांधकाम भिंती व दुरुस्ती | ०.२५ | - |
| ५ | कोराडी तलाव क्र. ३ चे सौंदर्यीकरण आणि मृद संशोधन, निष्कासन, बांधकाम, विकासाठी तपशिलवार अभ्यास | २६.८८ | - |
| ६ | रायगड, छतीसगढ येथील चक्रधर समारंभ २०१८ साठी देणगी | - | ०.०१ |
| ७ | शिक्षकांना मानधन (गारे पाल्मा-सी एस आर) | - | ०.१५ |
| | एकूण | ३०.६७ | ३.४७ |

**टिपा क्र. ४१**

**आकस्मिक दायित्वे आणि बांधिलकी (एकत्रित)** (₹ कोटीत)

| अ. क्र. | आकस्मिक दायित्वे | ३१.०३.२१ रोजी | ३१.०३.२० रोजी |
|---|---|---|---|
| १ | महानिर्मिती कंपनीला पुढील आकस्मिक दायित्वे संभवनीय आहेत. एस इ सी एल, डब्ल्यु सी एल-सिंगरेनी आणि आणि एम सी एल यांचे व्याजाची दावे ₹१३०९.८९ कोटी (मा. वर्षी एस ई सी एल, डब्ल्यू सी एल आणि एम सी एलचे ₹९६५.२६ कोटी) अधिक कार्यक्षमता प्रोत्साहन ₹८३७.६० कोटी (मा. वर्षी ₹७०४.२२ कोटी) आणि कमी उचल केल्याचे ₹९८३.३४ कोटी (मा. वर्षी ९८३.३४ कोटी) अधिक डब्ल्यू सी एल चा दंडाचा दावा ₹२९.६२ कोटी, विनिर्देशित खाणीसाठी डब्ल्यू सी एल चे ₹ निरंक (मा. वर्षी डब्ल्यू सी एल च्या दंडाचा ₹२९.६२ कोटी आणि डब्ल्यू एस सी एलच्या विनिर्देशित खाणीसाठी ₹३६२.७२ कोटी) एकूण आकस्मिक दायित्वे रुपये ३१६०.४५ कोटी (मा. वर्षा ३०४५.१६ कोटी) | ३,१६०.४५ | ३,०४५.१६ |
| २ | परळी युनीट-८ प्रकल्पाच्या उर्वरित कारखान्याची स्थापत्य पुरवठा, उभारणी आणि कार्यान्वयन याची विविध कामाच्या कंत्राटासंबंधी मेसर्स सुनील हायटेक इंजिनियर्स लिमिटेड, नागपुर आणि महानिर्मिती यांच्यात बरेच वाद असून ते लवादाकडे आहे. याची रक्कम ₹९५३.८६ कोटी आहे (मा. वर्षा ९५३.८६ कोटी | ९५३.८६ | ९५३.८६ |
| ३ | जलसंचन विभागाचे, जादा पाणी आकार व आस्थापना आकार यासाठी दायित्व ₹ २,८३,५६,४०,८३२ (मा. वर्षी ₹२,७७,६४,६६,७९९/-) जादापाणी आकार ₹ ९९,११,४०,८३२/- (+अधिक) आस्थापना आकार ₹ १,८४,४५,००,०००/- | २८३.५६ | २७७.६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | महालक्ष्मी इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड, कोल्हापुर यांचे आकस्मिक दायित्व ₹२९३.०१ कोटी अधिक व्याजाचे ४५ कोटी एकूण ₹३३८.०१ कोटी (मा. वर्षी ₹२४८.३१ कोटी अधिक व्याजाचे ₹४५ कोटी असे एकूण ₹२९३.०१ कोटी) असे आहे. यांचा संबंध आरसीसी (लोअर) मून बॅरेजचे बांधकाम आणि संलग्न कामे म्हणजेच रेडीयल गेट स्टॉप लॉग गेट, गोलीएथ क्रेन आणि रोप ड्रमचे आरोहण ई. चे उत्पादन, पुरवठा, उभारणी, परिक्षण आणि कार्यान्वयन करणे याच्याशी आहे या कंपनीने लवादातील सदस्यांना निविदाच्या अटीनुसार निर्णय करता यावा यासाठी लवादाने या कंपनीत रकमेचा आधारानुसार मागण्या करण्यास सांगितले. लवादाचे एकमेव सदस्य श्री एस.पी. कुरडूकर यांनी ₹५६ कोटी देण्याचा निर्णय २०-११-२०१४ रोजी जाहीर केला.<br><br>याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. (संदर्भ - ओएसएआरबीपी/४६६/२१५).<br><br>वादातील संस्थेने विनंती अर्ज (क्र. ५२६०/२०१५) दाखल केले. महानिर्मितीने नवीन वकील श्री. एस.आर. नारगोळकर यांची नियुक्ति केली. मुंबई उच्च न्यायालयने पुढील कामकाजासाठी एकमेव लवाद म्हणून श्री. ठक्कर यांना नियुक्त केले (उच्च न्यायालय आदेश दिनांक १६.१०.२०२०) महानिर्मिती कंपनीने ₹ ५७ कोटी आणि बँक हमीचे ₹४८,४९,२८,६२८/- जमा केले. | २३२.५१ | २९३.०१ |
| ५ | महानिर्मिती आणि मे. टाटा प्रकल्प लि. यांच्यातील वाद लवादाकडे आहे. तो भुसावळ २×५०० मे. वॅ. प्रकल्पासंबंधी आहे. मे. टाटा यांनी दीर्घ कालाचा खर्च, बँक हमी आकार, कार्यक्षमता, हमीच्या परिक्षणानुसार पैसे देणे आणि बँक गॅरेंटीची, जादा रक्कम आकारणी तसेच महानिर्मितीने केलेली वसूली चुकीची असल्याबद्दल आहेत. तसेच जादा काम व कंत्राटाच्या कामगिरीसाठी बँक गॅरंटी परत करण्याची मागणी केली आहे.<br><br>एकूण परत करावयाची बँक हमी - ₹ १८९,००,००,०००/-<br><br>एकूण दाव्याची रक्कम - ₹ ११८,१२,०८,९७६/-<br><br>एकूण मागणी केलेले व्याज - ₹ ७९,३३,५४,१८५/-<br><br>(११८,१२,०८,९७६ + ७९,३३,५४,१८५ + = १९७,४५,६३,१६१) | १९७.४६ | १९७.४६ |
| ६ | न्या. श्री.व्ही.जी.पळशीकर यांचेकडे लवाद क्र. ए.बी.एन/सी/क्र/६३/२०१४ एकमेव लवाद न्यायाधीश, ॲड. राठोड एशियन नॅचरल रिसोर्सेस लि. (पूर्वीची मेसर्स भाटीया इंटरनॅशनल लि. इंदूर) विरूद्ध महानिर्मिती,<br><br>मुख्य प्रलंबित विषय रेल्वे मालवाहतूक आकारातील बदल आणि १६ रेफ्री सँपल्स आणि विविध कारणांचे आयात कोळसा वर्ष २०१०-११ संबंधीत दावे आहेत. मे. एशियन नॅचरल रिसोर्सेस लिमिटेडने नाशिक, भुसावळ, खापरखेडा आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राना सन २०१०-११ मध्ये परदेशातून पूरवलेल्या अखाद्य (वाष्प) कोळशाच्या पूरवठा करारासाठी प्रलंबित विवाद आणि विविध खात्यांच्या विलंबित देयका संदर्भात लवादाचे कलम लागू केले आहे.<br><br>एकमेव लवादाधिकारी न्या. व्ही. जी. पळशीकर (सेवानिवृत्त) यांची दोन्ही बाजूच्या संमतीने १७.०४.२०१४ रोजी नियुक्ती झाली. दावे व प्रतिदावे दाखल करण्यात आले. सुनावणीची प्रक्रीया चालू आहे. दाव्याची रक्कम ₹१२७.४५ कोटी (मा. वर्षी ₹१२७.४५ कोटी) | १२७.४५ | १२७.४५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | आकस्मिक दायित्वे सूमारे ₹१०३.२१ कोटी (मा.वर्षी ₹१०३.२० कोटी) जलसिचंन विभागाने, रत्नागिरी पॉवर ॲण्ड गॅस कंपनीला, शिराळ पंप हाऊस मधून दिलेल्या पाण्यासाठी. | १०३.२१ | १०३.२० |
| ८ | वॉशरी ऑपरेटर यांनी केलेल्या प्रतिदाव्याचे महानिर्मितीवर आकस्मिक दायित्व ₹ ५९.४४ कोटी (मा.वर्षी. ₹१२९.०२ कोटी) उद्भवू शकते. | ५९.४४ | १२९.०२ |
| ९ | कंपनीच्या विरोधात इतर संकीर्ण दावे - मात्र त्यांना कर्ज अशी मान्यता नाही. | २९५.२० | २५१.९४ |
| १० | कोराडी ३×६०६० मे.वॅ, चंद्रपूर महा औ.वि.केंद्र २×५०० मे.वॅ, आणि परळी १×२५० मे.वॅ. येथे. नवीन प्रकल्पांच्या बांधकामावरील बीओसीडब्ल्यु सेस - १ टक्के दराने (बांधकाम व रचना कामगार कल्याण उपकर अधिनियम) याप्रमाणे कंपनीने काही रकमांचा भरणा न केल्याचे आकस्मिक दावे आहेत. | शोध सुरु आहे | शोध सुरु |
| ११ | मे. अदानी एंटरप्रायजेस लिमिटेडने महागुज कोलायरीज लिमिटेडच्या विरोधात लवाद प्रक्रीया सुरु केली आहे आणि महागुजने अंतिम सुनावणीसाठी प्रलंबित असलेला प्रतिदावा मुंबई उच्च न्यायालयात दाखल केला आहे. | **३९९.४२** | **३९९.४२** |
| I | **एकूण दावे** | **५,८१२.५६** | **५,७७८.१६** |
| | कंपनीच्या मते वादग्रस्त व थकीत कराच्या मागण्या | २१.४८ | १५२.४० |
| | कंपनीने विस्तृत केलेल्या हमी | ९७७.५६ | १,४२५.९२ |
| | **एकूण आकस्मित दायित्वे** | **६,८११.६०** | **७,३५६.४८** |
| II | **भांडवली बांधिलकी** | | |
| अ | भांडवली खात्यात कार्यवाही करावयाची असलेल्या आणि तरतूद नसलेल्या कंत्राटाची अंदाजे किंमत | ७३४.६४ | ८३१.०८ |

**३. महत्वाच्या इतर बांधिलकी**

अ) महानिर्मिती कंपनीने निर्माण केलेल्या वीज विक्रीसाठी महावितरण या कंपनी सोबत करार केला आहे आणि जर हा करार मधेच खंडीत केला नाही किंवा त्यांची मुदत वाढविली नाही तर तो पंचवीस वर्षे अंमलात राहील.

ब) फ्लाय ॲश विक्री/विल्हेवाटीसाठी महानिर्मितीने मेसर्स अल्ट्राटेक सिमेंट लि. यांचे सोबत वित्तीय वर्ष २०२३-२४ पर्यतचा १५ वर्ष दीर्घ मुदतीचा करार केला आहे/आदेश दिला आहे.

क) कंपनीला ५२.५३७ दशलक्ष मेट्रीक टन कोळशासाठी कोल लिंकेज मिळाले आहे. (यामध्ये ब्रीज लिंकेज व सामंजस्य करार समाविष्ट आहे) त्यानुसार - कोळसा कंपन्याकडून प्रचलीत बाजारभावाने कोळसा घेण्यास बांधील आहे.

ड) कंपनीने गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लि. सोबत दि. ०५-०७-२०२६ पर्यंत ३.५ एम एम एस सी एम डी गॅस खरेदी व वाहतूकीचा करार केला आहे.

**४. आकस्मिक मत्ता:**

१. महानिर्मिती कंपनीने वीज खरेदी करारानुसार महावितरण कंपनीला विलंब भरणा अधीभार लावला. या अधिभाराची रक्कम ₹३७२५ कोटी याला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दर बाह्य उत्पन्न मानले आणि महानिर्मितीची वार्षिक महसूलीची आवश्यकता वित्तीय वर्ष २०१०-२०११ ते २०१५-१६ या कालखंडासाठी कमी केली. या विरोधात कंपनीने अपील न्यायाधिकरणाकडे या कार्यपद्धतील बद्दल अपील दाखल केले होते. पण ते फेटाळण्यात आले. आता सदर प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.

नुकतेच अन्य पारेषण परवानाधारकाच्या, यासारख्या प्रकरणात लवादाने निर्णय दिला की, विलंब भरणा आकाराला दर-बाह्य (नॉन टॅरीफ) उत्पन्न मानले जाऊ नये आणि त्यामुळे ते वार्षिक महसूल आवश्यकता मधून वजा करू नये.

या निकालामुळे महानिर्मितीच्या ₹ ३७२५.२९ कोटीची पुनर्स्थापना होण्याची अनुकूलता वाढली आहे. तसा अनुकूल निकाल मिळाला तर महानिर्मितीची मिळकत ₹ ३७२५.२९ कोटी वाढण्याची शक्यता आहे.

२. महनिर्मितीने कोळसा कंपन्या आणि वॉशरीचे संचालक यांचे विरोधात केलेले प्रतिदावे यांना ऋण मानलेले नाही. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | तपशील | ₹ कोटीत |
|---|---|---|
| १ | कोळशातील दगडा संबंधीचे दावे | २९.४१ |
| २ | एस आर एन दावे | १००.८१ |
| ३ | व्याजाचे दावे | १,८४६.०४ |
| ४ | दर्जा कमी होणे | २,६६३.१७ |
| ५ | कोळसा ओला असणे | १५२.५६ |
| ६ | अपूरा माल देणे | २,८४१.४३ |
| | एकूण | ७,६३३.४२ |

३. महानिर्मितीने तीन संपर्क कंत्राटदार, अनुक्रमे मे. नायर, मे. नरेश कुमार आणि मे. करमचंद थापर यांच्या विरोधात ₹ ४०९.९५ कोटीचा भरपाईचा अर्ज एन सी एल ए टी नवी दिल्ली यांचेकडे दाखल केले आहे. श्री. के.के.शर्मा. केस नं एटी ०२/२०१८.

४. महानिर्मितीने एशियन नॅचरल रिसोर्सेस लि. (पूर्वीच्या भाटीया इंटरनॅशनल लि. इंदौर) यांच्या विरोधात प्रतिदावे दाखल केले आहेत. त्याला कर्ज मानलेले नाही.

| तपशील | ₹ कोटीत |
|---|---|
| कमी पुरवठ्यामुळे ए एफ सी नामंजूरी | ४७.२६ |
| उष्णता दरात वाढ झाल्याने तोटा | २३.०३ |
| साह्यकारी वीज वापर करावा लागल्याने तोटा | २८.५५ |
| माल पाठविण्यातील विलंबासाठी आकार | ३.०६५ |
| एकूण | १०१.९१ |

५. महानिर्मितीने मे. सुनील हायटेक इंजिनिअर्स लिमिटेड नागपूर विरोधात विविध कंत्राटांच्या वादांच्या संबंधात प्रतिदावे दाखल केले. हे दावे परळी युनीट ८ प्रकल्पाचे स्थापत्य पुरवठा, उभारणी, परिक्षण आणि कार्यान्वयन यासंबंधीचे तसेच प्लांट पॅकेजमधील शिल्लक कामाचे आहेत त्यांचा तपशील असा:

| तपशील | ₹ कोटीत |
|---|---|
| एस एच इ एल ची देय वसूली | २२४.२९ |
| प्रतिवादाने केलेली हानी / तोटा | ८१२.४० |
| आरक्षित रकमेची कॅरिंग कॉस्ट (वहन किंमत) | ७०.५६ |
| प्रतिवादीने केलेला जादा तोटा/हानी | ४२३.८० |
| एकूण | १,५३१.०५ |

६. दक्षिण पूर्व रेल्वे कडून जादा माल भाडयाचे ₹ ४.०७ कोटी मिळण्या जोगे आहेत. (सरडेगा सायडीगच्या दाव्याची रक्कम (एमएसएफजे कॉलरी) एमसीएल.

७ जादा माल भाडयाचे दावे (रिकाम्या वॅगन्स, जादा टीओआरओ, कमी सवलत, जादा डीपीसी डब्ल्यूएल, एफआरटी रेट डीआयएफएफ/ सीएएलसी डीआयएफएफ, जादा ऑईल, जादा एफएयूसी, जादा पीसीएलए, जादा ईएनएचसी). रक्कम ३.१५ कोटी.

**टिपा क्र. ४१ अ : मुल्यघट ( एकत्रित )**

प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला, व्यवस्थापनाने मालमत्ता, कारखाने आणि साधने आणि सर्व आर्थिक मालमत्ता यांचे मूल्यांकन केले आणि मूल्यांकनात घट होऊ शकतात की नाही हे निश्चित केले.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २५.०८.२०१४ च्या आपल्या निर्णयानुसार आणि २०१२ च्या डब्ल्यू.पी. (गुन्हेगारी) क्र. १२० मध्ये २४.०९.२०१४ च्या आदेशान्वये आणि इतर संबंधित बाबी, १९९३ पासून स्क्रीनिंग कमिटीद्वारे आणि सरकारी वितरण मार्गाने केलेल्या कोळसा खाणींचे सर्व वाटप बेकायदेशीर असल्याचे घोषित केले आहे आणि २०४ कोळसा खाणींचे वाटप रद्द केले आहे. कोळसा मंत्रालयाने आपल्या संकेतस्थळावर टाकलेल्या ०१.१०.२०१४ च्या पत्राद्वारे याची माहिती दिली आहे, ज्यात मच्छकटा-महानदी कोल ब्लॉकचाही समावेश होता.

त्यानंतर, कोळसा मंत्रालयाने कोळसा खाणीच्या आधीच्या वाटपाकडून मूल्यांकनाचा तपशील मागविला होता आणि त्यानंतर मूल्यांकनाचा तपशील देखील प्रतिज्ञापत्रावर सादर करणे आवश्यक होते. कोल ब्लॉकच्या विकासाबाबतची ही माहिती प्रतिज्ञापत्रावर सादर करण्यात आली. ही माहिती एमओसीने मागविली होती कारण भूवैज्ञानिक अहवाल, खाण योजना, खाण बंद योजना इत्यादी कागदपत्रे आणि अधिकार यशस्वी निविदाकाराला आधीच्या वाटपकर्त्याकडून हस्तांतरित करण्याची यंत्रणा आहे. कोळसा मंत्रालयाने मार्च, २०१५ पासून स्पर्धात्मक बोलीद्वारे कोळसा खाणीचे पुनर्वाटप केले आहे अशा प्रकरणांमध्ये कोळसा खात्याने पूर्व वाटपकर्त्याने केलेल्या खर्चाच्या मूल्यांकनाची प्रक्रिया हाती घेतली आहे.

मच्छकाटा - महानदी कोल ब्लॉक ३१ मार्च २०२० पर्यंत कोणत्याही निविदाकाराला पुन्हा वाटप करण्यात आलेला नाही आणि कंपनीने केलेल्या खर्चाच्या मूल्यांकनाबाबत कंपनीला कोळसा मंत्रालयाकडून कोणतेही पत्र मिळालेले नाही. हे लक्षात घेता, कंपनीच्या कोणत्याही मालमत्तेत बिघाड होऊ नये, असे व्यवस्थापनाचे मत आहे.

आर्थिक वर्ष २०१४-१५ पर्यंत ₹ ५४,४०,७०,१११/- इतका झालेला खर्च ताळेबंदातील इतर चालू नसलेल्या मालमत्तांअंतर्गत दर्शविण्यात आला होता. या खर्चामध्ये प्रामुख्याने कंपनी स्थापनेचा खर्च, भूवैज्ञानिक अहवालाच्या खरेदीसाठी सीएमपीडीआयएलला देयक, वॉशबिलिटी टेस्ट रिपोर्ट, सल्लामसलत, कायदेशीर आणि व्यावसायिक शुल्क आणि कोळसा खाणीच्या विकासासाठी केलेले विविध ऑपरेटिव्ह खर्च यांचा समावेश आहे. कंपनीचे असे मत आहे की मागील वर्षांत भूगर्भीय अहवालाच्या खरेदीसाठी केलेल्या खर्चाला खाण पायाभूत सुविधा खर्च म्हणू शकतो, ज्याचा दावा भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाकडे केला गेला आहे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने कोळसा खाण वाटप रद्द केल्यानंतर, कोळसा खाण (विशेष तरतूद) अध्यादेश, २०१४ नुसार आधीच्या वाटपकर्त्यांना नुकसान भरपाईचे मूल्यांकन सुरू केले होते. त्याला उत्तर देताना एमजीसीएलने कंपनीने केलेल्या खर्चाची माहिती दिली. शिवाय, एमओसीने आधीच्या वाटपकर्त्यांच्या खर्चाची मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली आहे ज्यामध्ये यशस्वी निविदाकारांना पुन्हा वाटप / निहित आदेश जारी करण्यात आले आहेत. मच्छकटा कोल ब्लॉक अद्‌याप कोणत्याही निविदाकाराला देण्यात आलेला नसल्यामुळे, एमओसीने मूल्यांकनासाठी त्याचा विचार केलेला नाही.

कोळसा खाणी (विशेष तरतुदी) अध्यादेश, २०१४ मधील मूल्यांकन प्रक्रिया आणि तरतुदींनुसार कंपनीला खर्चाची प्रतिपूर्ती गुणवत्तेवर असू शकते. सध्या, खर्चासाठी खात्यात कोणतीही तरतूद केली जात नाही, ज्याचा भरपाईसाठी एमओसीद्वारे विचार केला जाणार नाही. तथापि, एमओसीद्वारे मूल्यांकन प्रक्रियेस अंतिम रूप दिल्यानंतर, खात्यांमध्ये आवश्यक समायोजन/तरतूद केली जाईल.

**टिपा क्र.: ४२ अ विभागशः अहवाल देणे**

**( अ ) भौगोलिक माहिती :**

भौगोलिक माहितीमध्ये कंपनीच्या महसूल आणि चालू नसलेल्या मत्ता या कंपनीच्या रहीवासी देशात आणि इतर देशात असण्याबद्दलचे विश्लेषण केलेले असते. भौगोलिक माहिती सादर करताना, ग्राहकांची भौगोलिक स्थाने यांच्या आधारे विभागशः महसूल दाखविला जातो आणि चालू नसलेल्या मत्तांचे भौगोलिक स्थान यांच्या आधारे मत्तांचे विभागशः विश्लेषण असते.

| भूगोल | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षासाठी | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **१. महसूल** | २३३९२.४९ | २४६५६.३१ |
| भारतामध्ये | | |
| भारताबाहेर | निरंक | निरंक |
| **२. प्रमुख मोठ्या ग्राहकांची माहिती** | | |
| एकत्रित महसूल-१० टक्के पेक्षा जास्त (देणारा प्रत्येक ग्राहक) | | |
| भारत | २३३८५.३७ | २४४७२.१५ |
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित | | |
| भारतबाहेर | निरंक | निरंक |

**टिपा क्र.: ४२ ब**

**वित्तीय विवरण पत्रकाच्या विहीत मर्यादा खाली दिल्या आहेत**

| विहीत मर्यादाच्या बाबी | | मापनाचे एकक | विहीत मर्यादा |
|---|---|---|---|
| मालमत्ता, कारखाना व साधने यांच्या व्याख्येनुसार असलेल्या सुट्या भागांचे भांडवलीकरण | वैयक्तिकरित्या | **₹ कोटीत** | १०.०० |
| मागील वर्षाचे एकूण उत्पन्न / खर्च | संचयी | **₹ कोटीत** | ५०.०० |
| आकस्मिक दायित्वाचे प्रकटन | वैयक्तिकरित्या | **₹ कोटीत** | १.०० |
| भांडवली बांधिलकींचे प्रकटन | वैयक्तिकरित्या | **₹ कोटीत** | १.०० |
| ज्या स्थिर मत्तांची किंमत ₹ ५०००/- पर्यंत आहे आणि सर्व मोबाईल फोन यांचा त्यांच्या खरेदी वर्षात पूर्ण घसारा केला जातो. | | | |
| वित्त उभारणी साठीची कर्जे, अग्रिमे व त्यांचे खर्च | वैयक्तिककर्ज | **₹ कोटीत** | १.०० |
| **मत्ता व भाडेपट्टी, दायित्वे वापरण्यास मान्यता देणे** | | | |
| अ) वार्षिक भाडेपट्टी | प्रत्येक बाबतीस | **₹ कोटीत** | १.०० |
| बा) संबंधित मत्तांचे मूल्य | प्रत्येक बाबतीस | **₹ कोटीत** | १०.०० |

**टिपा क्र. ४३( अ )**

महानिर्मिती कंपनी महावितरण कंपनीला ऊर्जा विक्रीचे देयक, इंधन समायोजनाच्या आकाराचे देयक आणि अधिभार इत्यादी देयके देते. महावितरण कंपनीकडून मिळणाऱ्या पैशाचे विनियोजन प्रथम प्राप्ती प्रथम वजा या तत्वावर करण्यात येते. असे करण्यासाठी मिळालेली प्राप्त रक्कमेचा हिशेब विनियोजन विलंब भरण्याच्या आकाराच्या व्याजासोबत करण्यात येते. त्यानंतर महावितरणकडून देय असलेल्या मुद्दलांसोबत विनियोजन करण्यात येते.

व्यापारी येणी, कर्जे आणि अग्रिमे यांच्या शिलकी तो कायम होणे आणि जर असल्यास त्याचा मेळ करणे यांच्या अधीन आहे

**टिपा क्र. ४३( ब )**

महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड सोबत वीज खरेदी करार केलेला आहे. त्यातील वित्तीय अटींनुसार महानिर्मितीने विलंब भरणा अधिभार यावरील व्याजाची रक्कम ₹२५११.५१ कोटी यास महसुली मान्यता दिली. तसेच या अधिभाराचा वित्तीय वर्ष २००९-१० ते २०२०-२१ या कालावधीची संचित रक्कम ₹१४८६२.१० कोटी आहे. या रकमा कंत्राटानुसार मिळण्यास योग्य आहे. तसेच बहुवर्षीय वीजदर नियमनाने या अधिभारासाठी नियमीत वीज दराच्या व्यतिरिक्त तरतूद केलेली आहे.

दि ३१.०३.२०१८ रोजी महानिर्मिती आणि महावितरण या दोन्ही कंपन्यांची त्यांच्या लेखा नोंद वह्यांमध्ये विलंब भरणा अधिभार ₹ ७४८५.६१ कोटी दर्शविला. दि ३१-०३-२०१९ रोजी 'डी पी एस ची संचित रक्कम ₹ ९८०६.३० कोटी झाली होती. मात्र वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये महावितरणने एकतर्फी मताने या भरण्याच्या विनियोजनाच्या आदेशात बदल केला आणि डी पी एस ऐवजी थकीत मुद्दलचे समायोजन केले. तसेच हा बदल पूर्वलक्षी प्रभावाने करून टाकला आणि अधिभाराची रक्कम एकतर्फी ₹४८४३.२३ कोटीने कमी केली व तसे २८-०८-२०१९ रोजी कळविले. २०२०-२१ मध्ये कंपनीने विना देयक अधिभार प्राप्ती योग्य ₹ २५११.५१ कोटीला आधीपासून चालत आलेल्या कार्यपद्धतीनुसार मान्यता दिली.

महानिर्मिती सातत्याने हिशेब करून अधिभाराचे देयक विनियोजनाच्या आधारे करीत आहे. त्यानुसार प्रथम डीपीएसच्या पैशाचे समायोजन करून नंतर थकीत रकमेच मुद्दलाचे समायोजन केले जाते. कंपनीच्या व्यवस्थापनाचे असे मत आहे की या व्यवहाराचे वाणिज्यिक स्वरूप पाहता ही कार्यपद्धती अधिक योग्य आणि एकमेकांच्या सामंजस्याची आहे.

**टिपा क्र.४३( क ) कोविड १९ चे आघात**

भारतात आणि संपूर्ण जगात कोवीड-१९ ने सामान्यतः सर्वच आर्थिक व्यवहारांवर आघात केला आहे. वीजग्राहकांसाठी वीज निर्मिती करणे आणि तिची विक्री महावितरण कंपनीला करणे हा महानिर्मितीचा व्यवसाय आहे. वीज मत्तांची उपलब्धता वीज ग्राहकांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देणे हे कंपनीचे महत्वाचे काम आहे म्हणून कंपनीने लॉकडाऊनच्या अवघड काळातही मागणीप्रमाणे वीज निर्मिती करण्याचे कर्तव्य चालू ठेवले. याशिवाय भारताच्या रिझर्व बँकेने सुरू केलेल्या कर्जफेड सुविधेचाही दिलासा मिळाला, त्यामुळे येत्या वर्षातील रोकड सुलभतेच्या समस्या सुटण्यास हातभार लागला. वीज पुरवठा करणे ही एक जीवनावश्यक सेवा आहे, म्हणून व्यवस्थापन असे मानते की महासाथीचा गंभीर परिणाम कंपनीवर झालेला नाही. परिणामी, कंपनी जेव्हा देय असेल तेव्हा आपले वित्तीय दायित्वे पूर्ण करण्यात सक्षम असेल

**टिपा क्र. ४३( ड )**

महानिर्मिती कंपनी वित्तीय वर्ष २०१३-२०१४ पासून राज्याच्या वीज जाळयात रिॲक्टीव्ह वीज पुरवठा करीत आहे. महनिर्मितीने यासाठी महापारेषण कंपनीकडे ₹१४३.५२ कोटीची वीज देयके वित्तीय वर्ष २०२०-२०२१ पर्यत पाठविला. पंरतू महाराष्ट्र विज नियामक आयोगाने त्यांच्या वीज दराच्या आदेशात म्हटले आहे की, भूतकाळात रिॲक्टीव्ह ऊर्जाचा समन्वय करण्याची यंत्रणा पूर्णपणे अंमलात आणली नसल्याने, तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ यासह मागील वर्षातील समायोजनाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे आयोगाने त्या कालावधीतील रिॲक्टीव्ह ऊर्जा आकारांना मान्यता दिलेली नाही. (वर्ष २०१८-१९ पर्यंतची). कंपनीने वित्तीय वर्ष २०१८-१९ पर्यंतच्या रिॲक्टीव्ह वीज आकार याच्या समतूल्य रक्कम ₹१२६.९८ कोटी इतकी बुडीत कर्जासाठी तरतूद केली आहे. मात्र वरील आदेशाविरोधात ॲपलेट न्यायाधिकरणाकडे तक्रार दाखल केली आहे,

**टिपा क्र.: ४३( इ )**

सर्वोच्च न्यायालयाने दि २८ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रादेशीक भविष्य निर्वाह निधी विरूद्ध विवेकानंद विद्यामंदीर आणि इतर या प्रकरणी निर्णय दिला. भविष्य निर्वाह निधीमध्ये अन्य काही मत्तांचा समावेश करण्यासंबंधीचा हा निर्णय आहे. कंपनी या आदेशाच्या प्रभावाने मूल्यमापन करीत आहे. मराविम कंपनी समूहाच्या भविष्य निर्वाह निधी विश्वस्त यांच्याशी कर्मचाऱ्यांनाही जो नियमित भरणा दिला जातो त्याचे आकस्मिक दायित्व हयात परिणाम होऊ शकेल. त्यातील महानिर्मितीच्या रकमेचा अंदाज अद्याप निश्चित नाही. याविषयी स्पष्टता झाल्यावर रक्कम निश्चित होईल. मात्र हा परिणाम खूप मोठा नसेल असे व्यवस्थापनाचे मत आहे.

**टिपा क्र. ४४ वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांचे वर्गीकरण**

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | | | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नफा व तोटा या पत्रकाद्वारे रास्त मूल्य | इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य | मूल्य घटानंतर किंमत | नफा व तोटा या पत्रकाद्वारे रास्त मूल्य | इतर सर्वकष उत्पन्नाद्वारे रास्त मूल्य | मूल्य घटानंतर किंमत |
| **वित्तीय मता** | | | | | | |
| (१) व्यापारी येणी | | | २४,५१८.१८ | | | १७,८०३.६८ |
| (२) रोख व रोख सममूल्य | | | ५७.५१ | | | ४.९३ |
| (३) वरील (२) व्यतिरिक्त बँकेतील शिल्लक | | | | | | |
| (४) कर्जे | | | ५.७७ | | | ७.६५ |
| (५) इतर वित्तीय मत्ता | | | ३,०५९.५० | | | २,७८४.८६ |
| एकूण | - | - | २७,६४०.९९ | - | - | २०,६०१.१४ |
| **वित्तीय दायित्वे** | | | | | | |
| (१) कर्जे - उसनवारी | | | ३२,९२५.७५ | | | ३०,८२८.८० |
| (२) व्यापारी देणी | | | ३,२८१.५७ | | | २,२५१.९१ |
| (३) इतर वित्तीय दायित्वे | | | ११,२१९.५४ | | | ९,५२१.६३ |
| एकूण | - | - | ४७,४२७.३१ | - | - | ४२,६०२.६३ |

**वित्तीय जोखीमांचे व्यवस्थापन:**

**जोखीम व्यवस्थापनांचा आकृतीबंध**

सर्व सामान्य कार्य करताना, कंपनीच्या कृतींना विविध धोक्यांना सामोरे जावे लागते. त्यातील काही धोके वित्तीय विलेखासंबंधीचे आणि हे विलेख ज्या बाजारपेठेत कार्यरत असतात त्यासंबंधी असतात. महानिर्मिती कंपनीची स्वत:ची जोखीम व्यवस्थापनाची यंत्रणा असून तिचे नियमित अंतराने संचलन केले जाते. महागुज कोलायरीज मर्यादित, महाजेम्स मर्यादित आणि धोपावे कोस्टल पॉवर मर्यादित यांचे बाबत बँका, वित्तीय संस्था यांची कोणतीही कर्जे नाहीत.

**४४ अ नियमकांमुळे जोखिम**

महानिर्मिती कंपनी तिच्या वार्षिक महसूल गरजा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना सादर करते. त्यांनी मंजूर केलेल्या दरपत्रकाच्या आधारे महानिर्मिती ग्राहकांना मासिक उर्जा देयके देते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेले दर या आयोगाच्या (बहुवर्षीय वीज दर) पत्रकावर आधारलेले असतात. या दरात ठराविक कालावधीनंतर सुधारणा होते. या आयोगाच्या नियमकांच्या प्रमाणक मापदंडानुसार दर निश्चिती होते. या प्रमाणित मापदंडात किंवा नियमनाच्या मार्गदर्शक तरतुदीमध्ये कोणतेही बदल झाल्यास त्यांचे परिणाम महानिर्मितीच्या वीज विक्रीच्या महसूलावर होतात.

**४४ ब. कंपनीचे वित्तीय धोके ओळखून त्याच्या तीन श्रेणी केल्या आहेत त्या अशा १) पत जोखीम २) रोकड सुलभता ३) बाजारातील जोखीमा, या प्रत्येक श्रेणीतील धोक्यांचे उगमस्थानाचा तपशील आणि कंपनी या धोक्यांचे करीत असलेले व्यवस्थापन याचे स्पष्टीकरण खालील टिपांमध्ये केले आहे.**

**टिपा क्र. ४४ ब - १ पत जोखीमा:**

जेव्हा कंपनीचा ग्राहक किंवा अन्य व्यवहारातील संस्था तिचे करारानुसार असलेली बंधने पूर्ण करू शकत नाही, तेव्हा कंपनीला वित्तीय नुकसान करणारी पत विषयक जोखीम उद्भवते. त्यामूळे ग्राहकांकडील येणी आणि गुंतवणूकीच्या प्रतिभूती याबाबत धोके निर्माण होतात. म्हणून कंपनी संशयास्पद ऋणे येणी आणि कमी होणारी प्राप्ती यासाठी भरपाईची तरतूद करते. तसेच व्यापारातून आणि इतर येणी व गुंतवणूकी यांचे तोट्यांचा अंदाज कंपनी करून ठेवते. खाली दिलेल्या वित्तीय विलेखांच्या प्रकरणी पत पुरवठ्यांवर होणारे कमाल धोके हे त्यांच्या निर्देशित रकमांच्या संदर्भात मर्यादित केले जातात.

**व्यापारी येणी**

**महाजेनको :** व्यापारी येण्यांच्या (चांगली मानलेल्या) अपेक्षित पत तोट्यांचा अंदाज करण्यासाठी कंपनी शासकीय बॉण्डचा, उत्पन्नाच्या संबधित वर्षासाठी सवलत घटक म्हणून वापर करते आणि अशा व्यापारी येण्यांशी संलग्न असणाऱ्या वेळेच्या मुल्यांच्या धोक्यांचे निर्धारण करते. व्यापारी येण्याचा संबंध महावितरणाला पुरविलेल्या वीजेच्या येण्याशी आहे. ही सहोदर कंपनी असल्याने तसेच सार्वभौम संस्था असल्याने तिच्या व्यवहारात पत संबंधीचा धोका असल्याचे वाटत नाही. पत संबंधातील धोके दर्शन व तोट्यांची तजवीज (अपेक्षित पत तोट्याच्या तरतुदीसह) यांची माहिती खालील तक्यात दर्शविली आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | |
|---|---|---|---|---|
| | ठोक धरलेली रक्कम | तोट्यासाठी तजवीज | ठोक धरलेली रक्कम | तोट्यासाठी तजवीज |
| मागील येणे ०-९० दिवस | २४,५१८.१८ | - | १७,८०३.६८ | - |
| मागील येणे ९०-३६० दिवस | - | - | - | - |
| ३६० पेक्षा जास्त दिवस | १६७.१५ | १६७.१५ | १६७.१५ | १६७.१५ |
| एकूण | २४,६८५.३२ | १६७.१५ | १७,९७०.८२ | १६७.१५ |

या वर्षात व्यापारी येण्याच्या संदर्भातील अपेक्षित पत तोट्यासाठी केलेल्या तजवीजीचे स्थानांतर खालील तक्त्यात दिले आहे.

(₹ कोटीत)

| | |
|---|---|
| **३१.०३.२०१९ ची शिल्लक** | **१६७.१५** |
| अधिक: मान्य केलेला अपेक्षित पत तोटा | - |
| वजा: निलंबित केलेली रक्कम | - |
| **३१.०३.२०२० ची शिल्लक** | **१६७.१५** |
| अधिक: मान्य केलेला अपेक्षित पत तोटा | - |
| वजा: निलंबित केलेली रक्कम | - |
| **३१.०३.२०२१ ची शिल्लक** | **१६७.१५** |

रोख व रोख सममूल्य

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी | ३१.०३.२०२० रोजी |
|---|---|---|
| **रोख व रोख सममूल्य** | ५७.५४ | ४.९६ |

**कर्ज प्रतिभूती मधील गुंतवणूकी**

महानिर्मिती उपकंपन्या कर्ज प्रतिभूती मधील गुंतवणूकी/संयुक्त साहय कंपन्या यात गुंतवणूकी केल्या आहेत.

**टिपा क्र.४४ ब-रोकड सुलभतेचे धोके**

**महाजेनको :** रोकड सुलभतेचे धोके म्हणजे जेव्हा कंपनी तिची वित्तीय बंधने वेळेत पूर्ण करू शकत नाही ते धोके. कंपनी तिचे व्यवहार आणि वित्तीय आश्वासने वेळेवर पूर्ण करण्याची हमी मिळावी म्हणून रोकड सुलभतेचे प्रभावी व्यवस्थापन करण्यावर लक्ष केंद्रीत करते. कंपनीच्या कर्जावर पूरेशा मर्यादा असतात, त्याला भागधारक व मंडळाची योग्य मान्यता असते. कंपनीच्या रोकड सुलभतेच्या स्त्रोतामध्ये प्रवर्तनीय रोकडता प्रवाह. रोख व समतूल्य बँकाचे निधी व विना निधी आधारीत प्रवाह यांचा समावेश होतो. उद्योग व्यवसायाचे काम सुरळीत व सतत चालू रहावे यासाठी रोख व निधी प्रवाह व्यवस्थापन याकडे लक्ष दिले जाते.

**१ ) वित्तीय रचना:**

**महाजेनको :** कंपनीच्या विविध बँकातील निधी व विनानिधी यावर मर्यादा असतात. कंपनीचे भागधारक आणि मंडळ यांनी मंजूर केलेल्या कर्ज, उसनवारी यांच्या मर्यादा पुरेशा आहेत. कंपनीच्या पतस्थितीला दर्जा देणाऱ्या नामांकित संस्थांकडून चांगला दर्जा मिळाल्यास देशांतर्गत बाजारपेठेकडून निधी प्राप्त होण्यास त्याची मदत मिळते. निधीच्या स्त्रोताची विविधता आणि शक्तीवान रोकडता प्रवाह, आवश्यक भांडवली शिस्त राखण्यासाठी सक्षम असते. महानिर्मिती कंपनीने तिच्या भांडवली पुरवठ्याच्या रचनेत विविधता ठेवली आहे. यामध्ये कालानुसार मुदत पूर्ण होणाऱ्या ठेवी आणि चलनी पैसा यांच्या वित्तीय उत्पादनाचे मिश्रण आहे. या वित्तीय उत्पादनामध्ये खरेदीदारांचे क्रेडीट लोन, स्वच्छ व प्रतिभूती असलेली देशातंर्गत मुदतीची कर्जे (भारत सरकार, महाराष्ट्र शासनाकडून व महाराष्ट्र सरकार कडून परतफेडीची वसूली करण्याचा तत्त्वावर) इत्यादी यांचा समावेश होतो. महानिर्मिती कंपनी देशातंर्गत तसेच जागतिक बँक, आर बी आर डी आणि के एफ डब्ल्यू यासारख्या परदेशी वित्तीय संस्थांशी संपर्क साधून योग्य प्रकारे विविध स्वरूपात निधी मिळविते. यामध्ये भौगोलिक वैविध्यही आहे.

**२ ) वित्तीय दायित्वांची मुदत पूर्ण होणे**

करारानुसार आणि पात्र नसलेल्या रोकडता प्रवाहातील रकमा खालील तक्त्यात प्रकट केल्या आहेत (₹ कोटीत)

| तपशील | कंत्राटचा रोकडता प्रवाह | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०२१ | | | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | | |
| | १ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा अधिक | १ वर्षापर्यंत | १ ते ३ वर्ष | ३ वर्षापेक्षा अधिक |
| **डेरिव्हेटीव्ह नसलेले वित्तीय दायित्वे** | | | | | | |
| कर्जे (दीर्घ मुदतीत) | ३,९९८.४३ | ६,११०.७६ | १६,३४१.४४ | ३,३४०.४५ | ६,१६२.५० | १६,५६४.५१ |
| खेळत्या भांडवलातील उसनवारी | १०,४७३.५५ | | | ८,१०१.७९ | | |
| व्यापारी येणी | ३,२८१.५७ | | | २,२५१.९३ | | |
| इतर दायित्वे | ११,२१८.५४ | | | ९,५२१.०८ | | |
| **एकूण** | **२८,९७२.०९** | **६,११०.७६** | **१६,३४१.४४** | **२३,२१५.२५** | **६,१६२.५०** | **१६,५६४.५१** |

**टिपा क्र. ४४ क - बाजारपेठेतील धोके**

**बाजारातील धोक्यांचे पुढील तीन धोक्यांमध्ये वर्गीकरण केले आहे : १ ) चलनातील धोके २ ) व्याजदरातील धोके ३ ) वस्तुसंबंधी धोके**

**टिपा क्र. ४४ क -१ चलनातील धोके**

कंपनीने के एफ डब्ल्यू जर्मनी आणि (जागतिक बँक) आय बी आर डी यांचेकडून परकीय चलनात घेतलेल्या कर्जांना परकीय चलनातील बदलाचे धोके संभवतात. आम्हांला ४.९२ कोटी यूरो आणि ३.८६ कोटी यू एस डॉलर अशी कर्जे आढळली. मात्र कंपनी दर नियमनाच्या वातावरणात काम करते परिणामी परकीय चलनातील बदलाची समस्या प्रत्यक्ष ग्राहकांकडील वसूलीने हातात येऊ शकते. म्हणून परकीय चलनातील बदलांचा मोठा धोका कंपनीला नाही.

**टिपा क्र. ४४ क -२ व्याजदरातील धोके**

व्याज दरातील धोके हाताळणे.

कंपनीचे व्याज दर जोखीम कर्ज घेण्यापासून उद्भवते कंपनीच्या व्यवस्थपानाला दिलेल्या अहवालानुसार कंपनीच्या व्याज पत्करणाऱ्या वित्तीय विलेखाचे व्याज दराजे प्रोफाइल खाली दिल्याप्रमाणे.

| तपशील | निर्देशित रक्कम ₹ कोटीत पुनर्लिखित | |
|---|---|---|
| | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० |
| **स्थिर दरांचे विलेख** | | |
| वित्तीय मत्ता | - | - |
| वित्तीय दायित्वे | ४०५.९६ | ४०८.९४ |
| **दर बदल होणारे विलेख** | | |
| वित्तीय मत्ता | - | - |
| वित्तीय दायित्वे | ३६,५१८.२३ | ३३,७६०.३२ |

**दर बदल होणाऱ्या विलेखासाठी रोकडता प्रवाहाचे सूक्ष्म ग्रहिता विश्लेषण**

अहवालाच्या तारखेला व्याज दरात २५ आधार बिंदू इतका रास्त व शक्य बदल झाला असता तर त्यामुळे नफा किंवा तोटा यात होणारी वाढ/(घट) खालील तक्त्यात दिली आहे. तसेच निदर्शक २५ आधार बिंदू (०.२५ टक्के) स्थलांतर हे केवळ दिशादर्शक आहे आणि त्यातून व्यवस्थापनाचे व्याज दर बदलाचे अंदाज व्यक्त होत नाहीत.

या विश्लेषणात असे गृहित धरले आहे की, इतर सर्व फरक, विचलन विशेषत: परकिय चलन विनिमय दर हे स्थिर आहेत.

| तपशील | नफा किंवा तोटा | | | |
|---|---|---|---|---|
| | २५ आधार बिंदू वाढ | २५ आधार बिंदू घट | २५ आधार बिंदू वाढ | २५ आधार बिंदू घट |
| | ३१.०३.२०२१ | | ३१.०३.२०२० पुनर्लिखित | |
| तरता दराचे कर्ज | ९१.३० | (९१.३०) | ८४.४० | (८४.४०) |
| व्याज दर अदलाबदल (संकल्पनेतील मुद्दल रक्कम) | - | - | - | - |
| रोकडता प्रवाहाची संवेदनशिलता ( निव्वळ ) | ९१.३० | ( ९१.३० ) | ८४.४० | ( ८४.४० ) |

**टिपा क्र.४४ सी - ३ वस्तू संबंधी धोके**

कंपनीचे कार्य हे जेथे दराचे नियमन केले जाते अशा वातावरणात चालते. कंपनीच्या खर्चात मुख्य वाटा कोळशाच्या खर्चाचा आहे. कोळसा खर्चातील प्रत्यक्ष बदलाची वसूली ग्राहकांच्या येण्यातून करण्यास परवानगी आहे. मात्र ती कामगिरीचे मापदंड पूर्ण करण्याच्या अटीच्या अधीन आहे. म्हणून कोळसा किंमतीतील बदलाचा कंपनीस मोठा धोका नाही.

**टिपा क्र. ४५ भाडेपट्टी**

**अ ) भाडेकरू म्हणून भाडेपट्टी**

महानिर्मिती कंपनी जलविद्युत निर्मिती केंद्रे, जमिनी, कार्यालयाच्या जागा, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने आदि हेतूसाठी भाडयाने जागा कराराने घेते करार रद्द करणे / न करणे अशा स्वरूपाचे असतात. भारतीय लेखा मानक ११६ यातील बंधनकारक तरतूदीनुसार कंपनीने

तिच्या ताळेबंदात मत्ता वापरण्याचे हक्क आणि त्यानुसार भाड्याचे दायित्व यांना मान्यता दिलेली आहे. याचा परिणाम म्हणून भाड्याच्या मत्तांचा घसारा आणि भाडेपट्टीच्या दायित्वांचे व्याज यांना नफा-तोटा पत्रकात मान्यता देण्यात आलेली आहे.

रद्द न करण्याचा भाडेपट्टीच्या देय रकमेच्या संदर्भात अघोषित रोख बर्हिगमण खालीलप्रमाणे.

**अ ) भाड्याच्या दायित्वांतील बदल** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरीता | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षाकरीता |
|---|---|---|
| **१ एप्रिल २०२० रोजीची शिल्लक** | **३,५३८.१८** | **-** |
| भर | | ३६८५.५१ |
| या मुदतीत उपार्जित वित्त खर्च | ३६२.६९ | ३७७.७२ |
| भाडेपट्टी दायित्वाचा भरणा | ५१३.५८ | ५२५.०६ |
| **३१ मार्च २०२१ रोजीची शिल्लक** | **३३८७.२९** | **३५३८.१८** |

**ब ) भाडेपट्टी दायित्वाच्या मुदतपूर्तीचे विश्लेषण** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरीता | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षाकरीता |
|---|---|---|
| मुदतपूर्तीचे विश्लेषण-कंत्राटानुसार विना सवलतीचा रोकडता प्रवाह | | |
| एक वर्षासाठी | ४७१.०५ | ४८०.७८ |
| एक ते पाच वर्षासाठी | १७९६.५९ | २२६७.६४ |
| पाच वर्षापेक्षा जास्त | ४६९५.५४ | ४६९५.५४ |
| **एकूण विनासवलत भाडे दायित्व** | **६९६३.१८** | **७४४३.९६** |

**क ) नफा तोटा पत्रकात मान्यता दिलेल्या रकमा** (₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरीता | ३१.०३.२०२० रोजी संपलेल्या वर्षाकरीता |
|---|---|---|
| भाडेपट्टी दायित्वाचे व्याज | ३६२.६९ | ३७७.७२ |
| भाडेपट्टीच्या मत्ताचा घसारा | २५४.०४ | २५३.९४ |

**वीज खरेदी व्यवस्थेत भाडेपट्टीची निश्चिती**

महानिर्मिती कंपनीने महावितरण या कंपनी सोबत वीज खरेदी करार केलेला आहे. महानिर्मितीने निर्माण केलेल्या विजेचा बहुतांश वाटा महावितरणला विकण्यात येतो, म्हणून भारतीय लेखा मानक १७ मधील परिशिष्ट सी यातील अटीनुसार कंपनीने वीज खरेदी कराराचे परिक्षण केले. जेणेकरून या व्यवस्थेत भाडेपट्टी संबंधी तरतूद आहे किंवा कसे हे समजावे. त्यातून असे निदर्शनास आले की, या करारानुसार महावितरण कंपनीला मत्ता वापरण्याचा हक्क आहे. मात्र वीज निर्मितीसाठी उपलब्ध वीज केंद्राची देखभाल केलेली नसल्यामुळे होणारे तोटे महानिर्मिती कंपनीला सोसावे लागतील. त्यासाठी या मर्यादेतील जोखिमा आणि मोबदले यांचे महावितरणकडे हस्तांतरण केलेले नाही. यामुळे ही व्यवस्था वित्तीय भाडेपट्टीचे निकष पूर्ण करीत नाही.

**टिपा क्र. ४६ प्रतिभाग मिळकत**

समभाग धारकांना देय असलेल्या प्रतीभाग मिळकतीचा हिशेब वर्षातील नफ्याला त्यावर्षातील भारीत सरासरी इक्विटी शेअर्सच्या संख्येने भागून केला जातो.

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| समभाग धारकांना देय नफा: मूळ प्रतिभाग मिळकतीसाठी (₹) | २७२.३० | १५७.५९ |
| समभाग धारकांना देय नफा: सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीसाठी (₹) | २७२.३० | १५७.५९ |

**२. सामान्य वेटेड ॲव्हरेज शेअर्सची संख्या:**

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| दिलेल्या तारखेला समभागाची संख्या | २५,४१०,०९६,९११ | २५,४१७,३८१,०४८ |
| मूळ आणि सौम्यकृत प्रतिभाग मिळकती साठा वेटेड ॲव्हरेज शेअर्सची संख्या | २५,४१०,०९६,९११ | २५,४१७,३८१,०४८ |
| मूळ आणि सौम्यकृत प्रतिभाग मिळकत (₹) | ०.११ | ०.०६ |

**टिपा क्र. ४७ भांडवल व्यवस्थापन**

कंपनीच्या भागधारकांना विश्वास कायम असावा आणि भविष्यात उद्योग कायम चालावा यासाठी शक्तीशाली भांडवल पाया असला पाहिजे असे कंपनीचे धोरण आहे. भांडवलाच्या परताव्याकडे व्यवस्थापन लक्ष देत असते.

कंपनी कर्ज व समभाग यांच्या गुणोत्तराचा उपयोग करून भांडवलाचे निरिक्षण करते. दि. ३१ मार्च २०२१ रोजी कंपनीचे कर्ज समभाग गूणोत्तर खालीलप्रमाणे आहे.

(₹ कोटीत)

| तपशील | ३१.०३.२०२१ | ३१.०३.२०२० पुनर्लिखित |
|---|---|---|
| दिर्घ मुदतीची कर्जे (₹ कोटीत) | २२,४५२.२० | २२,७२७.०१ |
| समभाग भांडवल (₹ कोटीत) | २५,४०७.९७ | २५,३४३.९७ |
| कर्ज व समभाग यांचे गुणोत्तर | ०.८८ | ०.९० |

**टिपा क्र. ४८ लाभांश**

कंपनीने आतापर्यत लाभांश घोषित केलेला नाही.

**टिपा क्र. ४९ मागील वर्षाच्या आकडेवारीचे जेथे गरज असेल तेथे पुर्नवर्गीकरण केलेले आहे.**

## दीर्घ मुदतीचे कर्जे ( जोडपत्र अ )

(₹ कोटीत)

| अनु. क्र. | कर्ज देणाऱ्याचा तपशील | कर्जाचे स्वरूप | ३१.३.२०२१ रोजीची थकीत शिल्लक | १ वर्षात परतफेड करावयाच्या कर्जांना चालू दायित्व मानावे | दीर्घ मुदतीची निव्वळ कर्ज | परतफेडीची पद्धती | व्याज दर | प्रतिभूतीचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पीएफसी | नवीन परळी विस्तार युनीट – २ | ३५६.३४ | ७१.२८ | २८५.०६ | ६० समान तिमाही हफ्ते एप्रिल २०११ पासून प्रारंभ | ९.५०% | भविष्यात प्रकल्पासाठी निर्माण मत्ता, जमिनीसह गहाण/तारण |
| २ | पीएफसी | पारस विस्तार प्रकल्प युनीट – २ | ४४४.५२ | ८८.९२ | ३५५.६० | ६० समान तिमाही हफ्ते एप्रिल २०११ पासून प्रारंभ | ९.५०% | भविष्यात प्रकल्पासाठी निर्माण मत्ता, जमिनीसह गहाण/तारण |
| ३ | पीएफसी | कोराडी औ. वि. केंद्रात आर ॲण्ड एम कामे | ०.६५ | ०.६५ | ०.०० | ४८ समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २००८ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्राच्या युनिट १ च्या ३८० कोटी रुपयांचे एसजी व टीजी आणि इतर भेल पॅकेजचे जंगम मालमत्ता, गहाण/तारण |
| ४ | पीएफसी | भुसावळ, परळी आणि पारस येथे आर ॲण्ड एम कामे | ०.१७ | ०.१७ | ०.०० | ४८ समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २००९ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्राच्या युनिट १ च्या ३८० कोटी रुपयांचे एसजी व टीजी आणि इतर भेल पॅकेजचे जंगम मालमत्ता, गहाण/तारण |
| ५ | पीएफसी | नाशिक औ. वि. केंद्रात युनिट १ व २ चे आर ॲण्ड एम कामे | ०.७१ | ०.७१ | ०.०० | ४८ समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २००९ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्राच्या युनिट १ च्या ३८० कोटी रुपयांचे एसजी व टीजी आणि इतर भेल पॅकेजचे जंगम मालमत्ता, गहाण/तारण |
| ६ | पीएफसी | नाशिक औ. वि. केंद्रात रेल्वे सायडिंग सिस्टीम यांचा दर्जा उंचावणे | १.०४ | १.०४ | ०.०० | ४८ समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २००९ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्राच्या युनिट १ च्या ३८० कोटी रुपयांचे एसजी व टीजी आणि इतर भेल पॅकेजचे जंगम मालमत्ता, गहाण/तारण |
| ७ | पीएफसी | कोराडी औ. वि. केंद्रात ॲश बंड | ०.८९ | ०.८९ | ०.०० | ४८ समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २००९ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्राच्या युनिट १ च्या ३८० कोटी रुपयांचे एसजी व टीजी आणि इतर भेल पॅकेजचे जंगम मालमत्ता, गहाण/तारण |

| अनु. क्र. | कर्ज देणाऱ्याचा तपशील | कर्जाचे स्वरूप | ३१.३.२०२१ रोजीची थकीत शिल्लक | १ वर्षात परतफेड करावयाच्या कर्जांना चालू दायित्व मानावे | दीर्घ मुदतीची निव्वळ कर्ज | परतफेडीची पद्धती | व्याज दर | प्रतिभूतीचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पीएफसी | महानिर्मितीच्या विविध औ. वि. केंद्रात बॉयलर इकॉनोमायझर एल टी एस एच कॉईल्स आणि वॉटर वॉल पॅनल्स बदलण्याची आवश्यक आर ॲण्ड एम योजना | ५.०५ | ३.३७ | १.६८ | ४८ समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१० पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्राच्या युनिट १ च्या ३८० कोटी रुपयांचे एसजी व टीजी आणि इतर भेल पॅकेजचे जंगम मालमत्ता, गहाण/तारण |
| ९ | पीएफसी | चंद्रपूर महा. औ. वि. केंद्रात युनीट ५, ६ व ७ साठी समान सुटा भाग स्वरूपात म्हणून एल पी रोटरचे प्रापण | ९.५४ | २.३९ | ७.१६ | ४८ समान तिमाही हफ्ते एप्रिल २०१३ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्राच्या युनिट १ च्या ३८० कोटी रुपयांचे एसजी व टीजी आणि इतर भेल पॅकेजचे जंगम मालमत्ता, गहाण/तारण |
| १० | पीएफसी | कोराडी औ वि. केंद्र विस्तार प्रकल्प (३×६६० मे. वॅट) | ७४९६.३७ | ६६६.४० | ६८२९.९७ | ६० समान तिमाही हफ्ते जूलै २०१७ पासून प्रारंभ | १०.३८% | (३×६६० मे. वॅट) कोराडी विस्तार औ. वि. केंद्रात सर्व चल आणि अचल मत्ता यावर एकाच वेळी आकारणी यामध्ये चल यंत्रे, यंत्राचे सुटे भाग, अवजारे आणि सहायक साधने व सामान (प्रकल्पाच्या जागेवर) सध्या व भविष्य काळात त्या सोबत १.२५ घट कव्हरेज यासह |
| ११ | पीएफसी | कोराडी औ. वि. केंद्रातील युनीट ५, ६ व ७ साठी आर ॲण्ड एम | ४.९० | ०.४८ | ४.४२ | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१६ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| १२ | पीएफसी | परळी औ. वि. केंद्राच्या माजलगाव उपसा सिंचन योजनेपासूनच्या पाणी पुरवठा योजनेचे आर ॲण्ड एम काम करणे | १०६.५० | १४.२० | ९२.३० | ४० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१८ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| १३ | पीएफसी | चंद्रपूर महा. औ. वि. केंद्रात बॉयलर व टर्बाइनचे आर ॲण्ड एम काम | ६६.४६ | ५.३२ | ६१.१४ | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१८ पासून प्रारंभ | १०.६८% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| १४ | पीएफसी | चंद्रपूर महा. औ. वि. केंद्रात युनिट ५ व ६ च्या राख हाताळणी यंत्रणेचे आर ॲण्ड एम काम | ४.४७ | ०.४७ | ४.०० | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१५ पासून प्रारंभ | १०.६४% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |

| अनु. क्र. | कर्ज देणाऱ्याचा तपशील | कर्जाचे स्वरूप | ३१.३.२०२१ रोजीची थकीत शिल्लक | १ वर्षात परतफेड करावयाच्या कर्जांना चालू दायित्व मानावे | दीर्घ मुदतीची निव्वळ कर्ज | परतफेडीची पद्धती | व्याज दर | प्रतिभूतीचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | पीएफसी | चंद्रपूर महा. औ. वि. केंद्राचे युनिट ५ व ६ यांच्या कुलींग सिस्टीम कंडेसरचे आर ॲण्ड एम काम | १५.४६ | १.६३ | १३.८३ | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१५ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| १६ | पीएफसी | नाशिक औ. वि. केंद्र टप्पा २ (३×२१० मे. वॅट) युनीट ३,४,५ यांच्या प्रक्रीया सुधारणेसाठी आर ॲण्ड एम काम | २.४३ | ०.२९ | २.१४ | ४० समान तिमाही हफ्ते जुलै २०१९ पासून प्रारंभ | १०.६५% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| १७ | पीएफसी | भुसावळ केंद्रात कोळसा वापराचे मापन व निरिक्षण यासाठी आर ॲण्ड एम काम | ०.४३ | ०.०४ | ०.३९ | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१६ पासून प्रारंभ | १०.६५% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| १८ | पीएफसी | भुसावळ केंद्रातील बॉयलर अँड टर्बाइन सुधारणा योजना (स्टेशन हिट सुधारणा) आर ॲण्ड एम काम | ५.३६ | ०.५१ | ४.८५ | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१६ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| १९ | पीएफसी | भुसावळ केंद्रात टर्बाइन ऑक्झिलरी परफॉर्मन्स इम्प्रूव्हमेंट स्किम आर ॲण्ड एम कामें | ५.४६ | ०.५२ | ४.९४ | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१६ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| २० | पीएफसी | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ साठी बीएफपी (२०० के एच आय) कार्ट्रीज बदलून तेथे उर्जा कार्यक्षम कार्ट्रीज साठी आर ॲण्ड एम काम | ४.७४ | ०.५० | ४.२४ | ६० समान तिमाही हफ्ते ऑक्टोबर २०१५ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |
| २१ | पीएफसी | उरण जीटीपीएस च्या स्टेज २ च्या जी टी ऑ टोमेशन सिस्टीम स्टार्टींग फ्रिक्वेन्सी कन्व्हर्टर ॲण्ड स्टॅटीक एक्सायटेशन सिस्टीम युनीट ७ व ८ येथे | १०.३९ | १.१९ | ९.२१ | ६० समान तिमाही हफ्ते जानेवारी २०१५ पासून प्रारंभ | १०.७२% | परळी औ. वि. केंद्रातील युनीट ३, ४ व ५ यांच्या एकत्रित मत्ता जमिनीसह |

| अनु. क्र. | कर्ज देणाऱ्याचा तपशील | कर्जाचे स्वरूप | ३१.३.२०२१ रोजीची थकीत शिल्लक | १ वर्षात परतफेड करावयाच्या कर्जांना चालू दायित्व मानावे | दीर्घ मुदतीची निव्वळ कर्ज | परतफेडीची पद्धती | व्याज दर | प्रतिभूतीचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
